विषय निबंध
क्र. १४८२

# माध्यमिक शिक्षण कांहीं समस्या

[redacted]

[redacted]

REFBK-0013096
REFBK-0013096

व्हीनस प्रकाशन

# माध्यमिक शिक्षण

[ काही समस्या ]

☆

REFBK-0013096

व्हीनस प्रकाशन : पुणें

मार्च : १९६३

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
"तपश्चर्या"
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

# निवेदन —

'व्हीनस प्रकाशन'च्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने आम्ही या वर्षी जी नवी प्रकाशने प्रसिद्ध केली त्यात माध्यमिक शिक्षणावरील या ग्रंथाचे महत्त्व विशेष आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची घडी जी नव्याने बसली जात आहे व जिच्यायोगे नवभारताच्या बांधणीस मदत होत आहे तिला आमच्या या उपक्रमाने मदतच होईल अशी आशा आहे.

माध्यमिक शिक्षण घेणारा विद्यार्थी हा संस्कारक्षम वयाचा असल्याने याच वेळी विशेष काळजीपूर्वक अशी शिक्षणाची पुनर्घटना व्हावयास हवी. नव्या समाजाच्या नव्या गरजा लक्षात घेता आज जे महत्त्वाचे प्रश्न शिक्षणाच्या क्षेत्रात माध्यमिक शाळांपुरते उपस्थित झाले आहेत त्यातील काही महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार अधिकारी व्यक्तींकडून या ग्रंथात झालेला आहे. गेल्या तीन-चार महिन्यातील बदललेल्या परिस्थितीचा विचार करता लष्करी शिक्षणावरील लेख विशेष महत्त्वाचा मानावा लागेल. या ग्रंथाच्या निर्मितीस ज्या ज्या अधिकारी लेखकांनी आम्हांस साह्य दिलें त्यांना मनःपूर्वक धन्यवाद! आमचे मित्र श्री. य. गो. नित्सुरे, डॉ. द. न. गोखले, डॉ. प्र. न. जोशी यांची आम्हांस नेहमीप्रमाणे याही वेळी बहुमोल मदत झाली हे नमूद करण्यात आम्हांस विशेष आनंद होत आहे.

असो; महाराष्ट्रातील विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ यांना आमचा हा उपक्रम पसंत पडेल अशी आशा आहे.

१० मार्च १९६३ —प्रकाशक

♣ ♣ ♣

लेखमाला :


१. डॉ. ग. श्री. खैर

माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व गुणवत्ताप्रमाण ... १–२०

२. चंद्राबाई कर्नाटकी

स्त्री-शिक्षणाची दिशा व धोरण ... २१–४४

३. दि. ह. सहस्रबुद्धे

शिक्षणव्यवस्थेचे अर्थशास्त्र ... ४५–६६

४. ना. वि. पाटणकर

अपंग मुलांमुलींचे शिक्षण व त्यांचे पुनर्वसन ... ६७–८७

५. डॉ. द. न. गोखले

प्रज्ञेच्या जोपासनेचा प्रश्न ... ८८–११६

६. कॅ. शं. गं. चाफेकर

माध्यमिक शिक्षणांतील लष्करी शिक्षणाचे स्थान ... ११७–१२८

७. ल. नी. छापेकर

माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण ... १२९–१४२

८. डॉ. प्र. न. जोशी

माध्यमिक शाळांतील धर्मशिक्षण ... १४३–१५७

९. य. गो. नित्सुरे

'मार्गदर्शन-चळवळी'ची आवश्यकता ... १५८–१६४


* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२२० वि: निबंध
क्रमांक ९४८२ नों दि: १।७।६४

# माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व गुणवत्ताप्रमाण

• १ •

डॉ. गजानन श्रीपत खैर
एम्. ए., पीएच्. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०८६
(स्थळ प्रत)

शिक्षणाचा दर्जा घसरत चाललेला आहे; हा विषय आज प्रत्येकाच्या तोंडी आहे. त्यात सत्य किती आणि असत्य किती याची शहानिशा करणे सामान्य माणसाच्या आवाक्या-बाहेरचे आहे. बहुतेक लोक आजच्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांकडे पाहतात आणि आपल्या व्यावहारिक अनुभवाच्या आधारावर मोघम विधान करितात.

### विरोधी मते :

वाचकाला आश्चर्य वाटेल, परंतु प्रारंभीच हे सांगणे जरूर आहे की, शिक्षणतज्ज्ञांच्यामध्ये या विषयावर एकमत नाही. शिक्षणाची पातळी घसरलेली आहे असे ठामपणे सांगणारा एक पक्ष आहे; तर त्याच्या अगदी उलट टोकाला जाऊन शिक्षणाचा दर्जा सुधारलेला आहे, असे म्हणणारा दुसरा पक्षही आहे. ह्या दोन टोकातून मार्ग काढून खरोखरी वस्तुस्थिती काय आहे, ते निर्विकार मनाने आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने शोधून काढण्याचा प्रयत्न काही संशोधक, शिक्षणसंस्था आणि मध्यवर्ती शिक्षणखाते, ही करीत आहेत.

### जुन्या-नव्यांची तुलना :

पूर्वीच्या आपल्याच पिढीच्या शिक्षणाचा दर्जा चांगला होता आणि आजकालचे विद्यार्थी त्या मानाने कमी प्रतीचे आहेत असे प्रत्येक पिढीला

वाटतच असते. जगाच्या प्रारंभापासून आजतागायत नव्या–जुन्या पिढ्यांची तुलना याच तऱ्हेने होत आलेली आहे. त्याचे कारण असे आहे की, प्रत्येक पिढीला शिक्षणाचा विस्तार होत आहे आणि शिक्षणाचे विषय व त्यांची साधने यात झपाट्याने फेरबदल होत आहेत. सहज तुलना करता येईल आणि हे श्रेष्ठ व हे कनिष्ठ असे ज्याविषयी म्हणता येईल अशा समान गोष्टी फार थोड्या आहेत; त्यामुळे या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल प्रत्येकजण आपापल्या अनुभवाच्या अंदाजावर लावीत असतो.

**गुण-दोषांचे प्रमाण :**

शिक्षणाशी आणि विद्यार्थ्यांशी सतत संबंध असल्यामुळे गेली ५-६ वर्षे मी या प्रश्नाचा विचार करीत आहे. पुढील सविस्तर विवेचन करण्यापूर्वीच माझ्या विचारांचा निष्कर्ष सांगून टाकतो. तो असा आहे की, व्यापक ज्ञान, बहुश्रुतता, सार्वांगीण शिक्षण, व्यक्तिमत्त्वाचा विकास इत्यादि दृष्टींनी विचार करता आजचा विद्यार्थी पन्नास वर्षांपूर्वीच्या विद्यार्थिवर्गापेक्षा निश्चितपणे सरस व श्रेष्ठ आहे. परंतु इतर काही बाबतीत तो पूर्वपिढीतील विद्यार्थि-वर्गापेक्षा निश्चितपणे कमी दर्जाचा आहे. सुशिक्षित मनुष्य म्हटल्यानंतर त्याच्याकडून ज्या काही ज्ञानाची आणि बौद्धिक तयारीची आपण अपेक्षा करतो, त्याच्या काही कसोट्या पूर्वापार चालत आलेल्या आहेत. अशा कसोट्या लावल्या तर आजचा विद्यार्थी कमी प्रतीचा ठरतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये व्यापकपणा आहे, पण बिनचूकपणा नाही; त्याच्या ज्ञानाचा व्याप मोठा आहे. परंतु त्यात हजरजबाबी ज्ञान असे थोडे आहे. पूर्वीच्या विद्यार्थ्यांचे ज्ञानाचे क्षेत्र मर्यादित होते, परंतु जे होते त्यात बिनचूकपणा व निश्चितपणा जास्त प्रमाणात होता. मिळविलेल्या ज्ञानावर त्याचे प्रभुत्व होते. त्या मानाने आजच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोघमपणा आणि अनिश्चितता ही फार मोठ्या प्रमाणात असतात. तो बहुश्रुत असला तरी आत्मसात् केलेले आणि पूर्णपणे पचविलेले ज्ञान त्याच्याजवळ कामी प्रमाणात असते. एक-दोन विषयांची उदाहरणे घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल.

मराठी भाषेचे ज्ञान हा एक विषय घेऊ. सुबक हस्ताक्षर, शुद्धलेखनातील बिनचूकपणा आणि व्याकरणशुद्ध भाषा या गोष्टी पूर्वीच्या शिक्षणात विशेष

होत्या. अस्खलित आणि शुद्ध वाचन आणि व्यवस्थित लेखन यात पूर्वीची पिढी सरस होती. मुखोद्गत् असे मराठी पाठान्तर त्या पिढीत जास्त होते. शब्दाचे निश्चित व बिनचूक अर्थ आणि वाक्यात त्यांचे मागले पुढले संबंध यांचे तसेच व्याकरणाचे ज्ञान पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत जास्त होते. सामान्य मनुष्य भाषेच्या ज्ञानाच्या याच कसोट्या लावतो आणि त्या लावल्या म्हणजे आजचा विद्यार्थी कमी दर्जाचा वाटतो, म्हणूनच विधान केले जाते की, शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे.

गणितासारख्या दुसऱ्या विषयाचे उदाहरण घेऊं या. पूर्वीच्या विद्यार्थ्यांची उजळणी आणि तोंडी हिशेब यांची तयारी प्राथमिक शाळेतच झालेली असे. गणितातील सामान्य आणि मूलभूत प्रक्रिया त्याच्याकडून पक्क्या करून घेतलेल्या असत. त्यामुळे व्यावहारिक आकडेमोड किंवा वरच्या दर्जाचे गणित या गोष्टी जुन्या विद्यार्थ्याला सहज हस्तगत होत. वरील कसोटी लावली असताना आजचा विद्यार्थी कमी दर्जाचा वाटतो.

इतिहास-भूगोल या विषयाचा व्याप पूर्वीच्या अभ्यासक्रमात कमी होता परंतु जे ज्ञान दिले जात होते त्यात निश्चितपणा आणि पक्केपणा जास्त होता. आत्मसात् केलेल्या ज्ञानाचा भाग मोठ्या प्रमाणात होता. आजचा विद्यार्थी पूर्वीच्या पिढीपेक्षा जास्त इतिहास-भूगोलाचे वाचन करतो परंतु त्याचे पुष्कळसे ज्ञान पुस्तकात रहाते आणि केव्हाही उपयोगी पडेल असे हजरजबाबी ज्ञान कमी प्रमाणात असते. ऐतिहासिक घटना किंवा भौगोलिक स्थाने या विषयाचे त्याचे ज्ञान मोघम आणि अनिश्चित असे असते.

## गुणांची बाजू

वरील तुलनेत काही बाबतीत जुना विद्यार्थी श्रेष्ठ आणि आजचा विद्यार्थी कनिष्ठ असा दिसून येतो. परंतु अशा पुष्कळ गोष्टी आहेत की, त्यांत आधुनिक विद्यार्थी पूर्वीच्या पिढीपेक्षा श्रेष्ठ ठरेल. आजच्या विद्यार्थ्याला मराठी वाङ्मयाचे ज्ञान जास्त प्रमाणात आहे. तो अधिक पुस्तके वाचतो आणि वृत्तपत्रे व मासिके चाळतो. भाषाशैलीच्या बाबतीत त्याने पुष्कळच पुढे मजल मारलेली आहे. गणितात तो पूर्वीपेक्षा कच्चा असला तरी, पदार्थ-विज्ञान, रसायन आणि जीवनशास्त्र या विषयांचे त्याचे ज्ञान पूर्वीपेक्षा किती

तरी जास्त आहे. इतिहास-भूगोलविषयक ज्ञानाची त्याची कक्षा पूर्वीच्या विद्यार्थ्यांपेक्षा फारच व्यापक झालेली आहे. बौद्धिक आणि इतर विषय यांची संख्या पाहता तो जुन्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विषयांचे शिक्षण घेतो. आणि जास्त कार्यक्रमांत प्रत्यक्ष भाग घेतो. पूर्वीच्या विद्यार्थीपिढीप्रमाणे तो भाषा, गणित, इतिहास-भूगोल इत्यादि विषय शिकतोच आणि त्यांच्या भरीला हिंदी, नागरिकशास्त्र व राज्यकारभार, शारीरिक शिक्षण, चित्रकला हस्तव्यवसाय अशा जीवनोपयोगी इतर विषयांचेही शिक्षण घेतो. असे असले तरी शिक्षणाचा दर्जा उतरला आहे असे सामान्य माणसाला का वाटते ? शिक्षणाचे विषय आणि ज्ञानाचा व्याप कितीहि वाढला तरी सुशिक्षित माणसाजवळ किमान प्रमाणांत निश्चित, बिनचूक आणि हजर-जबाबी आणि व्यवहाराला तत्काल उपयोगी पडणारे असे ज्ञान आजच्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी कमी प्रमाणात असल्यामुळे शिक्षणाची पातळी घसरलेली आहे असा समज होतो व तो स्वाभाविक आहे.

**संक्रमणाचा परिपाक**

गेल्या ५० वर्षांच्या कालावधीत शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये प्रथम मंद गतीने, परंतु नंतर शीघ्र गतीने फार मोठे संक्रमण झालेले आहे. हे संक्रमण सतत चालू असल्याकारणाने आणि त्याचा परिणाम हळूहळू होत असल्या-कारणाने तो एकदम लक्षात आला नाही आणि त्यावर उपाययोजनाहि करावी असे कोणाला सुचले नाही. आता पन्नास वर्षांच्या कालानंतर पूर्वीच्या आणि आताच्या परिस्थितीत एकदम मोठ्या प्रमाणात फरक पडलेला दिसतो आणि त्याबद्दल सार्वत्रिक असंतोष व्यक्त केला जातो. शिक्षणक्षेत्रात झालेले संक्रमण हे कशा प्रकारचे आहे आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर त्याचा काय परिणाम झालेला आहे या सर्व गोष्टींची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा करून त्या अनुरोधाने शिक्षणाची पातळी योग्य उंचीवर आणण्याकरिता व राखण्याकरिता बुद्धिपुरस्सर आणि बुद्धिचातुर्याचा उपयोग करून शिक्षणतज्ज्ञानी आणि शिक्षणाधिकाऱ्यांनी उपाययोजना केली पाहिजे असा आज काळ आलेला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रम ३६२२० वि: गि.क्ष्म. क्रमांक २२५८ नों. दि: ८।९।६४

**नवे-जुने विद्यार्थी सारखेच :**

शिक्षणाची पातळी खाली घसरली याला जबाबदार कोण आहे असा स्वाभाविकच प्रश्न उत्पन्न होतो. याबाबतीत शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि शिक्षणाधिकारी यांची प्रवृत्ती ही जबाबदारी इतर घटकांवर लादण्याकडे असते. त्यात आक्षेपाला पात्र होणारा पहिला घटक म्हणजे विद्यार्थिवर्ग. आजचे विद्यार्थी बिघडलेले आहेत; पूर्वीच्या विद्यार्थिवर्गासारखा अभ्यासूपणा त्यांच्या ठिकाणी नाही, अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडेच त्यांचे लक्ष जास्त, म्हणून शिक्षणाची पातळी ढासळली आहे, असे विधान करणारे अनेक लोक आहेत. गेल्या पन्नास वर्षांत शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या बेसुमार वाढलेली आहे. परंतु त्यामुळे हा विद्यार्थिवर्ग बुद्धीच्या आणि अभ्यासूपणाच्या दृष्टीने कमी दर्जाचा आहे हे विधान सिद्ध करतां यावयाचे नाही. विद्यार्थिवर्गाच्या प्रत्येक पिढीमध्ये बुद्धीच्या दृष्टीने उत्कृष्ट, सामान्य आणि निकृष्ट असे तीन प्रकारचे विद्यार्थी असतात. तसेच प्रत्येक पिढीतील विद्यार्थ्यांत काही अभ्यासू वृत्तीचे आणि काही उनाड वृत्तीचे असे दोन्ही प्रकारचे विद्यार्थी असतात. अशी विविधता पूर्वी होती, आज आहे आणि पुढेही राहील. पूर्वीच्या व आताच्या पिढीची तुलना करावयाची झाल्यास समान पातळीवरील विद्यार्थिवर्गाची तुलना करावयास पाहिजे. तशी तुलना केली असता आजचा उत्कृष्ट विद्यार्थी पूर्वीच्या उत्कृष्ट विद्यार्थ्याइतकाच बुद्धिमान व अभ्यासू ठरेल. त्याचप्रमाणे सर्वसामान्य पातळीचे आज जे विद्यार्थी दिसत आहेत तसेच विद्यार्थी पूर्वीच्या पिढीतही होते. अनभ्यासी, चुकार आणि उनाड विद्यार्थिवर्गाची परंपरा ही पूर्वीच्या पिढीपासून चालत आलेली आहे आणि या वर्गाला भावी काळांतही मरण आहे असे वाटत नाही. पूर्वीचा उत्कृष्ट विद्यार्थी घेऊन त्याची तुलना आजच्या सामान्य किंवा निकृष्ट विद्यार्थिवर्गाबरोबर करावयाची आणि या विषम तुलनेच्या आधारावर आजचा सर्व विद्यार्थिवर्गच कमी दर्जाचा आहे असा निष्कर्ष काढावयाचा हा विचारसरणीचा दोष आहे. पूर्वीच्या पिढीत एकूण विद्यार्थिवर्गच लहान होता, आजच्या काळात ही संख्या दसपटीपेक्षा अधिक वाढलेली आहे.

या वाढीमध्ये उत्कृष्ट विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे, तशीच सामान्य व निकृष्ट विद्यार्थ्यांचीही संख्या वाढलेली आहे. परंतु सामान्य विद्यार्थिवर्ग हा

संख्येने मोठा असल्याकारणाने तोच दृष्टीपुढे ठेवून तुलना केली जाते. मूलभूत बुद्धिमत्ता आणि अभ्यासूपणा ह्यांचे शेकडा प्रमाण पूर्वीच्या व आजच्या विद्यार्थिपिढीत सारखेच आहे. विद्यार्थिवर्गाच्या बुद्धिमत्तेचा दर्जा घसरला म्हणून शिक्षणाचा दर्जा घसरला हे म्हणणे बरोबर होणार नाही. पूर्वीच्या पिढीतील विद्यार्थिवर्ग आजच्या परिस्थितींत शिक्षण घेण्याकरिता आला तर त्याच्यात व आजच्या विद्यार्थिवर्गात फारसा फरक दिसणार नाही. या ठिकाणी मूलभूत बुद्धि व अभ्यासप्रवृत्ती यांचाच विचार केलेला आहे; प्रत्यक्ष पदरांत पडलेल्या ज्ञानाचा व शिक्षणाचा विचार यापूर्वीच्या चर्चेत करून तो फरक दाखविलेला आहेच.

**शिक्षणाची वाढ :**

शिक्षणाचा विस्तार होत चालला म्हणजे त्याच्या अनुषंगाने उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचाही विचार आधी व्हावयास हवा तसा गेल्या चाळीस वर्षांत फारसा झालेला नाही. १९२० नंतरच्या वीस वर्षांत आणि विशेष: अलिकडे १५ वर्षांत प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि सार्वत्रिक करण्याचे कायदे झालेले आहेत. प्राथमिक शिक्षणांत होणाऱ्या या वाढीचा परिणाम माध्यमिक आणि उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर होणे हे अपरिहार्य आहे. पाश्चात्त्य देशातील शिक्षणाचा इतिहास पाहिला, तर असे दिसून येते की, सक्तीचे शिक्षण सुरू केल्यानंतर १०-१५ वर्षांच्या काळांत विद्यार्थ्यांच्या संख्येचा मोठा लोंढा माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या दिशेने येतो आणि प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत बेसुमार वाढ होते.

**साधने मर्यादित :**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणांतील होणाऱ्या वाढीला अनुसरून शिक्षणाकरिता लागणाऱ्या इतर सोयींची, साधनांची आणि माणसांची वाढ करणाऱ्या योजना कराव्या लागतात. तशा अधीपासून केल्या नाहीत तर उपलब्ध असलेल्या साधनांच्या बळावरच पूर्वीपेक्षा सव्वापट, दीडपट किंवा दुप्पटही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करावी लागते. साधने थोडी आणि संख्या मोठी अशा प्रकारची विसंगती उत्पन्न होते. अशी विसंगती प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत झालेली दिसून येते.

**मोठे वर्ग :**

शिक्षण द्यावयाचे म्हणजे इमारती पाहिजेत. अध्यापनासाठी वर्ग पाहिजेत; ग्रंथालय, प्रयोगशाळा, यांच्याकरिता जागा पाहिजेत; क्रीडांगणे पाहिजेत; औद्योगिक शिक्षणाकरिता वर्कशॉप्स पाहिजेत, या सर्व गरजा व्यवस्थित भागल्या तरच चांगल्या दर्जाचे शिक्षण देता येते. झाडाखाली बसून शिक्षण देण्याची कल्पना काव्यमय आणि रम्य आहे, परंतु ज्या ठिकाणी प्रत्येक वर्गात ४०–६० विद्यार्थी आहेत आणि शाळेत ५०० ते २००० विद्यार्थी आहेत, त्या ठिकाणी या आकर्षक वाटणाऱ्या कल्पनेचा काही उपयोग होत नाही. आज शहरांतील आणि मोठ्या खेड्यांतील शाळांचे वर्ग विद्यार्थ्यांच्या संख्येने तुडुंब भरून गेलेले आहेत. एका वर्गात एक शिक्षक किती मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊ शकेल त्याची मर्यादा सामान्यपणे ४० च्या आगे-मागे असते. परंतु आज वर्गातील ही संख्या ४५ पासून ६० पर्यंत गेलेली आहे.

ज्या प्रमाणात आणि ज्या गतीने विद्यार्थ्यांच्या संख्येची वाढ झाली त्या प्रमाणांत इमारतीची व शाळांची वाढ न झाल्याकारणाने असलेल्या थोड्या इमारतीत दीडपट ते दुप्पट विद्यार्थ्यांची सोय करण्याचा प्रसंग आलेला आहे. ही वाढ अशीच सतत होत राहणार आहे. एक काळ असा होता की, माध्यमिक शाळांची संख्या जास्त आणि विद्यार्थ्यांची संख्या कमी, त्यामुळे आपल्या शाळेकडे विद्यार्थी खेचून घेण्याची प्रवृत्ती शाळाचालकांच्या ठिकाणी होती. आता वस्तुस्थिती उलट झालेली आहे. शाळेतील सोयींच्या मानाने प्रवेश मागणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढलेली आहे. ह्या विद्यार्थ्यांची सोय करण्याकरिता प्रत्येक वर्गात इष्ट संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी घेण्याची आवश्यकता परिस्थितीमुळे उत्पन्न झाली आहे.

**गुणवत्तेवर परिणाम :**

वर्गातील या संख्यावाढीचा परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर कसा होतो ते पहा. वर्गातील मुलांची संख्या ३५ ते ४० पर्यंत असेल तर या विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे शिक्षकाला शक्य होते. ही संख्या जसजशी वाढत जाईल तसतसे वैयक्तिक मार्गदर्शनाचे प्रमाण कमी होत जाणार हे

अगदी उघड आहे. देवघरात एक दोन देव असले तर त्यांची यथासांग पूजा करता येते; तेच चाळीस पन्नास लहानसहान देव असले तर प्रत्येकाला वैयक्तिक गंध, फूल, अक्षता लावण्यापेक्षा पुजारी सर्व देवांवर सामुदायिक फुले आणि अक्षता वाहतो! तशीच स्थिती आज शालेय शिक्षणात झालेली आहे.

## वैयक्तिक लक्ष कमी झाले

शालेय अध्यापन-पद्धतीत दोन महत्त्वाचे भाग असतात. एक भाग विद्यार्थ्यांना विषय समजावून सांगण्याचा आणि दुसरा भाग शिकविलेल्या गोष्टी विद्यार्थ्यांच्याकडून तोंडी किंवा लेखी प्रश्नोत्तरांच्या रूपाने काढून घेण्याचा. आजच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना विषय शिकविण्याचा भाग शिक्षक चांगल्या रीतीने करू शकतो, परंतु त्यानंतरचा जो महत्त्वाचा भाग की ज्यात विद्यार्थ्यांची प्रगटनशक्ति वाढविली जाते तो भाग विद्यार्थ्यांच्या वाट्याला कमी प्रमाणात येतो. वर्गात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची आणि ती सुधारून घेण्याची संधी प्रत्येक विद्यार्थ्याला कमी प्रमाणांत मिळते. विद्यार्थ्यांनी केलेले लेखनकाम तपासण्याच्या बाबतीत हीच परिस्थिती होते. एका वर्गाच्या ३५–४० वह्या असल्यानंतर त्या तपासून चुका दुरुस्त करून, सुधारणा सुचविण्याचे काम जितके चांगले होऊ शकेल तितके ते ५० ते ६० विद्यार्थ्यांच्या वर्गाच्या बाबतीत होणार नाही. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या दर्जावर झालेला आहे. आपल्या सर्व परीक्षा लेखी असल्या-कारणाने लेखनातील या अपूर्ण तयारीचा व अपात्रतेचा परिणाम विद्यार्थ्यांना भोगावा लागतो. जी गोष्ट भाषेच्या अध्यापनात तीच गणितासारख्या विषयाच्या अध्यापनांत दिसून येते. गणितासारख्या कठिण विषयात प्रत्येक भाग प्रत्येक विद्यार्थ्याला समजला आहे किंवा नाही हे पदोपदी पाहून पुढे जावे लागते. तरच तो विषय सर्व वर्गाचा चांगला होऊ शकतो. परंतु ५०-६० मुलांच्या वर्गात ही गोष्ट शक्य होत नाही. संख्येबरोबरच साधनांची वाढ झाली नाही तर संख्येचा विपरीत परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर कसा होतो हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या गुणोत्तराचा माध्यमिक शिक्षणाच्या

दर्जावर जो अनिष्ट परिणाम झालेला आहे हीच वस्तुस्थिति आज उच्च शिक्षणांतही झालेली आहे. प्राध्यापकांच्या मानाने विद्यार्थ्यांची संख्या अधिक वाढत आहे, त्यामुळे वैयक्तिक मार्गदर्शन कमी; म्हणून महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचा दर्जाही कमी.

## मुलांच्या आवडीप्रमाणे विषय नाहीत :

विद्यार्थिवर्गाच्या संख्यावाढीची दुसरी एक बाजू मानसशास्त्राच्या दृष्टीने विचार करण्यासारखी आहे. समाजातील सर्व थरातील व सर्व वर्गातील विद्यार्थिवर्ग आज प्राथमिक व माध्यमिक शाळेत आलेला आहे. सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने इष्ट आणि अपेक्षित अशीच ही घटना आहे. परंतु संख्या आणि साधने यातील विसंगती व विषम प्रमाण एका निराळ्या अर्थाने पाहण्यासारखे आहे. सर्वच प्रगत देशातील माध्यमिक शिक्षणाचा इतिहास एकाच पद्धतीने घडलेला आहे. तो आज आपल्या डोळ्यांपुढे आपल्या देशात घडत आहे. प्रथमावस्थेत माध्यमिक शिक्षण हे बौद्धिक गोडी व आवड असलेल्या निवडक आणि थोड्या विद्यार्थ्यांकरिता असते. कालांतराने समाजातील सर्व वर्गांकडून या शिक्षणाची मागणी होते आणि ९ ते १८ या वयोमर्यादेतील समाजातील बहुसंख्य विद्यार्थी या शिक्षणाकडे येतात. अशा सर्व विद्यार्थ्यांना एकाच प्रकारच्या बौद्धिक शिक्षणाची सोय करून भागत नाही. त्यांच्या मगदुराप्रमाणे आणि पात्रतेप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला आवडेल, झेपेल आणि उपयोगी पडेल अशा प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी उपलब्ध कराव्या लागतात. या बहुसंख्य विद्यार्थिवर्गात उत्कृष्ट, मध्यम आणि निकृष्ट अशा तिन्ही दर्जाची बुद्धी असते. त्याचप्रमाणे कांहीजणांना बौद्धिक व तात्त्विक विषयांची आवड असते तर काही विद्यार्थ्यांना व्यावसायिक व प्रात्यक्षिक अशा विषयांची आवड असते. या विविधतेच्या प्रमाणात शाळेतील विषय आणि साधनसामुग्री ह्यातही विविधता यावयास पाहिजे. निरनिराळे व्यवसाय शिकविण्याच्या सोयी अधिक प्रमाणात उपलब्ध व्हावयास हव्यात. आजच्या बहुसंख्य माध्यमिक शाळा या बौद्धिक शिक्षणाच्या आहेत. औद्योगिक विषय शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे ही खर्चाची बाब असल्यामुळे मागणीच्या प्रमाणात त्यांची वाढ होऊ शकत

नाही. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांना त्यांची प्रवृत्ति, आवड, पात्रता आणि भावी गरज या गोष्टी कशाही असल्या तरी ठराविक साच्याचे बौद्धिक विषयांचेच शिक्षण घेणे भाग पडते. अशा सर्व प्रवृत्तींचे विद्यार्थी एकाच वर्गात असल्यानंतर अध्यापक आणि अध्यापन हे कितीही चांगले असले तरी विद्यार्थ्यांच्या गरजाच निराळ्या असल्याकारणाने शिक्षणाचा दर्जा आदर्श असा राहू शकत नाही. व्यावसायिक शिक्षणाच्या सोयीची ज्या प्रमाणात वाढ होईल त्या प्रमाणात हा प्रश्न सुटत जाईल. हाच प्रश्न पन्नास वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीतही निर्माण झाला होता. परंतु लहान संख्येमुळे त्याची तीव्रता भासली नाही. आज मोठ्या संख्येमुळे प्रश्न गंभीर झाला आहे.

## विषयसंख्याही वाढली

दुसऱ्या एका दिशेने शिक्षणाचा विस्तार होत आहे आणि त्याचाही परिणाम अपेक्षित अशा गुणवत्तेवर काय होतो हे पाहण्यासारखे आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विषयांच्या दृष्टीने अगदी साधे व सरळ होते. प्राथमिक शिक्षणांत लेखन, वाचन, उजळणी व गणित असे थोडे व महत्त्वाचे विषय होते. माध्यमिक शिक्षणातही इंग्लिश विषय हा मुख्य होता; त्याच्या जोडीला मराठी व संस्कृत या भाषा, थोडा इतिहास-भूगोल आणि गणित असे विषय असत. अखेरच्या मॅट्रिकच्या परीक्षेला चारच विषय असत. १९१६ साली मॅट्रिकला पुढील विषय व पेपर होते :( १ ) इंग्लिशचे २ पेपर. ( २ ) संस्कृतचा १ पेपर, इंग्लिशमधून. ( ३ ) इतिहासाचा १ पेपर इंग्लिशमधून. ( ४ ) गणिताचे ३ पेपर्स इंग्लिश-मधून. या ४ विषयांवर मॅट्रिकच्या वर्गातील विद्यार्थी आपले लक्ष केंद्रीभूत करीत असत. त्यामुळे या चारही विषयांच्या बाबतीत त्या वेळच्या विद्यार्थ्यांचा दर्जा आजच्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक चांगला असावा हे स्वाभाविक आहे.

गेल्या पन्नास वर्षांमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची संख्या हळूहळू आणि न-कळत वाढत गेलेली आहे. बौद्धिक ज्ञानातील प्रगतीमुळे, त्याचप्रमाणे: सामाजिक, राजकीय आणि

आर्थिक गरजा वाढल्यामुळे एकेक विषय अभ्यासक्रमामध्ये अधिकाधिक घालावा लागला. ज्या ज्या वेळी जो विषय महत्त्वाचा वाटला तो त्या त्या वेळी जुन्या अभ्यासक्रमात भर म्हणून अंतर्भूत झाला, परंतु नवीन विषय वाढल्यामुळे पूर्वीच्या विषयात कोणत्याही प्रकारची कपात झाली नाही. १९१६ सालानंतर विज्ञान हा विषय माध्यमिक शाळात सुरू झाला. त्यानंतर काही वर्षांनी मॅट्रिकच्या परीक्षेत विज्ञानाबरोबरच मातृभाषा आणि भूगोल या विषयांची भर पडून परीक्षेचे विषय पूर्वी चार होते ते सात झाले. १९४८ नंतर राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा अंतर्भाव होऊन हा आठवा विषय अभ्यासक्रमाच्या पंक्तीला येऊन बसला. आता कल्पना करा की, केवळ चार विषयांचा अभ्यास करणाऱ्या ५० वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्याला आजच्या आठ विषयांच्या एस्. एस्. सी. परीक्षेला बसविले तर इंग्रजी, गणित वगैरे विषयांचा त्याचा दर्जा तोच राहील की, त्यात काही वजावाट होईल ? एखादा अलौकिक बुद्धीचा विद्यार्थी आठही विषय उत्कृष्ट करू शकेल. परंतु तो अपवाद होईल, नियम नव्हे. सर्वसामान्य विद्यार्थी तयारीच्या दृष्टीने पूर्वीपेक्षा कमकुवत ठरेल.

माध्यमिक शाळेप्रमाणेच प्राथमिक शाळेचीही स्थिती झालेली आहे. पूर्वीच्या अभ्यासक्रमात हस्ताक्षर, शुद्धलेखन, व्याकरण, वाचन, लेखन, उजळणी आणि अंकगणित या विषयांवर मुख्य भर होता आणि बहुसंख्य तास त्या विषयांना दिले जात. त्यामुळे प्राथमिक चौथीच्या किंवा सातवीच्या अखेर झालेली भाषेची आणि गणिताची तयारी त्या विद्यार्थ्याला जन्मभर उपयोगी पडत असे, आणि माध्यमिक व उच्च शिक्षणाचा पायाही बळकट घातला जाई. आता आजची स्थिती काय आहे ती पहा. आपल्या सामाजिक आणि आर्थिक गरजांनुसार इतर काही विषयांची भर प्राथमिक शिक्षणात पडली आहे. सृष्टिज्ञान, इतिहास, भूगोल, हिंदी, हस्तव्यवसाय, शारीरिक शिक्षण इत्यादि विषयांचा समावेश वेळापत्रकात झाल्यामुळे भाषा आणि गणित यांच्या मूलभूत तयारीला कमी वेळ मिळून त्या विषयाचा दर्जा खाली आला आहे.

**इतर कार्यक्रमात भर :**

वर उल्लेख केलेले विषय मुख्यतः बौद्धिक स्वरूपाचे आहेत. याशिवायही इतर विषय आणि इतर कार्यक्रम यांचा प्रवेश माध्यमिक शिक्षणात झालेला आहे. शारीरिक शिक्षण, हस्तव्यवसाय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादि विषयांचा वेळापत्रकात समावेश झालेला आहे. त्याशिवाय अभ्यासेतर कार्यक्रम म्हणून सहली, प्रवास, नाट्यस्पर्धा, क्रीडास्पर्धा, संमेलने, राष्ट्रीय व धार्मिक महोत्सव इत्यादि गोष्टींची भर शालेय जीवनात पडलेली आहे.

वर उल्लेखिलेल्या गोष्टी शिक्षणाच्या दृष्टीने कमी महत्त्वाच्या आहेत असे म्हणावयाचे नाही. शाळेला व विद्यार्थ्याला उपलब्ध असलेल्या थोड्या वेळामध्ये पूर्वी फक्त थोडे बौद्धिक विषय शिकविले जात, त्याऐवजी आता तेवढ्याच वेळात अनेक विषय शिकवावे लागतात आणि अनेक कार्यक्रम करून घ्यावे लागतात, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा पूर्वीचा राहिलेला नाही, हा मुख्य मुद्दा आहे.

**प्रत्येक विषय व्यापक झाला :**

विषयाच्या संख्येच्या दृष्टीने वर विचार केला, त्याचप्रमाणे प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाच्या व्यापाचाही विचार केला पाहिजे. गेल्या पन्नास वर्षांत ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात वाढ झालेली आहे. त्या अनुरोधाने शालेय विषय अद्यावत् असावेत म्हणून प्रत्येक विषयात थोडी थोडी भर पडत गेली आहे. मराठीचा अभ्यासक्रम पूर्वीच्या अभ्यासक्रमापेक्षा अधिक संपन्न व सकस झालेला आहे. इतिहास आणि भूगोल या विषयांच्या अभ्यासक्रमात नवीन संशोधित ज्ञानाची भर पडली आहे. विज्ञानाच्या विषयांत खूपच वाढ झालेली आहे. गणितामध्ये कॉलेजमधील काही अभ्यासक्रम शाळेत आलेला आहे. या सर्वांचा संकलित परिणाम म्हणून अभ्यासक्रमाचा बोजा पुष्कळच वाढला आहे.

**काळाचा विचार झाला नाही :**

शालेय नियोजनांत काळाचा विचार हा अतिशय महत्त्वाचा आहे. अध्यापनाकरिता शाळेला उपलब्ध असणारा वेळ आणि गृहपाठाकरिता

विद्यार्थ्यांना घरी मिळणारा वेळ याचा शिक्षणाच्या गुणवत्तेशी निकटचा संबंध आहे. विद्यार्थ्यांची संख्या व विषयांची संख्या यांचा वर विचार केलेला आहे. या दोन्ही विभागात जशी वाढ होऊ शकते आणि वाढ झाली, तशी वेळेच्या बाबतीत होऊ शकत नाही. प्रत्येक दिवसात शिक्षणाकरिता उपलब्ध असणारा वेळ, आणि प्रत्येक वर्षात उपलब्ध असलेले एकूण दिवस, यांचे प्रमाण पन्नास वर्षांपूर्वी जे होते तेच आजही आहे. आता काळ-काम-वेग त्रैराशिकाच्या न्यायाने उपलब्ध असलेल्या तितक्याच वेळात थोडे विद्यार्थी आणि थोडे विषय शिकविण्यामुळे शिक्षणाचा दर्जा काय राहील आणि तितक्याच वेळात अधिक विषय आणि अधिक विद्यार्थी शिकवावयाचे झाल्यास त्या शिक्षणाचा दर्जा तुलनात्मक दृष्ट्या कसा राहील हे विचारवंतांच्या सहज लक्षात येईल. अनेक विषय आणि अनेक कार्यक्रम, वर्षातील तितक्याच दिवसात आणि दिवसातील तितक्याच वेळात करून घेणे भाग पडते; हे कसे जमते त्याचाही थोडा विचार करा. पहिला मार्ग म्हणजे साप्ताहिक वेळापत्रकात प्रत्येक विषयाचे थोडे थोडे तास कमी करून ते तास नवीन येणाऱ्या विषयांना दिले जातात. पूर्वीच्या विषयातील तास थोडे थोडे कमी होत जातात. मात्र त्या प्रमाणात ह्या विषयांच्या अभ्यासक्रमात कपात केली जात नाही. तास मात्र थोडे व अभ्यासक्रम भरपूर अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे मराठी, इंग्रजी, गणित अशा विषयांची तयारी कच्ची राहते. इंग्रजीसारख्या विषयाला खालच्या वर्गात पूर्वी अठरा तास मिळत ( यांपैकी सहा तास हस्ताक्षरासाठी असत. ) ते नंतर बारावर आले, व त्यानंतर आता ते आठ किंवा सहावर आलेले आहेत. त्याचप्रमाणे गणित, संस्कृत, मराठी इ. विषयांचे आठवड्यातून एक किंवा दोन तास कमी करून इतर विषयांना ते तास दिलेले आहेत. आठवड्यातून एक तास कमी याचा परिणाम संपूर्ण वर्षात ३० ते ३२ तास कमी असा होतो. प्रत्येक विषयाचे इतके कमी शिक्षण दिले जाते; मात्र अभ्यासक्रम आणि अपेक्षित दर्जा याच्यात फरक पडत नाही. नवीन विषयांना वेळ काढण्याचा दुसरा मार्ग म्हणजे वेळापत्रकाच्या प्रत्येक तासातील मिनिटे कमी करणे हा आहे. घड्याळाचा तास ६० मिनिटांचा असला तरी शाळेचा तास ६० मिनिटांपासून ३०-३५ मिनिटांपर्यंत कमी-जास्त होऊ शकतो. माध्यमिक शाळेच्या वेळा-

पत्रकांत पूर्वी पन्नास मिनिटांचा तास होता. विषयांची संख्या वाढल्यामुळे तो ४५ मिनिटांचा करण्यात आला. पुन्हा विषय वाढल्यामुळे तो ४० मिनिटांचा करण्यात आला, आणि आता निम्मे अधिक तास ३५ मिनिटांवर येऊन बसलेले आहेत ! म्हणजे ५० मिनिटात १५ मिनिटांची कपात होऊन शेंकडा तीस इतक्या प्रमाणात अध्यापनाला कमी वेळ मिळतो. कमी केलेली तासांची संख्या लक्षात घेता एकूण कपातीचे प्रमाण शेकडा पन्नासपर्यंत सहज जाईल.

आता वर्षातील एकूण दिवसांचा विचार करू या. सुट्या वजा करता सामान्यपणे २३० दिवस शाळेच्या कामाला मिळतात. गेल्या दहा वर्षांत अभ्यासेतर कार्यक्रम आणि राष्ट्रीय व सामाजिक महोत्सव इत्यादि गोष्टींची संख्या वाढल्यामुळे पूर्वीपेक्षा या कामात अधिक दिवस जातात. तितक्या प्रमाणात अध्यापनाचे दिवस व तास कमी पडतात. विद्यार्थ्यांचे सर्वसामान्य शिक्षण चांगले होते, परंतु बौद्धिक शिक्षणांत अपरिहार्यपणे कमतरता येते.

**विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया :**

प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाची मांडणी करतांना वेळापत्रकांत उपलब्ध असलेले तास आणि अभ्यासक्रमाचा विस्तार यांची योग्य सांगड घातली जात नाही. प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम त्या त्या विषयातील तज्ज्ञ असे लोक करीत असल्यामुळे स्वाभाविक त्यांचा असा प्रयत्न राहतो की, आपल्या विषयातील अधिकाधिक व नवे ज्ञान विद्यार्थ्यांना देऊन त्यांना विद्वान करावे. इतका सर्व अभ्यासक्रम शाळेच्या वेळात उत्कृष्ट तऱ्हेने पूर्ण होतोच असे नाही. त्या अभ्यासक्रमाच्या आधारावर ग्रंथकार क्रमिक पुस्तके लिहितात. स्पर्धेत आपले पुस्तक मागे पडू नये म्हणून तेही अधिकाधिक ज्ञानाचा समावेश करतात व त्यामुळे पुस्तकांची पाने वाढतात. आता या सर्वांविरुद्ध विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया कशी होते ती पाहा. घरी असलेल्या गृहपाठाच्या वेळात सात-आठ विषयांचा अभ्यास आणि प्रत्येक विषयाच्या अवजड पुस्तकाचे वाचन हे शक्य होत नाही. अशा संकटात त्याच्या मदतीला नोटस्-ॲनोटेशन्स् लिहिणारे लेखक येतात. विस्तृत अभ्यास-क्रमाचे आणि अवजड ग्रंथांचे थोडक्यात सार काढलेली पुस्तके ते विद्यार्थ्यांच्या

अनुक्रम ३६२२० वि:



हातात ठेवतात ! तसेच प्रत्येक पेठेत निघालेले खाजगी वर्ग. थोड्या वेळात मोजक्या गोष्टींची तयारी करून घेण्याची हमी हे वर्ग घेतात. विद्यार्थी मूळ ग्रंथांचा अभ्यास न करता छापील नोटस्‌चे वाचन करतात आणि खाजगी वर्गांचा आश्रय घेतात.

आजच्या शिक्षणाविषयी बोलताना प्रत्येकजण विद्यार्थ्यांच्यावर टीका करितात की, ते खाजगी वर्गांना जातात आणि छापील नोट्‌सची घोकंपट्टी करून परीक्षेची तयारी करितात. हा सर्व अवजड अभ्यासक्रमाचा परिणाम आहे. उपलब्ध वेळात सर्व ग्रंथांचे वाचन होऊ शकत नाही आणि अभ्यास पुरा होऊ शकत नाही म्हणून विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या इतरांनी या जवळच्या वाटा शोधून काढलेल्या आहेत. ती केवळ बाह्य लक्षणे आहेत. त्यांचे मूळ आजच्या विषयसंख्येत आणि अभ्यासक्रमपद्धतीत आहे.

कोणत्याही शिक्षणपद्धतीचा सर्वसामान्य विचार करिताना त्यात काळाचा विचार हा अतिशय महत्त्वाचा आहे आणि नेमके याच गोष्टीकडे गेल्या पन्नास वर्षांत आपले दुर्लक्ष झालेले आहे. उपलब्ध वेळ आणि अभ्यासक्रम यांची सांगड घालण्याचे काम आपल्याला जमलेले नाही. त्यामुळे एकीकडे वर्गातील विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ, विषयांच्या संख्येत वाढ, प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमात वाढ, आणि या सर्वांकरिता लागणारा जो वेळ त्याचा मात्र संकोच, अशी वस्तुस्थिती झालेली आहे. शिक्षणाचा दर्जा घसरलेला नाही असे म्हणणारांनी वरील घटनांचा अवश्य विचार करावा.

**शिक्षकाची तयारी :**

शिक्षणपद्धतींतील महत्त्वाचा घटक जो शिक्षक त्याचाही प्रामुख्याने विचार करावयास हवा. शिक्षकांच्या ज्ञानाची आणि विद्वत्तेची पातळी ज्या प्रमाणात असेल त्याच प्रमाणात शिक्षणाचीही पातळी राहील ही गोष्ट अगदी उघड आहे. गेल्या पन्नास वर्षांत शिक्षकाच्या विद्वत्तेची पातळी सुधारली आहे का घसरली आहे याचा विचार शिक्षकवर्गानेच करावयास पाहिजे. शिक्षकांच्या दोन-तीन पिढ्या ज्यांनी पाहिल्या आहेत त्यांना तरी जुन्या-नव्या शिक्षकांतील फरक जाणवल्यावाचून राहत नाही. नव्या पिढीतील

शिक्षकांच्या ज्ञानाचा व विद्वत्तेचा दर्जा कमी असण्याची जबाबदारी शिक्षकाकडे जितकी येते तितकीच ती हे शिक्षक ज्या शिक्षणपद्धतीतून बाहेर पडले तिच्याकडेही जाते. प्राथमिक आणि माध्यमिक क्षेत्रात विद्यार्थ्यांची व शाळांची संख्या अतिशय वेगाने वाढत गेल्यामुळे तितक्या प्रमाणात चांगल्या शिक्षकांचा पुरवठा करता आला नाही; म्हणून कमी गुणवत्तेच्या उमेदवारांनाही शिक्षकाच्या व्यवसायामध्ये प्रविष्ट करून घेणे भाग पडले. मराठी हस्ताक्षरही चांगले लिहिता येत नाही, शुद्धलेखनाचे ज्ञान नाही, उच्चारही निर्दोष नाहीत, अशा शिक्षकांच्या हाताखाली ज्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला गेला, ते पुढे तसेच कच्चे राहत गेले. अशा शिक्षणपद्धतीतून जे बाहेर पडले तेच पुन्हा शिक्षक झाले, अशा रीतीने शिक्षकांच्या प्रत्येक पिढीला त्यांच्या विद्वत्तेचा दर्जा घसरत चाललेला आहे. अलीकडे खाजगी अभ्यास करून विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याची सोय झाल्यापासून महाविद्यालयाचा संस्कार न झालेले बरेचसे पदवीधर बाहेर पडत आहेत. त्यांच्यातील काही थोडे बुद्धिमान व हुषार असतात. परंतु बहुसंख्य लोक परीक्षेच्या दृष्टीने जुजबी अभ्यास करून उत्तीर्ण झालेले असतात. त्यात त्यांचा दोष नाही. दिवसभर काम करून दमूनभागून आल्यानंतर, शरीर आणि मन थकल्यानंतर केलेला अभ्यास हा बेताबाताचाच असणार. कारकुनी कामासाठी लागणारा पदवीधर आणि शिक्षकाच्या व्यवसायाकरिता लागणारा पदवीधर यांच्या अपेक्षित पात्रतेत फार फरक आहे. कारकुनी कामाचा पदवीधर नियमाप्रमाणे ३५ टक्के मार्क मिळवून काठावर पास झालेला असला तरी चालतो. शिक्षकाच्या व्यवसायात पडणाऱ्या पदवीधराचे ज्ञान ३५ टक्क्यांपुरते असून चालत नाही. जो विषय तो शिकविणार असेल त्याचे शंभर टक्के ज्ञान त्यास असावयास पाहिजे. हे त्याने पदवी घेण्यापूर्वी तरी मिळविलेले असले पाहिजे किंवा व्यवसायात पडल्यानंतर तरी स्वप्रयत्नाने मिळवावयास पाहिजे.

पूर्वपिढीतील शिक्षकापेक्षा आजच्या शिक्षकाला अध्यापन-पद्धतीची जास्त माहिती आहे आणि या दृष्टीने तो पूर्वीच्या शिक्षकापेक्षा सरस आहे. त्याला मुलांचे मानसशास्त्र माहीत आहे. मुलांचे मनोरंजन करून आणि गोडी लावून विषय कसा शिकवावा याची त्याला जास्त चांगली माहिती आहे.

त्यामुळे आजचे शालेय जीवन पूर्वीच्या शालेय जीवनापेक्षा अधिक आनंदी आणि उत्साही असे झालेले आहे. परंतु या सर्व सद्गुणांना विद्वत्तेची आणि ज्ञानसंपन्नतेची जोड दिल्याशिवाय शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही.

**उनाडपणावर शिक्षा नाही**

शाळेच्या वातावरणात अलीकडे अनभ्यासी वृत्ती, गैरशिस्तपणा, उनाडकी आणि उद्धटपणा यांची हळूहळू वाढ होत आहे ही गोष्ट खरी आहे. अशा वृत्तीचे विद्यार्थी थोडे आहेत ही गोष्ट खरी, परंतु त्यांच्यावर योग्य पद्धतीने वचक आणि नियंत्रण ठेवता येत नाही. त्यामुळे काही प्रमाणात शाळेच्या अभ्यासूपणाच्या वातावरणात बिघाड होत आहे. विद्याखात्याने गेल्या १०-१५ वर्षांत केलेले नियम काही अंशी या वातावरणाला जबाबदार आहेत. गैरशिस्त, उनाड आणि अनभ्यासी विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचा शाळेचा अधिकार विद्याखात्याने काढून घेतलेला आहे. विद्यार्थ्यांना साधा दंडही करण्याची परवानगी नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना उपदेश करणे आणि ताकीद देणे येवढाच मार्ग शिल्लक राहतो. शाळेतून काढून टाकावयाचे झाले तरी विद्याखात्याची परवानगी लागते. अशा स्थितीत उनाडटप्पू विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकाचे आणि शिक्षकाचे पाणी जोखल्यास नवल नाही. शारीरिक शिक्षा किंवा दंड यांचा जेथे उपयोग करावयाचा नाही त्या ठिकाणी मानसशास्त्राला धरून अन्य साधने आणि तज्ज्ञ असे मनुष्यबळ तरी उपलब्ध असावयास पाहिजे. ज्या प्रगत देशात शारीरिक शिक्षा कमी केल्या आहेत त्यांच्या शिक्षणपद्धतीत मार्गदर्शक मानसशास्त्रज्ञांचा उपयोग विद्यार्थी सुधारण्याकडे करून घेतला जातो. तशा सोयी आपल्याकडे करण्यापूर्वीच शिक्षा करण्याचे शाळेचे अधिकार काढून घेतल्यामुळे अनभ्यासी आणि उनाड विद्यार्थ्यांवरील नियंत्रण नाहीसे झाले आहे. त्यामुळे शाळेचे वातावरण अभ्यासू वृत्तीला प्रतिकूल होत चालले आहे.

आजच्या शिक्षणाची पातळी खाली घसरलेली आहे आणि तसे होणे अपरिहार्य आहे हे यापूर्वीच्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आले असेल. यावर उपाय करावयाचा असल्यास तपशीलवार आणि बिनचूक अशी कारणमीमांसा करणे जरूर आहे. त्या दृष्टीने अधिक तपशिलात शिरून प्रमुख अशा कारणांची छाननी मी यथाशक्ती केलेली आहे. या परिस्थिती-

वर उपाययोजना सुचविणे ही याच्यापुढची दुसरी पायरी आहे. कारण-मीमांसेच्या बाबतीत एकमत होऊ शकेल. उपाययोजनेच्या बाबतीत पुष्कळ विविधत्ता असू शकेल. शिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख घटकांनी एकत्र येऊन उपाययोजनेचा दीर्घकालीन कार्यक्रम आखून तो कार्यवाहीत आणला पाहिजे. विद्याधिकारी, मुख्य अध्यापक आणि शिक्षक-संघटना या सर्वांचे सहकार्य या कामात मिळविले पाहिजे. माझ्या बुद्धीप्रमाणे मला जे उपाय सुचले व सुचवावेसे वाटले ते मी व्यक्तिशः अथवा संघटनेमार्फत योग्य त्या ठिकाणी कळविले आहेत. या ठिकाणी सारांशरूपाने त्यांचे थोडक्यात विवेचन केलेले आहे. उपाययोजनेचे हे क्षेत्र असे आहे की संशोधक, प्रयोगशील आणि विचारी अशा व्यक्तींना आणि संघटनांना त्यात मूलभूत अशा स्वरूपाचे पुष्कळ कार्य करिता येईल. आजपर्यंत आपण पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचे पुष्कळ अनुकरण केलेले आहे. आता आपणाला नवीन आणि मूलभूत असे काही करता येते की नाही त्याची ही परीक्षा आहे. आपल्या शिक्षणात जे प्रश्न उत्पन्न झाले आहेत त्यांची सोडवणूक आपल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीला योग्य अशा रीतीने आपण करू शकतो की नाही ही आपली खरी कसोटी आहे.

आजच्या शिक्षणात विद्यार्थ्यांची संख्यावाढ ही प्रमुख प्रक्रिया घडून आलेली आहे. ती तशीच चालू राहणार आणि राहावी हे इष्ट आहे. संख्यावाढ आणि गुणवत्ता कायम टिकविण्याकरिता पुढील उपाय योजिले पाहिजेत—

( १ ) शक्य त्या ठिकाणी वर्गातील संख्या ४० किंवा फार तर ४५ इतकीच मर्यादित ठेवावी.

( २ ) ज्या ठिकाणी हे शक्य नसेल तेथे निदान महत्त्वाच्या विषयांकरिता वर्गातील संख्या लहान ठेवावी.

( ३ ) नवीन शाळांच्या स्थापनेला उत्तेजन द्यावे; आणि असलेल्या शाळांच्या इमारती आणि वर्गांच्या खोल्या यात वाढ करण्याला द्रव्य व इमारत-साधने पुरवावीत.

( ४ ) पुढील पंचवीस वर्षांत लागणाऱ्या शाळा व त्यांच्या इमारती यांची शास्त्रशुद्ध योजना करावी.

विषयांच्या संख्येत आणि प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमात वाढ होऊन

एकूण अभ्यासक्रम अवजड झालेला आहे. त्यावर पुढील उपाययोजना करावी.

( १ ) प्रत्येक विद्यार्थ्याला सामान्य शिक्षण आणि व्यवसायाचे शिक्षण या दृष्टीने आवश्यक असे कमीत कमी विषय ठेवावेत. विषयांची संख्या जितकी कमी असेल तितका अभ्यासाचा दर्जा सुधारता येईल.

( २ ) प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाची तपशीलवार छाननी करून त्यातील महत्त्वाचा आणि आवश्यक भाग ठेवावा आणि अनावश्यक व पुनरावृत्तीचा भाग कापावा.

( ३ ) प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाचे दोन भाग करावेत. त्यातील एक भाग सूक्ष्म आणि सखोल अभ्यासाचा असावा, आणि त्याची उत्कृष्ट तयारी करून घेतली जावी. दुसरा भाग स्थूल आणि व्यापक स्वरूपाचा असावा आणि त्यावर कमी वेळ खर्च करावा.

( ४ ) अभ्यासक्रमाची मांडणी तपशीलवार आणि शास्त्रशुद्ध असावी, आणि तिच्यात सर्वसामान्य शिक्षकाला आवश्यक असे अध्यापनद्धतीचे, संदर्भ वाङ्मयाचे आणि साधनसामुग्रीचे संपूर्ण मार्गदर्शन असावे.

( ५ ) क्रमिक पुस्तकांच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण घालून ती आवश्यक आणि किमान प्रमाणावर आणावी. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याला त्याच्या सर्व विषयांच्या क्रमिक पुस्तकांची एकूण पृष्ठसंख्या किती असावी याचा संकलित विचार व्हावा.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा अभ्यासक्रम आणि उपलब्ध वेळ यांची बरोबर सांगड घातली जात नाही हा आहे. त्यावर पुढील उपाययोजना करावी.

( १ ) प्रत्येक वर्गाला त्याच्या प्रत्येक विषयाला वर्षातील किती वेळ ( ६० मिनिटांचे तास किंवा ३५ मिनिटांचे तास ) उपलब्ध आहे त्याचा बिनचूक हिशेब करून तेवढ्या वेळात चांगल्या रीतीने पूर्ण करता येईल एवढाच अभ्यासक्रम ठेवावा.

( २ ) वेळेच्या विभागणीच्या सर्व प्रश्नांचा शास्त्रशुद्ध असा विचार व्हावा. वर्षातील अध्यापनाचे एकूण दिवस, इतर कार्यक्रमांना लागणारे दिवस, अध्यापन-तासाची मर्यादा ( ३५ अथवा ४० मिनिटे ), शिक्षकांच्या रजा व अन्य कारणांनी वाया जाणारे दिवस, या सर्व गोष्टींचा आमूलाग्र विचार करून वेळापत्रकाची व अभ्यासक्रमपत्राची योजना केली जावी.

शिक्षणातील महत्त्वाचा घटक शिक्षक हा आहे. त्याच्या ज्ञानाचा व विद्वत्तेचा कस वाढल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता वाढणार नाही. म्हणून पुढील उपाययोजना करावी.

( १ ) विद्यमान शिक्षकांना त्यांचे कच्चे विषय परिपूर्ण करण्याकरिता पुरवणी अध्यापनवर्गांची व्यवस्था करावी.

( २ ) अध्यापक महाविद्यालयामध्ये बी. टी. च्या अभ्यासक्रमात सध्या अध्यापन-विषयांची तयारी करून घेतली जात नाही. त्यात सुधारणा होऊन विषयाचे ज्ञान देणे हा प्रमुख अभ्यासक्रम असावा.

( ३ ) वर्गातील अध्यापनाव्यतिरिक्त गृहपाठ तपासण्याचे काम ज्या शिक्षकांना जास्त पडते त्यांचे आणि जेथे वर्गात पन्नास-साठ विद्यार्थी आहेत त्या शिक्षकांचे अध्यापन–तास कमी करावेत.

अनभ्यासी आणि उनाड अशा विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार शाळेकडे द्यावा आणि मर्यादित प्रमाणात शिक्षा किंवा दंड करण्याचा अधिकार शाळांना असावा. तसे करणे अनिष्ट वाटत असल्यास अशा मुलांची व्यवस्था करण्याकरिता तज्ज्ञ अशा मानसशास्त्रज्ञांची योजना मार्गदर्शक म्हणून करावी.

शिक्षणाची पातळी सुधारण्याच्या दृष्टीने विधायक अशा प्रमुख उपायांची योजना मी वर सुचविलेली आहे. या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते अधिक विचार करू लागल्यास त्यांना यापेक्षाही अधिक आणि निराळे उपाय सुचविता येतील. त्या सर्वांचा साकल्याने विचार करून एक निश्चित कार्यक्रम विद्याखात्याने तयार केला पाहिजे आणि तो शाळांच्या सहकार्याने अमलांत आणला पाहिजे.

शिक्षणाच्या विकासात प्रत्येक देशाला अशा प्रकारच्या आपत्तीला तोंड द्यावे लागते. इंग्लंड, अमेरिका, रशिया हे देशही त्याला अपवाद नाहीत. म्हणून आपणही निराश न होता परिस्थितीचे आव्हान स्वीकारून त्वरित कामाला लागले पाहिजे. परिस्थिती जितकी गंभीर तितकी आपल्या कार्यक्षमतेची उत्कटता वाढविली पाहिजे. निराशावाद घालवून विधायक आशावाद उत्पन्न करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

♧ ♧ ♧

# स्त्रीशिक्षणाची दिशा व धोरण

. २ .

**चंद्राबाई कर्नाटकी**
एम्. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन )

**भा**रतात माध्यमिक शिक्षण सुरू झाले ते राज्यकारभारातील अधिकारपदावलींत खालच्या पायऱ्या भरून काढण्यासाठी. अर्थात याच धोरणाने शिक्षणाची दिशा व स्वरूप निश्चित झाले. परीक्षेचे वर्चस्व होऊन अभ्यासक्रम व अध्यापनपद्धतीवर परीक्षेचे दडपण आले.

मूलोद्योग-शिक्षणपद्धतीचे लोकशाही समाजाची एक नवी घडण करण्याचे प्रयत्न वगळल्यास आजतागायत परीक्षेचे तेच स्तोम कायम आहे—किंबहुना जास्त तीव्र झाले आहे. व्यक्तित्वाचा विकास, समाजात परस्परसंबंध व व्यवहार, बुद्धीला वळण व ज्ञानलालसा हे शिक्षणाचे ध्येय औपपत्तिक होते व औपपत्तिकच राहिले आहे. वस्तुत: शिक्षण राजकीय व आर्थिक परिस्थितीच्या मर्यादात इतके जखडले गेले आहे, की शिक्षणपद्धतींत आज व्यावहारिक उपयुक्ततेवर भर आहे.

शिक्षणाच्या संख्या-प्रगतीला अलीकडे तर फारच मोठा वेग आला आहे. मुख्यत: सक्तीच्या धोरणामुळे माध्यमिक शिक्षणाची मागणी शहरांच्या बरोबरीने खेडोपाडीसुद्धा वाढली आहे.

पण त्याचबरोबर शैक्षणिक समस्यांचीहि संख्या वाढत आहे. कारण हा प्रसार व्यावहारिक भूमिकेवरून होत असून शिक्षण घेण्यास येणाऱ्या मुलां-मुलींच्या व शाळांच्या संख्येची वाढ यंत्रवत होत आहे.

खरोखर माध्यमिक शिक्षणाचा एक विशिष्ट हेतू समजून घेतला पाहिजे. माध्यमिक शिक्षण फक्त प्राथमिक व उच्च शिक्षणास जोडणारा एक दुवा नव्हे. समाजांतील वरच्या व खालच्या थरांमधील अंतर बुजवून टाकणाऱ्या मधल्या थराला वरच्या थराचे नेतृत्व खालच्या थरापर्यंत योग्य रीतीने पोचवण्याचे, व खालच्या थरांतील भावना व गरजांचा अभ्यास करून त्या प्रांजलपणे वरच्या थरापर्यंत पोचवण्याचे कार्य करायचे असते. त्याचबरोबर मधल्या थरातच परस्पर सहकार्याने काही योजना, किंवा चळवळी चालवण्याचे सामर्थ्य मध्यम वर्गात असले पाहिजे. वरच्या थरातील नेतृत्वाकडे डोळे लावून बसण्याची वेळ त्याच्यावर येता कामा नये. मध्यमवर्गीय गटागटामध्ये आपापल्या क्षेत्रापुरत्या प्रश्नांची उकल करण्यास पुढे येणारे विकेंद्रित नेतृत्व पाहिजे. असे स्थानिक नेतृत्व माध्यामेक शिक्षणच निर्माण करू शकेल.

खालपासून वरपर्यंतच्या सर्वच शिक्षणाची संस्कृतीचे जतन व विकास ही जबाबदारी आहे. माध्यमिक शिक्षणाच्या पक्रियेमध्ये हे साध्य प्रकर्षाने दृष्टिसमोर राहिले पाहिजे. कारण प्राथमिक शिक्षण अधिक व्यापक असले तरी त्याची कुवत कमी आहे, व उच्च शिक्षणाचे क्षेत्र मर्यादित आहे.

आपल्या कालमर्यादेत फक्त मानसिक वा बौद्धिक विकास करणे इतकीच माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी नाही. आजच्या बदलत्या मनूमध्ये एकीकडे तांत्रिक ज्ञान व त्याने वाढलेली गुंतागुंत, तर दुसऱ्या बाजूने परस्परावलंबित्व इतके फोफावत आहे की अशा जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणींशी व शक्यतांशी टक्कर देणारे प्रगल्भ, दूरदर्शी, चिकित्सक, व्यक्तित्व नसेल तर निभाव लागणार नाही. असे व्यक्तित्व माध्यमिक शिक्षणाने घडवले पाहिजे.

बहुसंख्य समाज बौद्धिक वा आर्थिक पात्रतेच्या अभावीं उच्च शिक्षण घेऊ शकणार नाही. शिवाय समाजाच्या जीवनातील निरनिराळ्या गरजा भागवण्याच्या कार्यात सर्वत्र प्रचलित उच्च शिक्षणाचे ध्येय ठेवल्यास अतोनात खर्चाचा व बराचसा कालापव्ययाचा व अडथळ्याचा मामला होण्याचा संभव आहे म्हणून समाजजीवनात माध्यमिक शिक्षणाचे स्थान विशिष्ट आहे. सारांश माध्यमिक शिक्षण बऱ्याच अंशी स्वयंपूर्ण असले पाहिजे.

या दृष्टिकोनातूनच स्त्री-शिक्षणाबद्दलचा विशेष विचार करण्याचा प्रस्तुत प्रयत्न आहे.

भारतात आधुनिक स्त्रीशिक्षणाचा इतिहास सुमारे दीडशे वर्षांचा आहे. हा इतिहास म्हणजे स्त्रीला समाजात कसकसे स्थान मिळत गेले त्याचाच खरा इतिहास आहे. स्त्रियांचे सामाजिक स्थान व शिक्षण ही प्रथमपासून परस्परावलंबी व परस्परपूरक झाली आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठाच नव्हती म्हटले तरी चालेल. त्यांना आर्थिक हक्क नव्हते. बालविवाहाची प्रथा होती. बहुपत्नीकत्व रूढ होते. स्त्रियांना घरात राबावे लागत असे. त्यातून पोटासाठीही काही काम करावे लागल्यास दुसऱ्याच्या घरी घरकाम, स्वयंपाक, मोल-मजुरी, याशिवाय मार्ग नव्हता. ही कामे हलक्या दर्जाची मानली जात असत. शिवाय दुसऱ्याच्या घरी काम करणाऱ्या स्त्रियांबद्दल आणखी विशेषच तुच्छतेची भावना असे. विधवाविवाह तर जनसंमत नव्हताच. उलट विधवांना अमानुष रीतीने वागवण्यांत येत असे. सतीची चाल थोड्याफार प्रमाणांत अस्तित्वात होती. मुसलमान जमातीत बालविवाहाची पद्धत कमी असून वारसाहक्कसुद्धा हिंदू स्त्रियांच्या मानाने समाधानकारक होता. पण त्यांची पडदापद्धत कडक होती. इतर जमाती अत्यल्पसंख्य होत्या. सारांश, एकंदरीत स्त्रियांचे सामाजिक जीवन अनुकंपनीय होते.

स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार त्या वेळेच्या समाजधुरीणांनी व विचार-वंतांनी केला तो या परिस्थितीतून स्त्रियांना वर काढण्यासाठी. स्त्रियांना स्वत्वाची ओळख पटवून देण्यासाठी. अंतःकरणात निरनिराळ्या भावना असणे ही एक नैसर्गिक वस्तू आहे ते एक चैतन्याचे लक्षण आहे. असे असून स्त्रियांना जणू भावनाच नाहीत असे ठोकळ्याप्रमाणे किंवा पाळीव जनावराप्रमाणे वागवले जाणे हा एक भयंकर अन्याय होता. परमेश्वराच्या सृष्टीविषयीच तो एक अनादर होता ही जाणीव स्त्रियांच्या मनात उत्पन्न करून स्वत्वाबद्दल त्यांना जागृत करण्याचे एक भव्य व अत्यंत तेजस्वी ध्येय त्या वेळच्या सुधारकांनी व शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनी स्वतःसमोर ठेवले. स्त्रियांना आपल्याविरुद्ध होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली म्हणजे त्याचा प्रतिकार करण्याची इच्छा होईल, त्याकरिता सामर्थ्य कमावण्याचा

त्या प्रयत्न करतील, व त्यांच्यांत आत्मविश्वास येईल, अशी त्यांची विचारसरणी होती.

स्त्रियांच्या भावनांचा अनादर, समाजात निकृष्ट स्थान, विशेषतः विधवांची स्थिति, यांच्याशी स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व निगडित होते. किंबहुना आर्थिक परावलंबित्वामुळेच स्त्रियांच्या कपाळी हलाखी आली होती.

या निकृष्टावस्थेतून स्त्रियांना वर काढण्यासाठी शिक्षणाखेरीज दुसरे प्रभावी साधन नव्हते. स्त्रियांनी शिक्षण घेतले तरच त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल व त्यामुळे समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळेल हे स्पष्ट होते. स्त्रियांना शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू झाले ते यामुळे.

पण कालांतराने मूल्ये बदलली. स्त्रीला स्वत्वाची जाणीव यावी, सामाजिक गळचेपीतून स्वतःची सुटका करून घ्यायचे सामर्थ्य, व त्यासाठी लागणारा आत्मविश्वास तिच्यांत यावा, जीवनाबद्दलची तिची दृष्टि स्वच्छ व विशाल व्हावी व ती स्वतंत्रपणे विचार करायला समर्थ व्हावी हा स्त्रीशिक्षणाचा मूळ हेतु. आर्थिक स्वातंत्र्य हे या मूळ हेतूचे एक पूरक अंग होते. परंतु हळूहळू आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेला महत्त्व आले आणि स्त्रीशिक्षणात उपयुक्ततावादाचा शिरकाव झाला. पुरुष आधुनिक शिक्षण उपजीविकेचे साधन म्हणून घेत होते. स्त्रीशिक्षणाची बैठक निराळी होती. स्त्रीला शिक्षण स्त्रीसमाजाच्या सामाजिक उद्धारासाठी हवे होते. याच ध्येयाने प्रेरित झालेल्या रमाबाई रानडेसारख्या स्त्रियांनी शिक्षणाचे कार्य पुढे चालवले, परंतु स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराखातरच शेवटी पाहता पाहता स्त्री नोकरीपेशात गुंतवली गेली. कारण मुलींना शाळेत पाठवायला समाज तयार व्हावा म्हणून स्त्रीशिक्षिकांची गरज भासू लागली. शिक्षिका बनून स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराला हातभार लावला पाहिजे अशी एक नैतिक व व्यावहारिक जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडली. दुसऱ्या बाजूने पोटासाठी दुसऱ्याच्या दारी होणारी मानखंडना स्त्रियांना शिक्षणाकडे खेचू लागली व उपजीविकेचे साधन म्हणून स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. शिक्षणाच्या प्रसाराला नोकरी हे आमिष बनले. स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबरोबर शिक्षिकांची संख्या वाढत राहिली. हळूहळू शिक्षण घ्यायचे आणि शिक्षिका व्हायचे ही प्रथा इतकी सहज होऊन बसली

की मुलींना शिक्षणाची जोखीम घेतल्यानंतर ( १८५४ ) सरकारला सोळा वर्षांतच स्त्रियांची दोन ट्रेनिंग कॉलेजे उघडावी लागली ( १८७० व १८७१ ).

लगेच १८८४ मध्ये पुढे पाऊल टाकले. पुण्याला मुलींची माध्यमिक शाळा उघडली गेली. सनातनी समाजाने या उपक्रमाचा स्वीकार केला नाही. पण स्त्रीला जागृत करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी, विचारवंतांची चळवळ चालूच होती. विरोध-विरुद्ध-प्रोत्साहन यांच्या संघर्षात प्रगतीने वेग घेतला, व मुलांच्या शाळांतहि मुली माध्यमिक शिक्षण घेऊं लागल्या.

स्त्रीचे शिक्षण-क्षेत्र व कार्य-क्षेत्र झपाट्याने वाढत राहिले. वैद्यकीय मुख्यतः परिचारिकेचे काम स्त्रीच्या अंगच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे तिला योग्य असल्याचे आढळून येऊ लागले. हळूहळू याहूनाहि पलीकडे स्त्रीच्या कार्य-क्षेत्राचा विस्तार झाला. या शतकात गांधीजींच्या देश-स्वातंत्र्याच्या चळवळीचा भारतीय स्त्रीवर्गावर फार परिणाम झाला. या चळवळीपासून स्त्रीमध्ये आलेल्या जागृतीला दुसऱ्या जागतिक युद्धाने जोड दिली, व सार्वजनिक जबाबदाऱ्या घेऊन, पुरुषांकडून केली जाणारी राज्यकारभारातील, शिक्षण-क्षेत्रातील, किंवा समाजातील इतर कामे करायला स्त्री तयार झाली. कोणतेहि काम पुरुषांच्या बरोबरीने स्त्री करू शकते असा अनुभव येऊ लागला, व तसतसे स्त्रीला कोणत्याहि क्षेत्रांत काम करायचे असल्यास आडकाठी येता कामा नये, अशा मताचा पुरस्कार होऊन आज सरकारने तेच धोरण ठरवले आहे.

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी कोणत्याहि क्षेत्रात स्त्रीला मज्जाव असा नसला तरी सरकारी प्रशासनांत पंक्तिप्रपंच होता. कांही कामे व जागा स्त्रियांच्या समजल्या जात असत. स्त्रियांची एक वेगळी वेतनश्रेणी होती. अगदीच एखादा अपवाद म्हणून ' सामान्य ' वेतनश्रेणीत स्त्री घेतली जात असे. भारतीय लोकशाहीत स्त्री-पुरुष-भेद शिक्षण किंवा नोकऱ्यांच्या बाबतीत आड येता कामा नये, असा राज्यघटनेने स्पष्ट दंडक घातला आहे.

स्त्रियांना शिक्षण पुरुषांच्या बरोबरीने दिले जावे, व नोकऱ्याही पुरुषांच्या बरोबरीने दिल्या जाव्या, असे धोरण आज जारी आहे.

स्त्री-शिक्षणाने आज चांगले मूळ धरले आहे. आता वृक्षाची वाढ इष्ट प्रकारे इष्ट प्रमाणात होत आहे की नाही हे पाहण्याची वेळ येऊन ठेपली

आहे. चालू परिस्थितीचे निरीक्षण करून पुढील मार्ग कोणता व कसा आखावा हे आता पाहिले पाहिजे.

खानेसुमारीचे आकडे पाहिले तर माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. परंतु ही वाढ जवळजवळ सर्वस्वी शहर-वस्तीतच होत आहे. देशाच्या ग्रामीण भागात होणाऱ्या प्रसाराचे प्रमाण दोन टक्केसुद्धा नाही. याची अनेक कारणे आहेत, व स्त्री-शिक्षणाच्या दिशेचा विचार करतांना त्यातील प्रत्येक कारण लक्षात घेण्यासारखे आहे. घरातील कामे टाकून मुलींना शाळेत पाठवायला पालक तयार नाहीत. त्यातून मुलींच्या स्वतंत्र शाळा नसल्यामुळे तर पालक मुलींना मुलांच्या शाळांत पाठवायला अगदीच तयार नसतात. शहरातून असलेल्या शाळांत मुलींना शिकायला पाठवून वसतिगृहांत ठेवणे पालकांना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. त्यातून आपल्या मुलींच्या शिक्षणाची काही सोय काही महत्त्वाकांक्षी व आस्था बाळगणाऱ्या लोकांनी केलेली आढळते. पण अशा मुली शहरातून शिक्षण घेऊन आल्यावर आपल्या घराला व कुटुंबियांना दुरावतात ! या अनुभवाचा परिणाम ग्रामीण विभागातील शिक्षणाच्या प्रसारावर होत नसेल, असे म्हणता येत नाही. परंतु या सर्व कारणांपेक्षा, शहरी व ग्रामीण विभागातील स्त्री-शिक्षण-प्रसारातल्या तफावतीचे मुख्य कारण म्हणजे अडचणी सोसून मुलींना शिकवण्याइतके शिक्षणाचे महत्त्व जनतेला वाटत नाही.

त्यामुळे आज शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या संख्येत दोन स्पष्ट गट पडतात. ग्रामीण गटात शिक्षणाबद्दल उत्सुकताच कमी. त्यातून सहजासहजी जमते म्हणून, किंवा कुणाच्या प्रेरणेने, किंवा काही योगायोगाने आवड उत्पन्न झाली म्हणून ज्या मुली शाळेत जातात, त्यांना स्फूर्ति देणारा, योग्य मार्गदर्शन करणारा, शिक्षकवर्ग मिळत नाही. शिक्षणाचे साफल्य ज्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासांत आहे, त्या प्रकारच्या विकासाचा आदर्श या ग्रामीण गटाच्या दृष्टीसच पडू शकत नाही. अर्थात् ग्रामीण जनतेत शिक्षण-प्रसाराला जोर नाही. उलट दुसरा शहरातला गट. इथे गतानुगतिकत्वानेच मुले शिक्षण घेत आहेत. या गटात पाचवे वर्ष लागले की शाळेत जायचे, आणि मग लग्न होईपर्यंत शिकत राहायचे, हा एक

निर्विकार परिपाठ होऊन बसला आहे. एका गटाला शैक्षणिक ध्येयाची जाणींवच नाही, तर दुसऱ्या गटात, सोयी-सवलतींची रेलचेल आहे म्हणूनच की काय, ध्येयशून्यता आली आहे.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वाढवण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत हे उघड आहे. पण त्याचबरोबर शहरी भागातील शैक्षणिक परिस्थितीची छाननी केली पाहिजे. शैक्षणिक सोयी विपुल असूनहि जर शिक्षणातून अपेक्षित फल मिळत नाही असा अनुभव येत असेल तर मोठा निकडीने विचार करण्यासारखा प्रश्न आहे. शहरी भागांतील शिक्षणाबद्दलचे प्रवाहपतितत्व व त्याचे दुष्परिणाम हा ग्रामीण विभागातील शिक्षण-प्रसाराला एक मोठा अडथळा झाला आहे. पुढारलेल्या शहरी वाता-वरणाची व विचाराची छाप मागासलेल्या ग्रामीण विभागावर पडत असते. म्हणून आज हे दोन गट निरनिराळे असले तरी सर्वच समाजाच्या शिक्षणाचा प्रश्न एकच होय. शहरी विभाग व ग्रामीण विभाग काही अंशी अलग राहणे अपरिहार्य आहे. पण मूलगामी तत्त्वे सर्वत्र सारखीच लागू पडतील.

आज चालू असलेल्या शिक्षणाबद्दल कोणीच संतुष्ट नाही. असे का ? अतोनात पैसा व भरपूर वेळाचा मुक्तहस्ताने व्यय होत असून व शिक्षणात सुधारणा करण्याचे अविरत प्रयत्न चालू असून आजचे शिक्षण बहुंशी निरुपयोगी का वाटते ? शिक्षणाची सांस्कृतिक मूल्ये दडपली जाऊन उपयुक्ततावादाचे वर्चस्व झाले आहे म्हणून. संस्कृतिक ध्येय दृष्टिआड झाल्याने अशांतता उत्पन्न झाली आहे. शिक्षणाने संस्कृतीचे जतन होत नसेल, तर ते शिक्षणच नव्हे. मनुष्यमात्राला पोट भरण्यानेच काय पण ऐष-आरामानेसुद्धा समाधान होत नाही. या ऐहिक जीवनापलीकडे काही तरी खोल आंतरिक असल्याची त्याला एकसारखी जाणीव असते, व त्या अज्ञाताकडे त्याची ओढ असते. त्या अज्ञाताच्या प्राप्तीसाठी त्याच्या बौद्धिक व मानसिक शक्ति सतत धडपडत असतात, व त्या प्रयत्नात विकसित होत असतात. ती धडपड व शक्तींचा विकास चालू ठेवणे म्हणजेच संस्कृतीची जपणूक. मानवा-मानवामधील परस्परसंबंध प्रेमाचे असणे हे

उच्च संस्कृतीचे लक्षण आहे. सारासारविवेक व चिकित्साबुद्धी वाढविणे हीही संस्कृतीची जोपासना. ज्ञानाबद्दल अनिवार ओढ हे संस्कृतीचेच स्वरूप. समाजातील निरनिराळ्या जमातींनी व कारागिरांनी पिढीजात चालत आलेल्या आपापल्या कामाची परंपरा अभिमानाने चालवायची, आणि त्या त्या कामांतील कौशल्य, सफाईदारपणा, वृद्धिंगत करीत राहायचे, हासुद्धा संस्कृतीचाच भाग आहे. संस्कृतीच्या जोपासनेतच व्यक्तित्वाचा विकास आहे, व म्हणूनच संस्कृतीची जोपासना हे शिक्षणाचे आद्य ध्येय आहे. नैसर्गिक रीत्या होत असणाऱ्या मनुष्याच्या विकासाला मदत करणे, वेग आणणे, हे शिक्षणाचे कार्य आहे. परंतु आज जेथे शिक्षण चालू आहे तेथे परस्परसंबंध दुरावलेले दिसत आहेत. किंबहुना पितापुत्र, गुरुशिष्य, बंधुभगिनी, पतिपत्नी, इत्यादि नातीसुद्धा भावनाशून्य बनत असल्याच्या तक्रारी आज समाजात वारंवार कानावर येत आहेत. एका तत्त्वज्ञाने म्हटले आहे की आज आपल्याला ' शेजार ' नाहीसा झाला आहे. हा तुटकपणा शिक्षणाचा फोलपणा दर्शवितो. स्वतंत्र विचार करायची शक्तिही आपल्या शिक्षित मुलांमुलींना आल्याचे दिसत नाही. स्वतःला बरे-वाईट कळत नाही, पण कुणाचा सल्ला घेण्यात त्यांना कमीपणा वाटतो. ज्ञानलालसा म्हणावी तर परीक्षा संपते कधी व पुस्तके फेकून देतो कधी याचीच विद्यार्थी वाट पाहतात. परंपरागत कारागिरी पाहावी तर शिक्षण घेणाऱ्या मुलांना आपल्या पिढीजात व्यवसायाची ओळखहि पुरेशी होत नाही. अर्थात् आपुलकीही वाटत नाही. सराइतपणा व कसब तर बाजूलाच. म्हणजे संस्कृतीच्या कोणत्याही अंगाशी शिक्षणाची सांगड नाही. शिक्षणाबद्दल आज जनतेत असंतोष उत्पन्न झाला आहे तो या परिस्थितीमुळे.

शिक्षणाची व्यवहारिक बाजू जास्त विचारांत घेतली जात असल्याचा कित्येकांचा दावा आहे. व्यावहारिक बाजू जड झाल्याने समतोलपणा नष्ट झाला आहे हे तर खरेच. पण शिक्षणाच्या व्यावहारिक यशस्वितेबद्दलही जनता प्रतिकूलच बोलते. सार्वजनिक कामाच्या निरनिराळ्या सरकारी व बिनसरकारी कचेऱ्यात, दुकाने, कारखाने, शाळा, इत्यादि ठिकाणी चाललेल्या कागदपत्राच्या कामामध्ये व्यवस्थितपणाचा, कार्यक्षमतेचा, अभाव फारच मोठ्या प्रमाणात दिसून येऊ लागला आहे. निरनिराळ्या धंद्यांतील

तांत्रिक प्रकारच्या कामाबद्दल तर बोलताच येत नाही, कारण त्या बाबतीत लागणारे विशिष्ट शिक्षणच योग्य प्रमाणात मुलांना मिळत नाही.

दुसरी व्यावहारिक बाजू म्हणजे उपजीविका. शिक्षणाने उपजीविकेचे हमखास साधन उपलब्ध झाल्याचे दिसत नाही. एक तर सामान्यतः नोकरी खेरीज कोणत्याच कामाची लायकी शिक्षणाने प्राप्त होत नाही. शिवाय, नोकरी मिळणेहि कठीणच असते. त्यातून मिळालीच तर कोणालाहि कोणतेहि काम पत्करावे लागते. त्यामुळे कामात हृदय ओतले जाऊ शकत नाही, व कामांतील बारकावे लगेच आत्मसात होणे शक्य नसल्यामुळे कामाचा दर्जा व उठाव दोन्ही कमी होतात, असा अनुभव आहे.

आजच्या परिस्थितीत शिक्षणाचे व्यावहारिक महत्त्व नाकबूल करून चालणार नाही. जागतिक रस्सीखेचीत कोणतेच राष्ट्र बाजूला राहू शकत नाही, मग भारतासारख्या मोठ्या राष्ट्राची काय कथा? जागतिक धक्का-धक्कीत भारताला ओढाताण सोसण्याची वेळ आली आहे. ही ओढाताण जोपर्यंत जाणवत राहील तोपर्यंत सामाजिक व वैयक्तिक जीवन जगवण्या-साठी निरनिराळ्या क्षेत्रातील निरनिराळी कामे करण्याची गरज राहील व त्या त्या कामाचे तांत्रिक शिक्षण घ्यावे लागेल. मात्र द्रव्यार्जनाच्या लालसेने विशिष्ट शिक्षणाच्या मागे लागून शिक्षणाच्या सांस्कृतिक अंगाकडे दुर्लक्ष केल्यास कोणतेही शिक्षण कितीही उत्कृष्ट असले तरी ते एकांगी व लंगडे होणार आहे. आज आघाडीवर असलेल्या परदेशांत तांत्रिक शिक्षणा-वर भर आहे. विशेषीकरणाचे ( Specialization ) जीवनात महत्त्व व म्हणून शिक्षणात प्राबल्य आहे. पण त्या देशात जीवनातली अशांतता वाढतच आहे. अमेरिकेसारख्या देशांतील उसळती क्रियाशीलता प्रथमदर्शनी उत्साह व चैतन्याची द्योतक असली तरी बरीचशी अस्वस्थतेची द्योतक आहे.

शिक्षणाचा विचार करताना व्यावहारिक उद्दिष्टे दृष्टिआड करून चालणार नाही, पण शिक्षणाचे सांस्कृतिक महत्त्व जास्त लक्षात घेतले पाहिजे. स्त्रीवर्गाच्या शिक्षणात तर सांस्कृतिक मूल्यांवर कटाक्षाने भर हवा, कारण समाजातील संस्कृतीचे जतन आजवर स्त्रीनेच केले असल्याची साक्ष सामाजिक इतिहास देत आहे. जीवनाच्या वाढत्या गुंतागुंतीत मनःशान्तता

टिकवण्याकरिता पुरुषाला सांस्कृतिक अंगाबद्दल जागरूक राहण्याची गरज असली तरी ऐहिक जीवनाची व्यावहारिक बाजू-कष्ट, धावपळ, त्याला संभाळलीच पाहिजे. निसर्ग व परंपरा, दोघांनी ही जबाबदारी पुरुषावर टाकलेली आहे. व म्हणूनच स्त्रीचे क्षेत्रही आपोआपच निश्चित आहे. मानवतेचा तोल संभाळण्यासाठी तिला सांस्कृतिक बाजू प्रामुख्याने संभाळावी लागते. म्हणून पुरुषाच्या शिक्षणात व्यावहारिक उपयुक्ततेकडे जितके पारडे झुकेल तितकी स्त्रियांच्या शिक्षणात सांस्कृतिक बाजूला भर पडली पाहिजे.

याचा अर्थ असा की स्त्रियांचा अभ्यासक्रम पुरुषांच्या अभ्यासक्रमाशी पूर्णतया एकरूप असून चालणार नाही.

मुलींसाठी अभ्यासक्रम वेगळा असावा का, हा प्रश्न स्त्रीशिक्षणाच्या सुरुवातीलाच उत्पन्न झाला आणि तो एकदा उकल करून कायमचा सोडवून टाकण्याजोगा प्रश्न नव्हे.

एकोणिसाव्या शतकांत मुलींच्या प्राथमिक शाळा सुरू झाल्या त्या वेळी मुलींची प्राथमिक शिक्षणपद्धत मुलाहून निराळी, तीत खास शाळा, खास अभ्यासक्रम व खास पाठ्यपुस्तके असली पाहिजेत, अशीच विचारसरणी होती. अर्थात् स्त्रीशिक्षिका व स्त्रीइन्सपेक्टर पाहिजेतच. कारण मुली मुलांइतका काळ शाळेत राहू शकत नाहीत, व शिवणासारखे विषय मुलींना जास्त उपयुक्त व आवश्यक आहेत. त्याप्रमाणे मुलींचा अभ्यासक्रम चार वर्षांचा केला गेला. मुलांचा सहा वर्षांचा होता. १९०६ मध्ये मुलींकरिता वेगळी पाठ्यपुस्तके नेमण्यात आली. मुलींची प्राथमिक-शाळा-प्रमाणपत्र-परीक्षा १९४८ पर्यंत वेगळी होती. १९४७-४८ पासून प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीच्या कायद्याचा अंमल सुरू झाला. व त्याने माध्यमिक शिक्षणाचा प्रसार वाढला आहे. शिवाय मुलींच्या माध्यमिक शिक्षणाला सुरुवात होऊन सत्तर-पाऊणशे वर्षे लोटली असल्यामुळे प्रचलित माध्यमिक शिक्षणाचे बरेवाईट परिणाम समाजाच्या दैनंदिन जीवनात प्रकर्षाने दिसू लागले आहेत. देशाच्या राजकीय व त्यामुळे आर्थिक वातावरणात जी आंदोलने झाली, त्यांचेहि परिणाम शिक्षणावर झाले आहेत. त्याचप्रमाणे मनुष्यजीवनाबद्दलचे वैचरिक प्रवाहही स्वतंत्रपणे वाहात आले आहेत. या सर्व परिस्थितीमुळे आज अभ्यासक्रमाबद्दलचा प्रश्न पुनः ताजा झाला आहे. आणि तो विशेषतः

अनुक्रम ३६२२० दि: १२०५१ ... ३।५।६४ अंक ... १-६२ ... नों दि: ...

माध्यमिक अभ्यासक्रमाबद्दलचा. कारण प्राथमिक शिक्षणांत अत्यंत मूलभूत वस्तूंचा समावेश केला पाहिजे, व मुलांची पात्रापात्रता, आवडीनिवडी, स्वाभाविक कल, यांच्या विचाराला तेथे जागा देता येत नाही, आणि उच्च शिक्षण सामान्य जीवनापासून दूर आहे. माध्यमिक अवस्थेतील जबाबदारी विशिष्ट आहे.

मुलींच्या शिक्षणाचा वेगळा विचार करण्यासारखा आहे. याची दखलच अलीकडेपर्यंत कुणाला नव्हती. मुलांच्या शिक्षणक्रमाचा, अडचणींचा, गरजांचा, ऊहापोह व्हायचा, आणि प्रत्येक बाबतीत मुलांबरोबर मुलींचा अंतर्भाव समजायचा ! कुठे बारीकसारीक विषय जरासे जास्त कमी केलेले, इतकेच. सुदैवाने १९५८ साली पहिल्याप्रथम केंद्र सरकारने स्त्रीशिक्षणाच्या परिस्थितीचा अभ्यास करून सूचना करण्याकरिता 'नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स एज्युकेशन' नावाची एक समिती नेमली. सुमारे सहा महिने या समितीने काम करून आपला अहवाल दिला असून त्यांत निरनिराळ्या शिफारशी केल्या आहेत.

समितीला अभ्यासक्रमाबाबत निरनिराळ्या स्तरातून व क्षेत्रातून वैयक्तिक व सामुदायिक रीत्या मिळालेले जनमत असे की प्राथमिक अभ्यासक्रम मुलांमुलींना एकच असावा, पण माध्यमिक टप्प्यात मुलींकरिता त्यांच्या जीवनात आवश्यक अशा विषयांची तरतूद झाली पाहिजे. समितीची शिफारस या मतानुसारच आहे.

वस्तुतः मुलींना उपयुक्त असे कलात्मक विषय तीन-चार दशकांपासून मुलींच्या माध्यमिक अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. त्यांना सरकारी संमतीही आहे. हल्ली वीस-बावीस वर्षे गृहजीवनशास्त्रही थोड्या शाळात शिकवले जाते. हा विषय तर मुलींना अनिवार्य समजला पाहिजे. अलीकडे विविधलक्ष्यी अभ्यासक्रमांत हा विषय समाविष्ट झाल्यापासून त्याला अधिक महत्त्व आले आहे. माध्यमिक शिक्षण संपल्यावर मुलींना सामान्यपणे जरूर ती शैक्षणिक पार्श्वभूमी मिळून गृहविषयक व्यवस्था व कर्तव्ये शास्त्रशुद्ध दृष्टीने बजावण्याची ताकद यावी, हे उद्दिष्ट पुष्कळ शाळांनी प्रथमपासून ठेवले, व तशी तरतूद मुलींच्या बऱ्याच माध्यमिक शाळात विशेषतः बहुसंख्य शाळा खाजगी

संस्थांनी चालवल्या असल्यामुळे अनेक वर्षे झाली आहेत. मात्र मुलींना आवश्यक असे विषय अभ्यासक्रमात घेताना सामान्य अभ्यासक्रमांतील कोणताहि विषय कमी करण्यांत आलेला नाही. मुलींच्या अभ्यासक्रम जास्त अवजडच झाला आहे ! आणि मौज अशी की, प्रचलित सामान्य अभ्यासक्रमांतील पुष्कळ भाग मुलींना अनिवार्य रीत्या आवश्यक नाही, अशी जनता एकीकडे तक्रार करते, व एकीकडे मुलींच्या अभ्यासक्रमाचा बोजा कमी उपयोगी विषयातील काही भाग वगळून कमी करण्यास विरोध करते. चालू अभ्यासक्रमांतील विषय अंशतही कमी झाल्यास शिक्षणाचा दर्जा कमी होईल, ही जनतेला भीति वाटते. मुलींचे भावी जीवन व कार्य विशिष्ट असून मुलांच्या जीवन व कार्यापासून मूलतः स्पष्टपणे भिन्न आहे, याची पूर्ण जाणीव असूनही मुलांपेक्षा कोणत्याही प्रकारे भिन्न असलेले शिक्षण मुलींना द्यायला पालकवर्ग तयार नाही. तो कुरकुरतो, पण मुलींवर जादा भार पडलेला पत्करतो.

याचे कारण उघड आहे. शालान्त परीक्षा झाल्यावर मुलीला उच्च शिक्षण द्यायचे म्हटले तर शालेय सामान्य अभ्यासक्रम झालेला असला तरच विद्यापीठात प्रवेश मिळेल. उच्च शिक्षण द्यायचे नसेल तर लग्न जमेपर्यंत रिकामा वेळ काढण्यापेक्षा मुलीला नोकरीत गुंतवून टाकणे बरे. नोकरी मिळवायची म्हणजे मुलांच्या बरोबरीने लायकी असली तरच निभाव लागणार. अशी पालकवर्गाची साधीसुधी विचारसरणी आहे. शिवाय स्त्री-पुरुषांची जीवनांतली क्षेत्रे वेगळी आहेत, व त्या त्या क्षेत्रातील कर्तव्ये पार पाडणे सुलभ जाईल, अशाच मानसिक व बौद्धिक शक्ति निसर्गाने दोघांना पुरवल्या असून त्याचाच विकास करणे शहाणपणाचे आहे, हे पटलेले असले तरी मुलींच्या मुलांशी ‘ बौद्धिक ’ बरोबरीचे मातापित्यांना एक फार मोठे आकर्षण आहे. बौद्धिक बरोबरी फक्त परीक्षांवरून ठरते तेवढीच हीही गोष्ट वेगळी ! तात्पर्य, मुलींचा वेगळा अभ्यासक्रम जनतेला खरोखर हवा आहे, पण त्याला प्रत्यक्ष पाठिंबा मात्र आजवर जनतेकडून मिळालेला नाही.

उपरिनिर्दिष्ट स्त्रीशिक्षणसमितीने जनमताचा आढावा घेऊन मुलींचा माध्यमिक अभ्यासक्रम अंशतः मुलांच्या अभ्यासक्रमाहून निराळा असावा,

अशी शिफारस केली आहे. मुलींच्या अभ्यासक्रमात त्यांच्या भावी जीवनात उपयुक्त असे कलात्मक व व्यवसायात्मक विषय असावेत व शिक्षणाचा दर्जा कमी होऊ न देता प्रचलित अभ्यासक्रमातील जो भाग मुलींच्या आधिक उपयुक्ततेच्या दृष्टीने बदलावा लागेल, तो बदलण्यात यावा, असे समितीने सुचवले आहे. चालू माध्यमिक अभ्यासक्रमाचा बहुसंख्य मुलींच्या दृष्टीने फोलपणा व अवजडपणा अधिक व्यापक झाला नाही तोवरच या शिफारसीचा विचार झाला तर बरे होईल.

शिक्षणाची व्यावहारिक उपयुक्तता लक्षात घेऊन विविधलक्ष्यी अभ्यासक्रमाबाबतही समितीने आपले मत व सूचना दिल्या आहेत. विविधलक्ष्यी अभ्यासक्रमांत मुलींसाठी गृहजीवनशास्त्र व कला हे विषय ठेवण्यात आले आहेत. व्यावहारिक उपयोग ओळखून काही मुली व्यापारशिक्षण घेऊ लागल्या आहेत. गृहजीवनशास्त्र व कला हे विषय मुलींसाठी निवडणाऱ्यांनी मुलींचे फक्त घराच्या चार भिंतींच्या आतले जीवन लक्षात घेतले आहे, हा दृष्टिकोन संकुचित होय. आजच्या जगात घरातील कर्तव्ये बजावून बाहेरच्या सामाजिक, औद्योगिक व आर्थिक जीवनात सहभागी होण्याची आकांक्षा मुलींमध्ये निर्माण होणे अपरिहार्य आहे. द्रव्यार्जन करून संसाराला हातभार लावण्याची त्यांना हौसही वाटेल, गरजही भासेल. शिवाय समाजजीवनाच्या प्रगतीसाठी स्त्रीच्या बौद्धिक व इतर शक्तींचा उपयोग आवश्यक आहे. या दृष्टीने मुलींच्या शिक्षणामध्ये विविधलक्ष्यी अभ्यासक्रमात समितीने आणखी विषय सुचवले आहेत :

( १ ) कचेरीतील पत्रव्यवहार, टंकलेखन, इ०

( २ ) टाचणे करणे, सभांचे अहवाल लिहिणे, वृत्तपत्रांसाठी अहवाल तयार करणे, हिशेब ठेवणे, पत्रव्यवहार करणे, इ०

( ३ ) निरनिराळ्या प्रकारचे सामाजिक कार्य.

( ४ ) कातड्याचे काम, शिंपीकाम, वगैरे घरच्या घरी व अर्धवेळ करता येण्यासारखे व्यवसाय.

( ५ ) पूर्वप्राथमिक, प्राथमिक व समाज-शिक्षण क्षेत्रात कार्य.

या सर्व प्रकारच्या कामासाठी तयारी करून देणारे अभ्यासक्रम माध्यमिक

शाळात विविधलक्ष्यी अभ्यासक्रमात समाविष्ट केले जावे अशी समितीची शिफारस आहे.

विविधलक्ष्यी शिक्षणक्रम सुरू करण्याचा मुख्य हेतू असा, की विद्यार्थ्यांच्यामध्ये वसत असलेल्या विविध बौद्धिक पैलूंना, कर्तृत्वशक्तीला व आवडींना वाव मिळावा, परंपरागत अभ्यासक्रमाच्या चाकोरीबाहेरील क्षेत्राबद्दल विद्यार्थ्यांना गोडी उत्पन्न व्हावी व त्या क्षेत्रातील कार्याचे जीवनातील महत्त्व ओळखायला शिकून त्यांनी त्या त्या कार्यासाठी जरूर असलेली पूर्वतयारी करून घ्यावी. हे अभ्यासक्रम आखताना अर्थात उच्च शिक्षणाशी ते पुढे सहज जुळावेत या मुद्दयाकडे दुर्लक्ष केलेले नाही, पण माध्यमिक अवस्थेच्या पुढे ज्यांना जायचे नाही, किंवा जाता येणार नाही, अशा विद्यार्थ्यांना व्यावहारिक दृष्टया पुरेसे त्या त्या विषयातील मूलभूत ज्ञान मिळावे, याची मुख्यतः दक्षता बाळगण्यात आली आहे. स्त्रीजीवनाचे गृह हेच महत्त्वाचे क्षेत्र समजले जात असल्यावरून त्या क्षेत्रातील कार्यक्षमता वाढावी, व त्याचा फायदा पर्यायाने अखिल समाजाला मिळावा, अशी अपेक्षा बाळगली जात असल्यास नवल नाही. म्हणून मुलींसाठी गृहजीवन समृद्ध व सुखकर करण्याची तयारी करून देण्याजोग्या विषयांची निवड विविधलक्ष्यी अभ्यासक्रमात झाली आहे हे सयुक्तिकच होय.

शिक्षणाची व्यावहारिक उपयुक्तता नजरेसमोर ठेवल्यास समितीने सुचवलेल्या विषयांव्यतिरिक्त आणखीही विषयांचे अभ्यासक्रम ठेवता येतील. पण अखेर अशा अभ्यासक्रमांचे अंतिम उद्दिष्ट काय ? जे मुलांच्या बाबतीत तेच — जितक्या जास्त विषयात शिक्षण मिळेल तितके द्रव्यार्जनाचे जास्त मार्ग खुले होतील.

शिक्षणाच्या क्षेत्रात घर करून बसलेल्या उपयुक्ततावादाचे वजन स्त्रीशिक्षणाच्या मूलभूत सांस्कृतिक उद्दिष्टापेक्षा जास्त पडणे स्वाभाविक आहे. आज जीवन खडतर झाले आहे, व अजून अधिकाधिक खडतर होत जाण्याचीच धास्ती आहे. तेव्हा स्त्रीला द्रव्यार्जन करण्यासाठी तयार व्हावे लागेल. या परिस्थितीचा परिणाम तिच्या शिक्षणावर व शिक्षणाच्या उद्दिष्टावर थोडाफार होणारच. परंतु परिस्थितीचे धक्के खावे लागले तरी स्त्रीशिक्षण परिस्थितीच्या पायदळी जाऊ नये. जीवनातील व्यावहारिक

अडचणींसमोर निसर्गाने दिलेल्या शक्तीचा बळी देण्याची वेळ स्त्रियांवर येता कामा नये. स्त्रीच्या काय, पुरुषाच्या काय, ऐहिक जीवनाच्या सफलतेला स्वत्वरक्षणाशिवाय किंमत नाही. पण प्रसंगच पडला तर पुरुषाची भूमिका पडेल ते करण्याची. स्त्रीचे स्थैर्य, स्वातंत्र्य व अधिष्ठान अक्षत राहिले पाहिजे. जीवनाच्या आधारभूत तत्त्वाचे जतन तिने करीत राहिले पाहिजे, व जीविताचा झगडा बाहेर चालू असताना विशेषच कटाक्षाने पुरुषाला दिलासा व प्रोत्साहन दिले पाहिजे. आपल्या आत्मिक बलाचा पुरुषाच्या सामर्थ्याला तिने टेका दिला पाहिजे. पुरुषाबरोबर कंबर कसून तीही झगड्यात उडी घेईल—अलोट त्याग करील, पण प्रत्यक्ष झगड्यात पुरी पडण्याजोगी शक्ती तिला निसर्गाने दिलेली नाही. ती इतकी घायाळ होईल की तिला जीवन–आधाराचे जे जतन केले पाहिजे, ते करायला कोणीच न उरल्यामुळे दोघांचे जीवन कोलमडून नीरस व विद्रूप होईल.

आजची परिस्थिती पाहिल्यास अजून काही वर्षे तरी मध्यमवर्गीय स्त्रीला द्रव्यार्जन करायला तयार व्हावे लागेल, हे दुर्दैवाने खरे आहे. पण द्रव्यार्जन म्हणजे नोकरीच का ? समितीने सुचवलेल्या विविधलक्ष्यी विषयांच्या बहुतेक प्रकारात पुढे नोकरीशिवाय दुसरा मार्ग नाही. स्त्रिया आज फार मोठ्या प्रमाणात नोकरी करीत आहेत. पण त्यामुळे समाजाच्या जीवनात अतोनात विकृती वाढत आहे. कुटुंबातील स्वास्थ्य व समाधान नाहीसे झाले आहे. मुलांकडे दुर्लक्ष होत आहे. शक्तीचा अनाठायी ऱ्हास होत आहे. सर्वांत घातक म्हणजे नोकरीने मानसिक गुलामगिरीची बेडी पडते. नोकरीचे स्वरूपच हे की स्वत्व व बल अक्षरशः विकले पाहिजे. पुरुषांच्या बाबतीतही उपजीविकेसाठी नोकरीशिवाय दुसरा मार्ग नसल्यास दुर्दैव होय. आत्मविकासाचा संभव अत्यल्प, समाजाची सेवा सहज घडेल ती, आणि पदोपदी मानहानी, हे सर्व पत्करून अप्रतिम बुद्धिमत्ताही स्वतःला विकून घेण्यांत प्रतिष्ठा मानते ! त्यात आणखी स्त्री त्याच मोहात फसून गेली असल्याने स्वाभिमानाला कुठेच थारा नाहीसा झाला आहे व सबंध जीवन खिळखिळे झाले आहे. परस्परांबद्दलचा आदर, वचक नाहीसा होत आहे. स्त्रीसमोर सर्व प्रकारे पुरुषाने संयम राखण्याची सांस्कृतिक परंपरा मोडून, स्त्री आपल्यातलीच आपल्यासारखीच एक आहे, ही भावना उद्भवली आहे.

रक्ताचे संबंध शिथिल झाले आहेत. मुलांच्या विचार-उच्चार-आचारांवर नजर ठेवून मार्गदर्शन करणे मातापित्यांना कठीण झाले आहे. मार्ग-दर्शनाच्या अभावी मुलांच्या हातून घडत असलेले अविचार मनाशी चडफडत मान्य करून घ्यावे लागत आहेत. या दुर्बल अगतिकतेचे मूळ बऱ्याच अंशी स्त्रियांच्या मानसिक गुलामगिरी पत्करण्यात आहे.

द्रव्यार्जन करावेच लागले तर स्त्रियांनी अर्धवेळ काम करावे. औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्रपणे किंवा कारखान्यांसारख्या ठिकाणचे दिवसाकाठी तीन ते चार तास करण्यासारखे काम स्त्रियांना बरेच मिळू शकेल. स्त्री-शिक्षण-समितीने स्त्रियांच्या पूर्ण वेळ काम करण्यापासून होणाऱ्या सामाजिक हानीबद्दल काळजी व्यक्त करून स्त्रियांना अर्धवेळ काम देण्यात यावे, असे सुचवले आहे. स्त्रियांना निरनिराळ्या कारखान्यात जाऊन कामे करणे शक्य किंवा सोयिस्कर नसेल तर घरी आणून करण्याजोगी अनेक प्रकारची कामे आहेत, असे समितीचे म्हणणे आहे. छोटे घरगुती व्यवसाय तर स्त्रियांना चांगलेच करता येतील. या दिशेने स्त्रियांना भरपूर वाव, उत्तेजन व मार्गदर्शन देऊन भांडवल, कच्चा माल व खप यांसाठी शक्य ती मदत सरकारने द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

ही कामे इतक्या प्रकारची निघतील की त्या सर्वांसाठी लागणारे शिक्षण शालेय अभ्यासक्रमांतून देणे अशक्य आहे. शाळांमध्ये थोडे सर्व-सामान्य यंत्र-ज्ञान देता येईल. जितके देता येईल तितके दिले गेले पाहिजे. त्या त्या कामामध्ये कार्यक्षमता येण्यासाठी जरूर त्या शिक्षणाची सोय त्या त्या विशिष्ट कारखान्यांच्या किंवा केंद्रांच्या संचालकांमार्फतच करण्यात आली पाहिजे.

नोकरीपेशात एकच अपवाद आहे. स्त्रियांना योग्य अशी केवळ एकच नोकरी आहे– शिक्षिकेची. शिवाय समाजाच्या दृष्टीनेही स्त्रीशिक्षिकांची शैक्षणिक संख्या व गुणवत्ता दोहोंच्या प्रगतीसाठी गरज आहे. कारण शिक्षकाला आवश्यक असणारे गुण स्त्रीमध्ये निसर्गतःच प्रकर्षाने असल्यामुळे पुरुषापेक्षाही विशेषतः प्राथमिक अवस्थेत स्त्रियाच उत्तम शिक्षिका होतात. अर्थात अध्यापनाच्या माध्यमिक व उच्च क्षेत्रातही स्त्रीशिक्षिकांचें काम सांस्कृतिक प्रगतीला पोषक असते. शिक्षणक्षेत्रात काम करायचे तर नोकरी

करण्याखेरीज सामान्यतः इलाज नाही. पण शिक्षणक्षेत्रातील नोकरी अशा स्वरूपाची असते की इतर नोकऱ्यांमध्ये स्वतःला विकून घ्यावे लागते, तसे येथे लागत नाही. उलट शिक्षिकेचे स्वतःमधील उत्तमात उत्तम असे सर्व सत्कारणी लागते. मात्र, शिक्षिकेच्या कामासाठी आवश्यक ते तांत्रिक शिक्षण माध्यमिक शालेय अभ्यासक्रमात पुरेसे देता येईल की नाही याची शंका वाटते.

पूर्वप्राथमिक शिक्षणक्षेत्रातही नैसर्गिक शक्तीमुळे स्त्रियाच शिक्षिका असणे सुलभ व फायदेशीर आहे. परंतु प्राथमिकपेक्षा जास्तच तांत्रिक पूर्वतयारीची पूर्वप्राथमिक क्षेत्रात आवश्यकता असते. शिवाय प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षिकेला आवश्यक असलेले ज्ञान चांगले पचनी पडायला व मुरायला काही प्रगल्भता लागते. ती निदान थोडीशी तरी वयाने येऊ शकते. माध्यमिक अभ्यासक्रम चालू असलेल्या कालखंडात मुलीमध्ये ही प्रगल्भता नसते.

मात्र पूर्वप्राथमिक शिक्षकाला अवश्यक बालमानसशास्त्र, असलेल्या इंद्रिय-शिक्षण अशा एक-दोन विषयांचा अंतर्भाव मुलींच्या माध्यमिक शालेय अभ्यासक्रमातच केला जाणे अतिशय हिताचे आहे. हा अंतर्भाव मुलींनी पुढे शिक्षिका बनण्यासाठी नव्हे. हे ज्ञान मुलींच्या भावी जीवनात उपयोगीच नव्हे तर आवश्यक आहे म्हणून. ज्या वयात मुलाला आई पाहिजे असते, आई म्हणजे त्याचे सर्वस्व असते, त्या वयात त्याला पूर्व-प्राथमिक शाळेत पाठवून मातेने स्वतःपासून दिवसाचे काही तास दूर ठेवणे, व स्वतःव्यतिरिक्त त्याला एक निराळे श्रद्धास्थान निर्माण करणे अंतिम हिताचे नव्हे. भावनांच्या योग्य विकासाला मातेचे सान्निध्यच खरे पोषक असते. मुलाला मातेच्या मातृत्वाचा प्रत्यक्ष अनुभव व उपभोग अनन्यपणे जीवनाच्या कोवळ्या अवस्थेत भरपूर मिळणें हा त्याच्या सबंध जीवनाच्या पूर्वतयारीचा एक मोठा भाग होय. या जाणिवेचा व ज्ञानाचा प्रसार होण्यास ज्या समाजगटात अजून दुर्दैवाने कालावधि लागेल, त्या समाजात मुलांचे पूर्वप्राथमिक वयातील संगोपन शिक्षिकांना करावे लागेल. परंतु शिक्षित मातांच्या बाबतीत उलट आपल्या मुलांना आपल्या निकट सहवासाची जरूरी असते अशा वयात, मन घातले तर जे आपणास देता

येईल ते शिक्षण देण्यास शाळेत पाठवण्यात नामुष्कीच आहे. म्हणून त्या वयात मुलाचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, व आत्मिक संगोपन कसे करावे याचे शिक्षण—म्हणजेच पूर्वप्राथमिक शिक्षण आपल्या मुलींना माध्यमिक अभ्यासक्रमातील आवश्यक विषयांमधून मिळाले पाहिजे.

द्रव्यार्जन व उपजीविका यांकडे लक्ष पुरवण्याचा काही स्त्रियांवर तात्पुरता प्रसंग आला, तरी ते स्त्री-शिक्षणाचे ध्येय होऊ शकत नाही. समाज अधिक बलशाली व समृद्ध बनवण्याचे स्त्री-पुरुष दोघांचे कार्य आहे. त्यांत जीवनाची बाह्य, आधिभौतिक, बाजू मुख्यतः पुरुषाने संभाळावी, व आंतर, भावनात्मक, आध्यात्मिक बाजू मुख्यतः स्त्रीने संभाळावी, अशी आजवरच्या मानवी जीवनाच्या इतिहासावरून निसर्ग-योजना असल्याचे दिसते. आपले क्षेत्र सोडून दुसऱ्याच्या क्षेत्रात कोणालाही उतरावे लागले तर ते जीवन अस्वाभाविक म्हणून व त्रासदायक व कष्टप्रद असते. अर्थात् त्यामुळे सामाजिक प्रगतीला अडथळा होतो. म्हणून शिक्षणामध्ये नैसर्गिक शक्तींचा व गुणांचा विकास करण्याचीच योजना पाहिजे. " **श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्** " हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे.

आजची परिस्थिती लक्षात घेतल्यास माध्यमिक शिक्षणापुढे न जाणारी सामान्य मुले व मुली जीवनात ज्या प्रकारचे काम पत्करतात, त्यांपैकी एक शिक्षकाचा पेशा सोडून, भाषा व अंकगणित या दोन विषयांखेरीज इतर विषयांची जितकी गरज आहे, त्यापेक्षा शतपटीने काम करण्याच्या वळणाची, शारीरिक व बौद्धिक सवयीची, गरज आहे. अभ्यासक्रमाचे व विषयांचे अवडंबर कितीही विस्तृत केले, तरी जोपर्यंत अवयवांच्या व बुद्धीच्या बारीकसारीक सर्व सवयींकडे पुरेसे लक्ष दिले जाणार नाही, व लेखनादि कामाच्या उत्कृष्टतेबद्दल कटाक्ष बाळगला जाणार नाही, तोपर्यंत शिक्षणाचा दर्जा वाढणे शक्य नाही. मुलाखतीसाठी जाणाऱ्या बऱ्याच उमेदवारांच्या हास्यास्पद उत्तरांवरून भाराभर विषय अभ्यासक्रमात ठासून भरलेले असूनही एकंदर परिणामाची उत्तम कल्पना येते. पण हा ज्ञानाचा मुद्दा वेगळाच. उमेदवारांना मुलाखतीच्या वेळी धिटाईने, तरतरीतपणाने, आत्मविश्वासाने संभाषण करता येत नाही, हा अनुभव ठिकठिकाणी येत आहे. हा दोष वैयक्तिक समजणे कठीण आहे. ज्या शाळांतून हे उमेदवार उत्तीर्ण होतात त्या

शाळात निवळ पुस्तकी घोकंपट्टी चालू आहे, हा सरळ निष्कर्ष आहे. आजच्या घडीला भारतात व्यवस्थितपणे वस्तु हाताळण्याची, हिशेब किंवा इतर काही लेखन असेल तर ते शिस्तबद्ध करण्याची सवय, विशिष्ट कामातील बारकावे समजून घेण्याची प्रवृत्ती, या अत्यंत साध्या गोष्टींवर जितकी कार्यक्षमता अवलंबून आहे, तितकी विषयांच्या ज्ञानावर नाही. याबद्दल जागरूक राहिल्यास नियुक्त अभ्यासक्रमाचे खरे चीज होईल.

पूर्णपणे सर्वांच्या पसंतीस उतरेल, व सदैव सारखाच उपयुक्त ठरेल, असा अभ्यासक्रम आखणे सर्वथैव अशक्य आहे. तथापि आज शिक्षित समाजात कौटुंबिक समाधान नाहीसे होत असल्याचा अनुभव येत आहे हे लक्षात घेऊन मुलीच्या माध्यमिक शिक्षणाचा विचार करणे आवश्यक आहे. कारण, कुटुंबातील स्वास्थ्य व स्थैर्याची जोपासना स्त्रीचे कर्तव्य आहे. मनुष्याची वैयक्तिक व सामाजिक प्रगती ज्या गुणांच्या विकासाशिवाय होऊ शकणार नाही, असे सर्व गुण घराच्या व कुटुंबाच्या आवारातच काळजीपूर्वक जोपासले जावे लागतात. सार्वजनिक कारभारविषयक व इतर कामामध्ये लागणारी निष्ठा व कार्यक्षमता कुटुंबातल्या जीवनातूनच मुलांमुलींच्या अंगीं येईल. घराच्या व कुटुंबाच्या आधाराशिवाय हे गुण पोसले जाणे शक्य नाही. घरातल्या बारीकसारीक संघर्षांतून सामाजिक व राष्ट्रीय जीवनासाठी आवश्यक असलेले संयम, बंधुभाव, सहिष्णुता, सहनशीलता हे गुण मुले शिकतील. मातृभूमीबद्दल श्रेष्ठत्वाची, कर्तव्याची, कृतज्ञतेची, अभिमानाची, अशा भावना आपल्या मुलांमुलींमध्ये निर्माण व्हायला हव्या असतील तर त्या भावनांचे बीज घरात आहे, हे ओळखले पाहिजे, व मुलांमुलींना घराबद्दलची ओढ व श्रद्धा कायम राहील असे प्रयत्न झाले पाहिजेत.

त्यातही मुलींकडे पुढे गृहकर्तव्ये येणार असल्यामुळे, भावी जीवनातील जबाबदाऱ्यांची त्यांना ओळख होईल, व त्या उचलण्याची ताकद येईल, अशा प्रकारच्या विषयांचा माहितीचा, व वाङ्मयाचा अंतर्भाव त्यांच्या अभ्यासक्रमात होणे जरूर आहे. शिक्षण घेतल्यावर घराबद्दल व घरातील कर्तव्यांबद्दल बेफिकीरपणा मुलींमध्ये आज वाढू लागल्याचे दिसत आहे, हा मुलींच्या अभ्यासक्रमात बदलच नव्हे तर आमूलाग्र क्रांती झाली पाहिजे याचा पुरावा होय.

स्त्रीचे जीवन जगताइतके विशाल आहे. पण स्वतःच्या जीवनाच्या विशालतेची तिला कल्पना नाही, म्हणून ती क्षणिक गरजांनाच महत्त्व देत आहे. तिला जीवनाबद्दलची खरी कल्पना शिक्षणानेच येईल, व म्हणून तसेच शिक्षण तिला मिळाले पाहिजे. जगातील स्थिर व बदलत्या प्रवृत्ती व परिस्थिती यांचे ज्ञान मिळवण्याची उत्सुकता तिच्यामध्ये सतत जागृत राहील, असा तिचा माध्यमिक अभ्यासक्रम पाहिजे.

मुलींचा प्राथमिक अभ्यासक्रम मुलांबरोबर वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत पूर्ण व्हावा. मुलींच्या माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम चार वर्षांचा व स्थूलमानाने असा असावा—

मुलींना सुमारे तीनच तास शाळा असावी. अशासाठी की शिक्षणाच्या साहाय्याने जीवन जगणे व जीवन जगता जगता शिक्षण घेणे चालू राहावे; छंद, गृहपाठ व घरांतील कर्तव्ये यांसाठी भरपूर वेळ मिळावा व घराचे साहचर्य पुरेसे लाभावे. अभ्यासक्रमात गृहजीवनशास्त्राला प्राधान्य असावे. गृह-जीवनशास्त्र फक्त पाकशास्त्रापुरते मर्यादित नसून त्यांत आहारशास्त्र, शरीर-शास्त्र, आरोग्यशास्त्र, रुग्णशुश्रूषा, प्रथमोपचार, गृहसजावट, गृहव्यवस्था, ( आर्थिक व इतर ) वस्त्रशास्त्र, शिवण, धुणेशास्त्र बालमानसशास्त्र, बालसंगोपन, नागरिकशास्त्र या सर्व विषयांचा व त्यांच्या अनुषंगाने, येणाऱ्या पाकशास्त्र, घरगुती औषधे, पैशाचे व्यवहार व काटकसर. छोट्या यंत्रांची दुरुस्ती इत्यादि कौटुंबिक दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींचा समावेश पाहिजे. औपपत्तिक ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिकाला महत्त्व जास्त असावे. शाळेत शास्त्रशुद्ध पद्धती शिकवण्यापुरती मर्यादित प्रात्यक्षिके असावी, पण शक्य तितक्या प्रात्यक्षिकाची तरतूद घरी व्हावी. शाळेत मार्गदर्शन व प्रत्यक्ष जीवन घरी अशी व्यवस्था असावी.

गृहजीवनशास्त्राव्यतिरिक्त मुलींना सामान्यज्ञान व भाषा-वाङ्मय हे दोनच विषय गृहजीवनशास्त्राच्याच तोडीचे असावे. या दोन्ही विषयांत भरपूर व्यापकता असावी. गणित, इतिहास, भूगोल, शास्त्र, या विषयांचे प्राथमिक ज्ञान त्यांना प्राथमिक शाळेत मिळालेले असावे. सामान्यज्ञान या विषयात जगातील घडामोडी, शास्त्रीय शोध, राज्यव्यवस्था व राजकारण, हवापाणी व पिके, बाजारभाव व चलने, निरनिराळ्या कला व खेळ, इत्यादि

विषयांचे चालू ज्ञान मिळत राहावे. सामान्यज्ञानात, इतिहास, भूगोल, शास्त्र, यांचा फार मोठ्या प्रमाणात समावेश नसावा. चालू घडामोडींबद्दल जिज्ञासा जागृत राहील, व घटनांचे कार्यकारणसंबंध कळतील इतक्या प्रमाणात हे विषय समाविष्ट असावे. वाङ्मय हा विषय अत्यंत व्यापक असावा. चार-दोन लेखनप्रकार असलेल्या एखाद्या पुस्तकाने तो मर्यादित असू शकणार नाही. वाङ्मयीन प्रकारांची निरनिराळी बरीचशी पुस्तके वाचावी लागतील असा अभ्यासक्रम असावा. मुलींना स्त्रीजिवनाचा आदर्श मिळेल अशा प्रकारचे वाङ्मय पुस्तकांची निवड करताना पुरेशा प्रमाणात समाविष्ट केलेले असावे. द्रौपदी, सीता, चांदबिबी, अहल्याबाई, झाशीची लक्ष्मी, फ्लॉरन्स नाइटिंगेल, ॲनी बेझंट, पंडिता रमाबाई, हे एकेका विशिष्ट क्षेत्रातील आदर्श आहेतच, पण स्वावलंबी, नम्र, कामसू, हौशी, कुटुंब-जीवन उत्तम तऱ्हेने चालवणारी, पतीच्या व मुलांच्या बाबतीतल्या स्वतःच्या कर्तव्याविषयी निरंतर जागरूक असलेली, समाजाशीही संपर्क राखून समाजाच्या उन्नतीला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हातभार लावणारी, एखादी साधी स्त्रीसुद्धा आदर्शच होय. अशा सर्व स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण व चरित्र मुलींना भरपूर वाचायला मिळावे. भाषाविषयांत वाचनाच्या बरोबरीने लेखनाला स्थान असावे. गृहपाठ-वाचन व लेखन दोन्ही प्रकारचे व पुष्कळ दिले जावे.

इंग्रजी, हिंदी, संस्कृत या भाषा मुख्य अभ्यासक्रमात येण्याची जरूरी नाही. ह्या भाषा, तसेच दुसरे काही तांत्रिक स्वरूपाचे तात्पुरत्या उपयुक्ततेचे किंवा हौसेचे विषय ऐच्छिक असावेत, व अशा विषयांसाठी सुटीतले अभ्यासक्रम ( Vacation courses ) तयार केले जावे.

माध्यमिक शिक्षणात नैतिक व धार्मिक शिक्षणाला दररोज थोडासा वेळ देणे स्त्री-शिक्षणाच्या दृष्टीने अनिवार्य आहे.

शारीरिक शिक्षण हा महत्त्वाने सर्व शालेय बौद्धिक विषयांच्या तोडीचा एक स्वतंत्र शैक्षणिक भाग आहे. हे शिक्षण शाळेत व शाळेच्या वेळेत समाविष्ट केल्याने काय साधत आहे, हा एक फारच मोठा विचार करण्यासारखा प्रश्न झाला आहे! फक्त शारीरिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची ठिकठिकाणी जरूर त्या प्रमाणात स्थापना होऊन शाळांना समांतर अशी शारीरिक शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था सुरू झाल्याशिवाय शारीरिक शिक्षण

आरोग्याच्या, शरीरसौष्ठवाच्या व नैपुण्याच्या दृष्टीने सर्वांना उपयोगी होणार नाही. सबब माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींनी शारीरिक शिक्षण व्यायाम-शाळांमधून घेतले पाहिजे.

उच्च शिक्षणाचा माध्यमिक शिक्षणाशी असलेला संबंध पूर्णतया दृष्टिआड करून चालणार नाही. उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम प्रत्येक विषयाचे सखोल ज्ञान देणारा असावा. पदवी परीक्षेकरिता प्रत्येक विद्यार्थिनीला एक-दोनच विषय असावे. या विषयांकरिता लागणारी पूर्वतयारी, निदान दृष्टिकोन व आवड माध्यमिक शाळेत बहुधा निर्माण झालेली असेल. तशी झालेली नसल्यास स्वतंत्रपणे पूर्वतयारीसाठी सहा महिने किंवा एक वर्ष दिले जावे. उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्य मुलींसाठी जरूर पडणारी व्यवस्था सर्वच मुलींवर लादली जाऊ नये.

माध्यमिक शिक्षणसंस्थात सहशिक्षण असू नये. शिक्षकवर्गात स्त्री-पुरुष दोन्ही असावे. स्त्रियांचे अर्धवेळ काम असावे.

सामान्य मुलींना ज्या प्रकारचे जीवन जगावे लागते, व ज्या जीवनात पुरेसे स्वास्थ्य नसल्यास मोठमोठ्या चळवळींना सहकार्य व नैतिक पाठबळ मिळू शकत नाही. त्या जीवनाला वरीलपेक्षा जास्त पूर्वतयारीची मुलींना जरूर नाही. ज्यात ज्ञानप्राप्तीचा आनंद नाही, उलट ज्याच्याबद्दल ‘ हे काय बोकांडी बसले आहे ’ अशी अथपासून इतीपर्यंत भावना असते, जे करावे लागतील तितके अधिकाधिक नकोसेच होतात, आणि शेवटी ज्यांच्याबद्दल कायमची अढी बसते, असे विषय अभ्यासक्रमात घालून विद्यार्थिनींना शालेय जीवनातही आनंद व हित साध्य होत नाही, मागाहून तर नाहीच. म्हणून वेळेचा अपव्यय टाळलेला बरा. स्त्रीशिक्षणाने संस्कृतीचे जतन होईल ही महत्त्वाकांक्षा बाळगावी. संस्कृतीला धरून आचरण, संस्कृती-विरुद्ध विचार-उच्चार-आचारांना थारा न देणे, याबद्दल शिक्षण चालू असताना कटाक्ष ठेवला पाहिजे. इतके साध्य झाले तर शिक्षण सफल होईल. पुरुषांच्या शिक्षणाचे यश त्यांनी मिळवलेल्या ज्ञानाच्या प्रमाण व दर्जावरून मापायचे, स्त्रियांच्या शिक्षणाचे त्यांची जीवनाबद्दलची दृष्टी व निष्ठा कशी व किती बनली आहे यावरून. वाचनाने किंवा निरीक्षणाने होणारे ज्ञान दैनंदिन व्यवहार व्यवस्थित चालवायला मदत करील, पण काय वाचायचे

किंवा पहायचे, हे स्त्रीला समजले पाहिजे, व वाचलेल्या किंवा पाहिलेल्या गोष्टीतून बरे-वाइटाची निवड करण्याची शक्ती आली पाहिजे. प्रत्यक्ष ज्ञानापेक्षा बुद्धीचा स्वतंत्रपणे उपयोग करण्याची व शिस्तबद्ध रीतीने काम करण्याची प्रवृत्ती व सवय फार महत्त्वाची आहे. हे सत्य ओळखले तर माध्यमिक शिक्षण स्त्रियांच्या बाबतीत स्वयंपूर्ण व यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.

हे सर्व सामान्य स्त्रीवर्गाबद्दलचे विवेचन झाले. स्त्रीवर्गात अशा तऱ्हेचे काही अपवाद निघतील की ज्यांना सर्वांच्या बरोबर ठेवले असता त्यांची बुद्धिमत्ता खुजट होईल. अशा मुलींना ज्ञानार्जनासाठी व कर्तृत्वासाठी सामान्य स्त्रीवर्गापेक्षा विस्तृत क्षेत्र मिळाले पाहिजे. तसेच त्यांच्या विशिष्ट बुद्धिमत्तेचा व कर्तबगारीचा उपयोग समाजाला मोठ्या प्रमाणात लाभला पाहिजे. अशा मुलींच्या अंतःशक्ती आपोआपच सामान्य क्षेत्रापलीकडे झेप घेण्याची शक्यता फार असते. परंतु कित्येक तेजस्वी मुलींच्या शक्ती ओळखाव्या व पारखाव्या लागतात, व त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करावे लागते.

हे काम शिक्षकाचे आहे.

शिक्षणकार्यांत शिक्षक हा सर्वप्रमुख घटक आहे. शिक्षणक्षेत्रांत कोणतीहि लहानमोठी सुधारणा शिक्षकाच्या कार्यक्षम व निष्ठापूर्ण कामाशिवाय यशस्वी होणे अशक्य आहे. इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीबद्दल लिहिणारे शिक्षणतज्ज्ञ आमच्या देशांतील शिक्षणपद्धतीची सुव्यवस्था शिक्षकांच्या वेळोवेळीं झालेल्या विचारविनिमयांचे फळ आहे असे कृतज्ञतापूर्वक व अभिमानाने लिहितात. आपल्या पेशांत शिक्षकाला पाहिजे तितके व्यावहारिक स्वातंत्र्य नाही. परंतु कोणाच्याहि बैद्धिक स्वातंत्र्यावर कोणतीहि बाह्य सत्ता नाही. शैक्षणिक व परिस्थिती समस्यांचा निःस्वार्थीपणाने व विशाल दृष्टीने अभ्यास व तदनुरूप कार्य करण्याचें महत्त्व आपल्या शिक्षकांनी ओळखले पाहिजे. वेळोवेळीं येत राहणाऱ्या अनुभवांचा साकल्याने अभ्यास करून त्यांवर विचार, व नैतिक जबाबदारीने व अधिकाराने चर्चा करणारा शिक्षकवर्ग तयार झाला पाहिजे, दुसऱ्यांनी दिलेल्या नवनवीन कल्पना एकदम आत्मसात् करता आल्या नाहीत तरी निष्ठेने व प्रांजलपणाने त्या अमलात आणून पाहण्याची

मोठेपणाची प्रवृत्ति शिक्षकांनी अंगीकारली नाही तर लादले जाईल ते काम शिक्षकाने मुकाट्याने करण्याची प्रथा अधिकच बद्धमूल होत जाईल.

शिक्षणक्षेत्रात पालकांची जबाबदारी आहेच. मुलाच्या सर्वांगीण विकासावर लक्ष ठेवण्याकरता पालकांचे साहाय्य अत्यावश्यक आहे. वर उल्लेखिलेल्या अभ्यासक्रमासारखी एखादी योजना निर्माण झालीच तर मुलींच्या कुटुंबीयांवर शिक्षकांच्या बरोबरीने जबाबदारी पडेल, व शाळेंतील मार्गदर्शनाचा व औपपत्तिक ज्ञानाचा आचरणांत अंमल कसा व किती होत आहे याची माहिती पालकांनी निरलसपणे शिक्षकाला पुरवावी लागेल. परंतु शिक्षकाचे वैशिष्ट्य व महत्त्व सर्वप्रथम आहे हें विसरून चालणार नाही. शिक्षकाने शिक्षणक्षेत्रांत पाऊल घातल्यापासून एकसारखा अभ्यास करीत राहिले पाहिजे. मुलांमुलींच्या शक्तींचा, सवयींचा, गरजांचा, भावनांचा, शिक्षणावर परिणाम करणाऱ्या सामाजिक व इतर परिस्थितीचा, तसाच अभ्यासक्रमाचा, व पाठ्यपुस्तकांचा,—सर्व गोष्टींचा शिक्षकाचा अभ्यास इतका असला पाहिजे की शिक्षणक्षेत्रातील कोणत्याही प्रश्नांत शिक्षकाचे मत अंतिम निर्णायक म्हणून ग्राह्य धरलें जाण्याइतका त्याला अधिकार यावा.

शिक्षकामध्ये शिक्षिका समाविष्ट आहेत. फक्त अर्धवेळ कामाखेरीज शिक्षिकांच्यामध्ये शिक्षकाच्या मानाने कोणतेहि न्यून इष्ट नाही.

अस्तु !

स्त्रीशिक्षणांत सांस्कृतिक तत्त्वाचे व परंपरांचे जतन करण्याचे धोरण ठेवण्यात आले, व त्या धोरणाला योग्य असा अभ्यासक्रम व अध्यापनद्धति अमलांत आली तर शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुलींमध्ये समाजांतील स्थानिक मध्यमवर्गीय गटाच्या समस्यांचा जिव्हाळ्याने स्वतंत्रपणे विचार करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होईल, व वेळ पडेल तेव्हा जबाबदारीने सार्वजनिक कार्य करण्याची उमेद राहील.

वरील विवेचनांत ग्रामीण विभागांतील स्त्रीशिक्षणाच्या प्रसारांतील अडचणींचे निराकरण ओघानेच झाले आहे. शहरी व ग्रामीण गटांतील अंतर कमी करण्यांत वरील विचारसरणीची मदत होईल यांत शंका नाही.

♧ ♧ ♧

# शिक्षणव्यवस्थेचे अर्थशास्त्र

• ३ •

दि. ह. सहस्रबुद्धे
बी. ए., बी. टी., एल्‌एल्. बी.

मनुष्याचे मन सुसंस्कृत करणे हे शिक्षणाचे कार्य, रुपये आणि नवे पैसे या भौतिक संपत्तीच्या भाषेत सर्व बाबींची मोजणी करणाऱ्या अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून शिक्षण-व्यवस्थेचे मापन करण्याचे अर्थाअर्थी काहीच कारण नाही, प्रशिक्षण महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अनेकानेक व्याख्यांपैकी कोणत्याही व्याख्येत भौतिक संपत्तीचे उत्पादन हे शिक्षणाचे उद्दिष्ट सांगितलेले नाही. मनुष्याच्या सर्व सुप्त शक्तींचा शिक्षणामुळे विकास होतो अशिक्षित मजुरा-पेक्षा शिक्षित मजुराकडून भौतिक संपत्तींत जास्त भर पडते एवढाच काय तो, सुसंस्काराचे साधन शिक्षण व भौतिक संपत्तीच्या उत्पादनाचे अर्थशास्त्र यांचा संबंध सर्वसाधारण समजुतीच्या या पार्श्वभूमीवर ' शिक्षणव्यवस्थेचें अर्थशास्त्र ' या शब्दप्रयोगाबद्दल कुतूहल वाटणे साहजिक आहे.

### शिक्षण व अर्थशास्त्र यांचा निकट संबंध

पण पाश्चिमात्य जगांत या शब्दप्रयोगाबद्दल कुतूहल वाटण्याचे दिवस केव्हाच संपून गेले आहेत. शिक्षण व अर्थशास्त्र यांचा परस्परसंबंध इतका निकटचा आहे की, राष्ट्रीय आर्थिक उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता तयार करण्यात येणाऱ्या विकासयोजना शिक्षणशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ यांच्या सहविचारानेच आखल्या गेल्या पाहिजेत याची स्पष्ट जाणीव पाश्चात्य विचारवंतांना झाली आहे.

**उत्पादन व शिक्षण यांची समप्रमाणात वाढ**

इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ब्यूरोने काढलले ‘ Some Economic Aspects of Educational Developments in Europe ’ हे पुस्तक व Economics of Public Education हा ग्रंथ याच जाणिवेचे निदर्शक ग्रंथ आहेत. Review of Educational Research चा ऑक्टोबर १९६१ चा अंक तर केवळ शिक्षणाचे अर्थशास्त्र या एकाच विषयाच्या चर्चेकरिता वाहिलेला आहे. १९६१ च्या ऑक्टोबर महिन्यातच वॉशिंग्टन येथे उत्तर अमेरिकन संस्थानें, कॅनडा, डेन्मार्क, बेल्जम, फ्रान्स आदि वीस राष्ट्रांची एक परिषद ‘ Economic Growth and Investment in Education ’ या विषयाच्या अभ्यासाकरिता भरली होती. शिकागो विद्यापीठाचे प्रोफेसर थिओडोर शूल्टझ यांनी शिक्षण आणि भौतिक संपत्तीची वाढ यांच्या परस्परसंबंधाचे बरेच संशोधन केले आहे. उत्पादन-तंत्रातील संशोधन व मजुराचे आरोग्य या गोष्टी भौतिक संपत्तीत भर घालतात हे खरेच, पण मनुष्य-भांडवलाधिष्ठित अमूर्त शक्तींचा वाढ ज्या शिक्षणाने होते ते शिक्षणही भौतिक संपत्तीत भरपूर भर घालते असा त्यांच्या संशोधनाचा निष्कर्ष आहे. त्यांनी असें म्हटलें आहे की, ‘ अमेरिकेत १९२९ ते १९५७ च्या दरम्यान मजुराची अर्थोत्पादनशक्ती जितकी वाढली त्यापैकी ३६ ते ७० टक्के वाढ ही मजुराच्या शिक्षणात जी वाढ झाली तिचा परिणाम आहे. ’ राष्ट्रीय आर्थिक उत्पादनक्षमता व शिक्षण यांची वाढ समप्रमाणात होत जाते अशा निर्णयाप्रत पाश्चिमात्य शिक्षण-तज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ संबंधित संशोधनानंतर येऊ लागले आहेत. असे आपणाला दिसून येत आहे.

**शिक्षणावरील खर्च वाढला**

जमीन–मजूर–भांडवल ही अर्थशास्त्राची मूलत्रयी; त्यांपैकी जमीन या घटकाशी शिक्षणाचा मुळीच संबंध नाही, मजूर या द्वितीय घटकाशी शिक्षणाचा संबंध आहे तो फक्त एवढ्याच करता की शिक्षणामुळे मजुराची उत्पादनक्षमता वाढते; आणि भांडवल तर केवळ यंत्रादि भौतिक बाबच असे सनातन काळापासून अर्थशास्त्रज्ञ मानतात. शिक्षण हेच भौतिक भांडवलाप्रमाणे आर्थिक उत्पादन वाढविण्याचे प्रमुख साधन म्हणजे भांडवलच

अनुक्रम ३६२२० वि: निबंध
आंक २१८६२ नोंदि: ९।७।६४



आहे, म्हणून शिक्षणावरील खर्च हा भांडवली खर्च आहे असे मानण्यास अर्थशास्त्रज्ञ तयार नसतात. अशा स्थितीत राष्ट्रीय आर्थिक उत्पादन आणि शिक्षण यांची वाढ समप्रमाणांत होते. हा साधार सांगितला जाणारा विचार शिक्षण व अर्थशास्त्र यांच्या आजपर्यंत मानल्या गेलेल्या संबंधाला जोराचा धक्का देणारा विचार आहे. शिक्षणाचा व अर्थशास्त्राचा संबंध इतका निकटचा आहे असे पाश्चात्त्य अर्थशास्त्रज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ मानू लागले आहेत. यामुळे पाश्चिमात्य राष्ट्रांचे योजनाकार आजपर्यंत शिक्षणावर जितका खर्च करीत आले आहेत त्यापेक्षा किती तरी जास्त खर्च अली-कडील काळात करीत आहेत.

## रशियाचे भौतिक सामर्थ्य व शिक्षणावरील खर्च

सर्व प्रकारच्या भौतिक सामर्थ्याबाबत आज सोव्हिएट रशिया व अमेरिकन संयुक्त राष्ट्रे यांच्यामध्ये जणु काही स्पर्धा सुरू आहे. त्यात सोव्हिएट रशियाचा थोडा वरचष्मा आपणास दिसतो. दोन वर्षांपूर्वी अमेरिकन शिक्षकांचे एक शिष्टमंडळ सोव्हिएट रशियाचा दौरा करून अमेरिकेत परत गेले. सोव्हिएट रशियाची प्रगती पाहून परत आल्यावर त्यांनी 'आपण शिक्षणावर कमी खर्च करीत आहोत का?' असा प्रश्न अमेरिकेला विचारला व त्याचे उत्तर अनेक आकड्यांच्या आधारे 'होय' असे दिले. यावरून शिक्षणावरील खर्चच राष्ट्रीय सामर्थ्य वाढण्यास भरभक्कम मदत करतो ही भौतिक सामर्थ्यसंपन्न राष्ट्रांची समजूत स्पष्ट होते.

## मूलग्राही विचार : शिक्षणच अर्थशास्त्र बदलविते

खरे पाहू जाता राष्ट्राच्या खजिन्यावर सर्वप्रथम हक्क राष्ट्ररक्षणाचा व दुसरा हक्क शिक्षणाचा असला पाहिजे. कारण, राष्ट्र एकदा संरक्षित राहिले की, राष्ट्राचा सर्वंकष विकास, मनुष्याच्या व समाजाच्या बहुविध शक्तींचा विकास करून, शिक्षणच करिते. एवढेच नव्हे तर या विकसित शक्तींच्या पोटी नव्या शक्ती जन्माला येऊन राष्ट्र सदा विकासशील ठेवण्याचे कार्य शिक्षणच करते. शिक्षण राष्ट्रीय उत्कर्षाचा अखंड स्रोत आहे. राष्ट्रीय उत्कर्षात व राष्ट्र उत्कर्षशील राहण्यात शिक्षणाचे हे स्थान आपण नीट समजून घेतल्यास आपण शिक्षणव्यवस्थेचे अर्थशास्त्र पाहत बसणार नाही.

शिक्षणव्यवस्थाच राष्ट्राचे सर्व अर्थशास्त्र बदलण्यास समर्थ असते हे आपणाला उमजेल व ते कसे घडवून आणावयाचे याचा आपण विचार करू.

## उशीरा व अमूर्त फळ

शिक्षण राष्ट्राचे अर्थशास्त्र बदलविते हा विचार आपणाला केवळ विचार म्हणून आजही पटू शकेल व पटतोही. तरी पण आपण आपल्या वार्षिक राष्ट्रीय आर्थिक उत्पन्नाचा फार मोठा हिस्सा शिक्षणावर खर्च करण्यास तयार होत नाही. याचे कारण एक तर शिक्षणावरील या गुंतणावळीला ( Investment ) जरा उशीरा फळ येते आणि दुसरे म्हणजे जे फल येते ते अमूर्त असल्यामुळे ते मोजता येत नाही; नेमक्या या खर्चामुळे ही इतकी प्रगती झाली असे आपणास दाखविता येत नाही. यामुळे आपण शिक्षणावर तुटपुंजा खर्च करतो व त्या खर्चाचा योग्य प्रमाणांत मोबदला मिळाला किंवा नाही हे लगेच पाहू लागतो. हीच आपली प्रवृत्ती आपणास शिक्षण-व्यवस्थेचें अर्थशास्त्र म्हणजे शिक्षणावर व शिक्षण-व्यवस्थेवर आपण जो खर्च ज्या उद्दिष्टाने खर्च करतो त्यामुळे त्या उद्दिष्टांची पूर्ती किती प्रमाणात होते हे पाहण्यास प्रवृत्त करते. हे खरे असले व त्या दृष्टीनेच आपण आपल्या शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास करणार असलो तरी शिक्षणाबद्दलचा हा मूलगामी व मूलग्राही विचार आपण आपल्या मनाशी सदा बाळगला पाहिजे. अलीकडच्या आपल्या विचारांना पाश्चात्त्यांच्या विचारांचा पाठिंबा लागतो. तसे असण्याची काही जरूर नाही; तरी त्याला अनुसरूनही आपल्याला निश्चितपणे सांगता येते की पाश्चात्त्य विचारवंत वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाचा कितवा हिस्सा शिक्षणावर खर्च केला म्हणजे किती अर्थोत्पादन वाढते व इतर प्रगती होते याचा अभ्यास करू लागले आहेत.

## भारतीय योजनाआयोगाचा दृष्टिकोन

भारतीय समाजविकासाकरिता शिक्षणविषयक योजना आखताना आपल्या योजनाकारांनी हा मूलगामी व मूलग्राही दृष्टीकोन अवलंबिला आहे का ?

## योजनाकारांचा दृष्टिकोन

‘ द्रुतगतीने आर्थिक विकास व तांत्रिक प्रगती साधण्याचे **सर्वांत महत्त्वाचे एकमेव** साधन म्हणजे शिक्षण होय. ’ असे वाक्य योजनाकारांनी

तृतीय पंचवर्षीय योजनाग्रंथात शिक्षण विषयाची प्रस्तावना करताना लिहिले आहे. त्यामुळे आर्थिक विकास व शिक्षण यांच्या परस्पर संबंधाची ही मूलग्राही दृष्टी आपल्या योजनाकारांना आहे असे वाटते. तसेच पुढच्याच वाक्यात, नव्हे याच वाक्याच्या उत्तरार्धात, योजनाकारांनी म्हटले आहे, ' संधिसमानता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्याची मूल्ये यांच्यावर आधारित समाजरचना निर्माण करण्याचे अति महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय.' यावरून राष्ट्राच्या आर्थिक विकासात, तांत्रिक प्रगतीत, त्याचप्रमाणे नव्या मूल्यांवर आधारित नवी समाजरचना निर्माण करण्याच्या कार्यात शिक्षणाला असलेले मौलिक स्थान योजनाकारांना वैचारिक दृष्ट्या समजले आहे असे आपणास दिसते. पण प्रत्यक्षात काही निराळेच दिसते.

## प्रत्यक्षात शिक्षणाची आबाळ

७७४ पृष्ठांच्या या तृतीय पंचवर्षीय योजनाग्रंथात ५७३ पृष्ठावर ' शिक्षण ' या प्रकरणास सुरुवात होते व त्या प्रकरणाचा क्रमांक २९ आहे. या एकाच गोष्टीवरून राष्ट्रीय विकासयोजनेत योजनाकारांनी शिक्षणाला प्रत्यक्षात किती गौण स्थान दिले आहे हे स्पष्ट होते. एकुण योजनाखर्चापैकी शिक्षणाकरिता दिलेला अधिकात अधिक १२ टक्के हिस्सा ही केवळ त्या गौण स्थानाची सर्वांना सहज समजण्यासारखी साक्ष आहे. शिक्षण-योजना ज्या मोघम भाषेत वर्णिल्या आहेत त्यावरून शिक्षण विषयाला नियोजनाच्या खऱ्या अर्थाने योजनाकारांनी महत्त्व दिले नाही, हे स्पष्ट होते. मुख्य म्हणजे योजनाकारांनी ' शिक्षणा 'ला ' समाजसेवा ' या खंडात एक उपविषय म्हणून स्थान दिले आहे. शिक्षणाबाबतचा उपरोक्त मूलग्राही विचार ध्यानात घेता ' समाजसेवा ' विषयखंडांपैकी ' शिक्षण ' हा एक उपविषय मानणे म्हणजे शिक्षणाची उपेक्षाच करणे होय.

## शिक्षण-योजनांची उद्दिष्टे

आपल्या योजनाकारांनी सुसूत्र विकासाची उद्दिष्टे पहिल्याच प्रकरणात वर्णिली आहेत. व तृतीय पंचवर्षीय योजना आखण्यात स्वीकारलेल्या भूमिकेचे स्पष्टीकरण चौथ्या प्रकरणात केले आहे. या दोन्ही प्रकरणात व अन्यत्र जेथे जेथे म्हणून शिक्षणाचा उल्लेख आहे त्या सर्व ठिकाणी राष्ट्रीय

अर्थोत्पादनाच्या विकासाचे त्याचप्रमाणे आर्थिक व सामाजिक विकासाला संतुलन ठेवण्याचे साधन ही शिक्षणाविषयीची आपली भूमिका असल्याचे योजनाकारांनी स्पष्ट केले आहे. शिक्षणामुळे अर्थोत्पादनास सहाय्य दीर्घ मुदतीत होते असे स्पष्ट करून विकासयोजनांची आखणी समानसंधी, सुप्त शक्तींचा विकास हीच तत्त्वे लक्षात घेऊन योजनाकारांनी केली आहे. त्यामुळे भारतातील शिक्षणयोजनांचे व त्या योजना ज्या शिक्षण-व्यवस्थेद्वारे अंमलात येत आहेत त्या व्यवस्थेचे परीक्षण आपण योजनाकारांनी सांगितलेल्या वरील उद्दिष्टानुसारच केले पाहिजे.

## आर्थिक दृष्टी कोणती ?

असे मूल्यमापन करीत असता आर्थिक दृष्टी अवलंबावयाची ती इतकीच की, आजच्या शिक्षणयोजना व आजची शिक्षण-व्यवस्था ही उद्दिष्टे सिद्ध करण्यास समर्थ आहेत का ?

शिक्षण-योजनांची अंमलबजावणी ज्या प्रकारे होत आहे, शिक्षणाची जी रचना करण्यात आली आहे किंवा तीत ज्या सुधारणा करण्यात येत आहेत, शिक्षणयोजनांवर व व्यवस्थेवर जो अर्थ व श्रमशक्ती खर्च होत आहे, त्यांपासून उद्दिष्टसिद्धीच्या दृष्टीने अधिकांत अधिक लाभ आपणास होत आहे का ? यात अपव्यय तर होत नाही ना ? केवळ याच दृष्टीने आपण भारतातील आजच्या शिक्षणव्यवस्थेचे परीक्षण करू.

## चारित्र्याचा अभाव हा शिक्षणाचा पराभव आहे

आपल्या योजनांची अंमलबजावणी होत असता व्यक्तिगत व राष्ट्रीय चारित्र्याच्या अभावामुळे पैशाचा अपव्यय होतो. शिक्षणाच्या मूल्यमापनाच्या दृष्टीने चारित्र्याचा अभाव हा शिक्षणाचा पराभव आहे. तरीही आपल्या परिशीलनात चारित्र्याच्या अभावामुळे शिक्षणयोजनांच्या अंमलबजावणीत व शिक्षणव्यवस्थेच्या कार्यवाहीत जो अपव्यय होत आहे त्याचा विचार आपण करणार नाही. कारण तो विषय तूर्त अप्रस्तुत आहे त्याचा संबंध प्रत्यक्ष अर्थोत्पादनाशी नाही. शिक्षण हे सुसंस्काराचेही साधन आहे. चारित्र्य सुसंस्काराचा परिपाक आहे. त्या दृष्टीने त्या महत्त्वपूर्ण विषयाची चर्चा स्वतंत्रपणेच करावयास हवी.

## सक्तीचे व मोफत शिक्षण का ?

शिक्षणाच्या अनेक योजनांपैकी सर्वप्रमुख योजना म्हणजे सक्तीच्या मोफत शिक्षणाची योजना होय. भारतीय समाजातील सर्व स्तरातील सर्व घटकांना स्वतःच्या प्रगतीकरिता समान संधी प्राप्त व्हावी व सुसंस्काराच्या दृष्टीने किमान शिक्षण मिळावे म्हणून भारताच्या घटनाकारांनी राज्य-घटनेच्या ४५ व्या कलमान्वये भारतातील प्रत्येक मुलाला १४ वर्षे वय पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीने शिक्षण देण्याची सोय करण्याची जबाबदारी स्वीकारली. ही जबाबदारी घटनेच्या सुरुवातीपासून दहा वर्षांच्या आतच म्हणजे १९६० पूर्वीच पूर्ण व्हावी असा मानसही जाहीर केला. त्या दृष्टीने पहिल्या पंचवर्षीय योजनेपासूनच जारीने प्रयत्न करण्यात आले. तरी ती जबाबदारी पाचव्या पंचवर्षीय योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही असे आता स्पष्ट झाले आहे. चालू तृतीय पंचवर्षीय योजनाकाळात फक्त ६ ते ११ वयापर्यंतच्या सर्व मुलांमुलींच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल असे मानले जात आहे.

## केवळ जुजबी अंदाज

कोणत्याही वयाच्या गटातील मुलांमुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण न दिले तरीही व दिल्यावर तर अधिकच निश्चितपणे त्यापुढील वयात शिक्षण घेण्यास बहुसंख्येने विद्यार्थी पुढे येतील हे निश्चित. तेव्हा योजनाच करावयाची तर त्या त्या वय–गटातून किती मुले कोणत्या वर्षी पुढील वयातील शिक्षण घेण्यास बाहेर पडतील याचा अंदाज अगोदर करावयास नको का ? राष्ट्रीय अर्थोत्पादनाच्या दृष्टीने त्यांपैकी किती मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्याची आवश्यकता आहे याचा हिशेबही अगोदरच तयार नको का ? तितक्या विविध प्रकारचे शिक्षण तितक्या मुलांना मिळू शकेल याची संपूर्ण तयारी त्या त्या वर्षापूर्वीच करून ठेवायला नको का ? तीनही पंचवर्षीय योजनांतर्गत शिक्षणयोजनांचे असे वर्षवार व विभागवार साधार अंदाज बांधून, त्या त्या प्रकारच्या शिक्षणाची पूर्वतयारी करून ठेवली आहे, निदान तशी पक्की योजना आखली आहे, असे दिसत नाही. अमुक वर्षी देशाच्या किंवा राज्याच्या अमुक विभागात इतकी मुले य वय-गटातून बाहेर पडतील, त्यापैकी अमुक इतक्या मुलांना प्रत्येकी इतक्य

भिन्न प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे, त्याकरता इतक्या प्रकारच्या इतक्या शाळा त्या विभागात स्थापन करावयाच्या आहेत, किंवा असलेल्या वाढवावयाच्या आहेत त्याकरिता अमुक वर्षी शिक्षणाच्या सर्व सोयी म्हणजे आवश्यक पात्रता असलेले अवश्य जेवढे शिक्षक, सुसज्ज इमारती, खेळाची मैदाने, प्रयोगशाळा, ग्रंथालये आदी–तयार ठेवू असे आश्वासन विस्तृत योजना-पुस्तकातही कोठे सापडत नाही. योजना सुदीर्घपणे वाचल्या तर किती प्रकारच्या किती शाळा वाढतील, कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची जरूर भासेल अशी सर्वत्र मोघम भाषा वाचावयास सापडते. आपण ज्यांना शिक्षणयोजना म्हणतो त्या शिक्षण कसे वाढत जाईल त्याचे जुजबी अंदाज आहेत, त्यांपैकी एकाही योजनेत आपण अपेक्षितो असा निश्चितपणा नाही. खऱ्या अर्थाने या जुजबी प्रकल्पांना योजनाच का म्हणावे असा प्रश्न आहे.

## शंक्वाकृती शिक्षणव्यवस्था

सर्वसाधारणपणे शिक्षणव्यवस्थेची रचना शंक्वाकृती असते. म्हणजे जसजसे वरील वयाच्या अधिक उच्च स्तरावरील शिक्षण दिले जाते, तसतशी विद्यार्थ्यांची संख्या कमी कमी होत जाते, म्हणजेच शंकूचा आकार निमुळता होत जातो. कोणत्या उंचीवर या शंकूचा आकार किती निमुळता होईल किंवा करावयाचा म्हणजे किती विद्यार्थी विशिष्ट शिक्षण संपादनानंतर कोणत्या स्तरावर व्यवसायात पडतील किंवा त्यांना व्यवसायात पाठवावयाचे हे योजनाकारांनी ठरवावयाला पाहिजे.

शिक्षणव्यवस्थेत सर्वसाधारण शिक्षणाबरोबर औद्योगिक, व्यावसायिक, तांत्रिक आदि प्रकारच्या शिक्षणाचा अंतर्भाव होतो. सर्वसाधारण शिक्षणाकरिता प्रथम सर्वच विद्यार्थी दाखल होतात, पण विशिष्ट स्तरापर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांपैकी काहींना विशिष्ट प्रकारचे शिक्षण देणे अवश्य असते, म्हणजेच विशिष्ट उंचीवर या शंकूमध्ये भिन्न भिन्न प्रकारच्या शिक्षणाचे कप्पे पडतात. ते किती उंचीवर किती पाडावयाचे व प्रत्येक कप्पा किती लहान-मोठा ठेवावयाचा हेही योजनाकारांनी ठरविले पाहिजे. घरगुती उद्योग, शेती, खाणकाम, कारखाने, धरणे या सर्व शाखातील भावी

गरजांचे कालखंडानुसार मापन झाले पाहिजे. त्या गरजा भागविण्याकरिता कोणत्या प्रकारचे शिक्षण घेतलेले किती कारागीर लागतील हे ठरल्यावर त्यांचे राज्यप्रदेशवार व विभागवार विभाजन कसे होणार हे ठरविले पाहिजे. त्याप्रमाणे त्या त्या भागी त्या त्या प्रकारच्या शिक्षण-संस्थांची स्थापना किंवा वाढ झाली किंवा केली पाहिजे. अशा प्रकारचा संपूर्ण सखोल विचार व निश्चय योजनाकारांनी केलेला दिसत नाही. काही थोडासा विचार मेडिकल व इंजिनियरिंग शिक्षणाबाबत झालेला दिसतो, पण सर्वसाधारण शिक्षण, औद्योगिक, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाबाबत असा विचार मुळीच झालेला नाही.

दोन वर्षांपूर्वीच्या एका घटनेमुळेही हे स्पष्ट झाले आहे.

### किमान अर्थशास्त्रीय योजनादृष्टीचा अभाव

दुसऱ्या पंचवर्षीय योजनाकाळात तिसऱ्या वर्षी कारखाने उभारण्याकरिता लागणारे सामान्य दर्जाचेच पण औद्योगिक शिक्षण घेतलेल्या कारागिरांची निकड प्रत्यक्ष जाणवू लागली तेव्हा कोठे त्या वेळच्या तांत्रिक व औद्योगिक शिक्षण-संस्थात उमेदवारांची भक्कम भरती करवून घेण्यात आली. दुपाळ्या व तिपाळ्या चालवून ती तत्काळ दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सर्वपरिचित असलेल्या या घटनेवरून योजना करण्याकरिता जी किमान अर्थशास्त्रीय दृष्टी लागते तीही शिक्षणयोजनाबाबत धारण केली गेली नव्हती हेच स्पष्ट होते.

### ' टेक्निकल ' शिक्षणखात्याचे कार्य

महाराष्ट्र राज्यात ' टेक्निकल ' शिक्षणखाते हे एक स्वतंत्र खाते आहे. या विशिष्ट क्षेत्रातील गरजांचा अभ्यास करून योग्य शिक्षण घेतलेले कारागीर आवश्यक तेवढ्या प्रमाणात तयार ठेवणे हे या खात्याचे एक आवश्यक कर्तव्य आहे, केवळ ' टेक्निकल ' शिक्षणसंस्था चालविणे नव्हे. पण योजना-आयोगाच्या उच्च स्तरावरच जर या दृष्टीने सूक्ष्म विचार होत नाही तर मग राज्यस्तरावर स्वतंत्र खाते असताही अशा विचार व्हावा असे आपण का अपेक्षावे ? ' टेक्निकल ' शिक्षणक्षेत्रात उमेदवारी शिक्षण आवश्यक असते. ते विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून या खात्याला उद्योगपतींचे व कारखान-

दारांचे सहकार्य असावे लागते. ते आज अजीजीने किंवा कायद्याने मिळवावे लागते, स्वयंस्फूर्त मिळत नाही, अशी वस्तुस्थिती आहे. उद्योगपती व कारखानदार यांना ही राष्ट्रीय उत्कर्षाकरिता अवश्य असणारी शिक्षण-दृष्टी नाही व टेक्निकल शिक्षणखात्याला त्यांच्या गरजांचे मापन करून त्या पुरविण्याची आपली जबाबदारी आहे याची जाणीव नाही. दोहोंना अर्थोत्पादनाच्या वाढीकरिता परस्पर सहकार्याची व सहविचाराची आवश्यकता पटली तर शिक्षण व अर्थशास्त्र या विचाराला बळकटी येईल.

## किमान ' टेक्निक '

अर्थोत्पादनात शिक्षणव्यवस्थेकडून व अर्थोत्पादकांकडून अधिकात अधिक लाभ करून घेण्याकरिता योजनेच्या आखणीतच हे किमान ' टेक्निक ' वापरण्याची आवश्यकता आहे हे स्पष्ट केल्यावर शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्षात ती वाढ ज्या प्रकारे सुरू आहे ती पाहणे उद्बोधक होईल.

## शाळांची वाढ शिस्तबद्ध व्हावी

शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या प्रयत्नामुळे व महाराष्ट्रात तर आर्थिक दृष्ट्या निम्न स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रगतीकरिता समान संधी प्राप्त व्हावी म्हणून कोणत्याही दर्जाचे शिक्षण मोफत मिळाले पाहिजे अशा सरकारी घोषणेमुळे विद्यार्थ्यांच्या संख्येला भरती आली आहे. सुसूत्रपणे शाळा व इतर शिक्षणसंस्था स्थापून व / वा वाढवून या भरतीला योग्य वाट द्यावयाची काही योजना आहे असे आपणास दिसते का ? महाराष्ट्रात इतस्ततः निघालेल्या व सरकारमान्यता व विद्यापिठीय मान्यता मिळालेल्या शिक्षणसंस्थांची योजनाबद्ध वाढ झाली आहे व होत आहे का ? जेथे एक शाळा किंवा कॉलेज धड चालेना तेथे दोन निघतात व सरकार वा विद्यापीठाकडून मान्य होतात; जेथे ज्या विषयगटांच्या शाळात किंवा विद्याशाखात ( Faculty ) भरती अपूर्ण आहे, तेथेच जवळच त्याच विषयगटाच्या शाळा किंवा विद्याशाखा निघतात ही वस्तुस्थिती काय दर्शविते ? ' जनसेवक, आमदार, खासदार आणि उच्चपदस्थ आपल्या प्रतिष्ठेकरता आपल्याला पाहिजे त्या ठिकाणी शाळा, विद्याशाखा व विद्यापीठे काढवून घेतात ' असे कोणी म्हटल्यास ते विधान आत्मविश्वासपूर्ण

रीतीने आपण खोडून काढू शकतो का? या बाबतीत टाळता येण्याजोगा आर्थिक बोजा अंगावर घेऊन आपण पैशाचा अपव्यय करीत नाही का? विभागाची खरी शैक्षणिक गरज या केवळ एकाच दृष्टीने शाळांची त्या त्या जागी स्थापना व वाढ होत आहे का? या प्रश्नांचे स्पष्ट व योग्य उत्तर देणे कठीण आहे, म्हणून या समस्येचा विचार गंभीरपणे सर्व स्तरावर ताबडतोब होणे अवश्य आहे.

## शिक्षणाची सक्ती आज केलीच पाहिजे का?

किमान शिक्षण सक्तीचे व मोफत असणे सर्वतोपरी योग्य असे मानले तरी निदान आजच्या अंतरिम काळात श्रीमंताच्या मुलांनाही ते मोफत असावे का? ज्यांना अजून शिकावयाची इच्छाच उत्पन्न झाली नाही त्यांच्यावर ते एकदम सक्तीने लादावे का?

या प्रश्नाचा विचार करताना ‘ जे विद्यार्थी आजही प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गात दाखल होतात त्यांपैकी शेकडा ५० विद्यार्थीही चौथीच्या परीक्षेला बसत नाहीत ’ हे तृतीय पंचवर्षीय योजनेतील विधान ध्यानी बाळगणे योग्य होईल.

आपल्या अपुऱ्या अर्थाचा अधिकात अधिक लाभ अर्थोत्पादनाकरिता करून घ्यावयाचा असेल तर पुढील प्रश्नांचाही विचार झाला पाहिजे.

## सवलतीचा फेरविचार

गरिबांच्या मुलांना स्वप्रगतीसाठी समान संधी प्राप्त व्हावी या उदात्त हेतूने महाराष्ट्र सरकारने रु. १२०० वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना सर्व प्रकारचे, सर्व दर्जांचे शिक्षण मोफत केले. या निर्णयामागील हेतू अतिशय प्रशंसनीय आहे, पण या सवलतीचा फायदा स्वतःचे वार्षिक उत्पन्न कमी दाखवून किंवा ज्यांचे उत्पन्न कमी आहे त्यांना मुलांचे पालक दाखवून किती तरी पालक घेत आहेत हे महाराष्ट्र सरकारला आता कळून चुकले आहे. पण लोकशाही राज्यात या शेकडो पालकांना कोर्टासमोर खेचण्याचे वा एकदा जाहीर केलेली सवलत रद्द करण्याचे धारिष्ट्य महाराष्ट्र सरकारने दाखविणे अनिष्ट होईल का? शिकायला येतील व आणले जातील त्या सर्व मुलांना १४ वर्षे वयापर्यंत

मोफत शिक्षण द्यावे आणि त्यानंतर चुणचुणीत व आर्थिक निम्न स्तरातील सत्पात्र विद्यार्थ्यांना सर्व शाखात भरपूर शिष्यवृत्त्या द्याव्या, ही पद्धत मर्यादित पैशाचा सद्व्यय व उदात्त हेतूंची पूर्ती या दोन्ही दृष्टीने अधिक इष्ट होणार नाही का ? सर्वच मुलांना त्यांच्या सुप्तशक्तीचा विकास व्हावा व त्यांच्यावर सुसंस्कार व्हावे म्हणून १४ वर्षेपर्यंत मोफत शिक्षण द्यावयाचे व त्यानंतरच्या वयाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवर्धनास अडचण पडू नये म्हणून शिष्यवृत्ती द्यावयाची ही पद्धत मर्यादित अर्थाचा शास्त्रीय दृष्टीने उपयोग करण्याच्या दृष्टीने योग्य होईल.

## योजनांची सूक्ष्म आखणी व कणखर अंमलबजावणी

जीवनाच्या सर्व शाखातील भावी गरजांचे वर्षवार व विभागवार मापन करून त्या अनुसार सर्वसाधारण व तांत्रिक शिक्षणाच्या योजना काटेकोरपणे आखणे व त्या अंमलात आणताना केवळ त्या त्या विभागाची शैक्षणिक गरज व त्या प्रकारच्या शिक्षणाची राष्ट्रीय गरज एवढाच दृष्टिकोन शिक्षण-खात्याने कणखरपणे ठेवला तर शिक्षण-व्यवस्थेकडून, सुसंस्कार व अर्थोत्पादन या दोन्ही दृष्टीने अधिकात अधिक लाभ होईल.

## शिक्षणव्यवस्थेत सुसूत्रता पाहिजे

भारतीय राज्यघटनेत शिक्षण हा विषय राज्यसूचीमध्ये आहे. तरी ( अ ) काही प्रदेशच मध्यवर्ती नियंत्रणाखाली असल्यामुळे त्या भागातील शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी भारत सरकारवर आहे; ( आ ) काही विद्यापीठे भारत सरकारच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आहेत; ( इ ) तांत्रिक व संशोधनात्मक शिक्षणसंस्था बहुंशी भारतसरकारच्या अधिकारकक्षेत आहेत; ( ई ) कल्याणकारी राज्यात शिक्षणविषयक नैतिक व घटनात्मक जबाबदारी आपली आहे असे समजून ती पार पाडण्याकरिता लाखो रुपये भारत सरकार राज्यांना देत आहे; ( उ ) शिक्षणाबाबतचे विकेंद्रीकरण घटनेत असले तरी पैसे देण्याच्या सामर्थ्यामुळे भारत सरकार सर्व राज्य-प्रदेशातील शिक्षणव्यवस्थेचा ताबा अधिकाधिक प्रमाणात आपणाकडे घेत आहे; ( ऊ ) सर्व राज्यप्रदेशात हे प्रमाण समान नाही कारण राज्ये व विद्यापीठे कायद्याच्या दृष्टीने स्वायत्त आहेत त्यामुळे मध्यवर्ती सरकारचा

अधिकार किती प्रमाणात मानावयाचा हे ठरविण्याचा त्यांना अधिकार आहे. या सर्व कारणांमुळे अभ्यासक्रम, विविध स्तरावरील अभ्यासक्रमाचा काल, अभ्यासपुस्तकांचे लेखन, प्रकाशन व मान्यता, शिक्षणसंस्थांवरील सरकारचे नियंत्रण या सर्वांबाबत भारताचे चित्र इतके गुंतागुंतीचे व गोंधळाचे झाले आहे की एक संधी व एकात्म राष्ट्र शिक्षणाद्वारे निर्माण करण्याचे कार्य कठीण झाले आहे. त्यामुळे शिक्षण हा विषय राज्यसूचीतून काढून तो समवर्ती-सूचीमध्ये घालावा हा विचारप्रवाह बळावत आहे. शिक्षणव्यवस्थेच्या उद्दिष्टसिद्धीकरता हा घटनात्मक बदल करून भारतातील शिक्षणव्यवस्थेत निदानपक्षी सुसूत्रता ( Unity ) आणणे अगत्याचे आहे.

## सुधारणा की खेळखंडोबा ?

स्वातंत्र्योत्तर काळात पालकापासून पत्रकारापर्यंत, शाळानिरीक्षकापासून शिक्षणमहामंत्र्यापर्यंत प्रत्येकजण शिक्षणाची पुनर्रचना झाली पाहिजे असे साध्या संभाषणप्रसंगापासून तो मोठमोठ्या उत्सवसमारंभप्रसंगापर्यंत म्हणत असतो. तरीही गेल्या १५ वर्षांत भारतीय शिक्षणरचनेत वा व्यवस्थेत मूलगामी बदल मुळीच झाला नाही. पण याचा अर्थ गेल्या १५ वर्षांत भारतीय शिक्षणक्षेत्रांत सुधारणा ( ? ) झाल्या नाहींत असे कोणी समजू नये. मातृभाषा, हिंदी भाषा, इंग्रजी भाषा यांचे भिन्न भिन्न स्तरावरील शिक्षणक्रमात स्थान, मूलोद्योगी, उच्चमूलोद्योगी, अ–मूलोद्योगी, प्राथमिक, उच्चप्राथमिक, निम्न माध्यमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, बहुउद्देशीय माध्यमिक, पूर्व महाविद्यालयीन, महाविद्यालयीन पूर्वउपाधी, त्रैवार्षिक उपाधी आदि अभ्यासक्रमांची रचना, त्यांच्या स्तरांची कालमर्यादा, परीक्षापद्धती अशा अनेक बाबतींत आम्ही इतक्या सुधारणा व त्यासुद्धा इतक्या झटपट केल्या आहेत की काल लावलेले झाड लागले आहे किंवा नाही हे, ते आज उपटून पाहणाऱ्या वानराची आठवण व्हावी ! शिक्षणक्षेत्रांत वारंवार झालेल्या या सुधारणांमुळे शिक्षणाची अपरिमित हानि झाली आहे.

## स्वसंरक्षणक्षम व विकासक्षम शिक्षण

भारताच्या सीमेवर चीनचे आक्रमण होताच भारताच्या शिक्षणमंत्र्यांनी घोषणा केली की, भारताच्या शिक्षणव्यवस्थेत क्रांतिकारी बदल होणे संभवते.

राष्ट्र सदा एकात्म व स्वसंरक्षणक्षम व तसेच विकासक्षम असले पाहिजे या दृष्टीने प्रत्यही नवीन शक्तींना जन्म देणाऱ्या शिक्षणपद्धतीची रचना केल्यास भावी पिढ्यांचे भाग्य नेहमीच उभारते राहील हे निःसंशय.

## विकासयोजनेच्या आखणीत शिक्षणमंत्र्याचे स्थान

राष्ट्रविकासाच्या योजनांची आखणी करण्यात लोकशाही राज्यरचनेत शिक्षणमंत्र्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रीय विकासात शिक्षणाला मूलभूत स्थान प्राप्त व्हावे या विचाराचे नेतृत्व खरे त्यानेच करायला पाहिजे. पण आजच्या लोकशाही राज्यात शिक्षणमंत्री कोणीही नेमला जाऊ शकतो. राजकीय पक्षोपपक्ष किंवा गटांचा परिणाम मंत्रिमंडळाच्या रचनेवर झाला. नाही तर त्याला आपल्या कारकीर्दीकरता पाच वर्षे मिळतात. सर्वसाधारण मंत्री ही आपली पाच वर्षांची कारकीर्द यशस्वी करण्याकडे लक्ष देतो. शिक्षणाचे मूलगामी स्थान व त्या अनुसार योजनाखर्चात हिस्सा व योजनांची हेतू अनुसार सूक्ष्म आखणी काटेकोर अंमलबजावणी यांकडे सर्वसाधारणपणे शिक्षणमंत्री लक्ष देत नाहीत. पुष्कळ वेळा शिक्षणाच्या मूलभूत महत्त्वाची माहिती त्यांच्या ओठी असते, पण त्याची जाणीव पोटी नसते. आणि लोकांचे शिक्षणविषयक सर्वसाधारण कारभाराबाबत जे प्रश्न असतात त्यांचेच निराकरण करण्यात त्यांचा पुष्कळ वेळ जातो. तेव्हा ही मौलिक महत्त्वाची कामगिरी त्यांच्याकडून होत नाही. शिक्षण हा विषयच फार उशीरा व तेही अमूर्त फळ देणारा असल्यामुळे त्याच्या मार्गदर्शनास तज्ज्ञांची कायम जरूर असते. ती जरूर पंचवर्षीय मुदतीने बदलणाऱ्या मंत्र्यांकडून भागत नाही. त्याकरिता राष्ट्राच्या पायाभरणीच्या या खात्यावर मंत्री म्हणून कोणाची नेमणूक व्हावी व ती किती वर्षे कायम राहावी याबाबत विशिष्ट संकेत किंवा दंडक उत्पन्न करणे योग्य व हिताचे होईल. याबाबत शिक्षणतज्ज्ञांचीच नेमणूक या पदावर करणे योग्य होईल. या सूचनेचा विचार करणे अगत्याचे आहे.

## शिक्षणाचे नेतृत्व करणारा शिक्षणमंत्री

तसे झाल्यास १०००–१००० कोटी रुपयांचा तयार झालेल्या शिक्षण-योजना अर्थमंत्र्याकडून कापत कापत रु. ३२० कोटींपर्यंत कापल्या जाणार नाहीत व गेल्या तर शिक्षणमंत्री ते मान्य करणार नाही, कारण शिक्षणा-

वरील खर्च हा किती पूर्ण व भव्य अर्थाने भांडवली खर्च आहे याची त्याला जाणीव असेल. शिक्षणमंत्री हा केवळ शिक्षणमंत्री न राहता शिक्षणाचा नेता राहील. ज्या समाजाकडून आज शिक्षणाची उपेक्षा केली जात आहे त्या समाजाला शिक्षणाचे मूल्य समजावून लोकशाही राज्याचे लक्ष जीवन सदा उत्कर्षमार्गी ठेवणाऱ्या शिक्षणाकडे तो आकर्षून घेईल.

**शिक्षकाचे स्थान**

राष्ट्रीय विकास-कार्यक्रमाची आखणी करण्यात जे स्थान शिक्षणमंत्र्याचे तेच स्थान त्या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात शिक्षकाचे.

## मूल लाख मोलाचे तर शिक्षक किती कोटी मोलाचा ?

प्रत्येक पालकाला आपले मूल लाख मोलाचे वाटते. मग या लाख मोलाच्या मुलाला घडविण्याचे कार्य करणारा शिक्षक किती कोटी मोलाचा असला पाहिजे ? भारतात प्राचीन काळच्या गुरुसंस्थेविषयी आदर असला तरी अर्वाचीन काळातील शिक्षकाच्या स्थितीविषयी समाजाचे इतके अज्ञान व औदासीन्य आहे की त्याला राष्ट्रनिर्माता आदि नावाने संबोधणे व तशा कार्याची अपेक्षा त्याच्याकडून बाळगणे व्यर्थ आहे. प्राचीन काळच्या गुरूला माध्याह्नाची भ्रांत राहता कामा नये याची काळजी त्या वेळची राज्यसंस्था घेत असे. आजचा शिक्षक माध्याह्नाची व उद्याची काळजी नेहमीच वाहत असतो. त्याला नोकरीवरून मुक्ती देणे सहजशक्य गोष्ट आहे, पण तेही करण्याची पाळी येऊ नये म्हणून नियुक्तीपत्र देण्यापूर्वीच त्याच्याकडून विनातारखेचे त्यागपत्र लिहून मागण्यात येते ! ! या सर्वांवर जणु कडी म्हणूनच की काय साधा अभ्यासक्रम आखण्याबाबतही त्याला अस्पर्श म्हणून वागविले जाते. शिक्षणव्यवस्थेतील शिक्षकाची ही स्थिती शिक्षणातील चैतन्यच नष्ट करून टाकते. संत कबीराने म्हटले आहे, ‘ गुरु कुम्हार है सिख कुम्भ है ’ । या कुंभाराच्या सर्व प्रकारच्या स्वास्थ्याकडे समाजाने आत्मीयतेने लक्ष पुरविल्याशिवाय शिष्यरूपी कुंभाच्या सर्वांगीण सुंदर घडणीचे कार्य तो कसे करू शकणार ? शिक्षण जर ज्ञानाच्या पुड्या बांधून देणे यापेक्षा काही भिन्न असेल, विद्यार्थ्यांच्या आत्म्यावर लिहलेले ते अदृश्य लेखन असेल तर, या लेखकाचे शिक्षणव्यवस्थेतील स्थान समाजाने ओळखायला हवे.

## शिक्षणाबाबत कृपणाचे अर्थशास्त्र

शिक्षणव्यवस्थेत शिक्षकानंतरचे स्थान शिक्षणाच्या बहुविध सोयी व साधनांना आहे. सुसज्ज इमारती, खेळाची मैदाने, ग्रंथालये, प्रयोगशाळा, वसतिगृहे आदि शिक्षणसाधनांचा अभाव किंवा अपुरेपणा मुलाच्या सर्वांगीण वाढीच्या आड येतो. या सर्व बाबींपैकी मोठ्या गावात व शहरात कोणत्या एका गोष्टीचा अपुरेपणा विशेषत्वाने जाणवत असेल तर तो इमारतीचा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येला केवळ बसण्याकरताही जागा अपुरी पडू लागली म्हणून महाराष्ट्रात सर्व मोठ्या गावी शाळा पाळीने (Shift system) भरू लागल्या. शाळा भरविण्याबाबत अंगीकारावी लागणारी ही पाळीपद्धत शिक्षणव्यवस्थेला भयंकर शाप आहे, या एकाच वाक्यात या पद्धतीचा धिक्कार करता येईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढी-करता शहराच्या एकेका विभागातील शाळात केवळ त्याच विभागातील विद्यार्थ्यांनी जावे असा नियम करून त्याच त्या विद्यार्थ्यांची सकाळी व दुपारी शाळा भरविणे, अशा प्रकारची पाळीपद्धत असणे खरे पाहू जाता, आवश्यक आहे. पण शिक्षक मिळत नाहीत ( किंवा मिळवावयाचे नाहीत म्हणून ) खेड्यात एक-शिक्षकी शाळा व शहरात इमारतींचा अपुरेपणा म्हणून पाळी-शाळा सुरू झाल्या आहेत. त्याच्या जोडीला इतर सर्व शिक्षण-साधनांचा अपुरेपणा आहे. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक बाबीतील अपुरेपणा हे दारिद्य पाहून, शिक्षणव्यवस्थेचे हे अर्थशास्त्र नसून शिक्षणव्यवस्थेबाबतचे हे कृपणाचे अर्थशास्त्र आहे असें म्हटल्यावाचून राहवत नाही.

## शिक्षणात अर्थ नाही

कृपणाच्या अर्थशास्त्रावर आधारलेल्या शिक्षणव्यवस्थेत एकेका वर्गात ५५ ते ६० विद्यार्थी कोंबून भरल्यामुळे तर शिक्षणव्यवस्थेत काही अर्थच उरला नाही असे वाटते. मग आज विद्यार्थ्यांचे शिक्षण होते, हे तरी कसे ? असा प्रश्न पालकाकडून विचारला जाणे संभवते.

## आजचे शिक्षण

‘ स्पेशल ’ वर्ग, खाजगी वर्ग व शिकवण्या, शिकवण्यांच्या बाजारात आपली पत संभाळण्याची शिक्षकाला वाटणारी आवश्यकता, परीक्षापूर्व

घोकंपट्टी, अधिकाधिक सोपी केली जाणारी परीक्षा-पद्धति, खालून वरपर्यंत जाणारे 'ढकलपास' विद्यार्थी, आणि शेवटी बोर्ड किंवा विद्यापीठीय परीक्षात बहुसंख्य विद्यार्थ्यांची होणारी कत्तल, शिक्षणाच्या दर्जाची वाढती घसरगुंडी या गोष्टीत त्या प्रश्नाचे उत्तर सामावलेलें आहे. शिवाय विद्यार्थ्याने स्वगुणावर शिक्षकाकडून आजच्या काळात 'सेवया' तर नव्हेच पण 'परिप्रश्नेन' काही गुणवत्ता मिळविलीच तर तो विद्यार्थ्याचा गुण, शिक्षण-व्यवस्थेचा नव्हे. शिक्षण-व्यवस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे सुप्त गुण संशोधून ते वाढवील तीच खरी शिक्षणव्यवस्था. भारतात तीच अभावाने तळपत आहे.

## वेळेचा अपव्यय का म्हणून ?

शालेय वर्ष सुरू झाल्यानंतरही परीक्षांचे निकाल लागलेले नसतात, विद्यार्थ्यांना प्रवेश देणे संपलेले नसते, शिक्षकांच्या नेमणुका झालेल्या नसतात, वेळापत्रक तयार नसते, अभ्यासक्रम वा पुस्तके ठरलेली नसतात, किंवा तयार नसतात, तयार असली तर विद्यार्थ्यांनी घेतलेली नसतात, अशा अनेक कारणांनी शालेय वर्षाचे पहिले १५ ते २० दिवसपर्यंत अभ्यास व्यवस्थितपणे सुरु होत नसतात. लाखो मुलांमुलींच्या जीवनाचे १५ ते २० दिवस अशा प्रकारे खर्च होणे म्हणजे किती लाख तासांचा आपण दरवर्षी अपव्यय करतो याचे गणित कधी कोणी मांडून त्यावर कोणी गंभीरपणे विचार केला आहे का? उपरोक्त सर्व अडचणींचे निराकरण करून विद्यालये व महाविद्यालये उघडल्या दिवसापासून पूर्ण वेळ पूर्ण काम करतील अशी खबरदारी घेता येणार नाही का?

## बहिःशाल कार्यक्रमाचे अभ्यासवेळेवर आक्रमण

शालेय वर्ष सुरू झाल्यानंतर अभ्यासाला स्थिरता प्राप्त होताक्षणीच किंवा होण्यापूर्वीच विविध मंडळांची उद्‌घाटने होतात आणि मग शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यात विविध खेळ, त्यांचे सामने, बालवीर, ए. सी. सी., एन्. सी. सी. आदि चळवळी, सांस्कृतिक कार्यक्रम, सहली, शिबिरे, स्नेहसंमेलने, विविध दिन आणि सप्ताह, शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या उच्चपदस्थांचे स्वागत व निरोपसमारंभ आदि गोष्टी घडतात.

### शिक्षणाबाबत कृपणाचे अर्थशास्त्र

शिक्षणव्यवस्थेत शिक्षकानंतरचे स्थान शिक्षणाच्या बहुविध सोयी व साधनांना आहे. सुसज्ज इमारती, खेळाची मैदाने, ग्रंथालये, प्रयोगशाळा, वसतिगृह आदि शिक्षणसाधनांचा अभाव किंवा अपुरेपणा मुलाच्या सर्वांगीण वाढीच्या आड येतो. या सर्व बाबींपैकी मोठ्या गावात व शहरात कोणत्या एका गोष्टीचा अपुरेपणा विशेषत्वाने जाणवत असेल तर तो इमारतीचा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येला केवळ बसण्याकरताही जागा अपुरी पडू लागली म्हणून महाराष्ट्रात सर्व मोठ्या गावी शाळा पाळीने (Shift system) भरू लागल्या. शाळा भरविण्याबाबत अंगीकारावी लागणारी ही पाळीपद्धत शिक्षणव्यवस्थेला भयंकर शाप आहे, या एकाच वाक्यात या पद्धतीचा धिक्कार करता येईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढी-करता शहराच्या एकेका विभागातील शाळात केवळ त्याच विभागातील विद्यार्थ्यांनी जावे असा नियम करून त्याच त्या विद्यार्थ्यांची सकाळी व दुपारी शाळा भरविणे, अशा प्रकारची पाळीपद्धत असणे खरे पाहू जाता, आवश्यक आहे. पण शिक्षक मिळत नाहीत ( किंवा मिळवावयाचे नाहीत म्हणून ) खेड्यात एक-शिक्षकी शाळा व शहरात इमारतींचा अपुरेपणा म्हणून पाळी-शाळा सुरू झाल्या आहेत. त्याच्या जोडीला इतर सर्व शिक्षण-साधनांचा अपुरेपणा आहे. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक बाबीतील अपुरेपणा हे दारिद्र्य पाहून, शिक्षणव्यवस्थेचे हे अर्थशास्त्र नसून शिक्षणव्यवस्थेबाबतचे हे कृपणाचे अर्थशास्त्र आहे असें म्हटल्यावाचून राहवत नाही.

### शिक्षणात अर्थ नाही

कृपणाच्या अर्थशास्त्रावर आधारलेल्या शिक्षणव्यवस्थेत एकेका वर्गात ५५ ते ६० विद्यार्थी कोंबून भरल्यामुळे तर शिक्षणव्यवस्थेत काही अर्थच उरला नाही असे वाटते. मग आज विद्यार्थ्यांचे शिक्षण होते, हे तरी कसे ? असा प्रश्न पालकाकडून विचारला जाणे संभवते.

### आजचे शिक्षण

‘ स्पेशल ’ वर्ग, खाजगी वर्ग व शिकवण्या, शिकवण्यांच्या बाजारात आपली पत संभाळण्याची शिक्षकाला वाटणारी आवश्यकता, परीक्षापूर्व

घोकंपट्टी, अधिकाधिक सोपी केली जाणारी परीक्षा-पद्धति, खालून वर-पर्यंत जाणारे ' ढकलपास ' विद्यार्थी, आणि शेवटी बोर्ड किंवा विद्यापीठीय परीक्षात बहुसंख्य विद्यार्थ्यांची होणारी कत्तल, शिक्षणाच्या दर्जाची वाढती घसरगुंडी या गोष्टीत त्या प्रश्नाचे उत्तर सामावलेलें आहे. शिवाय विद्यार्थ्याने स्वगुणावर शिक्षकाकडून आजच्या काळात ' सेवया ' तर नव्हेच पण ' परिप्रश्नेन ' काही गुणवत्ता मिळविलीच तर तो विद्यार्थ्याचा गुण, शिक्षण-व्यवस्थेचा नव्हे. शिक्षण-व्यवस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे सुप्त गुण संशोधून ते वाढवील तीच खरी शिक्षणव्यवस्था. भारतात तीच अभावाने तळपत आहे.

## वेळेचा अपव्यय का म्हणून ?

शालेय वर्ष सुरू झाल्यानंतरही परीक्षांचे निकाल लागलेले नसतात, विद्यार्थ्यांना प्रवेश देणे संपलेले नसते, शिक्षकांच्या नेमणुका झालेल्या नसतात, वेळापत्रक तयार नसते, अभ्यासक्रम वा पुस्तके ठरलेली नसतात, किंवा तयार नसतात, तयार असली तर विद्यार्थ्यांनी घेतलेली नसतात, अशा अनेक कारणांनी शालेय वर्षाचे पहिले १५ ते २० दिवसपर्यंत अभ्यास व्यवस्थितपणे सुरू होत नसतात. लाखो मुलांमुलींच्या जीवनाचे १५ ते २० दिवस अशा प्रकारे खर्च होणे म्हणजे किती लाख तासांचा आपण दरवर्षी अपव्यय करतो याचे गणित कधी कोणी मांडून त्यावर कोणी गंभीरपणे विचार केला आहे का ? उपरोक्त सर्व अडचणींचे निराकरण करून विद्यालये व महाविद्यालये उघडल्या दिवसापासून पूर्ण वेळ पूर्ण काम करतील अशी खबरदारी घेता येणार नाही का ?

## बहिःशाल कार्यक्रमाचे अभ्यासवेळेवर आक्रमण

शालेय वर्ष सुरू झाल्यानंतर अभ्यासाला स्थिरता प्राप्त होताक्षणीच किंवा होण्यापूर्वीच विविध मंडळांची उद्‌घाटने होतात आणि मग शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यात विविध खेळ, त्यांचे सामने, बालवीर, ए. सी. सी., एन्. सी. सी. आदि चळवळी, सांस्कृतिक कार्यक्रम, सहली, शिबिरे, स्नेहसंमेलने, विविध दिन आणि सप्ताह, शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या उच्चपदस्थांचे स्वागत व निरोपसमारंभ आदि गोष्टी घडतात.

यांपैकी काही गोष्टीतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास पावते हे निश्चित व म्हणून त्या आवश्यक आहेत हेही खरे. पण या सर्वच चळवळींना शैक्षणिक वर्षांत अभ्यासक्रमाच्या वेळेवर आक्रमण करू द्यावे का ?

बहिःशाल गोष्टींपैकी कोणत्याही गोष्टीचे वेळापत्रक शाळा उघडण्यापूर्वी तयार नसते. यांपैकी कोणते कार्यक्रम व्हावयाचे अगर व्हावयाचे नाहीत हेही शैक्षणिक वर्षांत घडणाऱ्या ' इतर ' अनेक गोष्टींवर अवलंबून असते. त्यामुळे ते विद्यार्थ्यांच्या अभ्यासवेळेवर केव्हाही अनपेक्षितपणे आक्रमण करतात. खरे म्हणजे काही व्यक्तिगत विद्यार्थी किंवा संस्था अपवाद म्हणून सोडल्या तर इतर अनेकांच्या बाबतीत ध्येय, धोरण व वेळापत्रक यांच्या अभावी या सर्व चळवळी वळवाच्या पावसाच्या सरी किंवा वळवळी ठरतात. आपल्या देशातून वेस्ट इंडीज क्रिकेट टीमचा दौरा सुरू झाला की शेंबडी काटकुळी मुलेसुद्धा बनावट स्टंप, बॅट आणि टेनिस-बॉल घेऊन क्रिकेटचा खेळ गल्लोगल्ली खेळताना दिसून येतात. आणि पुढच्याच महिन्यात किंगकाँग-दारासिंगाच्या कुस्त्या सुरू झाल्या की हीच लुकडी मुले अंग व हाडे संभाळून गुद्दागुद्दीचे आव आणून ' फ्री स्टाईल ' कुस्त्या खेळताना आढळतात. यांतील एकहि मूल कायमपणे रोज खेळून मनगट बनवीत नाही की व्यायाम करून शरीर कमवीत नाही. अगदी असाच प्रकार या शाळेतील बहिःशाल चळवळीचा असतो; शिक्षण-संस्थांना वेळी-अवेळी आलेला हा एक ज्वर असतो म्हणून त्यातून कांहीही फलनिष्पत्ती होत नाही. या कार्यक्रमांच्या मागे ध्येय, धोरण व सातत्य असेल तरच त्यातून व्यक्तित्वविकासाच्या दृष्टीने काही निश्चित लाभ होऊ शकेल.

**सोव्हिएट रशियात सुप्त गुणांची वाढ कशी करतात ?**

बहिःशाल चळवळींतून व्यक्तित्वविकास कसा साधावा याबाबत सोव्हिएट रशियातील पद्धती विचार करण्यासारखी आहे. सोव्हिएट रशियात या बहिःशाल चळवळी खऱ्या अर्थाने बहिःशाल असतात, शाळेच्या अभ्यासाच्या वेळात त्यांना मुळीच स्थान नसते. खेडोखेडी, गावोगावी, शहरोशहरी अनुक्रमे पायोनियर कॉर्नर्स, पायोनियर हौसेस, पायोनियर पॅलेसेस असतात. शाळातील ज्या मुलांमुलींना ज्ञान, खेळ,

अनेकानेक छंद, कला, हस्तव्यवसाय, सांस्कृतिक कार्यक्रम, संशोधन आदि शालेय अभ्यासेतर विषयात प्रगती करण्याची इच्छा असेल त्यांनी या पायोनियर संस्थेत दाखल व्हावे. संध्याकाळी दोन तास संस्थेत हजर राहावे. तेथे सरकारतर्फे सर्व साहित्य पुरविले जाते. सरकारनियुक्त मार्गदर्शकांकरवी विनामूल्य मार्गदर्शन मिळते. त्याचा लाभ घेऊन कोणताही विद्यार्थी आपल्या विशेष गुणांचा वा व्यक्तित्वाचा विकास करून घेतात. सरकार यापैकी चुणचुणीत विद्यार्थ्यांची निवड करते व त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात त्यांना प्रगती करण्यास विशेष वाव देते.

**शिक्षणाचे महत्त्वपूर्ण साधन : शिबीर-निवास**

शिवाय या संस्थेतील जवळपास पन्नास लाख मुलांना दरवर्षी उन्हाळ्यात एक महिना शिबिर-निवासासाठी पाठविण्यात येते. ' एक दिवसाचा शिबिर-निवास म्हणजे एक वर्षाचे शिक्षण ' हे एका शिक्षणतज्ज्ञाने केलेले विधान बरोबर असेल तर या पन्नास लाख मुलांना दरवर्षी शिबिर-निवासात किती मौलिक शिक्षण मिळत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

**भारतात गुणविकास संस्था स्थापन करा**

मुलांमुलींचे गुण अन् गुण विकास पावतील अशी संधी प्राप्त करून देणारी अशी बहिःशाल संस्था भारतातहि स्थापन केल्यास, राष्ट्रोत्कर्षाच्या दृष्टीने निश्चित उपकारक ठरेल. आज बहिःशाल चळवळीवर शाळा-कॉलेजातून जितका एकूण खर्च होतो व श्रमशक्ती खर्च होते तेवढ्या पैशाच्या व श्रमाच्या मोबदल्यात निश्चितपणे भरपूर लाभ अशा संस्थेद्वारा राष्ट्राला मिळू शकेल.

**खास ज्ञानाचा उपयोग नाही**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने व राज्यसरकारांनी स्वतःच्या खर्चाने वा अन्यदेशीय सरकारांच्या सहाय्याने किती तरी भारतीय विद्यार्थी परदेशी शिक्षण व संशोधनाकरिता पाठविले. शिक्षण घेऊन वा संशोधन करून ते मायदेशी परत आले--काही आले नाहीत ते का आले नाहीत व येणार नाहीत याची कारणे शोधणे हिताचे होईल. पण जे आले त्यांच्या ज्ञानाचा सरकारने काय उपयोग केला ! ते ज्या प्रकारचे ज्ञान संपादन

करून आले त्या प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग होईल अशा स्थानी त्यांना सरकारने ठेवले आहे का ? त्यांपैकी कित्येक विद्यार्थी आज अशा जागी काम करीत आहेत की जेथे त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केवळ शून्य आहे. त्यांना अनुरूप काम देऊन त्यांच्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करून घेणे अशक्य आहे का ? शिक्षणाच्या अर्थशास्त्राच्या दृष्टीने हे आवश्यक नाही का ?

**पूर्ण लाभ घ्यावयाचा असेल तर ?**

विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा पूर्ण विकास करवून घ्यावयाचा असेल तर सर्व स्तरांवरील शिक्षणक्रमांचा साकल्याने विचार केला पाहिजे, एकेका स्तराचा स्वतंत्रपणे करता कामा नये. प्राथमिक विभागात मुलांचे अति संस्कारक्षम कोवळे वय लक्षात घेता उच्च शैक्षणिक पात्रता असलेले व इतरही दृष्टीने उच्च दर्जाचे शिक्षक नेमले पाहिजेत. प्राथमिक विभागातील मुलांना मुख्यतः प्रेमाच्या ओलाव्याने वागवावयास पाहिजे. त्यामुळे जगातील प्रायः सर्व देशात प्राथमिक शिक्षणात प्रमुखतः शिक्षक नव्हे–शिक्षिकाच नेमल्या जातात. आपल्याहि देशात ही पद्धत सुरू करणे इष्ट होईल. भारतात शिक्षित पण विवाहित स्त्रिया आहेत. त्यांना अर्धवेळ शिक्षिका नेमण्याचे धोरण स्वीकारले तर त्यांच्या शिक्षणाचा शिक्षणकार्यार्थ उपयोग करून घेता येईल. आजही ज्या स्त्रिया शिक्षिका म्हणून काम करतात त्यांपैकी कित्येक शिक्षिकांना घरचीहि संपूर्ण कर्तव्ये करावी लागतात. त्यामुळे त्यांच्यावर फार ताण पडतो. त्याचेही दृष्टीने ही अर्धवेळ शिक्षिका नेमण्याची योजना हितकारक ठरण्याचा संभव आहे. एकाच शाळेत हजार दोन हजार मुले ठेवणे यानेही चांगले शिक्षण होत नाही. मुख्याध्यापकाचा पगार शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येवर अवलंबून ठेवणे म्हणजे त्यांचे लक्ष शिक्षणाच्या दर्जापेक्षा शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या टिकविण्याकडे व वाढविण्याकडेच लागण्याचा संभव आहे. म्हणून हीहि पद्धत नष्ट केली पाहिजे. शिक्षणव्यवस्थेपासून विद्यार्थ्यांच्या शक्तींच्या विकासाच्या रूपाने संपूर्ण लाभ घ्यावयाचा असेल तर या गोष्टीचा विचार होणे अवश्य आहे. शिक्षणव्यवस्थेवर आपण जो खर्च करीत आहो त्याचा भरपूर मोबदला आपणास का मिळत नाही, व तो मिळविण्याकरिता काय केले पाहिजे हे आपण पाहिले. आणखी एक कल्पना स्वीकारली तर एकही नया पैशाचा अधिक व्यय न करता नव्या

अनुक्रम ३६२२० वि: ... क्रमांक ९८८२ नों. दि. ...

पिढीचा शारीरिक व बौद्धिक विकास घडून येण्यास किती तरी मदत होईल. ती कल्पना म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या पुनर्रचेनची.

## शैक्षणिक वर्षाची नवीन आखणी

जून–जुलैमध्ये सुरू होणारे व एप्रिल–मेमध्ये संपणारे सध्याचे शैक्षणिक वर्ष भारताच्या व महाराष्ट्राच्या नैसर्गिक हवामानाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक वाढीस मुळीच पोषक नाही. याऐवजी शैक्षणिक वर्ष नोव्हेंबर ते ऑक्टोबर केले तर हवामानातील ऋतुबदलाचा संपूर्ण लाभ मुलांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाकरिता करून घेता येईल. हिवाळ्याच्या सुरुवातीस नैसर्गिक उत्साहपूर्ण वातावरणात नवीन शालेय वर्ष सुरू होईल. या समयी निसर्ग विद्यार्थ्यांच्या धारणाशक्तीच्या व त्याहीपेक्षा त्यांच्या शरीरशक्तीच्या वाढीस भरपूर मदत करील. शाळेत नवीन अभ्यासाची सुरुवात असेल व मैदानावर भरपूर मैदानी व कसरती खेळ—जवळ वार्षिक परीक्षा येत आहे याची काळजी न बाळगता—खेळता येतील. या खेळांची पुरेशी प्रॅक्टिस झाल्यावर फेब्रुवारी–मार्चमध्ये सामन्यांना सुरुवात होईल. एप्रिलमध्ये सहामाही परीक्षेनंतर मिळालेली उन्हाळ्याची सुट्टी झोप, आळस आणि पत्त्यासारखे बैठे खेळ खेळण्यात न घालविता तिचा उपयोग सहामाही परीक्षेत अभ्यासात दिसून आलेल्या त्रुटी भरून काढण्याकरिता करून घेता येईल. सहा महिने नवीन वर्गातील शिक्षण झाले असल्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने सुट्टीचा विशेष फायदा करून घेता येईल. या नव्या शैक्षणिक वर्षात जुलै–ऑगस्टमध्ये बाहेर पावसाची चिकचिक चालू असता घरात बसून परीक्षेचा अभ्यास करता येईल व बदल म्हणून पावसाची पर्वा न करता फुटबॉलसारखा खेळ खेळता येईल. सप्टेंबर महिन्यात वार्षिक परीक्षा देऊन ऑक्टोबर महिन्यात विविध पिकांनी फुललेली शेते व वनश्रीने नटलेला भारत पाहण्यास सहली काढता येतील. एकांगी अभ्यासाची भरपाई प्रवासाने व देशदर्शनाने करून घेता येईल. ऑक्टोबर महिन्यातील शिबिर-निवासही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीस पोषक ठरेल. अशा प्रकारे हे नवे शैक्षणिक वर्ष विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक वाढीस व व्यक्तित्व-विकासास उपकारक ठरेल.

## शिक्षण-व्यवस्थेचे अनर्थशास्त्र

भारतीय योजनाकारांचा शिक्षणाकडे पाहण्याचा द्विविध दृष्टिकोन पण प्रत्यक्षात शिक्षणाला 'समाजसेवेत' दिलेले गौण स्थान, शिक्षणान्तर्गत मोघम योजना, शिक्षण-योजनांची अंमलबजावणी करण्यात कणखरपणाचा अभाव, पूर्ण विचार न करता केलेल्या शिक्षणसुधारणा, शिक्षण-विषय राज्यसूचीत असताही शिक्षणाचा सर्व राज्यप्रदेशात भारत सरकारने घेतलेला कमी-अधिक ताबा, पण घटनात्मक बदल करून शिक्षणव्यवस्थेत सुसूत्रता आणण्यात दिरंगाई, शिक्षणातील सजीवताच नष्ट करणारी शिक्षकांची स्थिती, शिक्षणसोयींचा अभाव किंवा अपुरेपणा, अभ्यास-वेळेवर बहि:शाल कार्यक्रमाचे अनपेक्षित आक्रमण, सध्याचे शैक्षणिक वर्ष आदि गोष्टींमुळे शिक्षणव्यवस्थेचे आपण जणु कांही अनर्थशास्त्रच तयार केले आहे असे वाटते.

## शिक्षणाबाबत शिक्षण

शिक्षणव्यवस्थेच्या या अनर्थशास्त्रावर उपाय काय? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. आजच्या लोकशाही राज्यव्यवस्थेत नागरिक व नागरिकसंस्थांच्या शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणच राष्ट्राचे अर्थशास्त्र बनविते या मौलिक विचाराची जाणीव त्यांना नाही, तशीच आजच्या शिक्षण व्यवस्थेतून आपणास पाहिजे तसे नागरिक का उत्पन्न होत नाहीत याचीही जागृत जाणीव त्यांना नाही व ती ज्यांना आहे त्यांनीच ती नागरिकांना व नागरिकसंस्थांना लोकशिक्षणाच्या मार्गांनी करून देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. शिक्षणानेच राष्ट्राचे भवितव्य सदा उज्ज्वल राहात जाते म्हणून शिक्षणाबाबत नागरिकांचे शिक्षण करणे हीच आजची तातडीची व कायमची गरज आहे.

# अपंग मुलांमुलींचे शिक्षण व त्यांचे पुनर्वसन

**. ४ .**

**ना. वि. पाटणकर**
एम्. ए., एम्. एड्.

'**अपंग**' या शब्दाचा अर्थ काही वैगुण्य, काही व्यंग, काही पंगूपणा असणारी व्यक्ती. हे व्यंग शारीरिक असेल, मानसिक असेल किंवा सामाजिक असू शकेल. जगातील प्रत्येक व्यक्तीमध्ये असे काही व्यंग असते हे खरे. पण ते मोठ्या प्रमाणात ठळक नसेल तर तिकडे कोणाचे फारसे लक्ष जात नाही, ते त्या व्यक्तीच्या सामान्य जीवनात आड येत नाही. पण ते विशेष प्रमाणात असेल तर जीवनात अडचणी निर्माण करते. ती अपंग व्यक्ती मूल असेल तर इतर सामान्य मुलांप्रमाणे ती शिक्षण घेऊ शकत नाही. व्यक्ती प्रौढ असेल तर तिला सर्वसामान्य माणसाप्रमाणे जीवन जगता येत नाही.

या दृष्टीने विचार केला म्हणजे अपंगांचे तीन प्रमुख प्रकार होतात. ते असेः—( १ ) **शरिराने अपंग** : यात अंध, बधिर, मूक, थोटे, लंगडे-पांगळे, सतत आजारी असलेले, ज्यांच्या शरीराच्या कांही अवयवांची व्हावी तशी वाढ झालेली नाही असे, इत्यादि अनेक उपप्रकार समाविष्ट होतात. ( २ ) **बुद्धीने अपंग** : यातही बुद्धी ज्या मानाने कमी असेल त्या मानाने विविध प्रकारे विभागणी केली जाते. म्हणजे सामान्य मुलांपेक्षा थोडी कमी बुद्धी असलेल्या मुलांपासून तो वेडसर किंवा पूर्ण वेडे अशा मुलांचा समावेश होतो. ( ३ ) **सामाजिकदृष्ट्या अपंग** : यातही अनेक

उपप्रकार होऊ शकतात. काही बालगुन्हेगार असतात, काही पोरकी मुले असतात, काही आईबापांना न जुमानणारी आणि अत्यंत व्रात्य अशी दांडगी मुले असतात. तसेच काही मुले स्वतः निष्पाप, निरुपद्रवी असून केवळ काही सामाजिक अन्यायाला बळी पडलेली, नव्हे बळी दिली गेलेली असतात. उदाहरणार्थ, अनीतीच्या व्यवसायाकरिता पळवून नेलेल्या मुली, किंवा भीक मागण्याच्या कामात मदतनीस होण्याकरिता बळजबरीने हस्तगत केलेली मुले, इत्यादि.

काही मुले तर केवळ एकाच दृष्टीने अपंग नसतात. त्यांचे अपंगत्व दुहेरी किंवा तिहेरीही असते. म्हणजे कोणी बहिरा आणि मुका, कोणी बहिरा, मुका आणि आंधळा, किंवा मुका आणि थोटा, अथवा मुका आणि बुद्धीने कमी; किंवा मुका, आंधळा आणि पोरका, अशा तऱ्हेने एकाहून अधिक बाबतीत पंगू असतो. अशा मुलांमुलींच्या शिक्षणाचा व पुनर्वसनाचा प्रश्न तर अधिकच बिकट असतो.

या विविध तऱ्हेच्या वर्गीकरणाचा थोडा अधिक तपशीलवार विचार पुढे केला आहेच.

गेल्या शतकाच्या शेवटल्या एक-दोन दशकांपर्यंत आपल्या देशात या मुलांमुलींच्या प्रश्नाकडे कोणाचेच—म्हणजे सरकारचे किंवा समाजाचे अथवा कोणा व्यक्तीचेही फारसे लक्ष गेले नव्हते. म्हणजे तोपर्यंत हा प्रश्न आपल्याकडे फारसा गंभीर झाला नव्हता असे नाही; तर त्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन निराळाच होता. अशा मुलांकडे पाहून जरा दुःखी चेहरा करावयाचा, 'अरेरे!', 'गरीब बिचारा!' असे उद्गार काढावयाचे किंवा 'काय बिचाऱ्यानं मागच्या जन्मी पाप केलं होतं म्हणून या जन्मी ही फळं भोगतो आहे!' असे म्हणावयाचे, त्याची कीव करावयाची, फार तर आर्थिकदृष्ट्या काही मदत करावयाची व 'संपलं आपलं कर्तव्य' असे समजून तो प्रश्न डोक्यातून काढून टाकावयाचा, अशी आपली सामान्यतः वृत्ती असे. आपल्या कुटुंबातच असे एखादे मूल असेल तर अन्न, वस्त्र आणि आसरा या त्याच्या मूलभूत गरजा भागवल्या म्हणजे झाली इतिकर्तव्यता असे समजावयाचे आणि त्या दुर्दैवी मुलाकडे 'एक ब्याद' या

दृष्टीने पाहावयाचे, व केव्हा यातून आपली (का त्याची ?) सुटका होते याची वाट पाहत बसावयाचे असे सामान्यतः होत असे.

पाश्चिमात्य प्रगत राष्ट्रांच्या संपर्कात आल्यापासून आणि या बाबतीत त्यांनी केलेली विशेष कर्तबगारी प्रत्यक्ष पाहिल्यानंतर आता मात्र आपलीहि वृत्ती बदलत चालली आहे असे दिसते. या मुलांना असे वाऱ्यावर न सोडता त्यांच्याकरिता आपण काही शिक्षणाची, पुनर्वसनाची व्यवस्था केली पाहिजे असे वाटू लागले आहे, प्रत्यक्ष काही करावयासही आरंभ झाला आहे.

पण अजूनही अनेकांच्या—अगदी जाणत्यांच्याही मनामध्ये एक शंका येते; तिचे निरसन प्रथम केले पाहिजे. त्यांना असे वाटते की, अपंग मुलांच्या शिक्षणाची सोय कशाला करावयाला हवी ? निदान भारतासारख्या देशात तरी तूर्त हा प्रश्न बाजूला ठेवावा. कारण धडधाकट, बुद्धिमान अशा म्हणजे कोणतेही व्यंग नसणाऱ्या मुलांच्याही 'प्राथमिक शिक्षणाचा' सुद्धा प्रश्न आपण अजून सोडविला नाही. स्वतःला, समाजाला आणि देशाला उपयुक्त होऊ शकणाऱ्या त्या मुलांचा प्रश्न सोडविण्यात आपण प्रथम आपला वेळ, आपला उत्साह, आपला पैसा खर्च करू या. ते एकदा झाले म्हणजे या दुर्दैवी मुलांच्या प्रश्नाकडे आपली सहानुभूती, दयार्द्र दृष्टी वळवू.

पण ही विचारसरणी अगदी चुकीची आहे. या मुलांच्या शिक्षणाकरिता समाजाने आणि सरकारने का व्यवस्था केली पाहिजे याची कारणे पुढील-प्रमाणे सांगता येतील :

(१) या मुलांचे पालक आणि स्वतः मुलेही भारताचे नागरिक आहेत. पालक प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, कर देतात. तेव्हा इतर नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणादिकांची जशी सरकारवर कायदेशीर जबाबदारी आहे तशी या मुलांसंबंधीही आहे.

(२) समाजावर या मुलांबाबत नैतिक जबाबदारीही आहे. कारण समाजातील इतर व्यक्तींप्रमाणे ही मुलेही माणसेच आहेत. इतर माणसांना ज्याप्रमाणे भावना असतात, सुखशांती मिळावी, दुःख हालअपेष्टा नसाव्या असे वाटते, तसेच त्यांनाही वाटते. अनेकदा

त्यांची व्यंगे त्यांच्या चुकीमुळे किंवा अपराधामुळे निर्माण झालेली नसतात. तेव्हा माणुसकी या नात्याने त्यांच्या शिक्षणाची वगैरे सोय इतरांनी करावयास नको काय ?

( ३ ) आणि ही माणुसकीची, उपकाराची भाषा सोडली, तरी आपल्या स्वतःच्या कल्याणाकरिता आणि स्वास्थ्याकरिता तरी आपण यांची व्यवस्था योग्य तऱ्हेने लावावयास नको काय ? समजा आपण ठरवले की यांच्या शिक्षणाकरिता आपला ( म्हणजे व्यक्तीचा, समाजाचा, राष्ट्राचा ) पैसा खर्च करावयाचा नाही, तर परिणाम काय होईल ? ही अपंग मुले लहानपणी तर आपणावर अवलंबून राहणारच, पण त्यांना शिक्षणाने आपण स्वावलंबी न केल्यास पुढे प्रौढपणीही ती आपल्यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अवलंबून राहणार, त्यांच्या उदरनिर्वाहाचा भार आपणावर कायमचाच राहील. तसेच उन्मार्गी, गुन्हेगार प्रवृत्तीच्या मुलांना आपण योग्य शिक्षण देऊन मार्गावर लावण्याचे, सुधारण्याचे टाळले, तर मोठेपणी हीच मुले पक्के गुन्हेगार बनून समाजास ( म्हणजे आपणासच ) अधिक उपद्रव देणार नाहीत काय ? त्यापेक्षा त्यांच्या बालपणीच त्यांच्या शिक्षणावर थोडा पैसा ( जसा आपण इतर मुलांवर खर्च करतो तसाच ) खर्च करून त्यांना स्वावलंबी, सुवृत्त करणे आपल्याच कल्याणाचे नाही काय ?

( ४ ) आणि सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे ही मुले अपंग असली तरी त्यांचे ते विशिष्ट व्यंग व त्यामुळे होणारा काही परिणाम सोडला तर बाकीच्या बाबतीत ती इतर सामान्य मुलांप्रमाणे संस्कारक्षम असतात आणि त्यांना योग्य त्या प्रकारचे शिक्षण दिले तर ती इतरांप्रमाणे पूर्णपणे स्वावलंबी होऊ शकतात. मात्र त्यांना योग्य अशा व्यवसायात पडण्याची संधी मिळाली पाहिजे व त्याकरिता योग्य असे शिक्षण मिळाले पाहिजे.

असे योग्य व्यवसाय कोणते व त्याकरिता शिक्षणाची खास व्यवस्था कशी करावयाची याचा पुढे विचार केला आहेच.

तेव्हा तात्पर्य हे की या मुलांच्या शिक्षणावर पैसा किंवा वेळ व उत्साह खर्च करावयाचा हे केवळ आपले कायदेशीर आणि नैतिक कर्तव्यच आहे असे नाही, तर ते आपल्या व त्यांच्या फायद्याचे आणि त्यांच्या उन्नतीचेच होय यात शंका नाही.

या अपंग मुलांमुलींच्या ( विशेषत: शारीरिक दृष्ट्या आणि बौद्धिक दृष्ट्या अपंगांच्या ) शिक्षणाची व्यवस्था करण्याच्या बाबतीत आपल्या भारतात काही अडचणी आहेत; त्या अशा:—

( १ ) या प्रश्नाबाबत अज्ञानामुळे समाजाचे औदासीन्य आहे. स्वातंत्र्य-पूर्व काळात सरकार परकीय असल्यामुळे त्याचेही या प्रश्नाकडे लक्ष नव्हते. अशा रीतीने हा प्रश्न आतापर्यंत उपेक्षिला गेला असल्यामुळे याच्या सोडवणुकीकरिता अगदी प्राथमिक अवस्थे-पासूनच सुरुवात करावयास हवी आहे.

( २ ) हा प्रश्न किती व्यापक आहे याची अजून आपल्याला कल्पना नाही. कारण अपंग मुलांची शिरगणती करण्याचा आपल्या भारतात आतापर्यंत तसा प्रयत्नच झाला नाही.

परदेशात अशा अपंग मुलांच्या व्यंगांची अगदी जन्मा-पासूनच नोंद केली जाते. तशी माहिती सरकारला पुरवण्याची जबाबदारी कायद्यानेच पालकांवर टाकली आहे.

आपल्याकडे हे काहीच होत नाही. दर दहा वर्षांनी होणाऱ्या शिरगणतीच्या वेळीही ही माहिती सरकार नोंदवून घेत नाही. १९३१ सालच्या शिरगणतीपर्यंत निदान अंधांची नोंद होण्याची व्यवस्था होती; आता तीहि नोंद शिरगणतीतून काढून टाकली आहे. हे आपल्या राष्ट्रीय सरकारने या प्रश्नाच्या बाबतीत एक पाऊल मागे टाकले आहे.

( ३ ) अपंग मुलांच्या शिक्षणाची सोय इतर मुलांकरिता करावयाच्या सोयीपेक्षा अधिक खर्चाची असते. वैयक्तिक लक्ष देण्याची विशेष आवश्यकता असल्यामुळे प्रत्येक वर्गात मुले फार थोडी असावी लागतात. म्हणून वर्गखोल्या अधिक आणि शिक्षक अधिक असावे

लागतात. या कामात तज्ज्ञ असणारे खास शिक्षक नेमावे लागतात; त्यामुळे इतर शिक्षकांपेक्षा त्यांना अधिक पगार द्यावा लागतो. शिक्षण-साहित्यही अधिक लागते. हे सर्व खर्चाचे होते.

(४) तज्ज्ञ शिक्षक भरपूर प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. कारण या मुलांकरिता लागणाऱ्या शिक्षकात काही विशेष गुण असावे लागतात. त्यांच्या अंगी चिकाटी हवी, धीमेपणा, शांतपणा हवा, या मुलांच्याविषयी सहानुभूती हवी. शिक्षणकार्याबरोबरच आपणांस समाजकार्य करावयाचे आहे अशी वृत्ती हवी. असे शिक्षक भरपूर प्रमाणात मिळणे कठीण जाते. शिवाय असे शिक्षक तयार करणारी अध्यापन-विद्यालयेही आपणाकडे अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच आहेत.

(५) अशा शाळांकरिता आपल्या देशातही परिस्थितीला अनुरूप असा अभ्यासक्रम आणि शिक्षणपद्धती शोधावयास हवी. ते अजून शास्त्रशुद्ध रीतीने करण्यात आले नाही. त्या बाबतीत संशोधन व्हावयास हवे.

एवढ्या जरी अडचणी असल्या तरी या मुलांमुलींच्या शिक्षणाची सोय आपण करावयास पाहिजे व ती ताबडतोब करावयास हवी. ताबडतोब म्हणण्याचे एक कारण असे की आज त्यांची संख्या फार मोठी आहे व आधुनिक जीवनातील वाढता कृत्रिमपणा, वाढती धावपळ, वाढती यांत्रिक प्रगती यांमुळे ती संख्या दरवर्षी वाढत आहे असे स्पष्ट दिसून येते.

अपंग मुलांमुलींच्या शिक्षणाची काय सोय करावयाची हे पाहण्यापूर्वी आणखी एका तत्संबंधी प्रश्नाचा विचार केला पाहिजे. तो असा : या मुलांची संख्या वाढू नये अशी काही प्रतिबंधक पूर्वयोजना आखता येईल काय? म्हणजे असे अंपगत्व येऊच नये अशी काही खबरदारी वेळीच घेता येईल काय?

इतर प्रगत देशांचा या बाबतीतील अनुभव पाहिला व आपल्या देशातील सद्य:परिस्थिती विचारात घेतली तर या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येईल. अंधांच्या बाबतीतीलच परिस्थिती पहा ना. स्थूलमानाने असे

म्हणतात की अंधत्वाच्या प्रमाणाच्या बाबतीत जगात आपल्या देशाचा क्रमांक इजिप्तच्या खालोखाल दुसरा लागतो. आपल्या देशात दर लाख माणसांमध्ये ५०० माणसे अंध आहेत. इंग्लंडमध्ये हेच प्रमाण १७५, अमेरिकेत १७५, बेल्जममध्ये ४३ असे पडते.

पण आपल्याकडे एवढे मोठे प्रमाण दिसत असले तरी यातील शेकडा ९० एवढे अंधत्व योग्य खबरदारी वेळीच घेतली तर टाळता येण्यासारखे आहे. बरेचसे अंधत्व बालवयात देवी न टोचल्यामुळे येते. कांही अंधत्व मातेच्या गरोदरपणी भलतीच औषधे तिने घेतल्यामुळे येते; कांही अंधत्व मूल जन्मल्याबरोबर त्याचे डोळे योग्य औषधाने साफ न केल्यामुळे येते. या गोष्टी अज्ञानामुळे घडतात. ते नाहीसे केले, योग्य प्रचार केला, तर यामुळे येणारे अंधत्व टाळता येईल. काही अंधत्व अपघाताने येते; त्या बाबतीतही योग्य शिक्षण देऊन ( उदा. Safety First Education ) काही करता येईल. मुकेपणा किंवा बहिरेपणा यांचीही बरीच कारणे आता माहीत झालेली आहेत. काही बहिरेपणा ( म्हणजे संपूर्ण बहिरेपणा ) आनुवंशिक असतो, काही मातापित्यांच्या रक्ताच्या विशिष्ट घटकांमुळे येतो, काही उपदंशासारख्या गुप्त घाणेरड्या रोगांमुळे येतो, काही मातेच्या गरोदरपणात तिने घेतलेल्या कडक औषधांमुळे, काही विशेष आजारामुळे ( उदा. विषमज्वर, कांजिण्या, मेंदूचा ज्वर इ. ) येतो, काही अपघातामुळे येतो. योग्य शिक्षण आणि वेळच्या वेळी केलेली वैद्यकीय उपाययोजना याने काही बहिरेपणा किंवा मुकेपणा टाळता येईल. तेच इतर काही शारीरिक व्यंगांसंबंधी म्हणता येईल. सामाजिक बाबतीतील विषमता योग्य उपायांनी नाहीशी—निदान कमी केली व योग्य शिक्षण सर्व मुलांमुलींना देण्याची व्यवस्था झाली तर उन्मार्गी, पोरकी, अशा मुलांची संख्या कमी होईल व या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आजच्याइतका बिकट राहणार नाही.

पण हे सर्व उपाय करूनहि काही अशी दुर्दैवी मुले सामाजात राहणारच. त्यांच्या शिक्षणाची सोय समाजाने, राष्ट्राने केलीच पाहिजे. ती कशी करावयास हवी व त्या बाबतीत आज भारतात काय केले जात आहे या प्रश्नाकडे आता वळू.

प्रथम आपण अंध मुलांमुलींच्या शिक्षणाचा विचार करू.

अंध कोणास म्हणावयाचे ते प्रथम स्पष्ट केले पाहिजे सामान्यतः ज्याला दोन्हींपैकी एकाही डोळ्याने अगदी काही सुद्धा दिसत नाही, म्हणजे जो दोन्ही डोळ्यांनी संपूर्णपणे ‘ ठार आंधळा ’ असतो त्यालाच आपण आंधळा म्हणतो. पण हे पूर्णत्वाने खरे नाही. खरे म्हणावयाचे म्हणजे ज्यांना आपण डोळस म्हणतो त्यांपैकी बहुतेक जण कमीजास्त प्रमाणात अंध असतात. कोणाला डाव्या डोळ्याने थोडे कमी दिसते, तर कोणाला उजव्या डोळ्याने. कोणाला बारीक ठशातील अक्षरे वाचावयास त्रास होतो, तर कोणाला रात्री दिव्याच्या प्रकाशात वाचावयास त्रास होतो, कोणाला लांबचे चांगले दिसते, पण जवळचे भुरकट दिसते; कोणाचे याच्या उलट असते. कोणाला चष्मा लावला म्हणजे स्पष्ट दिसते. त्यातही चष्म्याच्या काचेचे नंबर कमी जास्त असतात. तसेच कोणाच्या चष्म्याच्या उजव्या काचेचा नंबर आणि डाव्या काचेचा नंबर हे निरनिराळे असतात. कोणत्या डोळ्याने कोणाला कितपत दिसते हे बारकाईने आणि अगदी निश्चितपणे ठरविण्याचे आता शास्त्रच बनले आहे. त्याच्या साहाय्याने अंधत्वाची ( किंवा डोळसपणाची ) छाननी होऊन अंधत्वाच्या प्रमाणात त्यांच्या शिक्षणाची सोय करणे हे योग्य. परदेशात आता अंधांकरिता विविध प्रकारच्या शाळा असतात. ज्यांना अजिबात दिसत नाही अशी मुले एका शाळेत तर ज्यांना फार कमी प्रमाणात अगदी थोडे का होईना पण दिसते त्यांच्याकरिता निराळ्या शाळा, निराळी पुस्तके, निराळे शिक्षक, निराळे शिक्षणसाहित्य, निराळ्या शिक्षणपद्धति, अशी व्यवस्था असते. पण आपल्याकडे हे अजून शक्य झालेले नाही. अंगदी पूर्णपणे अंध असणाऱ्या मुलांमुलींच्याच शिक्षणाची थोडीफार व्यवस्था आहे. तेव्हा अशा मुलांच्याच शिक्षणाची आपण विचार करू या.

अंधांकरिता असणारी शाळा ज्यांनी पाहिली नाही त्यांना वाटेल की, अंधांना शिकविता कसे येईल ? शिकावयचे म्हणजे लिहावाचायला शिकावयाचे आणि ते तर मुख्यत्वे डोळ्याचे काम असते. जे वाचावयाचे ते जर दिसलेच नाही तर ते वाचणार कसे ? आणि ज्या कागदावर लिहावयाचे तो कागदच जर दिसला नाही तर त्यावर लिहिता तरी कसे येईल ?

पण या अडचणीतून आता मार्ग काढला आहे आणि तोहि एका अंध

माणसानेच. फ्रान्स देशातील लुई ब्रेल या अंधाने अंधांकरिता एक लिपी तयार केली आहे. त्या लिपीला 'ब्रेल लिपी' असे त्याचेच नाव देण्यात आले आहे. या लिपीत लिहिलेले वाचताना डोळ्याची गरज मुळीसुद्धा लागत नाही. कारण त्या लिपीतील लिखाण डोळ्यांनी वाचावयाचे नसते, तर ते हाताच्या बोटांच्या स्पर्शाने वाचावयाचे असते.

ही लिपी उठावाच्या सहा टिंबांवर बसविलेली आहे. एक जाड कागद घ्यावयाचा आणि त्यावर लोखंडी सळईसारख्या पेन्सिलीने ही टिंबे टोचावयाची. एकदा टोचले की एक खोलगट टिंब तयार होते. अशारीतीने त्यावर विशिष्ट पद्धतीने टिंबे टोचीत जावयाचे. मग तो कागद उलटा करून त्यावरून हाताची बोटे फिरवावयाची. उलट बाजूने बोट फिरविताना विशिष्ट ठिकाणी एकच उठावाचे टिंब बोटाला लागले तर त्याचा अर्थ, वर्णमालेतील विशिष्ट वर्ण समजावयाचा. दोन टिंबे लागली तर दुसरे अक्षर समजावयाचे. अशा तऱ्हेने सर्व भाषा केवळ या सहा टिंबांवर बसविता येते. या पद्धतीवर आता आपली देवनागरी लिपीही बसविली आहे व कोणतेही अक्षर अगदी जोडाक्षरही अशा तऱ्हेने लिहिता व बोटाने स्पर्श करून वाचता येते. या लिपीत अनेक पुस्तके तयार करण्यात आली आहेत. डेहराडून येथे अशा पुस्तकांच्या छपाईकरिता सरकारने मोठा छापखाना उभारला आहे व भारतातील प्रमुख भाषात येथे या लिपीत अनेक पुस्तके छापली गेली आहेत. सवयीने अंध विद्यार्थी अशा पुस्तकांचे वाचन बरेच जलद करू शकतो. आणि आता तर या सहाय्याने उठावाच्या अक्षरांचे नकाशेहि तयार झाले आहेत. त्यांच्या साहाय्याने इतिहास-भूगोल शिकविता येतात. आपण नकाशावरील अक्षरे डोळ्यानी पाहून वाचतो, तर अंध विद्यार्थी त्यांच्या या नकाशावरील अक्षरे स्पर्शज्ञानाने वाचू शकतात. आपण पत्ते खेळतो तशा पत्त्यांच्या पानावर या लिपीत अक्षरे उठवून अंधांना पत्त्यातील पाने म्हणजे बदामची राणी कोणती किलवरची तिरी कोणती हेही जाणता येते. घड्याळावर ही अक्षरे ठशाने काढून किती वाजले हेही त्यांना स्पर्शाने सांगता येते.

पण अंधांच्या शिक्षणव्यवस्थेतील खरा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांच्या व्यावसायिक शिक्षणाचा. कारण शिक्षण पूर्ण झाले म्हणजे कोणत्याही व्यक्तीला

स्वावलंबी होऊन स्वतःचे व कुटुंबियांचे पोषण करता आले पाहिजे नाही तर ते शिक्षण एकांगी कुचकामाचे ठरेल.

अंधांना शाळातून जे व्यवसाय शिकवावयाचे ते ठरविताना एक गोष्ट लक्षात घेतली जाते ती ही की दृष्टी गेल्यामुळे त्यांची इतर इंद्रिये अधिक कार्यक्षम झालेली असतात. म्हणजे त्यांचे कान, त्यांचे नाक, त्यांचे स्पर्शज्ञान ही विशेष तीक्ष्ण झालेली असतात. पावलांच्या आवाजावरून किंवा केवळ वासाने अथवा अंगाला स्पर्श करून त्यांना ओळखीच्या माणसाचे नाव सांगता येते. हे त्यांचे विशेष सामर्थ्य लक्षात घेऊनच त्यांना शिकवावयाचे व्यवसाय ठरवावे लागतात.

या दृष्टीने अंधांना शाळातून शिकवावयाचे व्यवसाय म्हणजे असेः— गायन, वादन, कापड विणणे, खुर्च्यांना वेत बसविणे, कागदाची पाकिटे तयार करणे, पुस्तकांची बांधणी करणे, शिवणकाम, कोंबड्या-बदकांची पैदास करणे, धोबीकाम, वीटकाम, दुकाने चालविणे, इत्यादि. परदेशांत तर याच्या जोडीला कारखान्यांतील यंत्रे चालविणें, वर्तमानपत्रे चालविणे, वकिली करणे, टेलिफोन कचेरींत कामे करणे, हेही शिकविले जाते; व त्यात नैपुण्य मिळवून अनेक अंध डोळस माणसाप्रमाणेच कर्तबगारी दाखवू शकतात. दृष्टीचे वैगुण्य जरासुद्धा त्यांच्या आड येत नाही.

अशा तऱ्हेने अंध मुलांमुलींना लिहा-वाचावयाचे व व्यावसायिक शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचे कार्य आपल्या देशात फारच अल्प प्रमाणात चालते. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या मध्यवर्ती सरकारच्या एका शैक्षणिक अहवालाप्रमाणे सर्व भारतात एकूण ६४ अंधशाळा असून त्यांत फक्त २९४२ विद्यार्थी शिक्षण घेत होते.[१] शिक्षण घेण्याचे वय असलेली निदान ३ लाख अंध मुले भारतात आहेत असा एक अंदाज तज्ज्ञांनी केलेला आहे. त्या मानाने सध्याची सोय किती तुटपुंजी आहे हे सहज लक्षात येईल. या ६४ शाळात सरकारी शाळा फारच थोड्या असून बहुतेक

१. Education in India; 1957-58, Vol. I : pages 300–301 (Published in 1962)

शाळा खाजगी संस्थांनी धनिक लोकांच्या दातृत्वावर चालविलेल्या अशा आहेत. आतापर्यंत परकीय राजवटीमुळे या प्रश्नाकडे सरकारचे फारसे लक्ष नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र सरकारच्या सहानुभूतीचा ओघ अशा अपंग मुलांच्या शाळांकडे वळला आहे व अशा संस्था अधिक निघाव्या व त्या अधिक कार्यक्षम व्हाव्या म्हणून सरकार सर्वतोपरी साहाय्य देत आहे. मध्यवर्ती आणि राज्यनिहाय समाजकल्याण खात्यामार्फत हे काम सरकार करीत आहे. प्रौढ अंधांनाही व्यावसायिक शिक्षण मिळावे म्हणून Sheltered Workshops या नावाच्या संस्था देशात काढण्यास सरकारी उत्तेजन मिळत आहे. या संस्थात प्रौढ अपंगांना ( अंध, मूक, बधिर इत्यादि ) व्यावसायिक शिक्षण तर दिले जातेच, पण त्यांना कामाकरिता कच्चा मालही पुरविला जातो व त्यांनी तयार केलेल्या वस्तू विकून त्यांना मजुरी देण्याची सरकार व्यवस्था करते. मात्र अशा संस्था देशात फारच थोड्या आहेत.

पण अजून एक मोठी अडचण राहिली आहेच. शिक्षण पुरे झाले म्हणजे अंध मुलांमुलींना त्या शिक्षणाला अनुरूप असा व्यवसाय मिळाला पाहिजे. स्वतंत्र धंदा करावयाचा असेल तर भांडवल मिळाले पाहिजे, इतर सोयी झाल्या पाहिजेत. नोकरी करावयाची असेल तर ती मिळाली पाहिजे. पण यात मोठ्या अडचणी येतात. यांना नोकरी देण्यास आपल्याकडे कारखानदार किंवा इतर व्यक्तीही तयार नसतात. हा आंधळा आहे, याला काय काम जमणार, याला नेमल्यास उत्पादन कमी होईल, आपला नफा कमी होईल, आपले काम चांगले होणारच नाही, असा सामान्य समज आहे. म्हणून शाळातून योग्य शिक्षण मिळूनही यांना अनुरूप काम मिळण्याची अडचण पडते व मग त्यांचे मन नाराज होते. याचा परिणाम म्हणजे असंस्कृत, गरीब अंधांना वाटते की शिक्षण घेण्यापेक्षा भीक मागितलेली बरी; कारण लोकांना दया येऊन ते दानधर्म करतात व कमाई चांगली होते. पोटापाण्याचा प्रश्न सुटतो. ही परिस्थिती बदलली पाहिजे. परदेशात कायदे झाले आहेत की प्रत्येक कारखान्यात विशिष्ट प्रमाणात अंध, मूक, बधिर, अशा अपंग व्यक्तींची नेमणूक केलीच पाहिजे. आणि तेथील कारखानदारांचा अनुभव असा आहे की अशी अपंग माणसे, त्यांना

योग्य काम दिल्यास, कारखान्याला भारभूत होत नाहीत, तर इतर कामगारांप्रमाणेच भरपूर काम देऊ शकतात.

मुक्या-बहिऱ्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाकडे आता आपण वळू.

पण या बाबतीतील एक गैरसमज प्रथम दूर केला पाहिजे. शरीरविज्ञान-शास्त्रज्ञांनी मुक्या माणसांच्या शरीररचनेचा—विशेषतः त्यांची वागिंद्रिये आणि कर्णेंद्रिये यांचा सूक्ष्म अभ्यास करून आता असे सिद्ध केले आहे की जी मुकी माणसे असतात— किंवा ज्यांना आपण मुकी समजतो, ती **सामान्यतः** मुकी नसतात. त्यांच्या वागिंद्रियात काहीही विकृति नसते, आपल्या इंद्रियांप्रमाणेच बोलण्यास समर्थ अशी त्याची ती इंद्रिये असतात. त्यांच्यात खरा दोष असतो तो बहिरेपणाचा. त्याच्या कर्णेंद्रियांत अशी काही विकृति असते की त्यांना कसलाही आवाज ऐकू येत नाही. आणि आवाज न ऐकल्यामुळे आवाजाचे – शब्दांचे – अनुकरण करून तसा आवाज किंवा शब्द काढणे त्यांना माहीत नसते. विशेषतः जन्मापासून बहिरी असणारी माणसे यांना आवाज म्हणजे काय याची काहीच कल्पना नसते. मग ती इतरांचे ( लहान मुले इतरांचे शब्द ऐकून तसे शब्द काढण्याचा प्रयत्न करतात व बोलावयास शिकतात ) त्याप्रमाणे अनुकरण करून बोलणार कशी ?

तेव्हा या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत खरा प्रश्न असतो तो त्यांना ऐकू येण्याच्या बाबतीत काही साहाय्य करण्याचा. आपण बोलू ते त्यांना काही उपायाने ऐकू येऊ लागले, तर आपले अनुकरण करून, त्यांनाही वेडेवाकडे का होईना, बोलता येते. हे त्याना कसे साध्य करून द्यावयाचे ?

पण प्रथम आणखी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. आपणांसारख्या ऐकू येणाऱ्या सर्वच माणसांची श्रवणशक्ति सारखीच नसते. कोणाचे कान तिखट आहेत असे आपण म्हणतो. म्हणजे त्याला अगदी सूक्ष्म आवाजही ऐकू येतो. काहींना कमी ऐकू येते; त्यांच्याशी मोठ्याने बोलावे लागते. काहींना एकाच कानाने ऐकू येते. तेव्हा बहिऱ्या मुलांत सुद्धा बहिरेपणा कमीजास्त प्रमाणात असतो. कोणाला किती प्रमाणात ऐकू येते हे प्रथम पाहावे लागते. आता असे एक यंत्र ( Audio-meter ) शास्त्रज्ञानी तयार केले आहे व त्याच्या साहाय्याने माणसाची श्रवणशक्ती अगदी बारकाईने

मोजता येते. माणूस किती प्रमाणात बहिरा आहे हे ठरले म्हणजे त्याला ऐकू येण्याकरिता बाह्य साधन उपयुक्त होईल काय हे ठरविता येते व जरूर तर ते देता येते. हे साधन म्हणजे श्रवणयंत्र ( Hearing Aid ). हे विजेच्या साहाय्यावर चालते व याने सूक्ष्म आवाज खूप मोठा केला जातो व मेंदूपर्यंत तो पोहोचला म्हणजे काही प्रमाणात बहिऱ्या असलेल्या व्यक्तीला थोडे ऐकू येते. बहिऱ्या मुलांच्या शाळेतही आता ही यंत्रे वापरू लागले आहेत. शिक्षक मायक्रोफोनसारख्या यंत्रांतून बोलतात व तो आवाज या श्रवणयंत्रामुळे मोठा होऊन एकाच वेळी दहा-बारा मुलांना ऐकू येऊ शकतो. आणि मग ती मुले शिक्षकांचे अनुकरण करून बोलण्याचा प्रयत्न करतात.

ज्यांची ऐकण्याची शक्ति एवढी कमी आहे की अशा यंत्राचाही काही उपयोग होऊ शकत नाही, म्हणजे जी पूर्ण बहिरी असतात, त्यांचे काय ?

त्यांच्याकरिताही वैज्ञानिकांनी एक मार्ग काढला आहे. आपण श्रवण-लहरी ऐकतो त्या कानामार्फत. कानातून आवाज मेंदूच्या एका विशिष्ट भागापर्यंत पोहोचतो व मग त्या आवाजाने सूचित केलेला अर्थ आपणास समजतो. पण आवाज कानाप्रमाणेच आपल्या शरीराच्या हाडातूनहि काहीसा अस्पष्ट असा मेंदूपर्यंत जाऊ शकतो. आपल्या मनगटाजवळील हाड किंवा कानाच्या मागील हाड ही या दृष्टीने उपयुक्त हाडे आहेत. कानाने ऐकू न येणारा आवाज या हाडातून थोड्या प्रमाणात ऐकू येऊ शकतो. इंग्रजीत याला Bone conduction म्हणतात. तेव्हा या पद्धतीने काही बहिऱ्या मुलांना बोलावयास शिकविता येते.

बहिऱ्या-मुक्या मुलांना बोलावयास शिकविण्याचा आणखी एक मार्ग आहे. एखादा माणूस जन्मापासून बहिरा-मुका नसतो. काही आजार किंवा अपघात यामुळे तो बहिरा व पुढे मुका होतो. म्हणजे त्याने आवाज, शब्द, ऐकलेले असतात. तसे शब्द काढण्याचे मर्यादित सामर्थ्य त्याला असते. पण दुसरा काय बोलतो हे कळल्याशिवाय त्याला शब्द काढता येत नाहीत व संभाषणात भाग घेता येत नाही. अशा व्यक्तीला ओष्ठवाचन ( Lip-Reading ) याने बोलण्यास मदत करता येते. आपण जेव्हा तोंडातून

शब्द बाहेर काढतो तेव्हा आपले ओठ, दात, जीभ यांची विशिष्ट हालचाल होते ती सूक्ष्म असली तरी बारकाईने पाहिल्यास लक्षात येते. 'प' म्हणताना दोन्ही ओठ एकमेकांजवळ येतात. 'त' म्हणताना जिभेचा शेंडा दाताना विशिष्ट जागी स्पर्श करतो; इत्यादि फरक मुकी-बहिरी माणसे बारकाईने लक्षात घेऊ शकतात व आवाज न ऐकताहि बोलणाऱ्याच्या तोंडाकडे, ओठांकडे पाहून तो काय बोलत आहे हे जाणू शकतात व त्याच्याशी संभाषण करू शकतात.

बोलावयास शिकविल्यानंतर वाचावयास व लिहावयास शिकविणे सोपे काम असते. त्यातल्या त्यात लिहिणे फार सोपे असते; कारण या मुलाची दृष्टी शाबूत असते.

इतर सामान्य शाळांप्रमाणे या मुलांच्या शाळातून इतिहास, भूगोल, सामान्यज्ञान, शास्त्र, चित्रकला, शारीरिक शिक्षण इत्यादि विषयही शिकविता येतात. चित्रकलेत तर काही मूक-बधिर मुले विशेषच प्रगती करू शकतात. अनेक मुले चित्रकलेच्या सरकारी परीक्षाहि देऊ शकतात.

मात्र या मुलांना इतर सामान्य मुलांपेक्षा हे शालेय विषय शिकण्यास अधिक काळ लागतो. जो अभ्यासक्रम सामान्य मुले चार वर्षांत पुरा करू शकतात तो पुरा करण्यास यांना आठ वर्षे तरी लागतात. आणि इतके करूनही ही मुले– काही थोडे अपवाद सोडले तर–शालान्त परीक्षा किंवा पदवी-परीक्षा यांचा अभ्यास करू शकत नाहीत.

या मुलांना हे शालेय विषय शिकविताना इतर सामान्य शाळांपेक्षा अधिक शिक्षणसाहित्य लागते. शब्दांनी स्पष्ट करता येत नाहीत अशा कल्पना फळ्यावरील आकृती, चित्रे, नकाशे, वस्तू किंवा वस्तूंचे नमुने अशा दृश्य साधनांनीच स्पष्ट कराव्या लागतात. पुस्तके, वह्या, पाट्या, पेन्सिली इत्यादि साहित्याचा यांना उपयोग होतोच.

पण या शालेय बौद्धिक शिक्षणापेक्षा यांना खरे उपयुक्त शिक्षण म्हणजे, अंधांप्रमाणेच, व्यावसायिक शिक्षण होय. यांना उपयुक्त असे व्यावसायिक शिक्षण पुढील विषयांचे होयः—सुतारकी, शिंपीकाम, पुस्तक-छपाई व बांधणी; घडयाळे, रेडिओ इत्यादींची दुरुस्ती, टंकलेखन, व्यापारोपयोगी

चित्रकला ( Commercial Art ), कागदाची फुले करणे, कापडावर खडी काढणे, विणकाम, कारखान्यातील यांत्रिक काम, कातडी सामान तयार करणे, इत्यादि. या कामात त्याचे व्यंग उपयुक्तच ठरते. कारण बाहेरचा काही आवाज ऐकू येत नाही, त्यामुळे मन अधिक एकाग्र होऊ शकते.

या मुलांच्या ( आणि अंध मुलांच्याही ) शाळातून अभ्यासेतर कार्यक्रम ( सहली, स्नेहसंमेलने, हस्तलिखित मासिके, वादविवादसभा, खेळांच्या स्पर्धा ) यांनाही शक्य तेवढे स्थान द्यावयास हवे.

या मूक-बधिर मुलांच्या शिक्षणाकडेही आपले आतापर्यंत फारसे लक्ष गेले नाही. अंध मुलांप्रमाणेच हीही मुले उपेक्षित राहिली आहेत. सांप्रत आपल्या भारतात या मुलांकरिता केवळ ४१ शाळा असून त्यात सुमारे २६०० मुलेच शिक्षण घेत आहेत. त्यात सरकारी शाळा फारच थोड्या आहेत. सर्वांत मोठी शाळा कलकत्ता येथे असून ती आज ७५ वर्षे उपयुक्त कामगिरी करीत आहे. तीत सुमारे ३०० विद्यार्थी जीवनोपयोगी शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रातील एक उत्तम शाळा पुण्यातील ' शिक्षण प्रसारक मंडळी ' चालवीत आहे. तिची स्थापना होऊन केवळ १० च वर्षे झाली; पण या अल्प काळात तिची मोठी प्रगती झाली आहे.

मूक-बधिर मुलांच्या शाळांकरिता तज्ज्ञ शिक्षक तयार करण्याची सोय भारतात फारच मर्यादित आहे. लखनौ, कलकत्ता, पालमकोटा आणि अहमदाबाद येथे काहीशी सोय आहे. पुण्यातील शाळेतही तशी काही सोय आहे. पण एकंदर गरजेच्या मानाने ती फारच अपुरी आहे.

व्यवसायांचे शिक्षण पुरे करून स्वावलंबनाने उदरनिर्वाह करू इच्छिणाऱ्या मूक-बधिरांना मार्गदर्शन आणि साहाय्य करणाऱ्या संस्थांचीही आता फार गरज आहे. ते झाले नाही तर मिळालेले शिक्षण व्यर्थ आहे अशी विफलतेची भावना या दुर्दैवी मुलांत निर्माण होईल व ते फारच हानिकारक होईल.

आतापर्यंत वर्णन केलेल्या शारीरिक व्यंगांशिवाय इतर व्यंगे असलेल्या मुलांमुलींच्या ( म्हणजे लुळे, पांगळे, थोटे, तोतरे इ० ) शिक्षणाची सोय आपल्या

देशात इतकी कमी आहे की जवळ जवळ ती नाहीच म्हणावयास हरकत नाही. मागे उल्लेख केलेल्या सरकारी अहवालाप्रमाणे अशा मुलांकरिता आपल्या खंडप्राय विस्तीर्ण देशात केवळ १० संस्था असून त्यांतून अवघी ४७७ बालके शिक्षण घेत आहेत. हे शिक्षणही अगदी जुजबी असून त्या शिक्षणानंतर मुले स्वावलंबी झाली आहेत किंवा पुढे होतील अशी आशा फारशी दिसत नाही. केवळ अहवालात घालावयाला पाहिजे, काही तरी काम चालले आहे हे दाखवावयाला पाहिजे म्हणून हे आकडे अहवालात आलेले दिसतात.

पाश्चिमात्य प्रगत देशात या अपंगांकडे इतर धडधाकट मुलांइतकेच लक्ष दिले जाते. सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यातून यांची सुटका नाही. त्यांच्याकरिता खास शाळा, खास शिक्षक, खास शिक्षणपद्धती यांचा अवलंब केला जातो. इतकेच काय पण पोलिओसारख्या रोगामुळे दीर्घकाल रुग्णालयात ज्यांना राहावे लागते अशा ( Hospitalized Children ) मुलांच्या शिक्षणाचीही रुग्णालयातच होईल तेवढी सोय केली जाते. आपण या बाबतीत अजून बरेच मागे आहोत. ही मुलेही राष्ट्राची संपत्ती आहेत; योग्य शिक्षण दिल्यास तीही इतरांप्रमाणेच स्वावलंबी, स्वाभिमानी, देशाचे उपयुक्त नागरिक होऊ शकतील ही कल्पनाच आपणांस अजून खऱ्या अर्थाने संमत झालेली नाही. ती झाली म्हणजे मग या मुलांकडे आपले लक्ष जाईल.

बौद्धिक दृष्ट्या अपंग ( म्हणजे सामान्य मुलांपेक्षा फार कमी बुद्धि असलेल्या ) मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न तर आपल्या देशात फारच उपेक्षिलेला आहे. तो प्रश्न समजण्याकरिता बौद्धिकदृष्ट्या अपंग कोणाला म्हणावयाचे याचा थोडासा प्रथम विचार करू.

मुलांच्या बुद्धीचा विचार करताना आपण 'हुशार', 'मंदबुद्धी', 'अगदीच ढ' असे शब्दप्रयोग करून त्यांचे वर्गीकरण करतो; पण ते फार स्थूलमानाचे असते. आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी प्रयोग करून कोणत्याही व्यक्तीची उपजतबुद्धी किती ते आकड्यात सांगण्याचे आता शास्त्र निर्माण केले आहे. त्यांनी काही चाचण्या ( Standardized Tests ) तयार केल्या आहेत व त्यांच्या साहाय्याने बुद्धिमापन करून कोणत्याही व्यक्तीची बुद्धी

किती ते सांगता येते. त्या आकड्याला त्या व्यक्तीचा बुद्ध्यंक म्हणतात. ज्याचा बुद्ध्यंक ९० ते ११० तो साधारण बुद्धीचा; ११० ते १२० बुद्ध्यंक असेल तर हुशार; १२० ते १४० बुद्ध्यंक फार बुद्धिमत्ता दाखवितो व १४० वर बुद्ध्यंक असेल तर ती व्यक्ती अति बुद्धिमान्, जणू बृहस्पतीच. उलट कमी बुद्धिमत्तेचे वर्गीकरण असे करतात:— ८० ते ९० मंदबुद्धी; ७० ते ८० फारच मंद; ६० ते ७० दुर्बलबुद्धी; ६० च्या खाली क्रमाने जडबुद्धी व शेवटी ० ते २० वेडसर किंवा वेडा.

शाळेत सामान्यतः शिकावयास जाणारी मुले ६०-७० या बुद्ध्यंकाच्या खालील नसतात. तेव्हा बौद्धिकदृष्ट्या अपंग म्हणजे ६० बुद्ध्यंकाच्या खालील मुले; म्हणजे ज्यांना सामान्य मुलांबरोबर, सामान्य पद्धतीने शिकविता येणारच नाही, ज्यांच्याकरिता खास शाळा हव्यात, अशी अर्धवट, बुद्धिहीन मुले.

अशा मुलांतही दोन प्रकार करावयास हवेत. जी अगदी वेडसर किंवा पूर्ण वेडी आहेत तो एक प्रकार. या मुलांचा प्रश्न शिक्षणविषयक नसतो. कारण त्यांना शिकवणे शक्यच नसते. त्यांचा प्रश्न सामाजिक असतो. त्यांना अन्न-वस्त्र देऊन कसा तरी त्यांचा सांभाळ करावयाचा असतो; त्यांचे त्यांना संरक्षणही करता येत नाही, समोरून एखादी गाडी जोरात आली किंवा एखादा बैल उधळून धावत आला तर बाजूला सरून स्वतःस वाचवावे हेही त्यांना कळत नाही. अशा मुलांना शिकविणार तरी काय व कसे ?

पण यांच्यापेक्षा थोडी अधिक बुद्धी असणारी ( म्हणजे दुर्बल बुद्धी किंवा फारच मंद बुद्धी असणारी ) मुले काही प्रमाणात शिक्षणक्षम असतात. मात्र त्यांच्याकरिता स्वतंत्र शाळा आणि खास शिक्षणपद्धती असावयास हव्या. अर्थात् या मुलांना कितीही खास पद्धतीने शिकविले तरी ती सामान्य मुलांप्रमाणे शिक्षण घेऊ शकत नाहीत. काहीच नाही त्यापेक्षा थोडे बरे या न्यायाने थोडे शिक्षण पदरात पडून ती कांहीशी सुधारू शकतात.

अशा मुलांना बौद्धिक शिक्षण अगदी जुजबी देता येते आणि तेही मूर्त वस्तू किंवा चित्रे अशा साधनांनी. त्यातही त्यांना त्यांच्या इंद्रियांचा

( म्हणजे हात, पाय, डोळे, कान, इत्यादींचा ) उपयोग करून ते व्यावयास शिकवावे लागते. कारण, बुद्धी कमी त्यामुळे बुद्धीने कोणत्याही नवीन कल्पनेचे ग्रहण त्यांना करता येत नाही. तसेच बौद्धिक शिक्षणापेक्षा अधिक भर हस्तव्यवसायांवर द्यावा लागतो. बागेतील किंवा शेतातील किरकोळ कामे, शिवणकाम ( म्हणजे नुसते टाके घालणे ), विणकाम, चटई विणणे, किंवा कपडे धुणे, इत्यादि हस्तव्यवसाय त्यांना उपयुक्त होत. कारण त्यात डोक्याचे काम कमी व सर्व क्रिया केवळ यांत्रिक असतात; त्यामुळे ते त्यांना जमू शकते, व आपणास काही तरी येते अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. प्रत्यक्ष काही येण्यापेक्षा ही भावनाच त्यांच्या बाबतीत उपयुक्त होते.

अशा मुलांच्या शाळातून ठराविक साच्याचा अभ्यासक्रम, किंवा ठराविक पद्धती अथवा पूर्वनियोजित वेळापत्रक अशा गोष्टींना गौण स्थान दिले पाहिजे. सर्व काही त्यांच्या कलाने घेतले पाहिजे, आणि तेही वैयक्तिक लक्ष पुरवून. त्यांच्या वर्गात एकेकच विद्यार्थी आहे असे समजून त्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या कलाने त्यास शिकवले पाहिजे. किती कठिण आणि खर्चाचे हे काम आहे ! पाश्चिमात्य देशात हेही आस्थेने केले जाते. आपल्याकडे अजून शिक्षणमंदिराचे हे दालन बंदच आहे. दर वर्षाच्या सरकारी अहवालात म्हटले जाते खरे, अशा तऱ्हेच्या संस्था आपल्या भारतात तीन आहेत आणि त्यात सुमारे १०० बालके शिकत आहेत. पण ते सर्व अगदी जुजबी काम आहे.

आता राहिला विचार सामाजिक दृष्ट्या अपंग असणाऱ्या मुलांमुलींच्या शिक्षणाचा. पुष्कळदा हा प्रश्न शैक्षणिक न समजता सामाजिक समजला जातो. अलीकडे शिक्षणविषयक सरकारी अहवालातही याचा समावेश केला जात नाही. मागे मी ज्या सरकारी अहवालाचा उल्लेख केला त्यात या प्रश्नाची माहिती नाही. कारण हा विभाग पूर्वी तुरुंग खात्याकडे असे तर आता तो समाजकल्याणखात्याकडे देण्यात आला आहे. पण खरोखरी तो शैक्षणिकच प्रश्न आहे म्हणून त्याचा येथेच, थोडक्यात आपल्या महाराष्ट्र राज्यापुरताच विचार करण्याचे योजिले आहे.

सामाजिक दृष्ट्या अपंग कोणास म्हणावयाचे हे या लेखाच्या आरंभी सांगितले आहेच. यातील ज्याचे वय शालेय शिक्षण घेण्याचे असते ( म्हणजे सामान्यतः ६ ते १६ वर्षे वयाची मुले ) यांचाच आपण येथे विचार करू.

अशा मुलांच्या शिक्षणाचा व तदनुषंगिक इतर बाबींचा विचार एका सरकारी कायद्यान्वये केला आहे. त्या कायद्यान्वये ही जबाबदारी सरकारने पत्करली आहे व तिच्या परिपालनामध्ये बिनसरकारी संस्था निर्माण करून त्यांची मदत घेण्याचे काही बाबतीत योजिले आहे. अशा संस्था जिल्हानिहाय निर्माण करता येतात व त्यांना ' जिल्ह्या परिवीक्षा आणि अनुचिंतन संस्था [1] ( District Probation and Aftercare Association ) असे नाव आहे. या संस्थेच्या कार्यकर्त्या अधिकाऱ्यांना ' परिवीक्षाधिकारी ' ( Probation Officers ) म्हणतात. सामाजिक दृष्ट्या अपंग असा या वयाचा मुलगा किंवा मुलगी त्यांना आपल्या गावी अथवा जिल्ह्यात आढळली की त्याला अथवा तिला जरूर तर पोलिसांच्या मार्फत ताब्यात घेण्याचा यांना कायदेशीर हक्क आहे. अवखळ, आईबापांचे न ऐकणारी, शेजाऱ्यापाजाऱ्यांना उपद्रव देणारी दांडगी मुलेही यांना ताब्यात घेता येतात. ताब्यात मूल येताच त्यांनी ते ' स्वीकार केन्द्रात ' ( Remand Home ) मध्ये नेऊन ठेवावयाचे. मुलांकरिता स्वतंत्र व मुलींकरिता स्वतंत्र अशी अनेक स्वीकार-केंद्रे जिल्ह्यात असतात. त्या ठिकाणी त्यांनी त्या मुलाचे निरीक्षण करावयाचे. ती अशी का वागतात, त्यात त्यांचा दोष किती, परिस्थितीचा दोष किती हे पाहावयाचे. मूल गुन्हेगार [2] असले

---

१. हे मराठी भाषांतर श्री. शरच्चंद्र दामोदार गोखले या ह्या क्षेत्रात निष्ठेने काम करणाऱ्या गृहस्थांनी सुचविले आहे. त्यांनी या विषयावर ' नावडती मुले ' हे पुस्तकही लिहिले आहे.

२. ही बालवयी मुले अगदी मोठ्या माणसासारखे चोरी, घरफोडी, जुगार, रेल्वेला उपद्रव, बिनतिकिटाने रेल्वे-प्रवास, विनयभंग, असभ्य वर्तन, आत्महत्येचा प्रयत्न, खून, बलात्कार, इत्यादि सर्व तऱ्हेचे गुन्हे करताना आढळतात.

तरी त्या गुन्ह्याचा विचार प्रामुख्याने न करता त्याची कारणमीमांसा करावयाची व त्याला सुधारण्याकरिता काय उपाय सुचवावा याचा या अधिकाऱ्याने विचार करावयाचा. त्यानंतर त्या मुलाला मुलांच्या न्यायालयात ' ( Juvenile Court मध्ये ) न्यायाधीशांसमोर उभे करून त्यांना त्या मुलाची सर्व माहिती द्यावयाची व आपण योजिलेली उपाययोजना सुचवावयाची. हे न्यायालय सामान्य न्यायालयांपेक्षा वेगळे असते. यात वकिलाला प्रवेश नसतो. येथे मुलांच्या कल्याणाचाच प्रामुख्याने विचार होतो. परिवीक्षाधिकाऱ्याने सुचविलेली उपाययोजना विचारात घेऊन न्यायाधीश ( हे सामान्यतः दोन असतात. एक सरकारी न्यायाधीश व एक बिनसरकारी स्त्री न्यायाधीश ) आपला निर्णय देतात. गुन्हा सामान्य असेल, पहिलाच असेल, त्वरित सुधारण्याची शक्यता असेल तर ताकीद देऊन मूल आईबापांच्या ताब्यात दिले जाते. काही वेळा एखादी ' सुयोग्य संस्था ' किंवा ' सुयोग्य व्यक्ति ' ( Fit Person Association, Fit Person Individual ) पाहून तिच्या ताब्यात ते मूल काही मुदतीकरिता दिले जाते व त्यावर होणारा खर्च सरकार देते. पण मूल जास्त दुर्वर्तनी असले, किंवा पोरके असले, किंवा त्याला अधिक सरकारी संरक्षण देण्याची आवश्यकता वाटली तर त्याला सरकारी अथवा बिनसरकारी ' संमत शाळेत ' ( Certified School ) मध्ये काही विशिष्ट मुदतीनेपाठविले जाते. पूर्वी या शाळांना Reformatory School ( गुन्हेगारांना सुधारण्याची शाळा ) म्हणत. आता ते नाव बदलून त्यांना हे नवीन नाव देण्यात आले आहे. पूर्वीचे बालतुरुंगांचे स्वरूप जाऊन त्यांना आता शाळेचे स्वरूप आले आहे. पुण्यातील येरवडा येथील असली शाळा ( Yeravada Industrial School ) ही आपल्या राज्यातील असली सर्वांत मोठी शाळा असून तीत अशा सुमारे ४०० मुलांच्या शिक्षणाची सोय केली आहे.

अशा शाळेत मुलांचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न तर होतोच, पण त्यांना लिहिण्या-वाचण्याचे आणि एखाद्या उपयुक्त व्यवसायाचे शिक्षणही दिले जाते. अशा शाळेत सामान्यतः पुढील व्यवसायांच्या शिक्षणाची सोय असते. सुतारकी, लोहारकी, शिंपीकाम, वेतकाम, विणकाम, धोबीकाम, मोचीकाम, शेतीकाम, बागकाम, पुस्तक-बांधणी, इत्यादि. हेतू हा की मुलाला आपल्या

आवडीचा व्यवसाय निवडता यावा व त्याचे शिक्षण घेऊन आपली तेथील मुदत संपताच बाहेर येऊन स्वावलंबनाने पोट भरता यावे.

अशा मुलांचे शिक्षण पुरे झाले म्हणजे त्याला अनुरूप व्यवसाय मिळावा याकरिता ‘ अनुचिंतन संस्थेतर्फे ’ ( Aftercare Association ) प्रयत्न होतो. तसेच त्याचे पुढील काळातील वर्तन चांगले आहे की नाही यावरही या संस्थेमार्फत लक्ष ठेवले जाते.

सामाजिक दृष्ट्या अपंग असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची आणि मार्गदर्शनाची ही सर्व व्यवस्था कागदोपत्री चांगली आहे. पण हे सर्व काम एकंदर समस्येच्या व्यापकपणाच्या मानाने फारच थोड्या प्रमाणात चालते आणि आता या उपक्रमाला सुरुवात होऊन सुमारे ७५-८० वर्षांचा काळ होऊन गेला आहे; तेव्हा एकदा या सर्व उपक्रमाचे निःपक्षपाती बुद्धीने मूल्यमापन करून या व्यवस्थेत कालानुरूप काही बदल करावयास हवा काय याचा विचार व्हावयास हवा.

♧ ♧ ♣

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36220 वि: निबंध
क्रमांक 9862 नों. दि. 9/7/64

# प्रज्ञेच्या जोपासनेचा प्रश्न

• ५ •

डॉ. द. न. गोखले
पीएच्. डी.

अलौकिक बुद्धिमत्तेला 'प्रज्ञा' हा शब्द वापरावा आणि अलौकिक बुद्धिमत्तेच्या व्यक्तींना 'प्राज्ञ' म्हणावे, हे मला अनेक दृष्टींनी इष्ट वाटते. बुद्धी लौकिकाची सीमा ओलांडून अलौकिकाच्या क्षेत्रात केव्हा प्रवेश करते याविषयी काही निसर्गसिद्ध नियम नाही. कारण एकंदर जनसमूहाच्या बुद्धीचे माप काढले तर दरेक बुद्ध्यंकांच्या थोड्याफार व्यक्ति आपणाला आढळतात. सरासरी बुद्धी दाखवणारा १०० हा बुद्ध्यंक आणि पराकोटीची बुद्धिमत्ता अथवा genius दाखवणारा १५० किंवा त्याहून वरचा बुद्ध्यंक, यांच्या दरम्यान असणारा प्रत्येक बुद्ध्यंक धारण करणारी माणसे निसर्गाने उत्पन्न केलेली आहेत. तेव्हा अलौकिकत्वाची विभाजक रेषा कोणत्या बुद्ध्यंकापाशी ओढावी याविषयी स्वयंभू असा कांही नियम नाही. पण मनशास्त्रज्ञांमध्ये असा एक संकेत दिसतो की १२५ किंवा १३० याहून जास्त बुद्ध्यंक असेल तर ती बुद्धी अलौकिक समजावी. म्हणजे १२५ किंवा १३० याहून जास्त युद्ध्यंक असणाऱ्या व्यक्तींच्या बुद्धीला मी आताच सुचविलेल्या परिभाषेप्रमाणे 'प्रज्ञा' म्हणावे लागेल आणि त्या व्यक्तींना 'प्राज्ञ' (gifted) हे अभिधान देता येईल. प्रस्तुत लेखात अशा प्राज्ञ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा किंवा प्रज्ञेच्या जोपासनेचा प्रश्न चर्चेला घ्यावा, असा माझा विचार आहे.

प्राज्ञांचा बुद्ध्यंक १२५ ते १३० च्या वर असतो एवढे सांगून प्राज्ञ विद्यार्थ्यांचा चांगला परिचय होतो असे नाही. त्यासाठी त्यांचे आणखी थोडे वर्णन करावयास हवे. एकंदर जनसमूहात या प्राज्ञांची संख्या काही मानसशास्त्रज्ञांच्या मोजमापाप्रमाणे शेकडा आठएक असते; तर काहींच्या मोजमापाप्रमाणे शेकडा फक्त तीनच असते. शाळेत जसजशा वरच्या इयत्ता घ्याव्या तसतसे त्यांचे हे प्रमाण वाढणे साहजिक असते. कारण परीक्षांच्या निरनिराळ्या उंबरठ्यांवर मंद बुद्धीची मुले कुठे तरी अडत राहातात नि अडल्यावर ती शाळेला रामराम ठोकतात. त्यामुळे उरलेल्या मुलांत प्राज्ञांची संख्या त्या मानाने जास्त होत जाते. प्राज्ञ विद्यार्थी बौद्धिक क्षेत्रामध्ये एखाद्या तेजःपुंज ताऱ्यासारखा असा झळाळत राहतो की त्याला हुडकण्यासाठी बुद्धिमापनाच्या तंत्राचाच अवलंब करावा लागतो असे नाही. कोणाही दक्ष शिक्षकांच्या नजरेत तो सहज भरतो आणि त्यांचे लक्ष वारंवार वेधून घेतो. त्याचे वाचन नि अवांतर ज्ञान इतरांच्यापेक्षा पुष्कळच जास्त असते. कोणत्याही विषयाचे ग्रहण तो झपाझप करतो आणि ग्रहण केलेला विषय त्याच्या ध्यानांत उत्तम प्रकारे राहतो. संधी मिळाली की कल्पकता नि स्वतंत्र बुद्धि दाखविल्याशिवाय तो राहत नाही. कार्यामागील कारणपरंपरा शोधण्यांत आणि विशेषावरून सामान्याचा अंदाज बांधण्यात त्याची गती लक्षात भरण्यासारखी असते. त्याच्यामध्ये योजना आखण्याची हातोटी बहुधा दिसून येते. आणि योजना तडीस नेण्याचे संघटनकौशल्यही तो बहुधा दाखवतो. समवयस्क मुलांपेक्षा तो काहीसा उंच, थोराड नि सुदृढ दिसेल आणि त्यांच्यापेक्षा तो कमी वाभरा नि भावनिक दृष्टीने जास्त सुस्थिर आढळेल. तो आत्मपरीक्षण करील, स्वतःचा स्वतःच टीकाकार बनेल. आणि स्वतःची तुलना सर्वमान्य अधिकारी व्यक्तींशी करून आत्मोन्नतीचा मार्ग चोखाळील. सर्वच प्राज्ञ मुले तंतोतंत अशी असतात असे नाही; पण त्यांच्यात ही लक्षणे कमजास्त प्रमाणात आढळण्याचा बराच संभव असतो. थोडक्यात असे म्हणता येईल, की अंधारात जसा लकलकीत दिवा उठून दिसावा तसा प्राकृत विद्यार्थ्यांच्या वर्गात प्राज्ञ विद्यार्थी आपल्या बुद्धिवैभवामुळे उठून दिसतो. प्रतिकूल परिस्थितीमुळे प्रज्ञा क्वचित झाकली जाते. हे खरे; पण राखेने झाकलेल्या निखाऱ्यावर कोणी चुकून पाय दिला

म्हणजे जसा चटका बसतो तसा चटका झाकलेल्या अवस्थेतहि प्रज्ञा केव्हा ना केव्हा देते आणि आपले अस्तित्व अंशतः प्रकट करते.

## प्राज्ञांच्या शिक्षणाचे महत्त्व

अशा प्राज्ञ विद्यार्थ्यांच्या मनःशक्तींची परिपूर्ण वाढ व्हावी म्हणून कोणतेही विशेष प्रयत्न सध्याच्या शिक्षणव्यवस्थेत आपण करीत नाही. सर्व-सामान्य विद्यार्थी दृष्टीसमोर ठेवून आपल्या साऱ्या शिक्षणव्यवस्थेची उभारणी झालेली आहे. आपले अभ्यासक्रम नि पाठ्यपुस्तके सामान्यांसाठी आहेत, आपला शिक्षकवर्ग नि अध्यापनपद्धती सामान्यांसाठी आहे आणि आपल्या परीक्षा नि पदव्याही सामान्यांसाठी आहेत. परीक्षेत जे विद्यार्थी उत्तम यश मिळवितात त्यांना आपण शिष्यवृत्त्या देतो आणि त्यांचा समारंभपूर्वक सन्मान करतो. या विद्यार्थ्यांना वैद्यक, स्थापत्य वगैरे विषयांच्या महाविद्या-लयांत आपण सुलभपणे प्रवेशही देतो. पण यापलीकडे प्रज्ञेच्या जोपासनेची कोणतीही विशेष खटपट आपण करीत नाही. प्रज्ञेच्या जोपासनेकडे आजवर जे दुर्लक्ष आपण केले त्याचे स्पष्टीकरण देता येण्यासारखे आहे आणि थोडेसे समर्थनही करता येण्यासारखे आहे. असे म्हणता येईल की, स्वातंत्र्य मिळाल्यावर शिक्षणाचे अनेक मोठमोठे प्रश्न आपल्यापुढे उभे राहिले, पण ते प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेली साधनसंपत्ती आपल्या हाताशी नव्हती. तेव्हा त्या प्रश्नांचा महत्त्वानुसार आपणाला क्रम लावावा लागला आणि विशेष महत्त्वाचे प्रश्न आधी हाती घ्यावे लागले. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण आणि शिक्षणाचा प्रसार यांवर या दृष्टीनेच आपण आपले लक्ष केंद्रित केले. पुस्तकी शिक्षणाला तांत्रिक नि औद्योगिक शिक्षणाची या दृष्टीनेच आपण थोडीफार जोड दिली. आणि मूलभूत संशोधनाला अत्यल्प का होईना पण चालना दिली. प्राज्ञांचे शिक्षण हा काही झाले तरी मूठभर विद्यार्थ्यांपुरता मर्यादित असा प्रश्न होता. तेव्हा लोकशाहीला आधारभूत असणारे बहुजनसामान्याचे शिक्षण प्रथम हातीं घेऊन प्राज्ञांच्या शिक्षणाचा प्रश्न आपण बाजूला टाकला यांत फारशी चूक झाली असे नाही. पण या प्रश्नाकडे आजवर झालेल्या दुर्लक्षाचे असे स्पष्टीकरण किंवा समर्थन करता येत असले तरी यापुढे मात्र तसेच दुर्लक्ष करणे योग्य ठरेल असे वाटत

नाही. आपल्या शिक्षणव्यवस्थेंत सर्वसामान्य विद्यार्थ्यांचाच जो विचार होत आहे त्याच्या जोडीला प्राज्ञांचाहि विचार व्हावा, अशी वेळ येऊन ठेपली आहे.

लोकशाहीचा कारभार सुव्यवस्थित चालावा म्हणून सामान्य बुद्धीचे बहुसंख्य मतदार सुशिक्षित व्हावे लागतात, हे खरे आहे. देश औद्योगिक दृष्टीने प्रगत व्हावयाचा असेल तर सामान्य कामगार साक्षर असावे लागतात, हेही खरे आहे. पण लोकशाही आणि औद्योगिक प्रगती यांचे एवढ्यानेच भागते असे नाही. लोकशाहीला दूरदर्शी, कर्तृत्वसंपन्न नि सुबुद्ध नेतृत्वाची खालपासून वरपर्यंत जरूरी असते. औद्योगिक प्रगतीसाठी संघटनाकुशल कारभारी, नवे नवे शोध लावणारे शास्त्रसंशोधक नि अनेक विषयांतले तज्ज्ञ व तंत्रज्ञ यांची पदोपदी गरज पडते. आपणाला आपले राष्ट्र लोकशाही नि औद्योगीकरण एवढ्या दोनच अंगांनी पुढे न्यावयाचे नसून त्याची सर्वांगीण प्रगती साधावयाची आहे. त्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपणाला उत्तम सेनानी हवेत, उत्तम डॉक्टर हवेत, उत्तम स्थापत्य-विशारद हवेत, उत्तम कलावंत नि कवी हवेत, उत्तम प्रशासक हवेत, नि उत्तम शिक्षकही हवेत. राष्ट्राच्या सर्व अंगांना आघाडीवर राहणारी ही माणसे सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांतून पुढे येतील, अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. १२५ ते १३० हून अधिक बुद्ध्यंक असणाऱ्या प्राज्ञ विद्यार्थ्यांमधूनच ही माणसे तयार होऊ शकतील. तेव्हा, सामान्यजनांच्या शिक्षणाबरोबर प्राज्ञांच्या शिक्षणाला आपण हात घातला पाहिजे हे उघड आहे. राष्ट्राच्या आगगाडीचे सामान्यजन हे निरनिराळे डबे होत; पण प्राज्ञ हे त्या आगगाडीचे एंजिन आहे. एंजिनची उपेक्षा केली तर गाडी थांबेल, हे विसरता कामा नये.

प्राज्ञांच्या शिक्षणाला राष्ट्रीय उत्थापनाच्या दृष्टीने जसे महत्त्व आहे तसेच ते लोकशाही तत्त्वविचाराच्या आणि न्यायाच्या दृष्टीनेही आहे. लोकशाहीत समष्टीच्या कल्याणाचा विचार झाला, तरी व्यष्टीच्या कल्याणाचा होम केला जात नाही किंवा त्याकडे दुर्लक्षही केले जात नाही. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार अभिप्रेत असतो आणि व्यक्तीच्या विकासाला स्वयंसिद्ध महत्त्व आहे असे मानले जाते. साहजिकच, लोकशाही-शिक्षण-

व्यवस्थेत सर्व व्यक्तींच्या बीजभूत गुणांची परिपूर्ण वाढ व्हावी असा प्रयत्न कसोशीने व्हावा लागतो. साधनसंपत्तीच्या अपुरेपणामुळे एखाद्या वर्गाकडे लोकशाही राज्यव्यवस्थेत दुर्लक्ष झाले, तर आपद्धर्म म्हणून ती गोष्ट क्षम्य मानता येईल. पण बहुसंख्यांच्या मताप्रमाणे कारभार चालावयाचा या तत्त्वाखातर अल्पसंख्यांचे मूलभूत हक्क कायमचे धाब्यावर बसवता येणार नाहीत. ते लोकशाहीला नि लोकशाहीत अनुस्यूत असलेल्या न्यायाला सोडून होईल. तेव्हा, प्राज्ञ विद्यार्थी अल्पसंख्य असले तरी आपल्या बीजभूत प्रज्ञेचा परिपूर्ण विकास होण्यासाठी समजाकडून साह्याची अपेक्षा करण्याचा त्यांना जरूर अधिकार आहे आणि तसें साह्य देणे हे समाजाचे पवित्र कर्तव्य आहे. प्राज्ञांचे शिक्षण आपण वाऱ्यावर सोडले तर ते आपल्या राष्ट्रविकासाला जसे एकीकडे हानिकारक ठरेल तसेच दुसरीकडे लोकशाहीच्या नि न्यायाच्या कल्पनांशीही ते विसंगत होईल.

### संधिसमानतेच्या नावावर विरोध

लोकशाहीतील संधिसमानतेच्या तत्त्वाचा आधार घेऊन कांही लोक प्राज्ञांच्या वेगळ्या शिक्षणाला विरोध करतात; पण तो विरोध लोकशाहीच्या नि संधिसमानतेच्या भ्रान्त कल्पनेतून जन्मलेला आहे, हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. लोकशाहीत सर्वांना समानसंधी द्यावयाची असते, म्हणजे सर्वांना एकाच साच्यात कोंबायचे नसते. समानसंधीचा तसा अर्थ केला तर आंधळ्यापांगळ्यांसाठी वेगळ्या शाळा काढता येणार नाहीत आणि गुन्हेगार मुलांसाठी ‘ रेफर्मेटरी स्कूल्स् ’ चालवता येणार नाहीत. सार्वजनिक दवाखान्यातून सर्व रोगांवर एकच औषध द्यावे लागेल आणि महाविद्यालयातून जडभरतानाही प्रविष्ट करून घ्यावे लागेल. समानसंधी म्हणजे विविध परिस्थितीला साजेल अशी विविध नि इतरांच्या मानाने अधिकउणी होणार नाही अशी संधी. एकच किंवा एकरूप व्यवस्था नव्हे. सध्याच्या शिक्षणव्यवस्थेंत आपल्या अंगच्या गुणांचा विकास करण्याची जेवढी संधी सामान्य विद्यार्थ्यांना मिळते तेवढी संधी प्राज्ञ विद्यार्थ्यांना मिळत नाही. विकासाची त्यांची जेवढी कुवत असते तेवढा त्यांचा विकास होत नाही. म्हणजे सामान्यांपेक्षा शिक्षणाची कमी संधी

त्यांना मिळते. तेव्हा त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देणें म्हणजे खऱ्या अर्थाने त्यांना समानसंधी देणे होय. आजही विशिष्ट परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या नि उच्च दर्जाची गुणवत्ता दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांनाच आपण स्थापत्य किंवा वैद्यक यांसारख्या विषयांच्या विद्यालयात प्रवेश देतो. सर्वांनाच त्या विद्यालयांचे दरवाजे खुले ठेवीत नाही. हुषार मुलांनाच शिष्यवृत्त्या देतो. सर्वांच्यावर शिष्यवृत्त्यांची खैरात करीत नाही. याचा अर्थ असा होतो, की आजच्या व्यवस्थेतहि गुणानुरूप शिक्षणाची विशेष संधी देण्याचे धोरण आपण ठेवले आहे. हे जर लोकशाहीशी सुसंगत असेल तर प्राज्ञांच्या शिक्षणाची विशेष सोय करणे लोकशाहीशी विसंगत कसे होईल ? लोकशाहीच्या नि संधिसमानतेच्या खऱ्या अर्थाशी प्राज्ञांचे शिक्षण पूर्णपणे सुसंगतच आहे. अमेरिकेसारख्या पराकोटीच्या लोकशाही-वादी देशातहि प्राज्ञांच्या वेगळ्या शिक्षणाला आता मान्यता मिळू लागली आहे. तेव्हा काही तरी तात्त्विक श्लेष काढून प्राज्ञांच्या शिक्षणाला विरोध करण्यात काही हशील नाही.

## वेगळ्या शिक्षणाची आवश्यकता

प्राज्ञ विद्यार्थ्यांना दैदीप्यमान बुद्धीचे देणे जर देवाने दिलेले असते तर सर्वसामान्य मुलांच्या वर्गात शिकूनहि आपला परिपूर्ण विकास त्यांना साधता आला पाहिजे, असे काही लोकांचे म्हणणे असते. प्राज्ञ विद्यार्थी वर्गात बिनचूक उत्तरे देतात आणि परीक्षात वरचे क्रमांक पटकावतात; तेव्हा त्यांची समाधानकारक प्रगती होतच असते, असे या लोकांना वाटते. पण ‘ वर वर दिसणारी समाधानकारक प्रगती ’ आणि ‘ शक्य असलेली कमाल प्रगती ’ यांतील भेद लक्षात घेतला, म्हणजे या लोकांची फसगत कोठे होते ते स्पष्ट होते. सामान्य विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला अभ्यासक्रम आपल्या पल्लेदार झेपेमध्ये प्राज्ञ विद्यार्थी सहज आक्रमून टाकतात आणि त्यांनी समाधानकारक प्रगती केल्याचा भास उत्पन्न होतो. पण सामान्य विद्यार्थ्यांना लावावयाच्या मापाने ही प्रगती समाधानकारक वाटली तरी प्राज्ञांच्या असामान्य बुद्धीच्या दृष्टीने पाहता ही प्रगती वस्तुतः समाधानकारक नसते. नेमलेल्या अभ्यासक्रमाच्या पलीकडे नवी नवी क्षितिजे प्राज्ञांना दाखविली

तर त्या क्षितिजांचा ठाव घेण्याची धमकही त्यांच्या पंखांमध्ये असते. त्या नव्या नव्या नि दूरच्या क्षितिजापर्यंत ते पोहोचले तरच त्यांची प्रगती खरोखर समाधानकारक झाली किंवा ' शक्य असलेली कमाल प्रगती त्यांनी साधली ' असे म्हणता येईल. नाही तर त्यांची प्रज्ञा भाकड पडली नि अर्धविकसित राहिली असेच म्हणावे लागेल. फक्त १३० बुद्ध्यंकाचा प्राज्ञ विद्यार्थी घेतला तर वयाच्या ६ व्या वर्षी त्याला ७-८ वर्षांची समज आलेली असते, १० व्या वर्षी १३ व्या वर्षांची समज आलेली असते आणि १३ व्या वर्षी १६.९ वर्षांची समज आलेली असते ! म्हणजे पहिलीत त्याला दुसरी-तिसरीचा अभ्यास झेपेल, पाचवीत आठवीचा अभ्यास झेपेल आणि आठवीत अकरावीचा किंवा महाविद्यालयांतील पहिल्या वर्षांचा अभ्यास झेपेल ! आपले सर्व अभ्यासक्रम अगदी सरासरी बुद्धीच्या-विद्यार्थ्यांसाठी आखलेले असतात असे गृहीत धरून हा हिशेब केला आहे. प्रत्यक्ष व्यवहारात हे अभ्यासक्रम थोडे अवघड असल्याने या हिशेबात थोडी वजावाट करावी लागेल. पण त्यांवरून प्राज्ञांच्या बुद्धीला सर्वसामान्य वर्गात पुरेसे आवाहन नि आव्हान कसे मिळत नाही, ते स्पष्ट होईल. अमेरिकेमध्ये काही शाळातून अवघड ' ऑनर्स कोर्सेस आहेत ' किंवा महाविद्यालयीन अभ्याक्रम अंशतः शाळेतच उरकण्याची ' अॅड्व्हान्स प्लेसमेंट प्रोग्रॅम ' या नावाची व्यवस्था आहे. प्राज्ञ विद्यार्थी हे ' ऑनर्स कोर्सेस ' किंवा ' अॅड्व्हान्स प्लेसमेंट प्रोग्रॅम ' यशस्वीपणे पार पाडतात, असा अनुभव आहे. तेव्हा, सामान्य अभ्यासक्रम प्राज्ञांनी पुरा केला म्हणून समाधान मानणे भोळेपणाचे आहे, हे आणखी स्पष्ट करावयास नको. प्रज्ञेची पुरेपूर वाढ करावयाची असेल तर सरासरी बुद्धीबरोबर तिला रखडत ठेवून चालणार नाही, तिच्या संचाराला योग्य अशा अफाट अंतराळातच तिला सोडले पाहिजे, यात शंका नाही.

प्राज्ञांना सामान्यांच्या पंक्तीला बसविले तर त्यांची प्रज्ञा अर्धविकसित राहते. एवढेच नव्हे, तर त्यांच्यावर नि समाजावर काही दुष्परिणाम होण्याचाही संभव असतो. एखादे वेळी, आपल्या प्रज्ञेचा वेगळेपणा प्राज्ञाला सामान्यांच्या संगतीत सारखा टुपत राहतो आणि तो कुढा नि अंतर्मुख बनतो. त्याला हीनगंडाची बाधा होते. एखादे वेळी, आपल्या

बौद्धिक श्रेष्ठतेची त्याला मिजास चढते आणि तो अहंकारी होतो. त्याला अहंगंडाची बाधा होते. एखादे वेळी, सर्वसाधारण वर्गातला अभ्यास पुरा करण्यासाठी त्याला फारसे परिश्रम करावे लागत नसल्याने तो आळशी होतो नि त्याच्या महत्त्वाकांक्षेला मरगळ येते. त्याला अन्तःप्रेरणेच्या ( motivation च्या ) उणिवेचा विकार जडतो. एखादे वेळी, त्याच्या प्रज्ञेला अभ्यासात पुरेसा वाव न मिळाल्याने ती भलतीकडे वाहू लागते आणि तो वर्गात टिवल्याबावल्या करू लागतो. तशात त्याला वाईट संगती लागली किंवा त्याच्या घरातले वातावरण दूषित असले तर तो गल्ली-गुंडांचा म्होरक्या बनतो आणि मोठेपणी क्वचित अट्टल गुन्हेगार म्हणून पुढे येतो ! या वैयक्तिक नि सामाजिक दुष्परिणामांचा संभव टाळण्यासाठीही प्रज्ञेच्या जोपासनेचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे.

## साधारण शाळातील जादा कार्यक्रम

व्यक्तिभिन्नता ध्यानांत घेऊन मुलांकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्याचा प्रयत्न व्हावा अशी सर्वच शाळांकडून अपेक्षा असते आणि त्याप्रमाणे चांगल्या शाळात काही कार्य नेहमीच चालू असते. त्या कार्यात साहजिकपणे प्राज्ञांचा समावेश होतो आणि प्रज्ञेच्या जोपासनेची विशिष्ट व्यवस्था केली जाते. उदाहरणार्थ, प्राज्ञ मुलांसाठी गृहपाठात अवघड प्रश्न घालावे, त्यांचा वेगळा गट करून ( शालान्त-परीक्षेपूर्वी ) त्यांना खास शिकवणी ठेवावी, वाचनीय पुस्तकांचे विस्तृत क्षेत्र त्यांना दाखवावे, किंवा वक्तृत्व, पाठान्तर, अभिनय, लेखन इत्यादि अभ्यासेतर उपक्रमात त्यांना मोठ्या प्रमाणावर गुंतवावे अशा तऱ्हेचा कार्यक्रम प्राज्ञांसाठी अनेक शाळांमधून आखलेला असतो. या कार्यक्रमामुळे प्रज्ञेला खाद्य मिळते आणि तिची अधिक वाढ होते, यात शंका नाही. पण हा कार्यक्रम एकंदरीत फार थिटा असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

वेळापत्रकांतील तासांना सामान्य मुलांच्या चालीनेच प्राज्ञांना शिकावे लागते आणि सामन्यांचाच अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण करावा अशी परीक्षेमध्ये अपेक्षा असते. त्यामुळे सर्वसामान्य पातळीच्या वर या जादा कार्यक्रमाची पातळी फारशी जात नाही आणि त्यामुळे प्राज्ञ भूतळ सोडून

लहानसे उड्डाण घेऊ शकले तरी त्यांच्या अंगात जेवढी उभारी असते तेवढी उत्तुंग झेप त्यांना मारता येत नाही. या मुळातच थिट्या असलेल्या कार्यक्रमाला इतर कारणांनीही मर्यादा पडतात. एक तर वर्गातील बहुसंख्य सामान्य विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य असते.— आणि त्या कर्तव्याचा भार त्यांच्यावर एवढा होतो की प्राज्ञांकरिता करावयाच्या विशेष यत्नांसाठी त्यांच्याजवळ वेळ नि शक्ती ही दोन्ही फारशी शिल्लक उरत नाहीत. दुसरे असे की, प्राज्ञांसाठी विशेष प्रयत्न करण्याचा निश्चय शिक्षकांनी केला तरी त्यांच्या हातून प्राज्ञांना उत्तम मार्गदर्शन होण्याचा संभव कमी असतो. सामान्यांना मार्गदर्शन करून करून त्यांच्या दृष्टीला असा घाट आलेला असतो की, प्राज्ञांच्या शक्तीचा आटोप त्यांच्या नीटपणे लक्षात भरत नाही. आणि आटोप लक्षात भरला तरी प्राज्ञांच्या मानसशास्त्राचा अभ्यास त्यांनी केलेला नसल्यामुळे त्या शक्तीचे संगोपन कसकसे करावे हे त्यांना सामान्यतः ठाऊक असत नाही.—मुळातच थिट्या असलेल्या कार्यक्रमाला सर्वसाधारण शाळेत अशा मर्यादा पडतात आणि तेथे प्रज्ञेची परिपूर्ण जोपासना होऊ शकत नाही. त्याकरिता, सर्वसाधारण शाळात हल्ली जे प्रयत्न होतात त्यापेक्षा अधिक प्रभावी प्रयत्नाकडे वळणेच आवश्यक ठरते. जेथे अधिक प्रभावी प्रयत्नांची शक्यता नसेल तेथे हल्लीचे प्रयत्न जरूर चालू ठेवावे; कारण 'अकरणात् मंदकरणं श्रेयः।' पण हल्लीचे प्रयत्न प्रज्ञेच्या वाढीला पुरेसे आहेत, अधिक काही करण्याची आवश्यकता नाही, अशी समजूत करून घेणे वेडेपणाचे होईल.

## इयत्ता ओलांडण्याचा उपाय

प्राज्ञांच्या बुद्धिसामर्थ्याची वाढ ज्या वेगाने होते तो वेग सामान्यांच्या वेगापेक्षा पुष्कळच अधिक असतो. तेव्हा प्राज्ञांच्या बुद्धिसामर्थ्याशी त्यांचा अभ्यासक्रम मिळताजुळता राहावा, म्हणून त्यांना एकदोन इयत्ता गाळण्याची कित्येक वेळा परवानगी दिली जाते. एकाच वेळी दोन इयत्ता गाळण्याची परवानगी देतात असे नव्हे; तर एकंदर शालेय जीवनात, मध्ये दोनतीन वर्षांचे अंतर टाकून, एकदा एक इयत्ता तर दुसऱ्यांदा दुसरी इयत्ता

गाळण्याला परवानगी दिली जाते. इंग्रजीत याला ' ग्रेड स्किपिंग ' म्हणतात नि आपण त्याला ' इयत्ता ओलांडणे ' म्हणू शकू.

हे इयत्ता ओलांडणे इष्ट की अनिष्ट याविषयी तज्ज्ञांमध्ये थोडासा मतभेद आहे; पण सरधोपट इयत्ता ओलांडू देणे अनिष्ट होय असाच निर्वाळा पुष्कळांनी दिला आहे. इयत्ता ओलांडल्यामुळे वेगाने वाढणाऱ्या प्राज्ञांच्या बुद्धीला पुरेसे खाद्य मिळते हे खरे; पण त्यांच्या ज्ञानातील सलगपणाला बाध येण्याचा मोठा धोका असतो. जी इयत्ता गाळली त्या इयत्तेतील अभ्यास बहुधा केला जात नाही आणि मागचे ज्ञान व पुढचे ज्ञान यात एक तऱ्हेची दरी उत्पन्न होते. प्रज्ञेच्या जोरावर इतर विद्यार्थ्यांप्रमाणे प्राज्ञही प्रगती करताना दिसतो, पण ही दरी सहसा बुजत नाही. भविष्यकाळात केव्हा तरी या दरीतच त्याचा पाय फसण्याचा संभव असतो. जर इयत्ता ओलांडण्यापूर्वी त्या इयत्तेचा अभ्यास करून घेतला, त्यासाठी उन्हाळ्याची सुट्टी नि नव्या इयत्तेतील प्रारंभीचे १-२ महिने कारणी लावले, तर ही दरी वेळीच बुजवून घेणे शक्य होईल. मात्र हा धोका असा टाळला तरी इयत्ता ओलांडण्यात आणखी एक मोठा धोका पुष्कळ वेळा संभवनीय असतो. प्राज्ञाला आपण इयत्ता ओलांडू देतो, कारण मूळच्या इयत्तेत बुद्धीच्या दृष्टीने तो चपखल नाही. पण नव्या इयत्तेत बुद्धीच्या दृष्टीने तो चपखल बसला तरी भावनिक दृष्टीने बसेल का? नव्या इयत्तेतील मुले त्याच्यापेक्षा वयाने मोठी असल्यामुळे त्यांची भावनिक वाढ जास्त झालेली असणार. तेव्हा भावनिक दृष्टीने नव्या इयत्तेत तो बहुधा चपखल बसणार नाही, हे उघड आहे. म्हणजे प्रकार असा होतो, की त्याची बौद्धिक अडचण दूर करण्याच्या प्रयत्नांत आपण त्याला भावनिक अडचणीत टाकतो! त्याच्या मनाची निकोप वाढ होण्याच्या दृष्टीने हे अत्यंत अनिष्ट होय. काही प्राज्ञ मुलांची भावनिक नि शारीरिक वाढ सरासरीपेक्षा काहीशी अधिक वेगाने होते; आणि कांही प्राज्ञ मुले एक-दोन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मुलांशी सहज जमवून घेऊ शकतात. अशा प्राज्ञ मुलांना इयत्ता ओलांडल्याने त्रास होण्याचा संभव नसतो. पण अशी अपवादात्मक प्राज्ञ मुले सोडल्यास इतरांना त्रासच होतो. म्हणून इयत्ता ओलांडू देण्यापूर्वी मुलाचे बुद्धिसामर्थ्यच न बघता त्याची भावनिक नि शारीरिक वाढ, त्याची मोठ्या मुलांशी

जमवून घेण्याची कुवत इत्यादि गोष्टीही लक्षात घ्याव्या लागतात. सारांश, सर्वच प्राज्ञ मुलांना इयत्ता ओलांडू देणे एकंदरीत अनिष्ट होय; पण विशिष्ट स्वभावधर्मांच्या कांही प्राज्ञ मुलांना, गाळलेल्या इयत्तेतील अभ्यास पुरा करण्याची दक्षता घेऊन, इयत्ता ओलांडू देणे हिताचे होईल अर्थात् हा उपाय फार थोड्या प्राज्ञ मुलांच्या बाबतींत लागू पडत असल्याने प्राज्ञांचा व्यापक प्रश्न त्यामुळे सुटू शकत नाही, हे स्पष्ट आहे.

## गुणांनुसार तुकड्या

आपल्याकडे काही मोठ्या शाळातून वार्षिक परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारे तुकड्या पाडण्याची पद्धती आहे. या पद्धतीप्रमाणे जास्त गुण मिळवणारी मुले ‘अ’ तुकडीत, त्याहून कमी गुण मिळवणारी मुले ‘ब’ तुकडीत, त्याहून कमी गुण मिळवणारी मुले ‘क’ तुकडीत, अशी उतरत्या क्रमाने मुलांची वाटणी होते. प्राज्ञ मुलांना सगळ्या बौद्धिक किंवा ॲकॅडेमिक विषयात भरपूर गुण मिळण्याची शक्यता असल्याने त्यांची गुणसंख्या साहजिकच जास्त भरते आणि बहुतेक सर्व प्राज्ञ मुले अ तुकडीत गोळा होतात. मग ही तुकडी नेमलेल्या अभ्यासक्रमातील सर्वांत जास्त भाग पूर्ण करू शकते आणि जो भाग पूर्ण केला त्यात अधिक खोलात नि अधिक तपशिलातही शिरू शकते. यामुळे प्रज्ञेच्या वाढीची काही सोय होते, हे उघडच आहे.

पण या पद्धतीचे सामर्थ्य नि दौर्बल्य कुठे कुठे आहे ते आणखी जाणून घेतले पाहिजे. सर्वसाधारण शाळेत प्राज्ञांसाठी वेळापत्रकाबाहेर जो कार्यक्रम आखता येतो त्याचा यापूर्वी उल्लेख केला आहे आणि त्यात खास शिकवणी, अवांतर वाचन, अभ्यासेतर उपक्रमातील विशेष भाग इत्यादि गोष्टी सांगितल्या आहेत. एकूण गुणांवरून तुकड्या पाडल्या आणि अ तुकडीला वेळापत्रकांतील अभ्यासाबरोबर हा वेळापत्रकाबाहेरील कार्यक्रमही दिला तर ‘ अधिकस्य अधिकं फलं ’ प्राप्त होईल. शालेय प्रशासनाच्या दृष्टीने तसे करण्यात काही अडचणही नाही. पण असे दुहेरी प्रयत्न करूनही त्या प्रयत्नात काही उणिवा नि धोके उरतातच. अ तुकडीत बहुतेक सर्व प्राज्ञ मुले गोळा झाली तरी अ तुकडीतील सर्वच मुले प्राज्ञ असत नाहीत. प्राज्ञांच्या जोडीला प्राज्ञांच्या थोडी खालची पण साधारणपणे हुषार अशी

मुलेही अ तुकडीत येऊ शकतात. ज्या शाळेत एकेका इयत्तेच्या सातसात, आठआठ तुकड्या असतील त्या शाळेत प्राज्ञांची संख्याही बरीच असणार. त्यामुळे, एवढ्या मोठ्या शाळेत अ तुकडीमध्ये प्राज्ञच बहुसंख्य असू शकतील. पण चारपांच तुकड्यांच्या इयत्ता ज्या शाळेत असतील त्या शाळेत अ तुकडीतही प्राज्ञ अल्पसंख्यच राहतील. तेव्हा, अ तुकडीचा अभ्यास केवळ प्राज्ञांच्याच चालीने चालणार नाही, तिची चाल थोडीफार मंदच राहील, हे क्रमप्राप्तच आहे. दुसरे असे, की तुकड्या गुणांनुसार पाडल्या तरी या शाळांमधून सर्व तुकड्यांना अभ्यासक्रम नि परीक्षा एकच असतात. तेव्हा अ तुकडीने तो अभ्यासक्रम जरी सर्वच्या सर्व संपवला, त्यात जरी खोलपर्यंत नि तपशिलात शिरून अवगाहन केले तरी अ तुकडीतील बहुतेक विद्यार्थ्यांच्या नि विशेषतः प्राज्ञ विद्यार्थ्यांच्या बुद्धीला त्यांत पुरेपूर आव्हान मिळणार नाही. गुणांनुसार तुकड्या पाडल्या की विद्यार्थ्यांचे भावजीवन किंचित दूषित होऊन शाळेच्या कारभारात करबुरी उत्पन्न होण्याचीही अंधुक शक्यता असते. अ तुकडीतील मुले अभ्यासात नेहमी आघाडीवर राहतात नि बरीचशी बक्षिसे पटकावतात, त्यामुळे त्यांना ‘ ग ’ ची बाधा होऊ शकते आणि अभ्यासात मागे पडणारी मुले त्यांचा थोडाफार मत्सर करू लागतात. मुलांमध्ये असे द्वैत निर्माण झाले की एकोप्याच्या भावनेने शाळेत कामे होत नाहीत आणि भांडणे सोडवीत बसण्याची पाळी येते. शाळा फारच मोठी असली तर असा प्रकार विशेषेकरून होत नाही; पण शाळा तीन-चार तुकड्यांच्या इयत्तांचीच असली तर असा प्रकार होणे असंभवनीय नसते. निरनिराळ्या तुकड्यांतील मुलांना अभ्यासेतर उपक्रमात एकत्र आणून नि इतर उपाय योजून हा प्रकार टाळता येतो; पण तो होऊ शकतो हे लक्षात घ्यावे लागते. गुणांनुसार तुकड्या पाडण्याच्या पद्धती-विषयी एकंदरीने असे म्हणता येईल, की तीमध्ये प्राज्ञांचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागतो, पण ती पद्धती प्रश्नाची संपूर्ण उकल होण्याच्या दृष्टीने अपुरीच पडते.

### विषयवार एकजिनसी वर्ग

व्यक्तिभिन्नतेची नि म्हणून प्राज्ञांच्या प्रश्नाची थोडीफार दखल घेणाऱ्या

नि भारतीय शाळातून प्रचलित असणाऱ्या काही मार्गांचा येथवर विचार केला. यानंतर, ‘ ॲबिलिटी ग्रुपिंग ’ या नावाने अमेरिकेत प्रचलित असलेल्या वर्गसंघटनेचा अथवा ‘ विषयवार एकजिनसी वर्गां ’चा विचार करणे योग्य होईल. विषयवार एकजिनसी वर्ग अमेरिकेत पुष्कळ शाळांतून बरीच वर्षे चालू आहेत आणि डॉ. जे. बी. कोनंट यांनी आपल्या सुप्रसिद्ध रिपोर्टात त्याचा पुरस्कारही केला आहे. एकूण गुणांनुसार तुकड्या पाडण्याची आपली जी पद्धति आहे तीमध्ये आणि या वर्गांमध्ये महत्त्वाचा फरक असा आहे, की एकूण गुणांनुसार बनलेल्या तुकड्या सर्व विषयांसाठी कायम राहतात पण हे वर्ग प्रत्येक विषयातील गुण वगैरे लक्षात घेऊन प्रत्येक विषयासाठी पाडलेले असल्याने विषयागणिक बदलतात. बहुतेक बौद्धिक विषयातील प्रगती पुष्कळ अंगाने ‘ जनरल इंटेलिजन्स ’वर किंवा ‘ सर्वसाधारण बुद्धिमत्ते ’वर अवलंबून असते. त्यामुळे जो विद्यार्थी एका विषयात चांगला असतो तो इतर विषयातही साधारणतः चांगला असतो; पण हा नियम ढोबळपणे खरा असला तरी सूक्ष्मपणे खरा नाही. एकाच विद्यार्थ्यांची निरनिराळ्या विषयातील गती निरनिराळी असते, असे मनोमापनानंतर सिद्ध झालेले आहे. विषयवार एकजिनसी वर्गांमध्ये या गोष्टीची दखल घेतली जाते आणि मुलाची विशिष्ट विषयातील प्रत्यक्ष प्रगती, त्याची त्या विषयातील नैसर्गिक बुद्धी वगैरेचा विचार होऊन त्याचा त्या विषया-पुरता वर्ग ठरतो. म्हणजे एखादा मुलगा इंग्रजी विषयाच्या अ तुकडीत जाईल तर गणिताच्या ड तुकडीत जाईल. वर्गरचनेच्या या पद्धतीमुळे दर तासाला मुलांना वर्ग बदलावे लागतात, वेळापत्रक करणे गुंतागुतीचे होते आणि शाळेत शिक्षकांची संख्या किंवा खोल्यांची संख्या जास्त लागते. पण केवळ एकूण गुण बघून कायमच्या तुकड्या न पाडता, विषयवार गुण वगैरे बघून विषयाबरोबर बदलणारे वर्ग पाडल्याने वर्ग अधिक एकजिनसी होतात. एकजिनसी वर्गात अध्ययन सुलभ होते, दोहोंची गती वाढते, हे विवरून सागण्याची गरज नाही. अशा वर्गरचनेमध्ये प्राज्ञ आपल्या निसर्गदत्त प्रज्ञेच्या बळावर बौद्धिक विषयापुरते तरी अत्युच्च वर्गात प्रवेश मिळवतात, हे स्वाभाविक होय. त्या वर्गात पुष्कळसे प्राज्ञच गोळा होतात आणि एकुण गुणांनुसार पाडलेल्या तुकड्यांपेक्षा अशा वर्गात प्राज्ञांचे सापेक्ष प्रमाण

आपोआपच वाढते. अर्थात त्याच्या शिक्षणाची विशेष सोय करण्याची जास्त शक्यता उत्पन्न होते हे स्पष्ट आहे.

अभ्यासक्रम तीन पातळ्यांवर आखणे हे ' ॲबिलिटी ग्रुपिंग 'चे अथवा ' विषयवार एकजिन्सी वर्गा 'चे एक अंगच मानले गेले आहे. दर विषयाच्या अभ्यासक्रमात उच्च, मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन परी असतात आणि विद्यार्थ्यांची कुवत बघून त्याला अनुकूल त्या परीचा स्वीकार करण्यास सुचविले जाते. यामुळे सामान्य विद्यार्थ्यांची तर सोय होतेच; पण सामान्यांच्या जे खाली किंवा वर असतात त्यांचीही कुचंबाण होत नाही. प्राज्ञ विद्यार्थी बौद्धिक विषयांचा उच्च अभ्यासक्रम घेऊ शकतात आणि त्यांची अभ्यासक्रमाबाबत होणारी अडचण जवळजवळ संपुष्टात येते. मात्र ' उच्च ' अभ्यासक्रम खास प्राज्ञांच्यासाठी आखलेला नसतो, तर सामान्य विद्यार्थ्यांच्या वरचे जे साधारण हुषार विद्यार्थी असतात. त्यांच्यासाठी आखलेला असतो. वर्गातील इतर हुषार विद्यार्थ्यांबरोबर प्राज्ञ तो अभ्यासक्रम पुरा करीत असतात. त्यामुळे त्यांच्या बुद्धीला त्यात ' बरे ' आव्हान मिळाले तरी ' पुरेपूर ' आव्हान मिळते, असे म्हणता येत नाही. एकूण गुणांवर पाडलेल्या तुकड्यांमुळे जे आव्हान मिळते त्यापेक्षा हे आव्हान अधिक मोठे नि म्हणून अधिक बरे, एवढाच लाभ होय. गुणांनुसार पाडलेल्या तुकड्यांत प्राज्ञ नि त्यांचे सवंगडी अ तुकडीमध्ये कायमचे राहतात नि त्यांना ' ग 'ची बाधा होऊ शकते. हे वर आपण बघितले. विषयवार एक-जिनसी वर्गरचनेत एकच तुकडी कायम राहत नाही, विषयाप्रमाणे वर्ग बदलतात नि काही विषयांना वरच्या वर्गात तर काहींना खालच्या वर्गात अशी विद्यार्थ्यांची स्थिती होते. त्यामुळे ' ग 'च्या बाधेचा संभव आपोआपच टळतो. अशा वर्गरचनेचा हा आणखी एक लाभ होय. अशा वर्गरचनेमध्ये विद्यार्थ्यांना वर्ग सारखे बदलावे लागल्याने त्यांच्यात संघभावनेची जोपासना फारशी करता येत नाही, हे येथेच सांगितले पाहिजे. एका ' होमरूम '-मधले अथवा ' कुटुंबा 'मधले २०–२५ विद्यार्थी सतत दोन तीन वर्षे विचारपूस, हजेरी इत्यादि कामासाठी रोज १०–१५ मिनिटे एकत्र यावे अशी व्यवस्था या वर्गरचनेच्या बरोबर केलेली असते. पण ती व्यवस्था अखेर तोटकीच ठरते.

विषयवार एकजिनसी वर्गांमुळे ( नि त्यातील तीन पातळ्यांवरील अभ्यासक्रमामुळे ) प्राज्ञांची बऱ्यापैकी सोय होते, हे आताच आपण बघितले. अशा वर्गात व्यक्तिभिन्नतेची पुष्कळच दखल घेतली जात असल्याने ते इतर विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त ठरतात. प्रत्येक विषयासाठी वेगळे वर्ग पाडल्याने वर्गपालटीचा व्याप वाढतो, वेळापत्रक गुंतागुंतीचे होते वगैरे गोष्टी खऱ्या आहेत; पण प्रत्येक विषयाऐवजी संबद्ध विषयांचे गट पाडून त्या विषयगटांसाठी वर्ग पाडले तर त्या अडचणी दूर होऊ शकतील. विषयगटांसाठी पाडलेले वर्ग बराच वेळ कायम राहात असल्याने मुलांत संघभावना जोपासण्यासंबंधीची अडचणही कमी होईल. तेंव्हा विषयवार एकजिनसी वर्गांचा प्रयोग भारतातील मोठ्या शाळांनी अवश्य करून बघावा, असे माझे वैयक्तिक मत आहे. या प्रयोगात वेळापत्रकाबाहेरील कार्यक्रमाची जोड प्राज्ञांच्या शिक्षणाला सहज देता येईल. आणि प्रज्ञेच्या जोपासनेचा प्रश्न पुष्कळ पुढे सरकेल ( ' रिपोर्ट ऑफ दि वर्कशॉप ऑन् ॲबिलिटी ग्रुपिंग ' ही डिपार्टमेंट ऑफ् एक्स्टेन्शन सर्व्हिसेस, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे २, यांनी प्रसिद्धिलेली पुस्तिका या संदर्भात पाहण्यासारखी आहे. )

## वेगवर्धन

प्राज्ञांना उपयुक्त असा, शिक्षणक्रमाची गति वाढविणारा, ' ॲक्सलरेशन ' अथवा ' वेगवर्धन ' नावाचा कार्यक्रम अमेरिकेत ठिकठिकाणी निरनिराळ्या स्वरूपात सुरू असतो. ' ग्रेड स्किपिंग ' किंवा ' इयत्ता ओलांडणे ' आणि प्रस्तुत कार्यक्रम यात मुख्य भेद हा असतो, की इयत्ता ओलांडण्यात ज्ञानशृंखलेतील काही दुवे हरवण्याचा संभव असतो; पण या कार्यक्रमात शिकण्याचा वेग वाढवूनहि तो संभव टाळला जातो. ह्या कार्यक्रमानुसार, काही ठिकाणी, प्राज्ञ नि हुशार मुलांची भावनिक, सामाजिक नि शारीरिक वाढ उफाड्याची आहे अशी खात्री करून घेऊन त्यांना प्राथमिक शाळेत १–२ वर्षे आधी प्रवेश देतात. त्यामुळे आपणापेक्षा १–२ वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मुलांमध्ये ती मिसळतात नि त्यांच्या बरोबर उत्तीर्ण होत होत १–२ वर्षे आधी शिक्षण पूर्ण करतात. कांही ठिकाणी ' अनग्रेडेड ' म्हणजे ' इयत्ताविहीन ' प्राथमिक शाळा असतात. अशा शाळात प्रत्येक मूल

आपापल्या गतीने पुढे जाते आणि त्याने प्राथमिक तीन इयत्तांचा अभ्यास पुरा केला की त्याला सरळ चौथीत घेतले जाते. पहिल्या तीन इयत्तांचा अभ्यास प्राज्ञ मुले दीड–दोन वर्षांत संपवू शकत असल्याने त्यांचे दीड एक वर्ष त्यामुळे वाचते. काही ठिकाणी सीनियर हायस्कूलमध्ये प्राज्ञांचे वेगळे वर्ग बनवतात आणि त्यांना ( इयत्ता ७, ८, ९ चा ) तीन वर्षांचा अभ्यास-क्रम दोन वर्षांत संपविण्याची सोय करून देतात. या सोयीने प्राज्ञांची गती एका वर्षाने वाढते. काही ठिकाणी सीनियर हायस्कूलमध्ये इतर मुलांपेक्षा वरच्या दर्जाचे आणि जास्त अभ्यासक्रम प्राज्ञ मुले निवडू शकतात आणि 'हायस्कूल ग्रॅज्युएशन'ला अथवा माध्यमिक–शालान्त–परीक्षेला लागणारे 'पॉइंट्स' लौकर पूर्ण करून त्या परीक्षेचे प्रमाणपत्र लौकर मिळवू शकतात. अशा ठिकाणच्या शाळांतून आपल्यासारख्या तुकड्या नसतात, विषयवार एकजिनसी वर्गांची पद्धती असते, आणि तीन किंवा कमी पातळ्यांवर पन्नास एक अभ्यासक्रम शिकविण्याची सोय असते. त्यामुळे प्राज्ञ विद्यार्थी जास्त वेळ खर्चून जास्त अभ्यासक्रम पुरे करू शकतात आणि शालान्त परीक्षेची पॉइंट्सवर मोजली जाणारी पातळी वेगाने गाठू शकतात. काही ठिकाणी अशाच सीनियर हायस्कूल्समधून महाविद्यालयातील काही अभ्यासक्रम अंशतः शिकविण्याची ए. पी. पी. किंवा ॲडव्हान्स प्लेसमेंट प्रोग्रॅम नावाची सोय असते. माध्यमिक शाळेचा काही विषयांचा अभ्यासक्रम संपवून या सोयीचा लाभ प्राज्ञ विद्यार्थी घेतात आणि परीक्षेत त्यांना पुरेसे गुण मिळाले तर महाविद्यालयांत त्यांच्या खात्याला तेवढे 'क्रेडिट' जमा होते. म्हणजे महाविद्यालयात जेवढा अभ्यास संपावयाचा असतो त्यातला काही अभ्यास त्यांनी आधीच संपविल्यामुळे उरलेला अभ्यास महाविद्यालयात गेल्यावर कमी वेळात त्यांना संपविता येतो. वेगवर्धनाची ही जी विविध स्वरूपे असतात. त्यांपैकी एकाचाच लाभ प्राज्ञाला मिळतो असे नाही, किंवा सर्वांचाच मिळतो असेही नाही. जेथे जेवढ्या सोयी असतील त्या मानाने नि स्वतःला झेपेल तेवढ्या गतीने तो पुढे जात असतो. अमेरिकेतील वेग-वर्धनाचा हा कार्यक्रम भारतात कितपत अमलात आणता येईल, याचा आपणांला विचार केला पाहिजे.

ह्या कार्यक्रमाला परिस्थितीची जी अनुकूलता हवी ती भारतात जवळ-

जवळ नाही म्हटले तरी चालेल. आपल्याकडे इयत्ताविहीन प्राथमिक शाळा नाहीत, त्यामुळे प्राज्ञांचा वेग प्राथमिक शाळेत वाढविता येणार नाही. आपल्याकडे उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक शाळात प्राज्ञांचे स्वतंत्र वर्ग नाहीत, त्यामुळे त्या वर्गांचा अभ्यासक्रम एखाद्या वर्षाने कमी करणे जमणार नाही.—आणि आपल्याकडे विषयवार एकजिनसी वर्ग पाडलेल्या, पुष्कळ अभ्यासक्रम शिकविणाऱ्या, नि पॉइंट-सिस्टमवर मुलांची प्रगती मोजणाऱ्या माध्यमिक शाळा नाहीत, म्हणून प्राज्ञ मुलांना उच्च नि अधिक अभ्यासक्रम निवडून लौकर शालान्त-परीक्षेला बसणेही शक्य होणार नाही. शिवाय, शाळात ए. पी. पी. प्रोग्रॅम आपल्याकडे नाही, शाळेतील उच्च अभ्यासाला महाविद्यालये श्रेय देत नाहीत, म्हणून महाविद्यालयीन शिक्षणाचा काळ देखील प्राज्ञांना कमी करता येणार नाही. सद्यःस्थितीत फक्त खाजगी प्राथमिक शाळांमध्ये प्राज्ञ मुलांना लौकर प्रवेश देता येईल आणि त्यांचा वेग एक-दीड वर्षाने वाढविता येईल. पण असा प्रवेश देताना प्राज्ञांची भावनिक, सामाजिक नि शारीरिक वाढ उफाड्याची आहे याची खात्री करून घ्यावी लागते. त्यासाठी शारीरिक वाढीची परीक्षा करणे आपल्याकडे शक्य झाले तरी मनोमापनाचे विश्वसनीय मानदंड आपल्याकडे तयार झालेले नसल्याने भावनिक नि सामाजिक वाढीची परीक्षा घेणे आपणाला अशक्यप्राय होईल. म्हणजे प्राज्ञांना प्राथमिक शाळेत शास्त्रशुद्ध रीतीने लौकर प्रविष्ट करण्यातसुद्धा आपणाला अडचणीच येतील. प्रतिकूल परिस्थितीमुळे प्राज्ञांच्या ( नि इतर हुषार मुलांच्या ) वेगवर्धनाचे सर्व मार्ग असे बंद झालेले असताना आपणापुढे एकच मार्ग उरतो.— तो म्हणजे परिस्थितीच बदलणे !

### वेगवर्धनाची इष्टानिष्टता

परिस्थितींत बदल करण्याचा विचार करण्यापूर्वी वेगवर्धनाच्या इष्टानिष्टतेसंबंधी एक-दोन गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत. मागे गुणांनुसार पाडलेल्या तुकड्यांचा किंवा विषयवार पाडलेल्या एकजिनसी वर्गांचा आपण विचार केला आणि तशा तुकड्यांना किंवा वर्गांना वेळापत्रकाबाहेरील कार्यक्रमाची कशी जोड देता येते तेही आपण बघितले. त्यामुळे प्रज्ञेच्या वाढीसाठी जादा पौष्टिक अन्न देण्याची थोडीफार सोय करता येते हे खरे;

पण वयाची सोळा-सतरा वर्षे पूर्ण होईतो महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या उंबरठ्याबाहेर प्राज्ञ मुलांना जे तिष्ठत राहावे लागते ते त्यामुळे टाळता येत नाही हेही खरे. वास्तविक पाहता, १३० बुद्ध्यंक असणाऱ्या अगदी खालच्या पायरीच्या प्राज्ञ मुलालाही वयाच्या १४ व्या वर्षी १८ व्या वर्षाचे बुद्धिसामर्थ्य आलेले असते. त्यामुळे १४ व्या किंवा १५ व्या वर्षीच प्राज्ञ मुले महाविद्यालयीन अभ्यासाला हात घालण्याइतकी परिपक्व झालेली असतात. तेव्हा, आधीचाच अभ्यास घोटीत, किंवा त्यातील तपशील घोकीत, किंवा त्या अभ्यासाचा विस्तार करीत, किंवा माशा मारीत, त्यांना ३–४ वर्षे बसायला लावणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या प्रज्ञेचा तो अपव्यय होईल आणि त्यात समाजाचेही नुकसान होईल. त्यासाठी वेगवर्धनाच्या कार्यक्रमाची नितान्त आवश्यकता आहे. सध्याच्या जटिल नि तंत्रनिष्ठ समाजव्यवस्थेत कित्येक व्यवसायांचे ज्ञान पैदा करता करता वयाचे २५ वे किंवा ३० वे वर्ष उजाडते! स्थापत्यविशारद किंवा शल्यकर्म-विशारद उपजीविकेला जेव्हा प्रारंभ करतात तेव्हा त्यांचे तिसऱ्या हिश्श्याहून अधिक आयुष्य उलटून गेलेले असते. तेव्हा ही स्थिती दूर करण्यासाठीही शिक्षणाचा वेग वाढवणे जरूरीचे आहे. अमेरिकेत किंवा इतर पाश्चात्त्य देशात सामान्य जनतेमध्ये वेगवर्धनासंबंधी काही प्रतिकूल भावना आहे; पण तज्ज्ञ संशोधकांनी वेगवर्धनाला सर्वसाधारणपणे पाठिंबाच दर्शविला आहे. वेगवर्धनाच्या कार्यक्रमातून वर आलेल्या विद्यार्थ्यांच्या तपासणीत अनेक संशोधकांना असे आढळले, की ते विद्यार्थी समाजिक प्रतिष्ठा, भावनिक सुस्थिती, शरीरप्रकृती, ज्ञानसंपत्ती इत्यादि हरएक बाबतीत उणे तर पडत नाहीतच, पण बहुधा सरसच ठरतात. डॉ. जेम्स गॅलाघर यांनी यासंबंधीच्या संशोधनाचे संकलन Analiysis of Research on the Education of Gifted Children या पुस्तकात केलेले आहे. तेव्हा, वेगवर्धन आवश्यक असल्याने नित्याचे परिणाम अनिष्ट होत नसल्याने त्याला वाव मिळण्यासाठी परिस्थितीत बदल केला पाहिजे, यात शंका नाही.

**प्राज्ञ-वर्ग**

अमेरिकेतील परिस्थिती जशीच्या तशी आपल्याकडे आणणे अव्यवहार्य ठरेल आणि कदाचित घातकही ठरेल. पण प्राज्ञांच्या शिक्षणाची चांगली

नि वेगवान सोय करण्याकरिता मोठ्या शाळातून ‘प्राज्ञ-वर्ग’ आणि दर जिल्ह्यात एखादे ‘प्राज्ञ-विद्यालय’ आपण जरूर काढले पाहिजे. दर शंभर मुलांमागे प्राज्ञांची संख्या फक्त ३ ते ८ असल्यामुळे प्राज्ञांचा कमीत कमी तिसांचा एक वर्ग काढावयाचा तर त्या इयत्तेत एकंदर ४०० ते १००० विद्यार्थी असले पाहिजेत! वरच्या वरच्या इयत्तांत प्राज्ञांचे प्रमाण जास्त पडत असल्यामुळे प्राज्ञांचा एक वर्ग निघण्यास त्या इयत्तातून २०० ते ६०० विद्यार्थी पुरतील. पण एवढे विद्यार्थी अगदी मोठ्या शाळातूनहि एकेका इयत्तेत क्वचितच आढळतात. तेव्हा धोरण असे ठेवले पाहिजे की प्राज्ञ-वर्ग एखाद्या मोठ्या शाळेत निघाला तरी त्यात केवळ त्या शाळेतील मुलांतूनच भरती करावयाची नाही; तर आससंतातील सर्वच शाळांमधून भरती करावयाची. मोठ्या शहरातून ही गोष्ट शक्य होईल आणि दर दहा शाळांमागे एक मोठी शाळा प्राज्ञांचा वर्ग सर्व इयत्तातून चालवू शकेल. प्राज्ञ-वर्गातून फक्त प्राज्ञांनाच प्रवेश द्यावयाचा असल्याने प्रवेश देण्यापूर्वी सर्व मुलांना बौद्धिक कसोटी लावली पाहिजे आणि ज्यांचा बुद्ध्यंक कमीत कमी १२५ भरेल त्यांची निवड केली पाहिजे. प्राथमिक नि माध्यमिक अशा दोन्ही प्रकारच्या शाळातून हे वर्ग निघावे आणि त्यात ४ वर्षांचा प्राथमिक अभ्यासक्रम ३ वर्षात व ७ वर्षांचा माध्यमिक अभ्यासक्रम ६ वर्षात संपविण्याची योजना करावी. सर्वसामान्य अभ्यासक्रमच तूर्त या वर्गातून शिकविला जावा, पण अध्यापनाची दृष्टी अशी असावी, की विद्यार्थी विषयावर संपूर्ण प्रभुत्व मिळवितील, मूलतत्त्वांचा ठाव घेतील आणि संपादित ज्ञानाचे उपयोजन करतील. सर्वसामान्य अभ्यासक्रम स्वीकारण्याचे कारण हे की वेगळा अभ्यासक्रम आखणे नि शिकविणे यांमध्ये मोठ्या शाळांना जोडलेल्या प्राज्ञ-वर्गांना अनेक अडचणी येतील. वेळापत्रकातील या अभ्यासक्रमाला वेळापत्रकाबाहेरील उपक्रमांची जोड अवश्य दिली पाहिजे आणि मुलांचे मन सुसंस्कारांनी संपन्न बनेल अशी काळजी घेतली पाहिजे. अवांतर वाचन, हरतऱ्हेची नवनिर्मिती, संघटन आणि नेतृत्व, नानाविध निरीक्षण, वक्तृत्व, इत्यादि गोष्टींवर या उपक्रमात भर दिला जावा. प्राज्ञांचे वर्ग अशा रीतीने चालले तर ११ वर्षांचा अभ्यास ९ वर्षातच ते संपवितील आणि त्यांच्या प्रज्ञेला चांगल्यापैकी कस लागेल. वेगळ्या वर्गात त्यांच्यावर स्वतंत्रपणे लक्षही

ठेवता येईल आणि त्यांच्या सर्वांगीण वाढीची हमी मिळेल. वेगळ्या वर्गात प्राज्ञ एकत्र आल्याने व बौद्धिक क्षेत्रात ते आघाडीवर राहणार हे साहजिक असल्याने त्यांच्यात अहंभाव उत्पन्न होण्याचा नि उच्चभ्रू वर्गीय भावना वाढण्याचा संभव आहे. इतर मुले त्यांचा हेवा किंवा मत्सर करू लागतील अशीही शक्यता आहे. तेव्हा बौद्धिक विषयांखेरीज इतर विषयात त्यांना जर बाकीच्या मुलांमध्ये मिसळून टाकता आले तर बरं होईल. थोडीशी कल्पकता नि संघटनाचातुर्य वापरल्यास ते अवघड जाऊ नये, अशी अपेक्षा आहे.

## प्राज्ञांसाठी प्राज्ञ शिक्षक

प्राज्ञ-वर्गांना शिकविण्याचे सगळेच्या सगळे काम सर्वसाधारण शिक्षकाकडे न देता बौद्धिक विषयापुरते तरी ते अत्युत्कृष्ट शिक्षकांकडेच दिले पाहिजे. सर्वसाधारण शिक्षक प्राज्ञांना शिकविण्याच्या कामी पुरे पडत नाहीत हे शिक्षकवर्गाविषयी पूर्ण सहानुभूती नि आदर मनात ठेवूनही सांगावयास हवे. सर्वसाधारण शिक्षकांच्या दृष्टीला सामान्य विद्यार्थ्यांना शिकवून शिकवून विशिष्ट घाट आलेला असतो किंवा प्राज्ञांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळालेली नसते, याचा उल्लेख मागे केलेला आहे. पण सर्वसाधारण शिक्षकांमध्ये याहीपेक्षा एक गंभीर कमतरता असते. ती कमतरता म्हणजे झळाळणारी बुद्धिमत्ता निसर्गाने त्यांना दिलेली नसते आणि उत्कृष्ट व्यासंग त्यांनी केलेला नसतो. सध्याच्या शिक्षकवर्गात अत्यंत बुद्धिमान नि अत्यंत व्यासंगी अशी काही माणसे नक्कीच आहेत. पण शिक्षकांना जे वेतन सध्या दिले जाते, त्यांना समाजात सध्या जी प्रतिष्ठा लाभते, आणि शिक्षणक्षेत्रात ध्येयवादित्वाची सध्या जी पातळी आहे, त्यांचा संकलित परिणाम होऊन शिक्षकी पेशात सुमारबुद्धीची नि उथळ व्यासंगाची माणसेच बहुसंख्येने भरती होतात. त्यामुळे सर्वसाधारण शिक्षक प्राज्ञ विद्यार्थ्यांना शिकवू शकतील, असे मानणे म्हणजे विजेला पणती वाट दाखवील असे मानण्यासारखे आहे. फार तर प्राथमिक शाळेतील प्राज्ञ विद्यार्थ्यांना सर्वसाधारण शिक्षक बऱ्या रीतीने शिकवू शकतील; कारण त्या वयात प्राज्ञ विद्यार्थ्यांचे बुद्धि-सामर्थ्य पूर्णपणे विकसित झालेले नसते आणि शिक्षकांचे झालेले असते. पण माध्यमिक शाळेत सर्वसाधारण शिक्षकांकडून प्राज्ञ विद्यार्थ्यांना चांगले

शिक्षण मिळेल अशी अपेक्षा करणे चूक ठरेल. हे प्राज्ञ विद्यार्थी वर्गात असे प्रश्न विचारतात की सामान्य शिक्षकांना त्यांची उत्तरे देता येऊ नयेत. भूमितीतील किंवा बीजगणितातील उदाहरणांच्या अशा रीती सादर करतात की सामन्य शिक्षकांनी विस्मयमूढ व्हावे. वाङ्मयाच्या तासांना अशा सुंदर कविकल्पना फुलवतात, अशा झोकदार शैलीत एखाद्या वेळी लिहितात की सामान्य शिक्षक त्यापुढे फिके पडावे. अशा स्थितीत, प्राज्ञ वर्गावर बौद्धिक विषयांसाठी प्रज्ञावंत नि व्यासंगी शिक्षकच नेमले पाहिजेत, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. प्रज्ञेच्या नि व्यासंगाच्या जोडीला या शिक्षकांपाशी प्राज्ञांच्या मानसशास्त्राचे ज्ञान असेल तर दुधात साखरच पडेल. प्राज्ञांसाठी वेगळे शिक्षक असावेत हे म्हणणे प्राज्ञ-वर्गापुरतेच मर्यादित नाही. प्राज्ञ ज्या ज्या योजनांखाली शिक्षणासाठी एकत्र आणले जातात त्या त्या योजनांमध्ये प्राज्ञांसाठी वेगळे शिक्षक नेमण्याची सोय हवी. या दृष्टीने, गुणानुसार तुकड्या पाडल्या तर अ तुकड्यांना, आणि विषयवार एकजिनसी वर्ग केले तर वरच्या वर्गांना, वेगळे उत्कृष्ट शिक्षक नेमण्याकडे लक्ष दिले पाहिजे. असे झाले तरच त्या योजनांचा पुरेपूर फायदा पदरात पडेल.

### प्राज्ञ-विद्यालये

प्राज्ञ-वर्गापेक्षा प्राज्ञ-विद्यालयांनी पाच पावले पुढे जावे अशी अपेक्षा आहे. प्राज्ञ-वर्ग फक्त मोठ्या शहरातूनच शक्य होतील. ज्या गावात प्राथमिक शाळांमध्ये ( म्हणजे पहिल्या चार इयत्तांमध्ये ) ५००० पेक्षा कमी विद्यार्थी असतील त्या गावात प्राथमिक प्राज्ञ-वर्ग उघडणे प्राज्ञांच्या पुरेशा संख्येच्या-अभावी अशक्य ठरेल. आणि ज्या गावात माध्यमिक शाळांमध्ये ( म्हणजे पाचवी ते अकरावीपर्यंत ) ६००० ते ८००० पेक्षा कमी विद्यार्थी असतील त्या गावात माध्यमिक प्राज्ञ-वर्ग काढणें शक्तीच्या बाहेर जाईल. प्राज्ञांच्या भरतीचे क्षेत्र विस्तृत राहणार असल्याने मोठ्या शहरातूनही दूर अंतरामुळे नि वाहतुकीच्या गैरसोयीमुळे अनेक प्राज्ञांना मोठ्या शाळांतील प्राज्ञ-वर्गांचा लाभ घेता येणार नाही. प्राज्ञ-वर्गाच्या योजनेतील ही उणीव प्राज्ञ-विद्यालयांमध्ये दूर झाली पाहिजे. त्यासाठी दरेक जिल्ह्यात निदान एका मध्यवर्ती ठिकाणी प्राज्ञ-विद्यालय निघावे आणि त्यांत वसतिगृहाची सोय असावी. किंबहुना तेथे सर्वच विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची सक्ती व्हावी.

ही वसतिगृहे सर्वांना मोफत ठेवण्याची जरूरी नाही; पण गरिबीच्या प्रमाणात तेथील राहण्या-जेवण्याचा खर्च माफ झाला पाहिजे. असे केल्याने जिल्ह्यातील कोठल्याही ठिकणचा प्राज्ञ विद्यार्थी प्राज्ञ-विद्यालयाचा लाभ घेऊ शकेल आणि शिक्षणाची सोय नसल्याने अनेकांच्या प्रज्ञेचा जो अपव्यय होतो तो टळेल. अगदी लहान मुलांना आईवडिलांपासून दूर ठेवणे अडचणीचे नि अनिष्ट असल्यामुळे या मध्यवर्ती प्राज्ञ-विद्यालयात प्राथमिक शिक्षणाची सोय करू नये. १२५ हून अधिक बुद्ध्यंक असणाऱ्या नि चांगल्या प्रकारे चौथी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच तेथे प्रवेश द्यावा. पण प्राथमिक शिक्षणाच्या काळांत खास शिक्षण न मिळाल्याने तेथे येणाऱ्या प्राज्ञांचे जे नुकसान झालेले असेल त्याची भरपाई दिडीदुपटीने अन्य प्रकारे करावी.

तेथे ७ वर्षांचे माध्यमिक शिक्षण ६ वर्षांत आटोपून वेगवर्धन तर साधावेच; पण तेथला अभ्यासक्रमही उच्च पातळीवर आखावा. प्राज्ञ-विद्यालयात केवळ प्राज्ञांसाठी सर्व संघटना उभारलेली असल्याने तेथे असा अभ्यासक्रम तयार करणे व शिकविणे हे सुलभ जाईल. सामान्य नि उच्च अभ्यासक्रम पार पाडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यावयाच्या, त्यांचा गुणानुक्रम कसा ठरवावयाचा, वगैरे अडचणी तेथे निर्माण होणार नाहीत. हा उच्च अभ्यासक्रम आखताना सामान्य अभ्यासक्रम त्याच्या पोटात सामावेल नि सामान्य अभ्यासक्रमाची रुंदी व खोली वाढून उच्च अभ्यासक्रम आपले रूप घेईल अशी व्यवस्था केली पाहिजे. म्हणजे शालान्त–परीक्षेत हा अभ्यासक्रम पार पाडणाऱ्या प्राज्ञ विद्यार्थ्यांना अडचण येणार नाही आणि शिवाय त्यांच्या प्रज्ञेला चांगले आव्हानही मिळेल.

उच्च अभ्यासक्रमाप्रमाणे गुरुगृहवास हेहि प्राज्ञ-विद्यालयाचे वैशिष्ट्य बनवता येईल. तेथे विद्यार्थ्यांनी वसतिगृहांत राहणे जसे सक्तीचे ठेवावे तसेच गुरुजनांनी विद्यालयाच्या परिसरात राहणे हे आवश्यक करावे. वसतिगृहाची एकच प्रचंड इमारत न बांधता एकेका गुरुगृहाशेजारी पंचवीसएक मुलांची राहण्याची सोय केली व लहान लहान वसतिगृहांचे असले अनेक पुंज तयार केले तर मुलांना जसा कांही गुरुगृहवासच लाभेल. मग मुलांच्या सर्वांगीण प्रगतीवर गुरुजी अगदी जवळून, पण आवश्यक तेवढ्या दुरून, लक्ष ठेवू

शकतील आणि मुलांचे केवळ बौद्धिक जीवनच नव्हे तर सारे भौतिक नि भावनिक जीवन संस्कारसंपन्न बनेल.

या प्राज्ञ-विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्व सुप्त गुणांना अंकुर फोडणारे आणि त्या अंकुरांना परिपुष्ट करणारे नानाविध अभ्यासेतर उपक्रम ठेवले पाहिजेत, तेथील प्रयोगशाळा नि ग्रंथालये चांगली समृद्ध बनविली पाहिजेत, तेथली क्रीडांगणे नि क्रीडासाहित्य पुरेसे असले पाहिजे, त्या विद्यालयांचा परिसर निवान्त नि प्रसन्न असेल अशी काळजी घेतली पाहिजे इत्यादि गोष्टींचा वेगळा विस्तार करण्याचे कारण नाही.

थोडक्यात सांगावयाचे तर ह्या प्राज्ञ-विद्यालयांचे स्वप्न असे आहे, की साऱ्या जिल्ह्यातील अस्सल प्रज्ञाबीज तेथे गोळा व्हावे आणि त्या बीजातून राष्ट्राला आपल्या सुमनसुगंधाने नि फलभाराने स्वर्गसुंदर बनवणारे कल्पवृक्ष तेथे बहराला यावेत !

**पैशाचा प्रश्न**

प्राज्ञ-विद्यालयांचे स्वप्न चित्ताकर्षक असले तरी ते सत्यसृष्टीत उतरविण्या-साठी पैशाची गरज लागेल, हे उघड आहे. गरिबीच्या प्रमाणात राहणे-जेवणे जर मोफत द्यावयाचे तर त्यासाठी पैसा लागेल. प्रज्ञावन्त नि व्यासंगी शिक्षक मिळवावयाचे तर त्यांना चांगले वेतन देण्यासाठी पैसा लागेल. आणि समृद्ध ग्रंथालये, प्रयोगशाळा, वसतिगृहाच्या इमारती इत्यादि स्थावर सरंजामासाठीही पैसा लागेल. तेव्हा, सर्वसाधारण शाळांपेक्षा प्राज्ञ-विद्यालयांना हा जो जादा पैसा लागेल तो कोणी नि कसा उभा करावयाचा या प्रश्नाचा उलगडा झाला पाहिजे.

प्राज्ञ-विद्यालयांची जबाबदारी मूलतः कोणाची आहे, या प्रश्नाच्या उत्तरावर पैशाच्या प्रश्नाचे सारे उत्तर अवलंबून ठेवावे लागेल. आतापर्यंत पुनः पुन्हा सूचित केल्याप्रमाणे प्रज्ञेची जोपासना हें एक दूरदृष्टीचे राष्ट्रकार्य आहे. राष्ट्रीय प्रगतीचे संरक्षण नि संवर्धन यांचा तो एक राजमार्ग आहे. तेव्हा राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सरकारवर प्राज्ञ-विद्यालयांची मूलभूत जबाबदारी येऊन पडते, हे नाकारता येणार नाही. विशेषतः कल्याणकारी राज्याने तर ती जबाबदारी उत्साहाने उचलली पाहिजे. साहजिकपणेच,

प्राज्ञ-विद्यालयांना येणाऱ्या जादा खर्चाची तरतूद सरकारी तिजोरीतून व्हावयास हवी, हे क्रमप्राप्त ठरते. प्राज्ञ-विद्यालयांप्रमाणे प्राज्ञ-वर्गांना किंवा प्राज्ञांसाठी केलेल्या इतर सोयींना जो जादा खर्च येईल तो उचलण्यासही सरकारनेच पुढे यावयास हवे. कित्येकदा असे होते की, राष्ट्रकल्याणाचे मार्ग पुरोगामी विचारांच्या काही व्यक्तींना किंवा व्यक्तिसमूहांना आधी दिसतात आणि व्यक्ति स्वार्थत्यागपूर्वक त्या मार्गांनी जाऊन त्यांचे महत्त्व राष्ट्राला पटवून देतात. मग जनमत तयार झाले की सरकार त्या मार्गाने आपोआप जाऊ लागते. प्राज्ञ-विद्यालयांच्या बाबतीत असा प्रसंग येईल असे वाटत नाही. पण आलाच तर काही दूरदर्शी व्यक्तींनी स्वार्थत्यागाला तयार झाले पाहिजे आणि झीज सोसून, सरकारी साह्याविना प्राज्ञ-विद्यालये उभी केली पाहिजेत. ब्रिटिश राजवटीत पुरोगामी नि स्वार्थत्यागी म्हणून ज्या शिक्षणसंस्था गाजल्या त्यांच्यावर तर ही विशेष जबाबदारी आहे. एकदा स्वार्थत्यागाच्या नि ध्येयनिष्ठेच्या प्रकाशाने प्राज्ञ-विद्यालयांचा मार्ग असा उजळला, की त्या मार्गाने वाटचाल करावयास सरकार आपोआप प्रवृत्त होईल. तेव्हा, प्राज्ञ-विद्यालयांच्या खर्चाची अंतिम जबाबदारी सरकारवर असली तरी संक्रमणकालामध्ये काही ध्येयवादी व्यक्तींनी ती जबाबदारी जरूर तर उचलली पाहिजे.

विद्यार्थ्यांकडून वाढीव दराने शुल्क घेऊन प्राज्ञ-विद्यालयांचा जादा खर्च चालवावा, अशी कल्पना पुढे येण्याचा संभव आहे. पण ती कल्पना सर्वथैव त्याज्य होय. शुल्क वाढवल्यास गरिबांना, ही विद्यालये दुष्प्राप्य होतील आणि या विद्यालयांचे रूपांतर कुप्रसिद्ध ‘पब्लिक स्कूल्स’ मध्ये होईल ! ही शुल्कवाढ म्हणजे प्रज्ञेवरील जणू जिझिया कर ठरेल. पण प्रज्ञा ही करपात्र किंवा दंडार्ह वस्तू नव्हे, हे वेळीच जाणले पाहिजे. आणि श्रीमंतांप्रमाणे गरिबांनाही प्रज्ञेच्या विकासाची संधी मिळावी म्हणून शुल्कवाढीचा मार्ग सोडून दिला पाहिजे.

## प्राज्ञ-विद्यालये कोणी चालवावी ?

प्राज्ञ-विद्यालयांचा जादा खर्च जरी सरकारने सोसला, तरी ती विद्यालये सरकारने स्वतःकडेच चालवावयास घ्यावी असे ठामपणाने म्हणवत नाही. सध्याची सरकारी यंत्रणा प्राज्ञ-विद्यालयाच्या कार्यक्षम संचालनाला अपुरी

पडेल, हे कोणीहि सांगू शकेल. तेव्हा, प्राज्ञ-विद्यालये चालविण्याचे काम ' कॉर्पोरेशन ' सारखी एखादी स्वतंत्र, स्वायत्त नि कार्यक्षम यंत्रणा निर्माण करून तिच्याकडे सरकारने सोपवावे किंवा चांगल्या खाजगी शिक्षण-संस्थांना प्राज्ञ-विद्यालये काढण्यास उत्तेजन द्यावे. जर खाजगी शिक्षण-संस्थांनी प्राज्ञ-विद्यालये काढली तर अगदी मोजकी नि मोक्याची नियंत्रणेच सरकारने त्यांच्यावर घालावी. उदाहरणार्थ, विशिष्ट किमान बुद्ध्यंक असल्या-खेरीज मुलाला या विद्यालयात प्रवेश दिला जाऊ नये असा आग्रह सरकारने धरावा. शिक्षकांची किमान वेतनश्रेणी सरकारने ठरवून द्यावी. अभ्यासक्रमाचा दर्जा सगळीकडे चांगला उंच राहावा म्हणून काही पथ्ये सक्तीची करावी. पण या प्रकारच्या नियंत्रणांपलीकडे शिक्षणसंस्थांना संचालनाचे संपूर्ण स्वातंत्र्य मनःपूर्वक दिले जावे. प्राज्ञ-विद्यालयांच्या खर्चाचा मोठा भार आपण उचलतो तेव्हा त्यांच्यावर आपले सर्वंकष नियंत्रण राहिले पाहिजे, अशी वृत्ती सरकारने ठेवता कामा नये. या दिशेने कारभार-योजना ठरली तर खाजगी शिक्षणसंस्था प्राज्ञ-विद्यालयांचा प्रयोग यशस्वी करून दाखवितील अशी अपेक्षा आहे. तेवढी उपक्रमशीलता, स्वयंशासनाची कुशलता आणि ध्येयनिष्ठा समाजाच्या धमनीतून खचितच वहात असावी.

### अमेरिकेतील नि रशियांतील स्थिती

अमेरिकेमध्ये प्राज्ञांसाठी वेगळ्या शाळा मुख्यतः न्यू यॉर्कमध्ये आढळतात आणि इतरत्रही त्या तुरळक तुरळक दृष्टीस पडतात. अशा शाळांचा तेथे जो अनुभव आहे तो एकंदरीने फार उत्तेजक आहे. वास्तविक पाहता, ज्या शाळांतील विद्यार्थी जिल्ह्याएवढ्या मोठ्या भूप्रदेशांतून गोळा व्हावे लागतात अशा शाळा निघण्याला अमेरिकेत अतिशय प्रतिकूल परिस्थिती आहे. कारण तेथली सगळी शिक्षणव्यवस्था प्रशासकीय किंवा आर्थिक अंगांनी जिल्ह्यापेक्षाही लहान अशा प्रदेशात विकेंद्रित झालेली आहे. पण असे असून देखील प्राज्ञांसाठी स्वतंत्र केंद्रवर्ती विद्यालये काढण्याची कल्पना तेथे हळूहळू मूळ धरत आहे. आपल्याकडे शिक्षणावर जो खर्च होतो तो अंशतः शुल्काच्या पैशातून होत असला तरी बाकीचा बहुतेक राज्य-सरकारांच्या तिजोरीमधून होतो. शिवाय शिक्षणव्यवस्थेवर आपल्याकडे राज्यसरकारांचे व्यापक नियंत्रण अस्तित्वात आहे. म्हणजेच आपला शैक्षणिक

कारभार मुख्यतः केंद्रित आहे. अशा केंद्रित कारभाराचे इतर हानिलाभ काहीही असले तरी प्राज्ञ-विद्यालयांच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने तो सोयिस्कर आहे. आपण प्राज्ञविद्यालयांसाठी राज्यसरकारांच्या तिजोरीतील पैसा सुलभतेने उपलब्ध करू शकू आणि लहान लहान प्रादेशिक विभागांचा विरोध न येऊं देता जिल्हानिहाय प्राज्ञ-विद्यालये चालवू शकू. अशा स्थितीत, अमेरिकेतील प्राज्ञविद्यालयांचा उत्तेजक अनुभव आपण जमेस धरला पाहिजे आणि पावले दुप्पट उमेदीने टाकली पाहिजेत.

प्राज्ञांचा प्रश्न रशियात अगदी वेगळ्या पद्धतीने निकालात काढला जातो. तेथील शालेय अभ्यासक्रम आणि परीक्षा यांचा दर्जा इतका उंच ठेवतात की सर्वसामान्य विद्यार्थी माध्यमिक शिक्षणाच्या परतीराला बहुधा लागतच नाही. फक्त ५ टक्के विद्यार्थी शालान्त-परीक्षा-प्रमाणपत्र मिळवू शकतात आणि बाकीचे खालून वर येता येता कोठे तरी अनुत्तीर्ण होऊन कामास येतात! या ५ टक्के विद्यार्थ्यांत विशिष्ट विषयांमध्ये ज्यांची असामान्य गती दिसून येते त्यांना विद्यार्थ्यांसाठी चालविलेल्या त्या विषयांच्या खास वर्गात घालतात आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली लहान लहान गटात काम करण्याची त्यांना संधीही देतात. म्हणजे रशियांतील शिक्षण-व्यवस्था मुख्यतः बुद्धिमन्तांसाठी असून तेथे वेगळी प्राज्ञ-विद्यालये उघडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आपली शिक्षणव्यवस्था रशियापेक्षा मूलतः भिन्न आहे. तेव्हा प्राज्ञ-विद्यालयांच्या व्यवस्थेबाबत रशियाकडून आपणांला मौलिक मार्गदर्शन मिळेल असे. वाटत नाही. उच्च पदवीधरांपैकी चांगली चांगली माणसे रशियामध्ये शिक्षकी पेशात पाठविली जातात आणि उच्च-विद्याविभूषितांना तेथे उत्कृष्ट वेतन नि सामाजिक प्रतिष्ठा लाभते, हे मात्र आपण लक्षात ठेवण्यासारखे आहे. प्रज्ञेला उत्तेजन देण्याचा तोही एक मार्ग आहे आणि तो आपल्या दृष्टिपथातून सुटता कामा नये.

## मागासलेल्या वर्गांचा विचार

आपला भारतीय समाज भेदांनी भेगाळलेला आहे आणि उच्चनीच भावनेचे वीष त्याच्या शरीरात खोलवर भिनलेले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या समूहांना वेगवेगळी वागणूक देणारी कोणतीहि योजना पुढे आली की,

तिच्याकडे आपण साहजिकपणेच साशंक दृष्टीने बघतो. प्राज्ञांसाठी काढावयाचे वेगळे वर्ग नि वेगळी विद्यालये यांबद्दल त्या कारणानेच काही शंका उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. बुद्ध्यंकाच्या बळावर जर प्राज्ञ-वर्गात किंवा प्राज्ञ-विद्यालयात मुलांना आपण प्रवेश देणार तर समाजांतल्या मागासलेल्या वर्गावर त्यामुळे अन्याय होणार नाही का, अशी त्यांपैकी एक शंका असू शकेल पण मागासलेल्या वर्गात प्रज्ञा निपजत नाही, अशी या शंकेमागे जी समजूत दिसते ती समजूत बरोबर नाही. प्रज्ञावन्त व्यक्ति जशा पुढारलेल्या वर्गात आढळतात तशाच त्या मागासलेल्या वर्गातही आढळतात. पुढारलेल्या वर्गांना शिक्षणाची संधी अधिक मिळाल्याने त्यांच्यांतील प्रज्ञा परिपुष्ट होते, प्रसिद्धीला येते आणि आपल्या नजरेत भरते. पण त्याचा अर्थ असा नव्हे की मागासलेल्या नि पददलित वर्गात प्रज्ञावन्त निपजतच नाहीत. या वर्गात अनेक बुद्धिमान नि प्रज्ञावान मुले निपजतात असे शास्त्रशुद्धसंशोधनात अनेकवार सिद्ध झालेले आहे. पण या वर्गात प्रज्ञा निपजली तरी तिची जोपासना होत नाही आणि ती वठून जाते. त्यामुळे आपणांला असा भास होतो की, प्रज्ञेचे वरदान खालच्या जातींना नि वर्गांना परमेश्वर देतच नाही. पराकोटीची प्रतिकूल परिस्थिती भेदूनही या वर्गातील प्रज्ञा केव्हा केव्हा कशी उत्तुंग भरारी घेते ते बुकर टी. वॉशिंग्टन किंवा डॉ. आंबेडकर यांच्या उदाहरणांवरून इतिहासाला ठाऊक झालेले आहे. तेव्हा, प्रज्ञेचा शोध मुले ५–१० वर्षांची असतानाच घेतला आणि तो शास्त्रशुद्ध कसोशीने घेतला तर पुढारलेल्या वर्गाप्रमाणे मागासलेल्या वर्गातील प्रज्ञाही प्रकाशात येईल आणि मागासलेल्या वर्गांना भीतीचे कारण उरणार नाही. प्रज्ञेचा असा शोध घेतल्यास त्यांचा उलट लाभच होईल. कारण दुर्लक्षामुळे किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांच्यातील जी प्रज्ञा वाया जाते ती मग वाया जाणार नाही आणि तिच्या जोपासनेची नीट सोय होईल. शिवाय मागासलेल्या वर्गातील प्राज्ञ माणसे सुशिक्षित होऊन समाजापुढे आली की त्यांच्याबरोबर तो सगळा वर्गच पुढे येईल आणि त्या वर्गाचे मागासलेपण हळूहळू नष्ट होईल.

'बुद्ध्यंकाच्या बळावर जर प्राज्ञ-वर्गात किंवा प्राज्ञ-विद्यालयात मुलांना आपण प्रवेश देणार तर समाजातल्या मागासलेल्या वर्गावर त्यामुळे अन्याय होणार नाही का' या शंकेमागे आणखीही एक समजूत असू शकेल. ती

समजूत अशी की बुद्धिमापनाच्या ज्या तंत्रानुसार बुद्ध्यंक ठरतो ते तंत्रच मागासलेल्या वर्गाच्या बाबतीत पुरेसे विश्वसनीय नाही. या समजुतीला काही आधार आहे, हे प्रथमतः मान्य करावयास हवे. बुद्धिमापनासाठी जे प्रश्न तयार करतात त्यांपैकी पुष्कळसे प्रश्न मुलाभोवतालच्या परिस्थितीवर आधारलेले असतात. त्यामुळे ज्या मुलाची परिस्थिती सर्वसामान्य परिस्थितीपेक्षा फार भिन्न असते त्याला त्या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड जाते आणि त्याचा बुद्ध्यंक खाली घसरतो. उदाहरणार्थ, मागासलेल्या वर्गातील मुलांभोवती शब्दसमृद्ध नि शुद्ध भाषेचा वापर होत नाही; वृत्तपत्रे आणि पुस्तके त्यांच्या हातात फारशी पडत नाहीत किंवा प्राणिसंग्रहालये, अजबखाने, प्रेक्षणीय स्थळे इत्यादि गोष्टी त्यांना सहसा बघावयास सापडत नाहीत. पण हे सर्व थोड्याबहुत प्रमाणात मुलाच्या जीवनामध्ये होते असे गृहीत धरून जर बौद्धिक निकष तयार केला असेल तर त्यावर मागासलेल्या वर्गातील मुलांचा कस फारच कमी उतरेल. एका समूहाची परिस्थिती आधाराला घेऊन जो निकष तयार केला असेल तो दुसऱ्या भिन्न समूहातील व्यक्तीला लावावयाचा, ही यामधील चूक आहे. ही चूक बुद्धिमापनाच्या प्रारंभकालात अनेकांच्या हातून झाली आणि अजूनही अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशात अनेक शाळांमधून ती होतच असते. त्यामुळे बुद्धिमापनाचे तंत्र मागासलेल्या वर्गाच्या बाबतीत पुरेसे विश्वसनीय नाही, त्यांना त्यात अन्याय होतो, अशी समजूत होणे स्वाभाविक आहे. पण उच्च किंवा मध्यम किंवा सर्वसामान्य परिस्थितीवर आधारलेले बौद्धिक निकष मागासलेल्या वर्गात लावावे, असे खरेखुरे बुद्धिमापन-तंत्र केव्हाच म्हणत नाही. आपण तसे केले तर त्या तंत्राचे ते विडंबन होईल आणि त्यात मागासलेल्या वर्गाची क्रूर थट्टाही होईल. तेव्हा आपल्याकडील बौद्धिक निकष तयार करताना आपण मागासलेल्या वर्गाची त्यात शास्त्रशुद्ध दखल घेतली पाहिजे आणि त्यांच्यासाठी तयार केलेले निकषच त्यांना लावले पाहिजेत. भिन्न समूहांच्या भिन्न निकषांची सांगड कशी घालावयाची त्याचाहि विचार केला पाहिजे. सार्वजनीन निकष तयार करण्याच्या नादात आपल्या हातून आपल्या पददलित बांधवांवर आणखी नवा अन्याय होणार नाही याविषयी आपण दक्ष राहिले पाहिजे. आपल्याकडे बौद्धिक निकष अद्यापि फारसे तयार झालेले

नाहीत. ते अजून व्हावयाचे आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टी करण्याची एक सुसंधीच आपणाला मिळाली आहे. ही सुसंधि आपण साधली नि शास्त्रशुद्ध निकष तयार केले, तर मागासलेल्या वर्गांना अन्याय होईल या भीतीचे-कारणच उरणार नाही. जाता जाता हेही सांगितले पाहिजे, की प्राज्ञांच्या-कल्याणासाठी आणि इतर अनेक शैक्षणिक नि सामाजिक प्रश्नांची उकल होण्यासाठी मनोमापनाचे विविध निकष आपल्याकडे झपाट्याने तयार झाले पाहिजेत. त्यांची समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने आपणाला निकड आहे.

**थांबला तो संपला !**

प्रस्तुत लेखांत प्राज्ञांच्या शिक्षणाचा किंवा प्रज्ञेच्या जोपासनेचा प्रश्न उपस्थित करून त्यावर काही उपाय सुचविले आहेत. हे उपाय मुख्यतः सूचनावजा असून प्राज्ञांचा प्रश्न विधायक रीतीने धसाला लागावा हा त्यामागे उद्देश आहे. प्रज्ञेच्या जोपासनेचे महत्त्व जनमनावर बिंबले की आणखीही अनेक उपाय पुढे येतील आणि येथे सुचविलेल्या उपायात सुधारणा होत जातील. पण प्रश्नाचे महत्त्व प्रथमतः जनमनावर बिंबले पाहिजे. विशेषतः लोकमताच्या नेत्यांनी ते जाणले पाहिजे. प्रज्ञेची जोपासना नीट न झाल्यामुळे ज्या अभागी भाग्यवंतांची जीवने अविकसित राहतात. त्यांची अशी हाक आहे की प्रज्ञेचा प्रश्न जाणून घ्या. आपल्या वर्धिष्णु राष्ट्राचा असा आक्रोश आहे की प्रज्ञेच्या जोपासनेची काळजी घ्या. प्रज्ञेचे लेणे ज्या सामान्य माणसांना मिळालेले नाही पण जी शहाणी आहेत तीही म्हणत आहेत की आमच्या कल्याणासाठी प्राज्ञांना पुढे जाऊ दे. या प्रश्नाचे महत्त्व रोजच्या रामरगाड्यात आणि निकटवर्ती सुखांच्या साधनेंत कदाचित् मनाला जाऊन भिडत नसेल; पण भविष्याचा वेध घेणाऱ्या दूर दृष्टीने ते हेरले पाहिजे आणि आताच कामाला लागले पाहिजे. ह्या प्रश्नावर तत्त्व-चर्चा व्हावी पण तत्त्वचर्चेचा अतिरेक होऊन चालणार नाही. कारण प्रश्न मुख्यतः तत्त्वचर्चेचा नसून विधायक प्रयत्नांचा आहे. प्रत्यक्ष कार्यातूनच हा प्रश्न सुटण्याचे खरेखुरे मार्ग उजळत जातील. तेव्हा, एकीकडे तत्त्वचर्चा करीत करीत दुसरीकडे जोमाने कार्याला लागले पाहिजे. 'थांबला तो संपला' असा काळाचा आपणाला इशारा आहे !

♧ ♧ ♧

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32220 दि: ...
क्रमांक ....2852...... नों. दि. ...

# माध्यमिक शिक्षणातील लष्करी शिक्षणाचे स्थान

. ६ .

कॅ. शं. गं. चाफेकर
ए. आय्. आर्. ओ.

चिनी आक्रमणामुळे सर्व भारतीयांचे लक्ष संरक्षणाच्या प्रश्नाकडे वेधले गेले आहे. सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेले लढे देऊन भारताने स्वातंत्र्य संपादिले. या दोन तत्त्वांचा पगडा आपल्या मनावर व जीवनावर इतका बसला की, आपणास संरक्षक युद्धसुद्धा करावे लागेल याचा विसर बहुतेकांना पडला. स्वराज्य-प्राप्तीपासून भारताने तटस्थतेचे, शांततेचे व सहकार्याचे धोरण स्वीकारले. आपल्या मैत्रीचा व सहकार्याचा हात पुढे केला, पण ज्यांना आपण आपला आशियाई बंधू समजत होतो, ज्याला राष्ट्रसंघात प्रवेश मिळावा म्हणून आपण १३ वर्षे प्रयत्न केले, ज्या देशाच्या पंतप्रधानांशी विचार-विनिमय करताना पंडित नेहरूंनी पंचशीलेची तत्त्वे जगास दिली त्याच चीनने भारताशी दगलबाजी करून भारतावर आक्रमण केल्यामुळे आपण स्तिमित झालो, आपले डोळे खाडकन् उघडले व संरक्षणाच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधले.

स्वातंत्र्य आणि स्वसंरक्षण ह्या गोष्टी अविभाज्य आहेत. जो देश परक्यांच्या आक्रमणापासून स्वतःचे संरक्षण करू शकत नाही तो देश फार काळ स्वतंत्र राहू शकत नाही. "शिर सलामत तो पगडी पचास" ह्या म्हणीप्रमाणे स्वातंत्र्य असेल तरच इतर सर्व गोष्टी करता येतात. स्वातंत्र्य गेले की, कपाळी गुलामगिरी येऊन राष्ट्रीय जीवन नष्ट होते. स्वातंत्र्याकरिता पडेल

ती किंमत देण्यास आपण तयार असले पाहिजे. स्वातंत्र्याचे बाळकडू नागरिकास तो जन्मल्यापासून पाजण्यात आले पाहिजे व स्वातंत्र्याकरिता पडेल तो त्याग करण्याची शिकवण त्यास लहानपणापासून दिली पाहिजे. आजची मुलेच उद्याची नागरिक आहेत, त्यांच्याकरिताच स्वराज्य आहे, व भविष्यकाळात ह्या स्वातंत्र्याचे रक्षण त्यांनाच करावयाचे आहे. ह्या-करिता लहानपणीच लष्करी शिक्षणाचे संस्कार मुलांच्या मनावर घडविण्यात आले पाहिजेत. पण त्याचबरोबर ह्या शिकवणुकीमुळे देशात चढावू वृत्तीची लष्करशाही निर्माण होणार नाही ह्याची आपण काळजी घेतली पाहिजे.

शिक्षणाचा मुख्य हेतू कोणता ? शिक्षणामुळे विद्यार्थ्यांत उदार वृत्ती, विशाल दृष्टिकोन, सहकार्याची प्रवृत्ती, देवाण-घेवाण करण्याची वृत्ती व कोणत्याही प्रश्नाचा विचार करण्याची शक्ती ह्या गोष्टी साधल्या गेल्या पाहिजेत. त्याचबरोबर ज्या समाजात व देशात आपण जन्मलो व वाढलो त्या समाजाचे व देशाचे आपण काही ऋण लागतो व ते ऋण आपण फेडले पाहिजे, ही भावना त्याच्यात उत्पन्न झाली पाहिजे. सहानुभूती, दया व मानवता ह्या गोष्टींचीही जोपासना करण्यात आली पाहिजे. सहिष्णुता अंगी बाणली पाहिजे, कर्तव्याची जाणीव उदयोन्मुख नागरिकात निर्माण केली पाहिजे. शिक्षण म्हणजे बौद्धिक विकास होय. ठराविक परीक्षात पास होणे म्हणजे सुशिक्षितपणा नव्हे. मिळालेले ज्ञान सत्कर्माकरिता व दुसऱ्याच्या भल्याकरिता वापरण्याची प्रवृत्ती शिक्षणामुळे निर्माण होते. त्याचप्रमाणे चांगले आणि वाईट यांच्यातील फरक कळण्याची दृष्टी शिक्षणा-मुळे प्राप्त होते.

आपल्या प्रचलित शिक्षणपद्धतीचा पाया सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी लॉर्ड विल्यम बेंटिंग याने घातला. पण तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जी शिक्षणपद्धती सुरू केली ती वर वर्णन केलेली ध्येये साध्य करण्याकरिता केली नव्हती. ब्रिटिश ह्या देशात परके होते. ते संख्येने थोडे होते. येथील भाषा त्यांस येत नव्हत्या, व राज्यकारभार तर चालवायचा होता. हा कारभार चालविण्याकरिता इंग्रजी जाणणारा खालचा नोकरवर्ग त्यांना हवा होता. म्हणूनच इंग्रजी माध्यमाद्वारा पाश्चिमात्य शिक्षण भारतास सुरू करण्यात आले.

पण हळूहळू शिक्षणाचा प्रसार होऊन सुशिक्षित वर्गांचा दृष्टिकोन विशाल होऊ लागला. इंग्लिश भाषा, वाङ्मय व इतिहास यांच्या वाचनामुळे लोकशाहीची तत्त्वे येथेही रुजू लागली. बंडाच्या वेळीच युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्या व १८८५ नंतर काँग्रेसच्या स्थापनेमुळे स्वातंत्र्य-आंदोलनास सुरुवात झाली. राष्ट्रीय जीवनात शिक्षणाचे महत्त्व काय आहे ? हे लोकांस कळून आले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे म्हणून नामदार गोखल्यांनी आटोकाट प्रयत्न केले. कर्झनने युनिव्हर्सिट्या व खाजगी शिक्षणसंस्थांवर नियंत्रणे घातली तरी शिक्षणप्रसार वाढतच राहिला. लो. टिळक चिपळूणकर यांनी ' न्यू इंग्लिशस्कूल ' काढून राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला. १९१९ च्या कायद्याने शिक्षण खाते कायदेमंडळास जबाबदार असलेल्या मंत्र्याच्या हाती सोपविण्यात आले. शिक्षणक्रम कसा असावा ? हे ठरविण्याचा अधिकार आपणांस मिळाला.

बेंटिंगने शिक्षणाचा पाया घातला हे वर सांगितले आहेच. त्यानंतर युनिव्हर्सिट्यांची स्थापना झाली व वेळोवेळी शिक्षण सुधारण्याच्या योजना आखण्याकरिता अनेक कमिशने नेमण्यात आली. त्याबद्दलची सविस्तर माहिती देणे ह्या छोट्या लेखात शक्य नाही. पण भारतीय शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणक्षेत्रात प्रयोग करण्यास सुरुवात केली, हे नमूद केले पाहिजे. दुय्यम शिक्षणक्रमात इंग्रजीशिवाय इतर विषय मातृभाषेतून शिकविण्याचा पहिला अधिकृत प्रयत्न आमच्या माहितीप्रमाणे पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रोफेसर नाईक हे शालाप्रमुख असताना करण्यात आला; व शिक्षण-तज्ज्ञांचे लक्ष शिक्षण-पद्धतीत सुधारणा करण्याकडे वळले.

प्राथमिक शिक्षणाने साक्षरता येते, पण बालवयात विचार करण्याची शक्ती जागृत झालेली नसते. विद्यार्थ्यांस मिळालेले ज्ञान प्राथमिक स्वरूपाचे असते. विद्येचा खरा पाया माध्यमिक शाळेत (Secondary Schools) घातला जातो. विद्यार्थ्यांत विचार करण्याची शक्ती जागृत होते. त्याची आकलनशक्ती वाढते, कल्पनाशक्ती भराऱ्या मारू लागते. माध्यमिक शाळेतच भाषा, इतिहास, भूगोल, गणित व विज्ञान ह्या विषयांचा पाया घातला जातो. माध्यमिक शाळेत ह्या विषयांचे पायाशुद्ध शिक्षण दिले गेले तरच पुढे विद्यार्थी कॉलेज व युनिव्हर्सिटीमध्ये प्रगती करू शकतो.

माध्यमिक शिक्षणाच्या चौथऱ्यावरच महाविद्यालयीन शिक्षणाची इमारत उभारलेली असते. ह्या म्हणजे १० ते १७ या कालखंडात विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडवले जाते. त्याच्यातील सुप्त गुण दिसू लागतात. त्याच्या कर्तृत्वशक्तीची चुणूक प्रत्ययास येऊ लागते. म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनांतील ह्या कालखंड अत्यंत महत्त्वाचा आहे. ह्या कालखंडात मिळालेल्या शिदोरीवरच त्याचे जीवन घडते, किंवा बिघडते. म्हणून माध्यमिक शाळातील अभ्यासक्रमास फार महत्त्व आहे.

पूर्वी एस्. एस्. सी. ऐवजी मॅट्रिकची परीक्षा असे. ह्या परीक्षेस इंग्रजी, गणित, इतिहास व संस्कृत हे चारच विषय असत. बाकीचे विषय पूर्व-परीक्षेपर्यंत शिकविण्यात येत. १९२८ साली संस्कृतऐवजी मातृभाषा घेता येऊ लागली. त्यानंतर थोड्याच वर्षांनी महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील व उद्योगधंद्यातील विज्ञानशास्त्राचे महत्त्व ओळखून भूगोल, विज्ञानशास्त्र हे विषयही सक्तीचे करण्यात आले. ह्याचाच अर्थ विषयात वाढ होऊन अभ्यासात वाढ झाली. पुढे इंग्रजीशिवाय इतर विषयांची उत्तरे मातृभाषेत देण्याची मुभा देण्यात आली. महाराष्ट्र राज्यात १९४८ सालापर्यंत विश्व-विद्यालयांच्या नियंत्रणाखाली असलेली मॅट्रिकची परीक्षा सरकारने आपल्या हाती घेतली, व १९४९ सालापासून एस्. एस्. सी. बोर्डातर्फे प्रवेश-परीक्षा घेण्यात येऊ लागली. ह्याच वेळी ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांचा दर्जा व भविष्यकाळामधील होणारी उद्योगधंद्यांची वाढ लक्षात घेऊन एस्. एस्. सी. शिक्षणक्रमात शेती, विणकाम, चित्रकला, संगीत, टायपिंग आदि अनेक नवे विषय आणण्यात आले व एकंदर विषयांची संख्या ७० वर गेली. त्यातून विद्यार्थ्यास मातृभाषा व हिंदीखेरीज इतर पाच विषय घेण्याची सवलत असते.

शारीरिक शिक्षणाचें महत्त्व पटून माध्यमिक शाळांत शारीरिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें. कॉलेजाप्रमाणेच माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांस प्राथमिक लष्करी शिक्षण मिळावे म्हणून शाळांतही नॅशनल कॅडेट कोअर ( N. C. C. ) सुरू करण्यात आले. पण महाराष्ट्र राज्य सरकारने खर्चाची सबब पुढे करून माध्यमिक शाळांतील N. C. C. बंद करून त्याच्या जागी ऑक्झीलरी कॅडेट कोअर सुरू केले. फक्त ज्या शाळा स्वखर्चाने N. C. C.

पथके चालू ठेवण्यास तयार असतील त्यांना तशी पथके ठेवण्याची सवलत देण्यात आली.

गेल्या ऑक्टोबरमध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यामुळे लष्करी शिक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. सर्व देशभर लष्करी शिक्षण सक्तीचे करावे, सर्व कॉलेजांत व युनिव्हर्सिट्यांत लष्करी शिक्षण सुरू करण्यात यावे, माध्यमिक शाळांतही सक्तीचे लष्करी शिक्षण सुरू करावे अशी निरनिराळी मते व्यक्त करण्यात येत आहेत. आपणास ह्या लेखात माध्यमिक शिक्षणक्रमांत सक्तीचे किंवा खुषीचे लष्करी शिक्षण द्यावे की नाही ? ह्या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे.

साधारणपणे १० व्या वर्षी मुलाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊन तो दुय्यम शाळेत प्रवेश करतो. इतक्या कोवळ्या वयात त्यास लष्करी शिक्षण द्यावे किंवा नाही, किंवा त्यास ते झेपेल किंवा नाही, ह्याचा विचार प्रथम करू. आमच्या मते इतक्या, कोवळ्या वयात त्यास लष्करी शिक्षण देणे योग्य नाही. व ते त्यास झेपणारही नाही. पण लष्करी शिक्षणाची पूर्वतयारी माध्यमिक शाळेच्या पहिल्या चार वर्षांत करून घेता येते. शारीरिक शिक्षण लष्करी शिक्षणाचा पाया होय. सुदृढ शरीर व तल्लख बुद्धी असल्याशिवाय लष्करी शिक्षण ग्रहण करणें कठीण जाते. म्हणून पाचवी ते आठवी ह्या पाच वर्षांच्या कालखंडात विद्यार्थ्यांची प्रकृती सुदृढ करण्याकडे लक्ष देण्यात यावे.

हल्ली माध्यमिक शाळांत खालच्या इयत्तात शारीरिक शिक्षण ( P. T. ) सक्तीचे असते. त्याऐवजी त्यास ऑक्झीलरी कॅडेट कोअर किंवा बॉय स्काऊटमध्ये जाता येते. गेल्या काही वर्षांपासून नॅशनल डिसिप्लीन स्कीमची योजना अनेक शाळांत लागू करण्यात आली आहे. दुर्दैवाने शारीरिक शिक्षण देण्याकरिता योग्य व लायक शिक्षक मिळणे कठीण जाते. शारीरिक शिक्षण देणारे शिक्षक तयार करण्याकरिता कांदीवली येथे गेली २५ वर्षे सरकारी शारीरिक शिक्षणसंस्था आहेत. इतर शिक्षणसंस्थांना हा शिक्षणक्रम चालविण्याची परवानगी देण्यात आली आहे. पण यातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या शिक्षकास काहीही खास पगार मिळत नाही. पदवी परीक्षेनंतर

शिक्षक P. T. झाला की, त्यास अधिक पगारमान मिळते. पण पदवी घेऊन कांदीवली कोर्स केलेल्यांना B. A. चेच स्केल मिळते. म्हणून गेली. काही वर्षे ह्या कोर्सकरिता कमी कमी विद्यार्थी येऊ लागले असून हा कोर्स बंद करावा की काय असा विचार करण्याची पाळी आली आहे. मॅट्रिक पास लोकांकरिता सर्टिफिकीट इन् फिजिकल एज्युकेशनचा कोर्स असतो. पण हा कोर्स केलेल्यांना जादा पगार काहीच मिळत नाही. उलट तो S. T. C. झाल्यास त्यास अधिक पगार मिळतो. म्हणून याही कोर्सकडे येणारी विद्यार्थ्यांची संख्या रोडावू लागली आहे. शिवाय ह्या दोन्ही शिक्षणक्रमांकडे येणारे स्वतःच चांगले खेळाडू नसतात. व त्यांचीच प्रकृती तोळामासा असते. म्हणून शिक्षणक्रम पुरा केल्यावरही हे लोक कार्यक्षम शारीरिक शिक्षक होऊ शकत नाहीत. ही स्थिती सुधारली पाहिजे. कांदीवली कोर्स व सी. पी. ऐड. कोर्स पास करताना B. T. व S. T. C. प्रमाणे वेतनश्रेणी देण्यात आली तरच ह्या शिक्षणक्रमाकडे चांगले लोक आकृष्ट होतील व शारीरिक शिक्षणाचा कस वाढेल; म्हणजेच लष्करी शिक्षणाची पूर्वतयारी चांगली होईल.

आता लष्करी शिक्षण ९ वी ते ११ वी ह्या इयत्तांत सक्तीचे करावे का नाही. हा प्रश्न येतो. अनेक पुढारी व शिक्षणतज्ज्ञ सुद्धा भावनेच्या आहारी जाऊन लष्करी शिक्षण सक्तीचे करावे असे म्हणतात. पण ह्या प्रश्नाबाबत त्यांनी खोलवर विचार केलेला नसतो. सबंध भारतभर राहू द्या; पण केवळ महाराष्ट्र राज्यापुरताच विचार केला तर साधारपणे ४ ते ६ लाख विद्यार्थ्यांस हे शिक्षण द्यावे लागेल. त्याकरिंता खर्च किती येईल ? व शिक्षण देणारी माणसे मिळतील का नाहीत ? ह्याचा कोणी विचार केला आहे काय ? ४ ते ६ लाख बुटांच्या जोड्या, पायमोज्यांच्या जोड्या, गणवेश व ४ ते ६ लाख बंदुकी उपलब्ध होऊ शकतील काय ? ह्याचा कोणी विचार करीत नाही. किमान १०० विद्यार्थ्यांस लष्करी शिक्षण देण्याकरिता सैन्याकडून एक तरी N. C. O., J. C. O. व ऑफिसर मागवून घ्यावा लागेल. शत्रूशी लढण्याचे काम सोडून संरक्षणदले एवढी माणसे सैन्यातून देऊ शकतील काय ? ह्याचा विचार कोणी करीत नाही. संबंध भारतात सर्व राज्यांत फक्त ९ वी ते ११ वी इयत्तांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याकरिता

सैन्यातून हजारो अधिकारी J. C. O. व हुद्देदार आणावे लागतील. ते मिळणे शक्य नाही. म्हणून हें शिक्षण सक्तीचे करणे व्यवहारास धरून होणार नाही. शिवाय इतका खर्चही झेपणार नाही.

पण ह्याचा अर्थ दुय्यम शाळेत लष्करी शिक्षण देऊ नये असा मात्र नाही. प्रस्तुत लेखकाचा N. D. A. च्या परीक्षेकरिता विद्यार्थ्यांची तयारी करून घेताना असा अनुभव आहे की, आपल्याकडील बहुसंख्य विद्यार्थी ह्या परीक्षेत नापास होतात. ह्याचे कारण त्यांची पूर्वतयारी चांगली नसते. गेल्या वर्षीपर्यंत N. D. A. करिता योग्य मुले पुरेशा संख्येने मिळत नाहीत अशी ओरड होती. दरवर्षी ठरलेली गणसंख्या भरत नव्हती. सैन्यांत पुरेसे अधिकारी नाहीत अशीही तक्रार आहे. ह्याचे कारण काय? प्रस्तुत लेखकाचे मत असे आहे व ते अनुभवावर आधारलेले आहे की, ‘ संरक्षक दलाबद्दल युवकांत आकर्षण नाही. ह्याचें कारण सैनिकी जीवनाबद्दलचे अज्ञान, पालकांच्या खुळ्या कल्पना व संरक्षक दलातही अखिल भारतीय स्वरूपाच्या I. A. S., I. P. S. सारख्या सनदी नोकऱ्यांप्रमाणेच हुशार उमेदवारास वाव असतो. हे फारच थोड्यांस माहीत असते हें होय. I. A. S., I. P. S. इंजिनीअर कोर्स व वैद्यकीय शिक्षणक्रमाबद्दल युवकांस विशेष आकर्षण वाटते. पण सैन्यांतही कमिशन मिळाल्यावर ४०० रु. पगार सुरू होतो. व कर्तबगार अधिकारी जनरल, ॲड्मिरल किंवा एअर मार्शल होऊ शकतो. हे पुष्कळांस माहीत नसते. संरक्षक दलांतील वेतनश्रेणी रु. ४०० पासून रु. ३००० मासिक असते. सर्वसाधारण अधिकारी १०००–१२०० रु. पगारावर सेवानिवृत्त होतात.

पण लेखकाच्या मते केवळ पगार हेच सैनिकी जीवनाचे मुख्य आकर्षण नव्हे. सैनिकी अधिकारी खुल्या हवेतील जीवन जगतो. भारतांतीलच सर्व प्रांत नव्हे तर परदेशातही त्यास जाण्यास मिळते. जातीयता, प्रांतीयता, भाषाभिमान ह्यांपासून संरक्षक दले अलिप्त असतात. जीवन आरोग्यदायक असते. खेळ, शिकार, गिर्यारोहण ह्यांमुळे तो धाडसी, काटक व बहुश्रुत बनतो. तो चौफेर जीवन जगतो. व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो आपल्या देशाकरिता लढतो व मरतो. वीरगतीपेक्षा अधिक श्रेष्ठ मरण ते कोणते !

अशा ह्या जीवनाकडे व ह्या जीवनातील कर्तव्यनिष्ठा व ध्येयनिष्ठा ह्याकडे लहान वयातच युवकांना आकृष्ट केले पाहिजे. माझ्या मते शाळेतील लष्करी शिक्षण केवळ लष्कराला अधिकारी मिळावे, किंवा सैनिक मिळावे ह्या करता असू नये. माझ्या मते शाळेतील लष्करी शिक्षणाची ध्येये तीन असावीत : ( १ ) ह्या शिक्षणाने त्याच्या मनात सैनिकी जीवनाची आवड उत्पन्न झाली पाहिजे. ( २ ) हे शिक्षण मिळालेला युवक भावी आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करू शकला पाहिजे. व ( ३ ) तो सु–नागरिक बनला पाहिजे. ( The aim should be to produce ( 1 ) An insipient Soldier, ( 2 ) A potential leader and, ( 3 ) A well integrated citizen. )

ह्या लष्करी शिक्षणाने त्याच्यात सैनिकी जीवनाची आवड उत्पन्न होऊन त्याने N. D. A. च्या परीक्षेस बसण्याची तयारी केली पाहिजे. “ मारून मुटकून जावईबोवा ” प्रमाणे “ मारून मुटकून सैनिक ” बनू शकत नाही. आपण पुष्कळ वेळा पाहतो की, केवळ वडील, डॉक्टर किंवा इंजिनियर आहेत म्हणून मुलाला जबरदस्तीने वकिली, डॉक्टरी, किंवा इंजिनीयरिंग कोर्सकडे पाठविण्याचा विचार पालक करतात. पण ज्या धंद्याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत आकर्षण नसते. त्या विषयात त्याला कधीच गोडी वाटत नसते. त्याचप्रमाणे सैनिकी जीवनाची आवड नसलेल्या विद्यार्थ्यास सक्तीचें शिक्षण देऊन सैनिक बनविण्याचा विचार केल्यास तो कार्यक्षम सैनिक बनू शकणार नाही. म्हणून शालेय जीवनात त्याच्यावर लष्करी शिक्षणाची सक्ती करण्यांत येऊ नये. व ज्या विद्यार्थ्यांना हौसेने हे शिक्षण घ्यावेसे वाटेल त्यांच्यापुरतेच ते मर्यादित असावे, असे माझे मत आहे. शालेय लष्करी दलात प्रवेश देताना वैद्यकीय परीक्षा करूनच प्रवेश देण्यात यावा म्हणजे विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित राहून त्यांना चांगले शिक्षण देता येईल.

महाराष्ट्र राज्याच्या S. S. C. बोर्डाने S. S. C. परीक्षेकरिता लष्करी विज्ञान ( Military Science ) हा विषय वैकल्पिक ठेवला आहे, असे जाहीर करण्यांत आले आहे. पण त्याचा शिक्षणक्रम काय ? व तो शिकविण्याची व्यवस्था काय करण्यात येणार आहे ह्याचे स्पष्टीकरण अजून तरी करण्यात आलेले नाही.

जानेवारी १९६२ मध्ये केंद्र सरकारच्या शिक्षण खात्याच्या कक्षेतील ' नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च व ट्रेनिंग ह्या संस्थेने माध्यमिक शिक्षणक्रमात अनेक नवे प्रयोग सुचविले आहेत; व माध्यमिक शिक्षणाचा पाया अधिक भक्कम करण्याकरिता अनेक योजना आखल्या आहेत. त्याची रूपरेषा कौन्सिलने " School Defence Corps Progamme " ह्या पुस्तिकेत दिली आहे. त्यास अनुसरून अभ्यासक्रम तयार करण्याकरिता काही समित्या नेमण्यात आल्या आहेत. त्यात लष्करी शिक्षणासंबंधी योजना तयार करण्याकरिता एक समिती नेमण्यात आली आहे. प्रस्तुत लेखक ह्या समितीचे चेअरमन आहेत. ह्या समितीने माध्यमिक शाळांकरिता लष्करी शिक्षणाची योजना सादर केली आहे.

ह्या योजनेप्रमाणे माध्यामिक शाळांतील ९ वी, १० वी व ११ वी ह्या इयत्तांतील विद्यार्थ्यांकरिता लष्करी शिक्षण हा ऐच्छिक विषय सुचविला आहे. शाळेतील अभ्यासक्रमाशिवाय हा ज्यादा विषय राहील व तीन वर्षे हे शिक्षण मिळाल्यावर विद्यार्थ्यांची N. D. A. च्या परीक्षेकरिता तयारी होईल असा शिक्षणक्रम आंखला आहे.

ह्या शिक्षणक्रमाचा विद्यार्थ्यांवर फाजील भार पडता कामा नये; म्हणून माझ्या मते ह्या विषयाकरिता आठवड्यातून दोन तास ठेवण्यात यावेत. म्हणजे साधारणपणे ३ वर्षांत मिळून २४० ते ३०० तास हे शिक्षण मिळेल. ह्या शिक्षणाचा हेतू विद्यार्थ्यास पक्का सैनिक बनविण्याचा नसावा हे मागेच स्पष्ट केले आहे. पण ह्या शिक्षणाने युवकाच्या अंगी काटकपणा धीटपणा, नेतृत्व, सहकार्य, सेवा, कर्तव्यदक्षता, भ्रातृभाव व राष्ट्रनिष्ठा ह्या गुणांचा विकास झाला पाहिजे. हे गुण त्यास सैनिकी जीवनातच नव्हे तर जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात उपयोगी पडतील.

युवकामध्ये तरतरीतपणा (Smartness) येण्याकरता त्यास ड्रील शिकविण्यात आले पाहिजे. ह्या ड्रीलची मर्यादा स्वॉड, प्लॅटून व कंपनी ड्रील-पुरतीच असावी. त्याला शस्त्रांचा उपयोग माहीत झाला पाहिजे. त्याला ३ वर्षांत मिळून ·२२ रॉयफलच्या ५० गोळ्या तरी उडवावयास मिळाल्या पाहिजेत व लाईट मशिनगन, मॉर्टर व हॅंडग्रेनेडची माहिती व्हावयास पाहिजे.

एकत्र राहिल्याखेरीज मुलांमध्ये भ्रातृभाव व सहकार्य निर्माण होत नाही. एकत्र राहिल्याने हेवेदावे नष्ट होतात. दुसऱ्याशी मिळून घेण्याची वृत्ती वाढीस लागते. एकमेकांच्या सुखदुःखांबद्दल सहानुभूती निर्माण होते, व शिस्तीने राहण्याचे शिक्षण मिळते. म्हणून ९, १०, ११ वीच्या विद्यार्थ्यांकरिता अनुक्रमे ५, ७, १० दिवसांची शिबिरे असावी. S. S. C च्या विद्यार्थ्यांचे शिबिर १० वी ची परीक्षा झाल्यानंतर ताबडतोब घेण्यात यावे. व जानेवारीनंतर त्यांना इतर अभ्यासाकरिता मोकळा वेळ ठेवण्यात आला पाहिजे.

ह्या अभ्यासक्रमांत फील्ड क्रॅफ्टला महत्त्व दिले पाहिजे. ह्या शिक्षणामुळे विद्यार्थी हरहुन्नरी बनू शकेल. त्याला सुतारकाम, थोडेसे लोहारकाम, जमिनीची मोजणी करणे, चर खणणे, बारके पूल बांधणे, ह्या गोष्टींचे शिक्षण मिळेल. त्याचबरोबर स्काउटिंगचे पण शिक्षण देण्यात आले पाहिजे. मात्र ह्या ठिकाणी स्काऊटचा अर्थ बालवीर नसून टेहेळणी करणारा, शत्रूची बातमी काढणारा, माऱ्याची ठिकाणे निवडून काढणारा असा अर्थ आहे.

लढाईच्या वेळी कामुफ्लाजला ( Camouflage ) फार महत्त्व असतें. आपली हालचाल शत्रूस दिसून येऊ नये म्हणून आजूबाजूच्या निसर्गातील झाडे-झुडपे, दगड, उंचवटे ह्यांच्याशी एकरूप कसे झाले पाहिजे, ह्याचे शिक्षण मिळते. मॅप-रीडिंगलाही ह्या शिक्षणात स्थान दिले पाहिजे. कान्टूर नकाशे कसे काढावेत, दृश्य भागाची चित्रे कशी काढावीत, नकाशावरून स्थळाचा व स्थळावरून नकाशाचा बोध कसा होईल ? लक्ष्य ( Target ) म्हणजे काय ? ते कसे दाखवायचे ? त्या ओळखण्यासाठी कोणती साधने वापरायची ? ह्याचेही शिक्षण त्यास देण्यात आले पाहिजे.

हल्ली युद्धातच नव्हे तर सामान्य नागरी जीवनांतही दळणवळणाचे महत्त्व फार आहे. एका ठिकाणची माहिती दुसऱ्या ठिकाणी पाठविण्याकरिता काय साधने वापरता येतात ? मॉर्स कोड, निशाणांनी संदेश पाठविणे, हाताचे हालचालींनी संदेश पाठविणे, रेडिओने संदेश पाठविणे ह्या गोष्टींची माहिती त्यास देण्यात आली पाहिजे. स्काउटिंग, फील्ड क्राफ्ट, सिग्नलिंग ह्या विषयांवर शिबिराच्या काळात जास्त लक्ष देण्यात यावे.

सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे प्लॅनिंग ( Planning ) होय. युद्धाचे वेळेप्रमाणेच नेहमीच्या जीवनातही आपणास अनपेक्षित घटनांना तोंड द्यावे लागते. आग, अपघात ह्या प्रसंगीही योजनाबद्ध काम करावे लागते. निरनिराळ्या अडचणीतून पार पडण्याकरिता योजना कशा आखाव्यात ? व त्या पार कशा पाडाव्यात ह्याचे शिक्षण मुलांस मिळाले पाहिजे. ह्यांतच सामूहिक योजना व नेतृत्वयोजना ह्यांचा समावेश होतो. ह्या योजना-आखणीत मुलांतील नेतृत्व, समयसूचकता, विचारशक्ती आदि गुणांचा विकास होतो, व तो स्वावलंबी बनतो. अडचणीत व संकटात तो डगमगून जात नाही.

लष्करी शिक्षणात खालील गोष्टींचा अंतर्भाव व्हावा असे आम्हांस वाटते :—

( १ ) ड्रील.
( २ ) हत्यारांचा वापर व हत्यारी ड्रील.
( ३ ) मॅप-रीडिंग.
( ४ ) फील्ड क्राफ्ट.
( ५ ) स्काउटिंग.
( ६ ) कामुफ्लाज.
( ७ ) सिग्नलिंग.
( ८ ) योजना-आखणी.
( ९ ) शिबिर.

आता हे शिक्षण देण्याकरिता शिक्षकवर्ग तयार करावा लागेल. प्रत्येक शाळेतून ३ किंवा ४ शिक्षकांना प्रथम शिक्षण देण्यात आले पाहिजे. ३ महिन्यात शिक्षकांना हे शिक्षण देता येईल अशी आमची खात्री आहे. प्रत्येक प्रांतात असे एक शिक्षण-केंद्र असावे. फक्त ह्या शिक्षण-केंद्राकरताच लष्कराचे सहाय्य घ्यावे. पुढे दैनंदिन कार्यक्रमात लष्करी माणसे मागविण्यात येऊ नयेत. शिक्षकांनीच हें काम आपल्या जबाबदारीवर करावे. ह्या शिक्षकांची निवड करतांना त्यांची हौस, शारीरिक पात्रता, चारित्र्य,

नियंत्रणशक्ती ह्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत व हे शिक्षक शाळेच्या कामाव्यतिरिक्त हे काम करणार असल्याने त्यांना खास भत्ता देण्यात यावा. विद्यार्थ्यांवरून तरतरीत व कामसू विद्यार्थ्यांना कॉर्पोरल, सार्जंट, मेजर असे हुद्दे द्यावेत. ह्या विभागाला स्वतंत्र गणवेश असावा. ह्याबाबत जास्त माहिती केंद्रीय शिक्षण खात्याकडून या विषयाबाबत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तिकेत मिळेल. ह्या विषयावर नॅशनल कौन्सिलतर्फे लायक व अधिकारी व्यक्तीकडून पुस्तके लिहवून घेण्यात येत आहेत. ती लवकरच उपलब्ध होतील. ह्या कार्यावर देखरेख ठेवण्याकरिता व एकसूत्रीपणा आणण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात एक निरीक्षणाधिकारी ठेवण्यात यावा; व सबंध राज्याकरिता एक राज्य-निरीक्षणाधिकारी ठेवण्यात यावा. ह्या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यावर खर्च करण्यात राज्य सरकारांनी चिक्कूपणा करू नये.

♣ ♣ ♣

# माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण

. ७ .

ल. नी. छापेकर
एम्. ए., बी. टी.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने अनेक क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली. शेती, उद्योगधंदे, शिक्षण इत्यादि बाबतीत योजना आखल्या गेल्या. आज भारत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची वाटचाल करीत आहे. गेल्या पन्नास-साठ वर्षांत जगात झालेली सामाजिक, राजकीय, आर्थिक आंदोलने भारताला दृष्टीआड करून चालण्यासारखे नव्हते, आणि म्हणूनच आजच्या प्रस्थापित सरकारने सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाही समाजवादी समाजरचना करण्याचे ध्येय निश्चित केले. त्या ध्येयानुसार आज आपल्या सर्व राज्यसरकारात पुढील पावले पडत आहे. या सत्ता-विकेंद्रीकरणात शिक्षणाच्या—प्राथमिक व माध्यमिक—अंतर्भाव करण्यात आला आहे. माध्यमिक शिक्षणाचा विस्तारही गेल्या आठ-दहा वर्षांत फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

**केवळ वाढ म्हणजे विकास नव्हे !**

प्रत्येक जिल्ह्यात १२५-१५० माध्यमिक शाळा निघाल्या, मुलांची संख्या या शाळातून ' वर्गाला ४५-५० ' या सरासरीने मिळू लागली, शालान्त परीक्षेला एक लाखाचे वर मुले दरसाल बसू लागली म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा आपण विकास साधला असे होते. बाळसेदार मूल

हे आरोग्यवान असते; सर्वांचे लक्ष ते चटकन आपल्याकडे खेचून घेऊन पाहणारांना सहजगत्या निरागस आनंद देते. तसे शरिरावर सूज आल्यामुळे तितकेंच भरीव दिसणारे मूल आनंद देऊ शकणार नाही. आणि म्हणून आपल्या माध्यमिक शिक्षणात झालेल्या वाढीचे विकासात रूपांतर झाले पाहिजे. यासाठी अभिजात, आणि प्रशिक्षित शिक्षकांची अत्यंत आवश्यकता आहे. प्रत्येक शिक्षकाला,, या कार्यांत आपले स्थान कोणते व ते किती महत्त्वाचे आहे हे उत्तम प्रकारे समजणे व त्याप्रमाणे त्याने त्याचा ध्यास घेऊन कार्य करीत राहणे कोणत्याही देशाच्या विकासाला आवश्यक आहे.

## शिक्षण सर्वस्पर्शी आहे

शिक्षण हा विषयच असा आहे की त्याचा संबंध सर्वांना स्पर्शून जाणारा आहे. स्थल, काल, व्यक्ती या सर्वांच्याच बाबतीत शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. जगात अखंड चालू असणाऱ्या आणि त्यामुळेच गतिमान झालेल्या अनेक गोष्टींप्रमाणेच शिक्षण हे अखंड चालू आहे. त्यातील आवश्यक तो भाग उचलून व्यक्तित्वाच्या विकासासाठी त्याचा शास्त्रशुद्ध पद्धतीने उपयोग अव्याहत करून घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाचे सर्वस्पर्शी स्वरूपाचे आकलन होऊन त्याप्रमाणे समोर येणाऱ्या मुलांचा – माध्यमिक शिक्षणातील मुलांचा – जास्तीत जास्त विकास कसा घडवून आणावा याचे शास्त्र समजावून घेण्यासाठी प्रत्येक शिक्षकाला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. काही व्यक्ति अभिजात शिक्षक असतात; त्यांना, त्यांच्या कुशाग्र बुद्धीने व त्यांना लाभलेल्या निर्मळ विचारसरणीने शिक्षणातल्या अनेक समस्यांचे सहज आकलन होते व ते त्यातून उत्तम प्रकारे मार्गही काढू शकतात. पण अशा व्यक्ति फार थोड्या; शिक्षणाच्या विस्ताराच्या मानाने त्यांची संख्या अत्यंत तोकडी आणि म्हणून शिक्षक प्रशिक्षित होणे अपरिहार्य आहे. त्याखेरीज त्याला शिक्षणाच्या सर्वस्पर्शित्वाचे महात्म्य आकलन होणे कठीण आहे.

## शिक्षकाला अग्रस्थान

आज आपल्या राज्यात—आणि थोड्याफार फरकाने इतर राज्यातही

माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण फारसे समाधानकारक नाही. मुलांचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे जे घटक आहेत त्यात शिक्षक हा घटक सर्वांत महत्त्वाचा आहे. आपल्या राष्ट्रात शिक्षणाची पुनर्रचना केवळ कागदी योजना व त्या पार पाडण्यासाठी उपलब्ध करून दिलेला पैसा यांनीच फक्त करता येणार नाही. त्यासाठी पुरेशी शैक्षणिक योग्यता लाभलेले, व्याक्तित्वाचा सर्वांगीण विकास झालेले आणि योग्य प्रकारे प्रशिक्षित झालेले शिक्षक बहुसंख्येने हवे आहेत. अशा शिक्षकांना शाळेत व समाजांत कोणते स्थान, केवळ त्याच्या इतर असमर्थतेमुळे, लाभते याचाही विचार झाला पाहिजे.

शिक्षणाच्या पुनर्रचनेत शिक्षकाला अग्रस्थान दिले पाहिजे हे तत्त्व म्हणून स्वीकारल्यानंतर आजची प्रशिक्षणाची व्यवस्था किती तुटपुंजी, तोकडी, निरर्थक आणि अदूरदृष्टीची आहे हे ध्यानी येते. आजचा सर्वसामान्य प्रशिक्षित माध्यमिक शिक्षक त्याच्यावर पडणारी जबाबदारी पेलण्याच्या दृष्टीने असमर्थ ठवण्याची शक्यता आहे. एक गोष्ट येथे अगोदरच सांगितली पाहिजे की, समाजाने व राज्य सरकारांनी शिक्षकाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनात इष्ट तो बदल घडवून आणला पाहिजे. शिक्षकाची आर्थिक स्थिती अशी असली पाहिजे की त्यास आपला सर्व वेळ मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी देता आला पाहिजे; त्यातील हरएक बाबीवर ‘ चिंतन-मनन ’ करायला त्याला सवड असली पाहिजे. समाजाने–पर्यायाने सरकारने–त्याची अशी व्यवस्था केली तर त्याला मिळालेल्या प्रशिक्षणाचा तो हरघडी निरलसपणे, समंजसपणाने व परिणामकारक रीत्या उपयोग करूं शकेल.

### आजचे प्रशिक्षण

आज मिळत असलेले प्रशिक्षण मुख्यतः दोन प्रकारचे—( १ ) पदवीधर शिक्षकांसाठी आणि ( २ ) पदवीधर नसलेले पण कमीत कमी शालान्त परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या शिक्षकांसाठी. हिंदी, चित्रकला, शारीरिक शिक्षण या विषयासाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. सर्वच पदवीधर शिक्षक त्यांच्याचसाठी असलेल्या अभ्यासक्रमासाठी अध्यापक

विद्यालयात–मुख्यतः आर्थिक अडचणीमुळे जाऊ शकतात असे नाही. एस्. टी. सी. सारख्या परीक्षांची त्यांना कास धरावी लागते. ज्यांना शैक्षणिक योग्यता अधिक लाभली आहे व ज्यांना शिक्षणविषयक गोष्टींचा सखोल अभ्यास करणे शक्य आहे अशा पदवीधर शिक्षकांना त्यांच्यासाठी मुद्दाम तयार केलेल्या प्रशिक्षणाचा लाभ न मिळणे ही एक प्रकारे राष्ट्रीय हानीच आहे.

( १ ) **पदवीधर शिक्षकांसाठी**—या प्रकारच्या शिक्षकांना बी. टी. अथवा बी. एड्., बी. टी. ( मूलोद्योग ), डी. एड्. हे अभ्यासक्रम आज उपलब्ध आहेत. नागपूर विद्यापीठातर्फे एक थोड्या मुदतीचा ( Short Term ) बी. टी.चा अभ्यासक्रम ' डिप्. टी ' परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांसाठी चालविण्यांत येतो. याशिवाय शारीरिक शिक्षणाचाही अभ्यासक्रम आहे.

( २ ) **इतरांसाठी**—एस्. टी. सी., टी. डी. , डिप्. टी. , बेसिक डिप्लोमा, हिंदी सनद, डी. टी. सी., डी. एम्. इत्यादि चित्रकला परीक्षा, सी. पी. एड्, इत्यादि अभ्यासक्रम आहेत. यातील काही अभ्यासक्रम शाळेत नोकरी करीत असतानाहि पूर्ण करणे शक्य असते. एखाद्या अध्यापक-विद्यालयांत गेल्यास एक वर्षांत हा अभ्यासक्रम सामान्यतः पूर्ण करता येतो.

या दोन्ही अभ्यासक्रमांची संपूर्ण माहिती देऊन येथील जागा मी अडवू इच्छीत नाही; आणि तशी सविस्तर माहिती देण्याची आवश्यकताही नाही. या प्रशिक्षणाच्या *अभ्यासक्रमांतील ठळक गोष्टी* अशा आहेत—

★ अध्यापनाचे तंत्र समजण्यासाठी व शाळेत परत गेल्यावर त्या तंत्राचा परिणामकारक रीत्या उपयोग कसा करावा याचे प्रत्यक्ष शिक्षण मिळावे म्हणून प्रत्येक शिक्षक-विद्यार्थ्याला ठरीव पाठांची संख्या-प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली घेऊन पूर्ण करावी लागते. यासाठी शालेय विषयातील दोन विषय तरी निवडावे लागतात. एकाच विषयाच्या प्रशिक्षणाच्या बाबतीत त्याच विषयाचे पाठ द्यावे लागतात.

★ शैक्षणिक मानसशास्त्र व इतर काही शैक्षणिक प्रमेयांचा प्राथमिक परिचय व्हावा यासाठी काही विषय अभ्यासावे लागतात त्यात वर्ग-

संचालन, शालेय नियोजन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने जरूर असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांची रूपरेखा यांचाही अंतर्भाव असतो.

* काही विशेष अभ्यासक्रमामध्ये मूलोद्योगी शिक्षणाचा अंतर्भाव आहे. या प्रशिक्षणाला बी. टी. चे स्थान जरी असले तरी डी. एड्. वा बेसिक बी. टी. झालेले शिक्षक सामान्यतः प्राथमिक अध्यापक विद्यालये व शिक्षक वा सरकारचे उप-शिक्षणाधिकारी ( A. D. E. I. ) होऊ शकतात; आणि त्यांना तशा नोकऱ्या त्वरित मिळतातही.

* एस्. टी. सी. चा व टी. डी. चा अभ्यासक्रम एक वर्षाचा खरा पण तो संपूर्ण वेळेचा नसतो. दिवसातून दोनअडीच तासांचें त्यांचें वेळापत्रक असते. सनदचाही अभ्यासक्रम याच स्वरूपाचा आहे.

* चित्रकलाशिक्षक D. T. C. व शारीरिक शिक्षण हे अभ्यासक्रम पूर्ण वेळाचे आहेत. पण D. T. C. झाल्यानंतर खाजगी रीत्या अभ्यास करून तो शिक्षक आर्टमास्टरपर्यंतच्या परीक्षा देऊ शकतो. अशा प्रकारच्या सवलती पदवीधर शिक्षकांच्या अभ्यासक्रमात नाहीत.

* बी. टी. वा बी. एड्. झाल्यानंतर शिक्षक एम्. एड्., पीएच्. डी. या परीक्षांच्या अभ्यासक्रमासाठी अध्यापक विद्यालयात विद्यापीठाच्या नियमानुसार जाऊ शकतो.

* डी. एड. साठी जो अभ्यासक्रम तयार केला आहे त्यांत ‘ मूलोद्योगी ’ व इतर ‘ सामान्य अध्यापन अभ्यासक्रम ’ यांचे मिश्रण आहे. त्यामुळे हे शिक्षण माध्यमिक शाळा व प्राथमिक अध्यापक विद्यालये यात उपयोगी ठरू शकतात.

* पाठांची संख्या सामान्यपणे जरी सर्वत्र सारखी असली तरी ते घेण्याची व्यवस्था करण्यात निरनिराळ्या ठिकाणी फरक आढळतो. एका सत्रातले सर्व १५ पाठ एकदमच सर्वांचे घेण्याची व्यवस्था कांही ठिकाणी करतात. कांही ठिकाणी हे पाठ जुलै ते जानेवारीअखेर सुरू असतात.

* सर्वच परीक्षांना ‘ प्रायोगिक मानसशास्त्र ’ हा विषय आहे असे नाही. जेथे आहे तेथेही तो फारच प्राथमिक स्वरूपाचा आहे.

* पदवीधर शिक्षकांना एखादा वैकल्पिक विषय–शारीरिक शिक्षण; ग्रामीण शिक्षक, व्यवसाय-मार्गदर्शन इ.–अभ्यासासाठी निवडावा लागतो.
* जवळजवळ सर्वच परीक्षांत 'लेखी' व 'प्रात्यक्षिक' असे विभाग आहेत. प्रात्यक्षिक कामांसाठी विद्यालयाकडे काही गुण राखून ठेवलेले असतात.

माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणातील या ठळक गोष्टी आहेत. यावरून सहज नजर टाकली तर त्यातील उणिवा कोणाच्याही चटकन ध्यानी येतील.

त्या उणिवांचा विचार करण्यापूर्वी आज या पद्धतीने तरी किती शिक्षकांची प्रशिक्षणाची व्यवस्था आहे, हे पाहाणे अवश्यक आहे. खाली दिलेल्या कोष्टकातील आकडे इंटिग्रेशन कमिटीच्या रिपोर्टावरून घेतले आहेत.—

| क्र. विभाग | विद्यार्थ्यांची संख्या | शाळांची संख्या | बी.टी.,डी.एड इ. संस्था | एस्.टी.सी. डिप. टी. इ. |
|---|---|---|---|---|
| १ पश्चिम महाराष्ट्र | ३,७७,८१५ | ८५२ | ८ | २७ |
| २ विदर्भ | १,५९,७१३ | २७८ | ३ | ५ |
| ३ मराठवाडा | ५४,१७३ | ९७ | १ | ५ |

हे आकडे १९५९ मधील असले तरी प्रशिक्षण संस्थांच्या संख्येत फार मोठी भर पडलेली नाही. एस्. टी. सी. च्या संस्था बऱ्याच वाढल्या पण बी. टी. साठी एक दोन संस्थांचीच भर पडली आहे. याशिवाय चित्रकला शिक्षकांसाठी पाच संस्था आहेत, सनद परीक्षांचे वर्ग बहुतेक जिल्ह्यात चालविले जातात. या आकड्यांवरून हे स्पष्ट होते की, सर्व शाळांना प्रशिक्षित शिक्षक पुरविण्यास आजच्या संस्था अपुऱ्या पडतील. वर उल्लेख केलेल्या अहवालात वरील विभागात प्रशिक्षित शिक्षकांचे जे प्रमाण होते ते दिले आहे. ते असे—पश्चिम महाराष्ट्रात शे. ४०, विदर्भात शे. १८ आणि मराठवाड्यात शे. १४०. यावरून माध्यमिक शिक्षणातील प्रशिक्षणाची समस्या किती गंभीर आहे याची कल्पना येईल. प्रशिक्षणाचा आदर्श कार्यक्रम असावाच पण त्यापूर्वी तो अथवा जो शिक्षणक्रम उपलब्ध

आहे, तो सर्वांच्या आवाक्यात येईल; त्यासाठी सर्वांची सोय केली जाईल हे सरकारने प्रथम पाहिले पाहिजे. संस्थांची संख्या वाढविलीपाहिजे व प्रत्येक संस्थेत घेतल्या जाणाऱ्या शिक्षक-विद्यार्थ्यांची संख्या देखील थोड्या प्रमाणात वाढवून घेतली पाहिजे.

पण ही डागडुजी होईल व तसे केले तरी येत्या ५-१० वर्षांत सारा शिक्षकवर्ग प्रशिक्षित होऊ शकेल असे नाही. त्याकरिता सरकारने शिक्षणाचा प्रश्न युद्धपरिस्थितीप्रमाणे समजून सोडविला पाहिजे. शिक्षणाला अग्रहक्क देण्यातच राष्ट्राचे खरे हित आहे. शिक्षकांना त्याच्या प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत दिली पाहिजे; चांगले काम केल्यास आपली समाजात प्रतिष्ठा प्रस्थापित होते असे त्यास वाटले, तरच तो या व्यवसायात शिरेल व प्रशिक्षित होऊन व्यवसायात रस घेऊ लागेल. सरकारने व समाजाने शिक्षकाचा मान राखला पाहिजे. ज्यूइश तत्त्वज्ञान्याने सांगितले होते– ‘Jerusalem was bestroyed because teachers were not respected.’ हे सार्वत्रिक सत्य आहे. आज आपल्याकडे जेव्हा शिक्षण हा विषय विकेंद्रीकरणामुळे जिल्ह्यात गेला आहे त्या वेळी तर या वचनाची तीव्रतेने जाणीव व्हावी.

## चालू प्रशिक्षणातील उणिवा

असे आजचे सर्वसामान्यपणे माध्यामिक शिक्षकाच्या प्रशिक्षणाची अवस्था आहे. आपल्याकडे आलेल्या आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ज्ञांच्या संघाने प्रशिक्षणाची पाहणी केल्यावर त्यातील महत्त्वाच्या उणिवा दाखविल्या. त्या उणिवा व एकसूत्रीकरण समितीने दाखविलेल्या उणिवा यांचा विचार केल्यास व प्रत्यक्ष प्रशिक्षित शिक्षकाचे शाळेत कार्य पाहिल्यास मला खालील उणिवा स्पष्टपणे दिसतात—

* शिक्षकाला अध्यापनाबाबत आत्मविश्वास वाटेल, अध्यापनाच्या विविध पद्धतींचा अवलंब करायला तो स्वयंस्फूर्ततेने पुढे सरसावेल अशी अध्यापनाची त्याची तयारी होत नाही.

* अध्यापक-विद्यालये व माध्यमिक शाळा यांच्यातील कार्यात कोणत्याच

प्रकारे समन्वय प्रत्यक्षपणे किंवा दैनंदिन कार्यात किंवा प्रयोगरूपाने स्वतंत्रपणे साधलेला दिसत नाही.

* अध्यापक-विद्यालयातील साहित्य, शिक्षकवर्ग, इमारती यातील अपूर्णता कित्येक ठिकाणी थोडीही उपेक्षा होऊ नये अशी असते.
* एस्. टी. सी. सारख्या परीक्षांना सध्या भरपूर शिक्षक बसतात व उत्तीर्णही होतात. या शिक्षकांना मिळणारे प्रशिक्षण म्हणजे त्याचे केवळ विडंबन आहे. शिक्षक विद्यार्थी संबंध जवळ जवळ नसतातच; ग्रंथालये या संस्थात फारशी चांगली नसतात; असलीच तर विद्यार्थ्यांना तेथे जायला व पुस्तके घेऊन वाचायला सवड नसते.
* अध्यापन-पद्धतीसाठी घेतलेल्या दोन विषयांचेही ज्ञान त्या शिक्षकांना फार जुजबी — पाठ घेण्यापुते – असते.
* काही विषयांचे शिक्षक आज या विद्यालयातून फार थोड्या प्रमाणात तयार होतात — काही तांत्रिक विषय, शेती, गृहजीवन शास्त्र, हस्त-व्यवसाय, कला व संगीत या विषयांची सोय बी. टी. व एस्. टी. सी. सारख्या परीक्षांसाठी सरकारने व विद्यापीठांनी करायला पाहिजे.
* शिक्षकांना प्रशिक्षणासाठी प्रवृत्त करील अशा योजनांचा अभाव आहे.
* विद्यालयात शिकलेल्या अध्यापन-पद्धतींचा शाळेत प्रत्यक्ष शिकवायला फारसा उपयोग होत नाही, असा शिक्षकांमध्ये असलेला गैरसमज.
* प्रशिक्षणाच्या बाबतीतही परीक्षांचा अहितकारक परिणाम झाला आहे. आणि त्यामुळे प्रशिक्षित शिक्षकांचे शैक्षणिक सिद्धान्ताचे ज्ञान पुष्कळ वेळा वरवरचे असल्याचे आढळून येते.

**प्रशिक्षणाची नवी दिशा**

भारतातील शिक्षणाची समस्या फार मोठी आहे. लोकशाही राज्यपद्धति स्वीकारल्यावर समाजाचे शिक्षण होणे अगत्याचे असते. ते योग्य प्रकारे झालेले नसले तर पक्षीय हुकूमशाहीला वाव मिळणे शक्य आहे. पण समाजाला शिक्षण देण्यापूर्वी त्यांना सुशिक्षित करणाऱ्या शिक्षकाचे शिक्षण कोणत्याही विकासक्षम राष्ट्राने प्रथम हाती घेतले पाहिजे. राष्ट्राची उभारणी

ज्या पद्धतीने करावयाची व त्याने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणकोणत्या तत्त्वांचा अवलंब करावयाचा याची निश्चिती करणेही प्रथम आवश्यक असते. भारतीय लोकशाही राज्यघटना व तिच्या योगे प्रस्थापित होणारी–होऊ शकणारी समाजवादी समाजरचना यांचा परिणाम शैक्षणिक क्षेत्रातही झाल्याशिवाय राहणार नाही. राष्ट्रीय एकात्मता, व्यक्तित्वाचा अधिकात अधिक विकास व द्वेषविरहित आंतरराष्ट्रीय व्यवहार या गोष्टी साधतील अशी योजना सर्व क्षेत्रात देशाने स्वीकारली पाहिजे; प्रत्येक भारतीय व्यक्ति सामर्थ्यवान बनेल असा शैक्षणिक कार्यक्रम आखला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीची कार्यक्षमता ही देखील विकसित होऊन राष्ट्रकार्याला व परिणामतः मानव-जातीच्या विकासाच्या कार्याला तिचा उपयोग होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. या गरजा केवळ आजच्या आहेत असे नव्हे; कोणत्याही काळी देशाच्या या गरजा असणारच आणि म्हणून आपल्या प्रशिक्षणाच्या बाबतीत काही बदल करून आपण आपले शिक्षक तयार करून घेतले पाहिजेत.

### प्रशिक्षणाचे काही प्रकार

आज आहे त्याप्रमाणेच हे प्रशिक्षण मुख्यतः दोन प्रकारचे पदवीधरांसाठी व शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांसाठी–असावे. ग्रामीण भागात, आदिवासी भागात व शहरी भागात काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रशिक्षणात फरक असावा काय, असाही एक मतभेदाचा प्रश्न आहे. भारतातील शैक्षणिक कार्य सर्वत्र समपातळीवर येईपर्यंत असा फरक असणे इष्ट आहे. माझ्या मते खालील सुधारणा घडवून आणणे फार आवश्यक आहे.

( १ ) शैक्षणिक व्यवसायात शिरू इच्छिणाऱ्या व्यक्तींची योग्य अशी निवड झाली पाहिजे. त्यासाठी, पूर्वीच्या–या शतकाच्या प्रारंभी काली प्राथमिक शालान्त उमेदवार शिक्षक घेतले जात. वर्षभर ते तेथे काम करीत; मुख्याध्यापकाडून त्यांना मार्गदर्शन होई आणि नंतर प्रशिक्षणासाठी ते निवडले जात. अशी योजना माध्यमिक शिक्षणात आज अवश्य स्वीकारावी. ज्या शाळेत प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे अशा शाळात उमेदवार शिक्षक घेण्याची योजना करावी. १०-१२ शिक्षकांस एक उमेदवार शिक्षक अशी त्यांची संख्या असावी. वर्गातील अध्यापनाचे तंत्र

त्याने तेथे असताना अभ्यासावे. मुलाचे मन त्याला संपूर्णपणे जरी समजले नाही तरी त्याच्या विकासाला आड येईल असे आपण करू नये एवढे प्रात्यक्षिक ज्ञान त्या उमेदवार शिक्षकाला शाळेतील या एका वर्षात व्हावे. या उमेदवार शिक्षकाना त्यांचा वैयक्तिक खर्च भागेल अशा प्रमाणात अध्यापन-वेतन ( Stipend ) सरकारने द्यावे. यानंतर हे उमेदवार जर अध्यापक विद्यालयात प्रशिक्षणासाठी गेले तर त्यांचा प्रात्यक्षिक कार्याचा पाया चांगला भरला गेला असल्यामुळे, तेथील अध्यापनपद्धतीचे आकलन त्यांना प्रथमपासूनच होऊ लागेल.

अशा उमेदवारी केलेल्या शिक्षकांसाठीही निदान दोन वर्षांचा अभ्यासक्रम असावा असे मला वाटते. पण तूर्त देशापुढे जी समस्या आहे ती सोडविण्याच्या दृष्टीने एका संपूर्ण वर्षाचा–निदान दहा महिन्यांचा–अभ्यत्सक्रम त्यांच्यासाठी असावा. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांत शिक्षकाला आवश्यक असणाऱ्या इतर अनेक गोष्टींचा अंतर्भाव करता येईल. मुदलियार-कमिशनच्या अहवालातील शिफारसही अशी दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची आहे.

( २ ) दुसरी योजना अशी तयार करता येईल की, शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एक एस्. टी. सी. सारखा एक वा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पदवी न मिळवू इच्छिणारांसाठी. पदवी मिळवू इच्छिणारासाठी महाविद्यालयातील पदवीपरीक्षेसाठीच ‘ अध्यापन व शिक्षण ’ असा विषय ठेवून तो तीन वा चार वर्षांचा अभ्यासक्रम या शिक्षकांनी पूर्ण करावा. यामुळे, ज्यांना अध्यापकाच्या व्यवसायाची आवड आहे अशी माणसे या क्षेत्रात कार्य करायला उपलब्ध होतील. त्यांच्या अभ्यासक्रमात मुख्यतः पुढील गोष्टींचा अंतर्भाव व्हावा—

* शैक्षणिक मानसशास्त्र व तत्त्वज्ञान.
* अध्यापनाच्या पद्धति—दोन वर्षे प्रात्यक्षिक ज्ञान.
* मुलांच्या सर्वांगीण विकासाला आवश्यक असणाऱ्या अनेक अवांतर हालचालींपैकी काहींचे यथायोग्य ज्ञान.
* अध्यापनासाठी निवडलेल्या दोन शालेय विषयांचा–ही संख्या आज तीन स्वीकारली तरी चालेल—अभ्यास.
* शालेय व्यवस्था.

अशा प्रकारे अध्यापनशास्त्राची पदवी घेतलेले शिक्षक चार वा पाच वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे असे असतील. यांना उमेदवार शिक्षक म्हणून कार्य करण्याची आवश्यकता वाटणार नाही. पदवी परीक्षेनंतरही ही परीक्षा बाहेरची नसावी; अंतर्गतच असावी–काही काल सक्तीने एखाद्या चांगल्या शाळेत त्यास कार्य करावे लागल्यास अधिक चांगले. पण आजच त्याची आवश्यकता नाही.

( ३ ) ग्रामीण शिक्षक तयार करण्यासाठी अशाच प्रकारे परीक्षेचा अभ्यासक्रम ठेवणे शक्य आहे. गारगोटी येथील विद्यालयाने असा कार्यक्रम तयारही केला होता. तो महाविद्यालयातील पहिले वर्ष संपल्यावर तीन वर्षांचा होता. त्यात इंग्रजी, अध्यापनाचे शास्त्र व पद्धति, समाजविकास, शालेय विषयापैकी कोणतेहि दोन विषय अशा विषयांचा अंतर्भाव केला होता. माझ्या दृष्टीने यांत शैक्षणिक मानसशास्त्र व तत्त्वज्ञान याचा समावेश असावा. हाही अभ्यासक्रम तीनऐवजी चार वर्षांचा ठेवल्यास उत्तम होईल आणि आपल्याला ग्रामीण भागात ज्या प्रकारचे अध्यापक हवे आहेत तसे अध्यापक या विद्यालयांतून तयार होतील.

( ४ ) यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट मला जी वाटते ती ही की, अध्यापक-विद्यालयातील शिक्षक-विद्यार्थी यांच्या येणाऱ्या दैनंदिन संबंधाची. हा संबंध अधिक घनिष्ठ असला पाहिजे. शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींवर महाविद्यालयांतील अध्यापकाच्या व्यक्तित्वाचा इष्ट असा परिणाम झाला पाहिजे. या प्राध्यापकाचे ज्ञानमय जीवन त्यांना जवळून पाहायाला व अभ्यासायला मिळायला पाहिजे. आणि म्हणून माझ्या मते अध्यापक-विद्यालयांनी पुढे दिलेले विशेष सर्वत्र अवलंबिले गेले पाहिजे—

* प्रत्येक जिल्ह्याला पदवीधरासाठी एक महाविद्यालय कमीत कमी असावे इतरांसाठी आवश्यकतेप्रमाणे दोन अथवा तीन विद्यालये असावीत.

* प्रत्येक आध्यापक–विद्यालयाला वसतिगृहाची सोय असली पाहिजे. तेथील आवारातच विद्यालयातील अध्यापकांची राहण्याची सोय असणे मार्गदर्शनाच्या दृष्टीने इष्ट आहे.

★ प्रत्येक अध्यापक-विद्यालयाला जोडून एक स्वतंत्र शाळा असावी. विद्यालयातील अध्यापकांनी थोडे तरी अध्यापनाचे कार्य तेथे करावे व हे प्रशिक्षण घेणारांना निरीक्षण करायला मिळावे.

★ प्रत्येक अध्यापक-विद्यालयात खुले ग्रंथालय असावे व तेथे अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी वाचन करावे, टिपणे करावी, आपल्या शालेय जीवनाला आवश्यक वाटणाऱ्या पुस्तकांची यादी करावी, इत्यादि.

या गोष्टींच्या अभावी आजचे प्रशिक्षण वरवरचे तकलुबी व शिक्षण-व्यवसायाबद्दल नावड निर्माण करणारे असे झाले आहे. अध्यापक व शिक्षक-विद्यार्थी यांचे प्रमाणही धोकादायक ठरू शकते. आपणाकडे दिलेल्या शिक्षकांना संपूर्णपणे मार्गदर्शन आपण करू शकू, त्यांच्यात बसून वावरून औपचारिक व अनौपचारिक रीत्या महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा घडवून आणू शकू, आपल्या दैनंदिनीत त्याची सविस्तर नोंद ठेवून त्या शिक्षकांचा विकास कसकसा व्हावा याची योजना आखू शकू असा आत्मविश्वास अध्यापकाला वाटेल असे ते प्रमाण असावे. यामुळेच शिक्षकी जीवनाची आवड निर्माण होऊन पुढील २५-३० वर्षे ते शिक्षक अत्यंत जागरूकतेने विकासक्षमतेने कार्य करून स्वत: गतिमान होतील व त्यांच्या हाताखाली येणाऱ्या विद्यार्थ्यांना ते गतिमान करू शकतील. आज अनेक विद्यार्थी शिक्षकांच्या हाताखालून जातात, पण त्यांतील फार थोडे त्यांच्या हाती लागतात. याला त्या शिक्षकांची आर्थिक परिस्थिती कारण आहेच, पण त्यांना त्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण अध्यापक-विद्यालयात मिळालेले नसते व शाळेतही तसे मार्गदर्शन खऱ्या जिव्हाळ्याने व सहानुभूतीने क्वचितच होते.

( ५ ) शाळेत प्रशिक्षित शिक्षक नोकरीस लागल्यावर त्याला त्या शाळेच्या वातावरणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गदर्शन लाभते. हे मार्गदर्शन करणारे जे तेथील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, तपासनीस, इत्यादि लोक असतात त्यांचेही प्रशिक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. शिबिरे, कृतिसत्रे, परिसंवाद इत्यादींची योजना करून सरकारने याबाबत व्यवस्था केली; पण ही फार तुटपुंजी व्यवस्था झाली. या गोष्टी असाव्यातच पण त्या त्यांच्या प्रशिक्षणानंतरच एकसूत्रीकरण समितीने तपासनिसासाठी अशी योजना असावी अशी शिफारस केली आहे. मुख्याध्यापकासाठी तर ही गोष्ट

खरोखर अपरिहार्य ठरावी. तशी एखादी योजना कार्यवाहीत येईपर्यंत शाळेत येणाऱ्या नवीन प्रशिक्षित शिक्षकाला मार्गदर्शन करण्याबाबत मुख्यतः खालील गोष्टी असाव्या—

* शाळेतील चांगल्या शिक्षकांचे व स्वतः मुख्याध्यापकांचे पाठ पाहण्याची संधी त्यास मिळावी.
* शाळेत एखादे अध्यापक-मंडळ वा शिक्षकसभा असावी. या सभेमार्फत शैक्षणिक विषयावरील चर्चा व्हाव्यात, एखाद्या पुस्तकाचें प्रत्येक शिक्षकाने वर्षातून निदान एकदा या सभेपुढे परीक्षण करावे वा त्याचा परिचय करून द्यावा.
* शिक्षणविषयक तत्त्वज्ञान व शाळेतील दैनंदिन जीवन यांचा मेळ कसा बसू शकतो याचे विवेचन शिक्षकांच्या सभातून मुख्याध्यापकाने केले पाहिजे.
* योजनाबद्ध कार्यक्रम म्हणजे काय याचे दर्शन या शिक्षकाला शाळेत सर्व बाबतीत—अभ्यासक्रमाची आखणी, लेखी व तोंडी कार्य, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, दैनंदिन अध्यापन, शालेय परंपरा इत्यादि झाले पाहिजे.

यापेक्षा आणखीही अनेक गोष्टी अशा आहेत की, या प्रशिक्षित शिक्षकाचे त्याबाबत खरे प्रशिक्षण शाळेतच होत असते. याची जाणीव व्हावी, कार्याची योग्य दिशा समजावी, शिक्षकांना व मुलांना मार्गदर्शन करायला सिद्धता व्हावी या सर्व दृष्टींनी मुख्याध्यापकाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. केवळ पाच वर्षांची नौकरी केल्याने ही योग्यता सर्व मुख्याध्यापकांना लाभेल असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल.

अशा प्रकारे आपली प्रशिक्षणाची योजना तयार व्हावी. आजच्या आपल्या अनेक शैक्षणिक समस्या आहेत. शाळांच्या इमारती, क्रीडांगणे, ग्रंथालये, प्रयोगमंदिरे या समस्या तर विराट स्वरूप धारण करून आपणांसमोर उभ्या आहेतच; पण या समस्या सुटल्या व योग्य तो शिक्षकवर्ग लाभला नाही तर शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही; मुलांचा अपेक्षित विकास होणार नाही; आणि भारताला सांस्कृतिक सामर्थ्य लाभणार नाही. माझ्या मते प्रशिक्षणाची समस्या हीच खरी समस्या आहे. भारतात

ध्येयवादी युवकशक्ती उपलब्ध नाही असे नाही; त्यांना मार्गदर्शन करायला लागणारी थोर माणसेही मिळू शकणार नाहीत असे नाही. सरकारने, विद्यापीठांनी व सर्व अध्यापक-विद्यालयांनी यासाठी निश्चित असे धोरण आखले पाहिजे. त्यासाठी पुरेसा खर्च करण्यास सरकारने -- म्हणजेच समाजाने-तयार झाले पाहिजे. आजही काही शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी जिवाचे रान करून हे कार्य करताना आढळतात. ही शक्ती एकवटली पाहिजे; अनेक ध्येयवादी युवकांना या व्यवसायाकडे आकृष्ट करून घेतले पाहिजे व त्यांच्या प्रशिक्षणानंतर आपल्या राष्ट्रातील शिक्षणाची पुनर्रचना करून घेतली पाहिजे. यासाठी सरकारने बद्धपरिकर होऊन हा विषय ' युद्धकालीन विषय ' समजून त्याची आखणी केली पाहिजे.

चांगले प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध झाले की, शिक्षणातल्या इतर समस्या जाड स्वरूपाच्या असल्यामुळे लवकर सुटतील. मुलांतील ' माणूस ' विकसित करायला ज्ञानी, प्रयोगशील व संतुष्ट असा शिक्षकवर्ग उपलब्ध असायला हवा. हे माझ्या मते प्रशिक्षणाचे खरेखुरे उद्दिष्ट असावे.

मराठा ... स्थळप्रत.
अनुक्रम ३६२२०
... १४८२ ... नो. दि. ...

# माध्यमिक शाळांतील धर्मशिक्षण

. ८.

डॉ. प्र. न. जोशी
एम्. ए., पीएच्. डी.

डॉ. आर्च्. ओ हेक् या माझ्या एका अमेरिकन मित्राचे गेल्या आठवड्यात आलेले एक विस्तृत पत्र या वेळी माझ्यासमोर आहे. डॉ. हेक् हे ओव्हायो स्टेटमधील कोलंबस येथील विद्यापीठाच्या सेवेतून नुकतेच निवृत्त झाले आहेत. चार वर्षांपूर्वी मी अमेरिकेत असताना आमच्या कार्यक्रमांचे ते सर्वाधिकारी होते. सत्तरीच्या घरात आलेल्या या प्राध्यापकाचा उत्साह व कामाचा उरक आम्हा तरुणांना लाजविणारा होता. त्यांना शिक्षणशास्त्र पूर्ण अवगत होतेच; आणि नवी समाजरचना, विज्ञानाचा प्रभाव, यांत्रिक जीवन, मानवी जिण्यास आलेले बाजारी स्वरूप, आसुरी युद्धखोरीमुळे जगात हरघडी उफाळणाऱ्या ज्वाला इत्यादि आधुनिक संकटातून मानवी जीवन सुसह्य व रसदार होईल ते धर्माच्या आश्रयानेच अशी त्यांची निष्ठा होती. धर्मकल्पनेचा अर्थ येथे निश्चित होता. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे असल्याने सर्वत्र बंधुभाव हा धर्माचा एक प्रमुख आधार मानला जात होता. आणि जो कोणी सृष्टीचा नियंता आहे त्याशी नाते जडविण्याचा वा जे जडलेलेच आहे त्याचा अल्पसा प्रत्यय घेण्याचा प्रयत्न, दिवसास थोडा वेळ तरी आपले मन आतल्या आत मुरडून, प्रत्येकाने करावा असे त्यांना मनापासून वाटे. निदान दर रविवारी तरी तास दीड तास प्रत्येकाने चर्चमध्ये घालवावा असा त्यांचा आग्रह असे.

माझ्यासमोर असलेल्या पत्रात डॉ. हेक् यांनी आपल्या मेथॉडिस्ट चर्चचा कारभार कसा चालला आहे याचेच सविस्तर वर्णन केले आहे. या पत्राच्या तीन-चारशे प्रती त्यांनी सर्व जगातील आपल्या मित्रांना पाठविल्या आहेत. पत्रातील प्रत्येक ओळीत ख्रिश्चन धर्माचा अभिमान प्रकट होत आहे. मानवी जीवनाचे अंतिम साफल्य धर्मश्रद्धेवर कसे अवलंबून आहे याचेच जणू दर्शन या पत्रात आहे. पत्राच्या प्रारंभी हिरोशिमाचे प्राध्यापक बन्सॅकू यांच्या दुःखद निधनाचे वृत्त आहे. त्यानंतर प्राध्यापक बन्सॅकू हे आपल्या घरी कसे आले, त्यांनी कोणते संशोधन केले, ते खऱ्या अर्थाने ख्रिश्चन कसे बनले याचे मोठ्या आत्मीयतेने त्यांनी वर्णन केले आहे. प्राध्यापक बन्सॅकू यांची मुलगी योको ही मी ज्या वेळी डॉ. हेक् यांच्या परिवारात होतो त्या वेळी अमेरिकेत होती. तीही ख्रिश्चन झाली होती. तिचे आणि तिच्या वडिलांचे वर्णन करताना डॉ हेक् यांनी लिहले आहे, " Bansaku was a fine Christian gentleman; he loved his family; his daughters were the 'Jewels of his eye.' "

यानंतर डॉ. हेक् यांनी चर्चचे विविध व्यापार व नवीन योजना यांचे विवेचन केले आहे. मिशनऱ्यांचे कार्य कसे चालले आहे, त्यांत मेथॉडिस्ट चर्चचा काय वाटा आहे, युवक, प्रौढ व वृद्ध यांना धर्मशिक्षणाची काय आवश्यकता आहे, ख्रिश्चन लीडरशिपसाठी प्रभावी प्रयत्न कसे केले जात आहेत, चर्चच्या सान्निध्यात गावातील तरुण स्त्री-पुरुष रविवारी संध्याकाळी जमून कोणता कार्यक्रम करतात, कुटुंबातील विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न चर्चमार्फत कसा केला जातो, पतिपत्नींनी परस्परांच्या सहकार्याने अखंडपणे एकत्र कसे राहावे, त्यांच्या देखरेखीखाली मुलांची वाढ कशी व्हावी, भावनिक, मानसिक व यामुळे शारीरिक पीडा होत असल्यास तीपासून बचाव कसा करावा, इत्यादि महत्त्वाच्या बाबतीत चर्च कशी मदत करीत असते याचे मोठे उद्बोधक वर्णन या पत्रात आहे. या विशिष्ट चर्चची त्या गावची सभासद-संख्या या वर्षी ४२०० आहे. त्यांच्याकडून आलेल्या मदतीतून वरील सर्व कार्यक्रम नीटपणे व्हावेत म्हणून दोन लक्ष सतरा हजार डॉलर्सचे बजेट मंजूर झाले असल्याचे डॉ. हेक् यांनी लिहिले आहे. हे सर्व आपण जगातील आपल्या मित्रांना का लिहितो याविषयी सांगताना त्यांनी

पत्राच्या शेवटी लिहिले आहे; " I thought my friends like to know what the Christain Churches are doing in an effort to help people solve their problems and to achieve a happy life here on this earth. " या बुद्धिवादी विज्ञानयुगात धर्माच्या आश्रयाने माणसास सुखाचे दिवस लाभतील, त्याच्या रोजच्या जीवनातील शेकडो धारदार प्रश्नांची टोके बोथट होतील अशी त्यांची बुद्धि-निष्ठ श्रद्धा आहे.

## लहान गोष्टींतील महान आशय

डॉ. हेक् यांचे वरील सहा पानांचे पत्र वाचून मी सुन्न झालो आहे. गेले आठ–दहा दिवस मी इतस्ततः वावरणाऱ्या आमच्या माध्यमिक शाळातील तरुणांच्या वर्तनाचा विचार करतो आहे. आमच्याकडे स्वातंत्र्या-नंतरच्या काळात मुलांच्या मनावर कोणते संस्कार केले गेले आहेत ? शाळा-कॉलेजातून मिळणाऱ्या लौकिक शिक्षणाचा आणि धर्माचा कांही संबंध असावा हे आता कोठे आमच्या ध्यानी येऊ लागले आहे. पण गेली कित्येक वर्षे आमची मुले धर्मशिक्षणापासून वंचित झाली आहेत हे तितकेच खरे आहे. सेक्युलॅरिझमच्या भ्रान्त आणि अतिरेकी कल्पनेमुळे लौकिक शिक्षण आणि धर्म यांची आम्ही कायमची फारकत करून ठेविली आहे. जुन्या शिक्षणाचा मूलभूत पाया धर्मश्रद्धा हाच होता आणि धर्मकल्पनेवर आधारलेले शिक्षण प्राचीन काळी गुरुगृही त्यांच्या आश्रमात पाठशाळेत मिळत असे. जुन्या काळी आमची घरे या दृष्टीने किती चांगली होती. चांगले आणि संस्कारसंपन्न घर हे धर्मशिक्षणाचे आदिपीठ असते. आज आम्हांस खऱ्या अर्थाने घरेच नाहीत. 'दहा बाय् बारा' च्या सीमेत आम्ही विटांवर विटा रचल्या असून तेथे फक्त निवाऱ्याला कसे तरी आहोत. या ठिकाणचे स्त्री-पुरुष पोटाच्या चिंतेने दिवसभर वणवण करून अर्थसाधनाच्या व्यापात असतात. त्यांची मुले कधी शाळांत, कधी रस्त्यावर, कधी भलत्या संगतीत भटकत असतात. प्रातःस्मरण, भूपाळी, देवपूजा, आरती, स्तोत्रपठण यातील काहीही उरले आहे असे वाटत नाही. धर्मग्रंथाचे वाचन, मनन यांना रजा मिळाली आहे. स्वतःखेरीज जगात कोणी

आदरणीय आहे, कोणावर तरी आपण निष्ठा ठेवावयास हवी, वडील माणसे व गुरुजन यांच्याबद्दल आदराची भावना असावी, अशी शिकवणच कोणी देईनासे झाले आहे. तशा प्रकारचे आदर्शही नाहीत. सकाळी, संध्याकाळी पाच दहा मिनटे का होईना देवापुढे नम्र होण्याची सवय लहानपणी जडणे फार अगत्याचे आहे. पुढे वयात आल्यानंतर देव आहे की नाही याची तात्त्विक चर्चा काहींनी करावी, पण लहानपणी जडलेली सवय इतरत्रही उपयुक्त होईल. प्रत्येक वस्तूत ईश्वरी अंश असल्याची शिकवण जुन्या काळी असल्यामुळे आदळआपट करणे, लाथाडणे, अनादर करणे असे प्रकार नव्हते. एकंदर वागण्यातच एक प्रकारची मर्यादा होती. साध्या वस्तूंच्या उपयोगाबद्दल कृतज्ञतेची भावना होती. पुस्तकाला, पोथीला पाय लागताच मन कचरत असे. दिव्याला हळुवारपणे निरोप दिला जात असे. केरसुणीला लक्ष्मी मानले जात असे. या सर्व दिसावयास क्षुल्लक गोष्टी असत, पण त्यांच्या जाणिवेने संपन्न झालेले मन इतर क्षेत्रात सावध असे. जड वस्तूस पवित्र मानणारा माणूस दुसऱ्या माणसास सहसा ठोसा देणार नाही, एकदम एकेरीवर येणार नाही, एकदम बावरा होणार नाही. धर्मग्रंथाच्या साह्याने मिळणाऱ्या नीतिधर्मांच्या शिक्षणातून जुन्या घरी हे शिक्षण मिळत असे.

परंतु आता जमाना पालटला आहे. आता घर अधिक देखणे झाले तरी त्याचा घरपणा गमावला आहे. पूर्वी रामायण-महाभारतातील कथा, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, यातील आख्याने यांचे संस्कार मुलांच्या मनावर होत असत; आता अनेक प्रकारचे बालवाङ्मय ‘ गवता ऐसे उदंड ’ वाढले आहे. पूर्वी स्तोत्रे, अष्टके, भूपाळ्या, आरत्या मुलांच्या कानावर पडत असत; आता रेडिओवरील सिनेसंगीताची एकसारखी चटक मुलांना व कित्येकदा त्यांच्या आईलाही लागलेली दिसते. पूर्वी घराभोवती तुळस, बेल, उंबर यांची जोपासना होत असे; आता बिनवासाची रंगीबेरंगी विलायती फुले व नाना प्रकारचे निवडुंग यांची हौस वाढली आहे. आता घरे सजतात ती मऊ मऊ कुशनच्या सोफा सेटने, नाजुक फर्निचरने, रेडिओने, टेलिफोनने, पण या सर्वांना शोभा आणणारे देवघर आज नाहीसे झाले आहे. जेथे थोडे दिसते तेथे केवळ देखाव्याचा भास. या

घरातील मुलांना धर्मनीतीचे शिक्षण कोण देणार ? त्यांच्या आईस व बापास त्याचे महत्त्व वाटते काय ? मुले समोर आहेत हे समजून त्यांचे आचरण असते काय ? धर्मग्रंथाची ओळख आई-बापांना तरी असते काय ? साधुसंतांची चरित्रे यांचा आदर या घरातून होतो काय ? घरांना घरपणा या दृष्टीने राहिलेला नाही. बाहेरच्या पाठशाळा बंद पडल्या, देवळे ओसाड झाली, शाळा-कॉलेजातून धर्मशिक्षण कायद्याने देता येईनासे झाले आहे.

## मनाच्या मशागतीची व्यवस्था नाही

वयात येणाऱ्या आजच्या तरुण मुलांचे मन यामुळे संभ्रमात आहे. जे शिक्षण तो घेत आहे त्यावर याचा विश्वास नाही. रोजच्या वृत्तपत्रात, पुढाऱ्यांच्या भाषणात, आजच्या वाङ्मयात, नाटकात, चित्रपटात तो सारे निराळेच वाचत असतो, पाहात असतो; आणि हे निराळे जग सवयीने त्याच्या परिचयाचे होते, तेच खरे असे त्यास वाटू लागते. खून, मारामाऱ्या, दरोडे, अब्रूनुकसानीचे खटले, आत्महत्या, विनयभंग, सामाजिक व राजकीय भ्रष्टाचार, लाचलुचपत यांचाच वर्षाव त्याच्या मनावर होत आहे. वर्तमानपत्र तो वाचतो ते अग्रलेखासाठी नाही, तर या गोष्टींची चव घेण्यासाठी; घरीदारी दिसणारा, रस्त्यातून हिंडताना नजरेत येणारा, वेडावाकडा शृंगार त्याचे मन बिथरवणारा आहे. आपली मुले शिकतात चित्रपटगृहामध्ये हेच खरे मानावे. 'अवर मून्हीमेड चिल्ड्रन' हे पुस्तक या दृष्टीने वाचण्यासारखे आहे. योग्य वेळी त्यास धर्मशिक्षण मिळाले असते किंवा तसे आदर्श त्याच्यासमोर असते तर त्याची ही संभ्रमित अवस्था झाली नसती. पण या तरुण मुलांच्या मनाच्या जोपासनेकडे कोणाचे लक्ष गेले आहे ? तिसरी पंचवार्षिक योजना सिद्ध झाली आहे; नवे कारखाने, नवे उद्योगधंदे, नवे व्यापार, नवी धरणे, नवी विद्युत्-केंद्रे, नवीन विज्ञानमंदिरे उभारली जातील; पण हा सर्व खटाटोप ज्या माणसासाठी त्याचे मन संस्कारसंपन्न व्हावे, त्याच्या मनास इष्ट ते वळण लागावे. विज्ञानाचा हितकारी उपयोग त्याला समजावा, 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' ही श्रद्धा त्याच्या मनात बळावली जावी, श्रद्धास्थानाबद्दल त्याच्या मनात आदर निर्माण व्हावा; विनय, चारित्र्यसंपन्नता, सचोटी, सत्यप्रियता,

सहिष्णुता इत्यादि गुणांचे बीजारोपण त्याच्या मनात योग्य वेळी व्हावे किंवा थोडक्यात म्हणजे त्याच्या मनाची मशागत योग्य ती व्हावी म्हणून कुठे आहेत योजना ?

आणि अशी योजना नसल्यामुळे मुलांना शिक्षणापासून जे फायदे व्हावेत असे आपण म्हणतो त्याचा पत्ताच नसतो. बाह्य परिस्थितीतील आराजक त्याच्याही मनात घर करून असते. बनवाबनवी, खोटेपणा, काळा बाजार, पैसेखाऊ वृत्ती, शांततेने व विचाराने काही न ठरवता एकदम आततताई-पणा करून हुल्लड उठवणे, वृथा धाक देणे, अन्यायाने वागणे, साध्या माणुसकीस पारखे होणे यांचे धडे मोठ्या माणसापासून त्यांनी गिरवलेले असतात. आणि मग शाळा-कॉलेजमध्ये दंगली होतात, एन्. सी. सी. च्या विद्यार्थ्यांकडून मुलींची थट्टामस्करी होते, थोडे निमित्त होताच गुरुजनांवर हात टाकला जातो, वार्षिक परीक्षांवर बहिष्कार टाकला जातो, विद्यापीठे बंद ठेवावी लागतात, केंद्रीय सरकारतर्फे भरणारे युवक क्रीडा महोत्सवा-सारखे उपक्रम सोडून द्यावे लागतात, सर्व सत्ताच विद्यार्थी आपणाकडे मागण्याचे धाडस करू इच्छितात. उस्मानिया विद्यापीठ काही दिवस बंद ठेवण्याचा निर्णय मग करावा लागतो. बनारसवर हाच प्रसंग काही दिवसां-पूर्वी आलेला होता. आसामचे मुख्यमंत्री चलिहा गौहत्तीस येताच शाळा कॉलेजच्या आठ-दहा हजार विद्यार्थ्यांचा गराडा त्यांच्याभोवती पडतो, पादत्राणे व दगड यांचा मारा होतो, गाडीच्या काचा फुटतात व मुख्य-मंत्र्यांना जखमा होतात. विश्वभारतीसारख्या नावाजलेल्या संस्थेशी संलग्न असलेल्या काही संस्था बंद ठेवाव्या लागतात. ही स्थिती कालची परवाची आहे. या मुलांच्या पाठीमागे मोठी माणसे असतातच. हे काही ताजे नमुने दिले आहेत. दर वर्षी अशा नमुन्यांची भेट आपणास वृत्तपत्रात होतेच. अराजकाच्या मार्गावर चाललेल्या या विद्यार्थ्यांना योग्य मार्गावर आणण्या-साठी जे उपाय सांगितले जातात त्यात धर्मशिक्षणाच्या उपायाचे महत्त्व विशेष मानावे लागेल.

### धर्मशिक्षणाचे विविध प्रयोग

पाश्चात्त्य देशात काय किंवा आपल्याकडील देशात काय पूर्वीच्या काळी शिक्षणात धर्मास प्राधान्य असे. इंग्रजी राजवट आपणाकडे येईपर्यंत

शिक्षणाच्या धार्मिक अंगासच महत्त्व होते. युरोपमधील ग्रीक परंपरेत शिक्षणाला विशेष स्थान असे. पुढे ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर शिक्षणाच्या या अंगाने चांगलेच बाळसे धरले. इस्लामच्या परंपरेत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर धर्माचा तीव्र ठसा असे. पुढे तेराव्या-चौदाव्या शतकापासून धर्माचे विकृत रूप सुधारावे म्हणून सुधारणेच्या चळवळी सुरू झाल्या. विज्ञान-विकासास गति मिळाली, भौगोलिक क्षितिजे कल्पनेबाहेर वाढली, व्यक्ति-स्वातंत्र्य, बुद्धिवाद इत्यादि तत्त्वांचा विजय होत राहिला. निरनिराळ्या धर्मांच्या बाह्य रूपांवरून झालेल्या कटकटीस कंटाळून खऱ्या धर्मासच माणसाने हद्दपार करून टाकले. जॉन लॉक, रूसो यांसारख्या विचारवंतांनी धर्मनिरपेक्ष अशा सार्वजनिक जीवनाचे, शिक्षणाचे स्वरूप उभे केले. अमेरिकेसारख्या उगवत्या राष्ट्रात अनेक धर्मांचे व धर्मपंथांचे लोक एकत्र राहण्याचा प्रसंग आला तेव्हा तर व्यक्तीचे धर्मस्वातंत्र्य मान्य करूनही लोक, सरकार व धर्मशिक्षण यांची फारकत झाली. ज्या शाळात सर्व धर्मांची मुले आहेत व ज्या सरकारी मदतीवर चालल्या आहेत त्यांस धर्मशिक्षणास कायद्याने बंदी झाली. चर्च आणि स्टेट यांचे संबंध एकदम दुरावले. धर्म ही खाजगी बाब झाली. सार्वजनिक जीवनात तिचा संचार बंद झाला.

पण हे स्वरूप फार काळ टिकू शकले नाही. धर्मविरहित असे माणसाचे जीवित कसे भयाण असू शकते याची चांगली जाणीव दोन महायुद्धांनी करून दिली. बुद्धी व विज्ञान यांचे सामर्थ्य लंगडे आहे असे पटू लागले. विज्ञानाचे नवे सिद्धान्त तत्त्वज्ञानाची भाषा बोलू लागले. आपली मर्यादा नीटपणे ओळखू लागले. इतकेच नव्हे तर धर्माने आमच्या मदतीस यावे, धर्माविना आम्ही अपुरे आहोत, असे विज्ञानशास्त्रीच म्हणू लागले. विज्ञानाचा व प्रखर बुद्धीचा योग्य तो उपयोग धर्माने शिकवावा असे प्रतिपादन होऊ लागले. एकदा तर आईन्स्टीनसारख्या युगप्रवर्तकानेच म्हटले की, ‘ Science without Religion is lame, religion without science is blind.’ (‘Ont of My Later Years’, p. 28). विज्ञान आणि धर्म यांच्या परस्पर सहकार्याची जाणीव फार मोठ्या प्रमाणा-वर झाली. केवळ मानवी बुद्धीच्या पलीकडे असणारे विश्व अफाटपणे पसरले आहे त्याचा शोध कोण घेणार ? चंद्रावर व शुक्रावर जाण्याची

इच्छा करणाऱ्या माणसास आपल्या अद्भुत अशा मनाचे धागेदोरे तरी स्पष्टपणे कोठे उकलले आहेत ? म्हणूनच विज्ञानशास्त्र, समाजशास्त्र, वैद्यक, मानसशास्त्र इत्यादि शाखांतील पंडित धर्मप्रेरणेचा अभ्यास पुनः करू लागले. खऱ्या शुद्ध धर्माची स्थापना पुनः अत्यावश्यक वाटली. याच गरजेतून संडे स्कूलची कल्पना प्रबळ झाली. मोठमोठी चर्चेस स्वतःची कॉलेजे, स्वतःची विद्यापीठे यांचा प्रपंच थाटू लागली. चांगले विद्यार्थी याच परंपरेतून चमकू लागले. सन १९४४ मध्ये तर इंग्लंडने कायदा करून आपल्या शाळातून धर्मशिक्षण चालू केले. जगातील बहुतेक प्रगत देशात या नाही त्या मार्गाने धर्मशिक्षणाचे महत्त्व जाणत्यांनी ध्यानात आणले आहे.

इंग्लंडमधील शिक्षण-विषयक कायद्यातील २५ व्या परिच्छेदात म्हटले आहे, ' The school-day ..shall begin with collective worship on the part of all pupils in attendence and that religious instruction shall be given in every country school and in every voluntary school.' झेकोस्लोव्हाकिया या समाजवादी राष्ट्रानेही पुढीलप्रमाणे धर्मशिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. ' The school shall be liable to care for the religious instruction of children in accordance with their religious faith. ' ज्या त्या धर्मपरंपरेस अनुसरून ज्यांना त्यांना धर्मशिक्षण मिळावे असाच सूर आज सर्व पुढारलेल्या राष्ट्रातून आहे. अमेरिकेत धर्मशिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण दिवसेदिवस कसे वाढत आहे हे मी तेथे असताना उपलब्ध असणाऱ्या संख्यांवरून समजून येईल. खालील संख्या रविवारच्या शाळांची आहे.

| सन | धर्मशिक्षण देणाऱ्या शाळा | एकंदर विद्यार्थी |
|---|---|---|
| १९२६ | १,८४,६८६ | २३,२०६,३७४ |
| १९४१-४२ | २,१३,४२४ | २४,१००,७१० |
| १९५० | २,४६,२४० | २९,७७५,३५७ |
| १९५३ | २,६२,०८४ | ३५,३८९,४६६ |

याशिवाय निरनिराळ्या चर्चेसनी चालविलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या निराळीच. जेथून आपण ऐहिकतेचा

बडेजाव पत्करला, जेथून आपण धर्मनिरपेक्षतेची कल्पना उचलली, जेथून आपली शिक्षणप्रणाली आकार धारण करीत आहे तेथली अवस्था ही अशी आहे.

## भ्रान्त आम्हा का पडे ?

आणि आपण मात्र भ्रान्त बनलो आहोत. नकोत त्या घातक बाबींचे झपाट्याने आपण अनुकरण करीत आहोत. येथे कुणाला कसली जाणीवच नाही. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, गीता यांचा हा देश राम, कृष्ण, गौतम बुद्ध, तुळसीदास, कबीर, चैतन्यदेव, नरसी मेहता, मीरा, ज्ञानदेव, तुकाराम, त्यागराज, पुरंधरदास यांचा हा देश. या देशाच्या मातीतून व देवादिकांच्या व संतमहात्म्यांच्या उपदेशामृताचे झरे पाझरत आहेत. येथल्या गंगा-यमुना, कृष्णा-गोदावरी, कावेरी-तुंगभद्रा या नद्यांचे पाणी धर्मभावनेने मंतरलेले आहे. येथली निसर्गसंपत्ती ईश्वराच्या स्पर्शाने टवटवीत झालेली आहे. येथून वाहणाऱ्या वाऱ्यात परमेश्वराचे श्वासोच्छ्वास उमटलेले असतात. येथल्या माणसांच्या नसानसातून धर्मभावनेचे रक्त संचारत आहे. पण या करंट्या देशास आज याचे कशाचेच भान नाही. विवेकानंदांच्या, रामतीर्थांच्या या देशास धर्माचे शिक्षण द्यावे असा आग्रह धरण्याची पाळी यावी हे खरोखर दुर्दैव आहे. आज येथे सगळे दुसऱ्याचे भ्रष्ट झालेले, उसने आणलेले आपणाजवळ आपण कवटाळून धरलेले आहे. वापरून निरुपयोगी झालेली जी लक्तरे दुसऱ्याने फेकून दिली ती आपण साजशृंगार म्हणून खांद्यावर मिरवीत आहोत. आपल्या संस्कृतीचा, धर्मांचा, तत्त्वज्ञानाचा, अध्यात्मविचाराचा अभ्यास त्यांनी तिकडे करावा आणि आम्ही इकडे त्यांच्याच चुका आंधळेपणाने कराव्यात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

काही थोडी जाणीव अगदी अलीकडे आपणास झाली आहे. एक तपापूर्वी नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन् यांच्या युनिव्हर्सिटी कमिशनने धर्म-शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष प्रथम दिलेले दिसते. भारतीय राज्यघटने-प्रमाणे सरकारी मदत घेणाऱ्या शिक्षणसंस्थांना धर्मशिक्षण देता येणार नाही. कारण या शाळांत हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन, ज्यू

इत्यादि विविध धर्मांची मुले येणार. तेव्हा या सर्वांना कोणत्या धर्माचे शिक्षण द्यावयाचे ? कमिशनच्या रिपोर्टामधील याविषयीच्या प्रकरणात अशाही परिस्थितीत धर्मशिक्षण कशा प्रकारे देता येईल याचे विवेचन केले आहे. सेक्युलर स्टेटची कल्पनाही अधिक विस्ताराने स्पष्ट केली आहे. सेक्युलर स्टेट म्हणजे निधर्मी राज्य म्हणण्यापेक्षा धर्मनिरपेक्ष राज्य म्हणणे अधिक युक्त मानावे लागेल. ज्या देशात अनेक धर्म आहेत तेथे कोणत्याही एका धर्माचा आधार लोकशाहीच्या सरकारास घेता येणार नाही एवढाच भावार्थ. या कमिशनने धर्मशिक्षणाचे महत्त्व धर्मनिरपेक्ष राज्यातही मान्य करून पुढील शिफारसी केल्या आहेत :

१. सर्व शिक्षणसंस्थांच्या कामाची सुरुवात काही मिनिटांच्या स्तब्ध चिंतनाने व्हावी.

२. गौतम बुद्ध, कन्फ्यूशिअस, झरतुष्ट्र, सॉक्रेटिस, जीझस, शंकराचार्य, रामानुज, मध्वाचार्य, महंमद, कबीर, नानक, गांधी यांची चरित्रे पदवीच्या पहिल्या वर्षी शिकवावीत.

३. दुसऱ्या वर्षी जगातील प्रख्यात धर्मांतील मुख्य तत्त्वे शिकवावीत.

४. आणि तिसऱ्या वर्षी धर्माच्या तात्त्विक बाजूचा अभ्यास व्हावा.

## अर्धवट उपाययोजना

ज्या कारणांसाठी आपल्या मुलांना धर्मशिक्षण हवे असे आपण म्हणतो त्यांची पूर्ती या शिफारसींकडून होईल की नाही याची चर्चा जाणत्यांनी करावयास हवी. गेल्या बारा वर्षांत कमिशनने सुचविलेल्या कोणत्याही उपायाचा प्रयोग कॉलेजमध्ये झालेला दिसत नाही. या सूचना कमिशनच्या दप्तरातच पडून राहिल्या किंवा अशा सूचना केल्या गेल्या होत्या एवढाच ऐतिहासिक अर्थ त्यांना लाभल्याचे स्पष्ट आहे. घरी व शाळातून धर्म-शिक्षणाची कोणतीही तयारी नसताना कॉलेजमधील प्रौढ विद्यार्थ्यांसाठी स्तब्ध चिंतन ( सायलेंट मेडिटेशन ) आणि तेही भरगच्च भरलेल्या वर्गांतून किती शक्य आहे ? जगातील प्रमुख धर्मसंस्थापकांच्या चरित्राचा अभ्यास, सर्व धर्मांच्या प्रमुख तत्त्वांचे परिशीलन इत्यादि विषय सर्वांच्या अभ्यासात कसे समाविष्ट होणार ? धर्म व तत्त्वज्ञान हा पदवीचा विषय घेऊन अभ्यास

करणे हे धर्मशिक्षण नव्हे. शिवाय जर कदाचित् या शिफारशींप्रमाणे धर्म-शिक्षण चालू झाले असते तर इष्ट तो परिणाम घडून येण्यास त्यात कितपत वाव होता ? सन १९५२-५३ साली माध्यमिक शिक्षणाचा विचार करणाऱ्या मुदलियार-कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यात सबंध एक पानभर धर्मनीति-शिक्षणाचा विचार करण्यात आला आहे. धर्मशिक्षणाचे महत्त्व येथेही मान्य करण्यात आले आहे. धर्मशिक्षणाचे तीन पर्याय येथे सुचविण्यांत आले आहेत :

१. घरच्या वातावरणाचा उपयोग या कामी होण्यासारखा आहे.
२. शाळांतील शिक्षकांचे वर्तन व शाळेतील एकंदर वातावरण यांचे द्वाराही इष्ट तो परिणाम होण्यासारखा आहे.
३. एकंदर समाजातील जागृत मतही विचारात घेण्यासारखे आहे.

या पार्श्वभूमीवर काही उपायहि कमिशनने सुचविले आहेत. शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी सामुदायिक व सर्व धर्मांस समान असणारी प्रार्थना म्हणावी; नीतिशिक्षणावर अधिकारी व्यक्तींची व्याख्याने घडवावीत. पालकांच्या परवानगीने शाळेच्या वेळापत्रकाबाहेर विशिष्ट धर्माचे शिक्षण देण्यासही हरकत नसावी; असेही या रिपोर्टात सूचित केले आहे. याही कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन सात–आठ वर्षे होत आली; परंतु धर्म-शिक्षणाच्या बाबतीत काही प्रत्यक्ष पावले पडली असावीत असे वाटत नाही. या दोनही महत्त्वाच्या अहवालांचा मथितार्थ असा की आपल्या मुलांसाठी धर्मशिक्षण अगत्याचे आहे याबद्दल वाद नाही; पण या धर्मशिक्षणाचे स्वरूप कोणते असावे व ते कोणत्या पद्धतीने द्यावे. याबद्दल मात्र मतभेद होण्याची बरीच शक्यता आहे.

सर्व धर्मांची प्रमुख तत्त्वे बहुधा सारखीच आहेत. सत्य बोलावे, शेजाऱ्यावर प्रेम करावे, अहिंसक असावे, सदाचरणाने वागावे, दुसऱ्याच्या वस्तू चोरू नयेत, दुसऱ्याच्या मतास मान द्यावा, यांसारखी तत्त्वे सर्वत्र सारखी असल्याने यासंबंधी मतभेद होण्यासारखा नाही. शिवाय ही तत्त्वे धर्मशिक्षणासारख्या विषयातून नसली तरी इतर विषयातून शिकविली जातातच. शिवाय असे की सर्व धर्मांची तात्त्विक एकरूपता हा बुद्धिगम्य

विषय लहान मुलांना कोणती प्रेरणा देणार ? त्यांच्या मनावर कोणते संस्कार करणार ? त्यांच्या भावनिक विश्वाची इष्ट अशी जोपासना त्यायोगे कितपत होणार ? राम आणि रहिम वा महादेव आणि महंमद तात्त्विक दृष्ट्या एकरूप आहेत असे सांगितले तरी ' हरहर महादेव ! ' या गर्जनेने जी प्रेरणा ज्या लोकांना मिळते ती ' अल्ला हो अकबर ' ने मिळेल काय ? मिळावी; हे उत्तर तात्त्विक दृष्ट्या ठीक, नव्हे इष्टही आहे. पण सर्वसामान्य माणसाचे मन एवढे विशाल बनविण्याचे सारे प्रयत्न असफल झाले आहेत. किंबहुना असे प्रयत्न म्हणजे मानवी स्वभावास सोडूनच आहेत की काय अशी शंका जाणत्यांना येते. आणि म्हणून आपत्प्रसंगी, संकटकाळी त्या त्या देशाचे लोक आपापल्या देवदैवतांची प्रार्थना करू लागतात. कोणाचा वॉशिंग्टन असतो, कोणाचा महंमद असतो, कोणाचा लेनिन असतो, कोणाचा शिवाजी असतो. यात अदलाबदल झाली की सामान्य माणसाची सर्व शक्ति खुंटून जाईल. याच अनुरोधाने असे म्हणावेसे वाटते की, कोणास श्रीकृष्ण प्रेरक ठरेल, कोणास ख्रिस्त प्रेरक ठरेल. सर्व धर्मांची बौद्धिक व भावनिक अनुभूती एक आहे अशी जाणीव लाखात एखाद्याला येईल. तो अपवाद मानावा लागेल. त्या ऐक्याच्या अनुभूतीचे स्वरूप अंतिम सत्याच्या जवळचे असले तरी विकसित होऊ पाहणाऱ्या बालमनावर त्याचा तीव्र संस्कार उमटणे अशक्य होईल. घरामध्ये परंपरेने चालत येणाऱ्या आईबापांच्या धर्माचाच इष्ट असा परिणाम मुलांवर होत राहील; आणि याच धर्माचे शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे असे आग्रहाने म्हणावयाचे आहे.

**भारतीय धर्मांचेच शिक्षण हवे**

माझे हे प्रतिपादन आजच्या या युगात वाचकाना प्रतिगामी वृत्तीचे वाटेल. असे वाटले तरी मी हे मत तज्ज्ञांपुढे मांडून पाहण्याचे ठरविले आहे. आमच्या मुलांना धर्मशिक्षण हवे ते भारतीय धर्मांचे शिक्षण हवे. सर्व धर्म आपापल्या परीने मोठेच आहेत, सर्व धर्मप्रवर्तक श्रेष्ठ आहेत. सर्व देशातील साधुसंत एकाच श्रेणीचे आहेत, असे शिकविण्याची येथे गरज काय आहे ? येथे काय कोणी निराळे मत मांडणाऱ्याला हद्दपार केले आहे ? धर्माच्या नावाखाली येथे कोणी देशत्याग केला आहे ? धर्माविरुद्ध

बोलणारास येथे कोणी तुरुंगवास दिलेला नाही, कोणी कुणास जिवंत जाळले नाही. येथील धर्माने राजसत्तेवरही आक्रमण केले नाही. येथे धर्मावरून युद्धेही झालेली नाहीत. इतर धर्मांच्याबद्दलची सहिष्णुता येथे शिकविण्याची आवश्यकताच काय? सुमारे साठसत्तर वर्षांपूर्वीच आमच्या धर्माची सहिष्णुता शिकॅगोच्या परिषदेत विवेकानंदांनी गर्जून सांगितली. या आमच्या परम उदार धर्माला आजच्या शिक्षणात स्थान हवे. वेदांचा, उपनिषदांचा गीतेचा, रामायण-महाभारताचा धर्म आम्हांस हवा आहे. परंपरेच्या या उच्च धर्मतत्त्वांना आमची नवी पिढी पारखी होत चालली आहे. प्राचीन ऋषिमुनी, व्यास-वाल्मीकी, ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, तुलसीदास, कंबन, त्यागराज, चैतन्यदेव, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ यांच्या वाणीतून प्रकट झालेला धर्म, सामाजिक व वैयक्तिक या दोन्ही स्वरूपात आम्हांस हवा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने आम्हांस प्रेरणा मिळेल. आम्हांस आमची परंपरा समजेल. आमची श्रद्धास्थाने उजळून निघतील, आमच्या बुद्धिवादाला आधार सापडेल. झरतुष्ट्र, जीझस, कन्फ्यूशिअस यांचा अभ्यास आमची मुले करतीलच; पण आधी त्यांच्या मनावर आमच्या धर्माचे संस्कार करावयास हवेत. जगातील सर्व देव व धर्म एकरूप आहेत हा बुद्धिगम्य तत्त्वविचार आमच्या मुलांना समजण्यास अवघड जाणार नाही, कारण तीही आमच्याच धर्माची शिकवण आहे. पण घरच्या घरी रोज सकाळ-संध्याकाळी ज्याचे स्मरण आम्ही थोडा वेळ का होईना पण करावयाचे आहे ते आमच्या धर्माचे; आणि यासच आम्ही पारखे झाल्यामुळे आमच्या मुलांचे मन अनेक आवर्तांनी झाकळून गेले आहे. धड विश्वव्यापी मानवधर्म वा सर्व धर्मांचे ऐक्यही त्यांना समजत नाही, आणि धड स्वतःच्या धर्माचीही ओळख त्यांना नाही. यातून सर्व अनर्थ होईल की काय अशी धास्ती निर्माण झाली आहे. आमच्या धर्माच्या शिकवणुकीत कोणाचा द्वेष नाही, मत्सर नाही. येथे ईश्वरवादी आहेत, निरीश्वरवादी आहेत. कोणीही आपले मत येथे मांडावे, त्याला तीव्र विरोध युरोपच्या इतिहासात झाला तसा कधीच होणार नाही. ' हें विश्वचि माझे घर ' अशी ज्याची शिकवण तो दुसऱ्या संप्रदायाचा व धर्मपंथाचा द्वेष कसा करील ! आमच्यात अराजक माजले, कटकटी झाल्या, अनाचार वाढला, याचे कारण आम्ही

आमच्या उज्ज्वल धर्मास पारखे झालो हे होय. मध्ययुगीन काळानंतर धर्मांचे बाह्यांग जे कर्मकांड त्याकडेच आम्ही लक्ष दिले. नुसत्या कोरड्या व्रतवैकल्यांवरच जोर दिला, धर्माच्या नावाखाली फार मोठ्या संख्येने आम्ही आमच्या बांधवांना फार हीन लेखले. हे दोष नाकारून चालणार नाहीत आणि ते मान्य करूनही आम्हांस तारणारा आमचा धर्म आहे असेच म्हणावेसे वाटते.

सर्व प्रकारची ऐहिक संपन्नता उपलब्ध झाली, प्रापंचिक समाधान मिळाले, तरी माणसाचे मन भुकेले, अतृप्तच राहिले. संगीत, नृत्य, साहित्य इत्यादि कलांनी जसे त्यांच्या मनाचे पोषण होईल त्याचप्रमाणे धर्माच्या सत्य स्वरूपाची ओढही त्याला अस्वस्थ करील; आणि या अवस्थेतून त्याला खरे खरे शाश्वतचे मानसिक समाधान लाभेल. वाट्यास आलेले रोजचे कर्तव्यकर्म संपल्यावर आम्ही आमच्या मुलांना घेऊन, नम्र होऊन, थोडे अंतर्मुख होऊन संध्याकाळी व रात्रीच्या शांत वेळी देवासमोर बसलो, प्रार्थना केली, एकाद-दुसरा अभंग म्हटला, एखादे स्तोत्र वा अष्टक म्हटले तर आमच्या साऱ्या ऐहिक वैभवास एक प्रकारचे नवे ऐश्वर्य येईल. आपल्या मुलांची चित्तवृत्ति प्रसन्न होईल, उल्हसित राहील. शांत राहील. त्यांना नम्रता आपोआप समजेल. या वैयक्तिक धर्माच्या संस्कारामुळे समाजधर्मांचे महत्त्व त्याच्या विशेषेकरून ध्यानात येईल. ज्या चैतन्य तत्त्वाचा अंश माझ्यात आहे, तेच तत्त्व सर्व प्राणिमात्रात भरून राहिले आहे. हे मनावर बिंबल्यावर दुसऱ्याचा मत्सर माझ्याकडून होणार नाही. समाज-धर्माचा प्रारंभ या वैयक्तिक धर्मामधून आहे. धर्माने समाजाची धारणा होते हे खरे, पण ज्या समाजाची धारणा होते त्यातील व्यक्तीची धारणा हेही खऱ्या धर्मांचे प्रारंभाचे व महत्त्वाचे अंग मानावयास हवे. या व्यक्तिगत धर्मांचे संस्कार योग्य वेळी होत राहिले म्हणजे सामाजिक दुःख सहज ध्यानी येईल. जसे ज्ञानेश्वरांना आर्तांचे दुःख समजले, जसे एकनाथांना अस्पृश्यांचे दुःख समजले, तसे ‘ पुण्य परउपकार व पाप तें परपीडा ’; ‘ जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले ’; ‘ ज्यासि अपंगिता नाही, त्यासी धरी जो हृदयी, तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ’; ‘ देवाची पूजा हे भूतांचे पाळण ’ इत्यादि सामाजिक धर्मांचे विचार वैयक्तिक धर्माच्या सुखासनावर उभे आहेत. या वैयक्तिक

धर्माचे संस्कार जर मुलांच्या मनावर प्रथमपासून होतील तरच त्यांना दु:खितांचा खरा कळवळा येईल. आर्तांच्या हाकेस ते ओ देतील, पीडितांच्या मदतीस धावतील, दुसऱ्याचे सकंट निवारण करतील आणि स्वतः आपत्तीत आले, तर स्वतःच्याच बळावर मान वर करून ताठपणे उभे राहतील.

**आमची आजची गरज**

आणि या धर्माच्या शिक्षणाचे आदिपीठ आमचे घर हे आहे. पुन: पाठशाळा सुरू व्हाव्यात, मंदिरातून कीर्तन-प्रवचनांची लयलूट व्हावी, शाळा-कॉलेजातूनही आमच्या परंपरेच्या धर्माची शिकवण आमच्या मुलांना मिळावी असे मानले तरी या फार अवघड गोष्टी होऊन बसल्या आहेत. खरे म्हणजे हे सारे व्हावयास हवे. धर्मकल्पनांचा व विचारांचा प्रसार हा समाजात वारंवार करणे अगत्याचे असते. चांगल्या गोष्टी आपण लवकर विसरतो, स्खलनाकडे आपली प्रवृत्ती स्वभावतःच असते. अशा वेळी व्यास-वाल्मीकी, ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्यासारखे धर्मदीप आपणांस आसरा देतात, मार्ग दर्शवितात ऐहिकास लालचावलेल्या व म्हणून गोत्यात येणाऱ्या आपल्या मनास सावरतात. यासाठी या श्रेष्ठ विचारवंतांच्या व साधुसंतांच्या चरित्राचे, वाङ्मयाचे आमच्या परंपरेतील संस्कार आमच्या मुलांच्या मनावर व्हावयास हवेत. नाही तर वैज्ञानिक प्रगतीबरोबर आमचे ऐहिक वैभव वाढेल, आमच्यात यांत्रिक सुधारणा होतील, मोठे कारखाने उभे राहतील, प्रवासाची साधने वाढतील, पाटबंधाऱ्यांच्या योजना यशस्वी होतील, खेड्या-पाड्यात विजेचे दिवे झळकतील; पण हे सारे ज्या माणसासाठी त्याचे मनच वखवखलेले असेल तर मात्र आपल्या ऐहिक वैभवाचा साराच इमला कोसळून पडावयाचा. ऐहिक वैभवाने वैज्ञानिक प्रभावाने राष्ट्र उभे राहील पण ते टिकेल ते समाजात साधुसंतांच्या करवी धर्मकल्पनांच्या सततच्या होणाऱ्या प्रसारामुळे हा सिद्धान्त इतिहासाने सिद्ध केलेला आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनीच म्हटले आहे की, " राज्ये मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा ती कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाही होतो. " ही आमच्या पिढीची आजची प्रमुख गरज आहे.

♧ ♧ ♧

# ‘ मार्गदर्शन-चळवळी ’ची आवश्यकता

. १ .

य. गो. नितसुरे
बी. ए., एम्. एड्.

दुसरे महायुद्ध संपल्यापासून माध्यमिक शिक्षणाचा पुनर्घटनेकडे विविध देशातील शिक्षणतज्ज्ञांनी व राज्यकर्त्यांनी अधिक आस्थेने लक्ष पुरविण्यास सुरुवात केली आहे. माध्यमिक शिक्षणाला जगभर अधिक महत्त्व का दिले जाऊ लागले आहे याची कारणे अनेक जाहेत. काही राजकीय आहेत, काही आर्थिक आहेत, काही सामाजिक आहेत, परंतु या सर्वांचा परिणाम मात्र असा आहे की, माध्यमिक शिक्षणाकडे पाहण्याचा महायुद्धपूर्व दृष्टिकोन झपाट्याने बदलू लागला आहे.

देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला माध्यमिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली पाहिजे, असे प्रभावी लोकमत पुढारलेल्या देशात निर्माण झाले आहे. ‘ सेकंडरी एज्युकेशन फॉर ऑल ’ अशी घोषणा निवडणुकांच्या जाहीरनाम्यात अंतर्भूत करण्यात आलेली दिसत आहे. नव्यानेच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रातही अशीच अपेक्षा प्रबळ होऊ लागली आहे. कम्युनिस्ट देशात तर ती क्रांतीच्या कार्यक्रमातच समाविष्ट झालेली आहे.

## आजच्या शिक्षणाचे ध्येय कोणते ?

एक काळ असा होता की शिक्षणविषयक आकांक्षाची झेप मर्यादित होती. ‘ सक्तीचे प्राथमिक शिक्षण ’ प्रत्येक व्यक्तीला देण्यात आले तरी

व्यक्तीच्या, राष्ट्राच्या व जगाच्या स्थैर्याला अन् प्रगतीला ते उपकारक होईल असे मुत्सद्दयांना व विचारवंतांना वाटत असे. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर ही परिस्थिती एकदम बदलली. शिक्षणासंबंधीची अपेक्षा वाढली. बदललेल्या राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीने शिक्षणक्षेत्रापुढें एक नवे आह्वान उभे केले. हे आह्वान जबरदस्त होते.

हे आह्वान कोणत्या स्वरूपाचे आहे याची ओळख आपणा सर्वांना आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षांतील घडामोडींनी या आह्वानाचे स्वरूप अधिकच स्पष्ट केलेले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, आजच्या शिक्षणाकडून एक नवा माणूस व नवा जागतिक समाज निर्माण करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येऊ लागली आहे. कम्युनिस्ट राष्ट्रातील शिक्षण असो अगर कम्युनिस्टेतर राष्ट्रातील शिक्षण असो, त्या त्या राष्ट्रातील शिक्षणाचा घाट जागतिक गरजांच्या संदर्भात बदलला जाऊ लागला आहे. राष्ट्रवादाचे व राष्ट्रीय गरजांचे महत्त्व पूर्वीइतके प्रभावी मानणे अवघड होऊं लागले आहे. राष्ट्रवाद व शिक्षण यांचा परस्परसंबंध एका मर्यादेपर्यंत शिक्षणाला उपकारकच ठरलेला आहे. तथापि, शिक्षण हे राष्ट्रवादाच्या हाती सापडलेले साधन किंवा हत्यार होण्यामुळे शिक्षणाची प्रगती खुंटते असाही अनुभव आलेला आहे.

आजच्या जगातील बदललेल्या परिस्थितीत शिक्षणाकडून फार वेगळ्या प्रकारची अपेक्षा केली जात आहे. भोवतालची परिस्थिती फार झपाट्याने बदलली आहे व एकसारखी बदलत आहे. या बदलाशी शिक्षणाने एकसारखे अनुसंधान राखावे अशी स्थूलमानाने ही अपेक्षा आहे विशेषतः, ही अपेक्षा माध्यामिक व उच्च शिक्षणासंबंधी अधिक उत्कट स्वरूपात मांडली जात आहे.

### एका आक्षेपाला उत्तर

या प्रकारची अपेक्षा व्यक्त करण्यात येऊ लागल्यामुळे आजच्या शिक्षणात अस्थिरता व व्यवहारवादी दृष्टिकोनाचा अतिरेक निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे, असा काही विचारवंतांचा आक्षेप आहे. परंतु याला उत्तर असे देण्यात येते की, गतिमान राहणे हे

शिक्षणाचे आद्य कर्तव्य आहे. भोवतालच्या परिस्थितीमधील बदल आत्मसात करणे ही शिक्षणाची अंगभूत जबाबदारीच आहे. विद्यार्थ्याला जें ज्ञान व शक्ती देण्याची गरज निर्माण झाली आहे ते देण्याचे उपाय शोधून काढणे ही समाजाची जबाबदारीच आहे. विद्यार्थ्याला काय देणे आवश्यक आहे हें शिक्षणाने सर्वस्वी ठरविण्याचा काळ केव्हाच नव्हता, परंतु, राष्ट्राराष्ट्रातून जेव्हा जेव्हा स्थितिस्थापकता व प्रगतीचा अभाव निर्माण होतो तेव्हा तेव्हा शिक्षणक्षेत्र स्वावलंबी आहे व ते स्वायत्ततेने आपली ध्येयधोरणे ठरविते असा समज किंवा गैरसमज निर्माण झालेला आहे. तथापि, शिक्षणाचे ध्येयधोरण, उद्दिष्टे, कार्यपद्धति व संचलन भोवतालच्या समाजाच्या आंदोलनातूनही ठरत असते. सुदैवाने, हा विचारच सध्या जगभर प्रभावी आहे आणि त्यामुळे शिक्षणाने बदललेल्या व बदलणाऱ्या परिस्थितीशी अनुसंधान राखावे अशी अपेक्षा शिक्षणाकडून करण्यात येत आहे.

## शिक्षक-विद्यार्थी संबंध असमाधानकारक

माध्यमिक शिक्षणाकडून करण्यात येणारी ही अपेक्षा वाढल्यापासून गेल्या दहा-पंधरा वर्षात शैक्षणिक कार्यक्रमासंबंधी काही मूलभूत व महत्त्वाचे बदल पुढारलेल्या देशातून घडून येऊ लागले आहेत. त्यातील अनेक बदलांचे स्वरूप दीर्घकाळ प्रयोगिक राहणार आहे. परंतु शिक्षणविषयक बदलांचे स्वरूप दीर्घकाळ प्रयोगिक राहाते हे ज्याना माहीत आहे त्याना त्याबद्दल आश्चर्य वाटणार नाही. असो. महायुद्धोत्तर बदललेल्या परिस्थितीत जगभर जो एक नवा कार्यक्रम किंवा प्रयोग पुढारलेल्या देशातील शैक्षणिक क्षेत्रात स्थिर होऊ लागला आहे त्याचा विचार करण्याकडे आता वळू या.

हा कार्यक्रम मुख्यत: शिक्षक व विद्यार्थी यांच्या परस्पर नात्यासंबंधाचा आहे. आजच्या बदललेल्या परिस्थितीत शिक्षक विद्यार्थ्याला काय देऊ शकेल व काय देऊ शकणार नाही आणि जे देऊ शकणार नाही त्याबद्दल अन्य व्यवस्था काय करायची यासंबंधीचा आहे.

विद्यार्थ्याच्या व्यक्तित्वविकासात व इतर जीवनसाधनेत शिक्षकाच्या वैयक्तिक संबंधाचा प्रभाव किती असतो हे सर्वांना ठाऊकच आहे. तो

प्रभाव, ते नाजूक व इष्ट नाते कमी लेखण्याच्या प्रवृत्तीतून वरील फेर विचार निर्माण झाला आहे असे समजता कामा नये. शिक्षक–विद्यार्थी संबंधाचा फेरविचार करण्याची कारणे कोणत्याही पूर्वग्रहातून, संकुचित दृष्टिकोनातून अगर शिक्षकाची जबाबदारी कमी करण्याच्या अगर समजण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेली नाहीत.

मग हा फेरविचार का सुरू झाला आहे ? हा फेरविचार का सुरू झाला आहे याचे काहीसे दिग्दर्शन या लेखाच्या प्रास्ताविक भागात आलेच आहे. शिक्षणावरील जबाबदारी वाढली आहे असे जे म्हटले आहे त्याचाच अर्थ असा की आजच्या शिक्षकावरील जबाबदारी अधिक वाढली आहे. आणि ही जबाबदारी तो कशी पार पाडणार आहे ? ही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडण्याची शक्ती त्याच्यात आहे काय ?

**अल्पवयांतच जागतिक शांततेचा विचार**

वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले तर असे म्हणावेसे वाटते की आजच्या विद्यार्थ्यांकडून पूर्वीच्या पिढीतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक अपेक्षा करण्यात येऊ लागली आहे. त्याच्यावरील जबाबदारी वाढविण्यात आली आहे. अल्पवयातच त्याला जागतिक शांततेचा विचार करावा लागत आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अफाट प्रगतीमुळे त्याच्या बुद्धीचा अन् कर्तृत्वाचा अधिक कस लागत आहे.

एवढे मात्र खरे की, आजचे शिक्षक व विद्यार्थी ज्या वातावरणात काम करीत आहेत ते वातावरण अत्यंत गुंतागुंतीचे ( complex ) झाले आहे. आणि मानवी कार्यकुशलतेच्या व विकासाच्या सद्यःपरिस्थितीत आहेत त्या मर्यादा लक्षात घेता असे म्हणावेसे वाटते की रूढ, पारंपरिक पद्धतीने चाललेल्या आजच्या शिक्षक-विद्यार्थी संबंधात अनेक मूलभूत बदल झपाट्याने करण्याची आवश्यकता आहे.

दिवसातील पाचसहा तास विद्यार्थी शाळेत येणार आणि त्यानंतर पुन्हा त्याचा व शिक्षकाचा किंवा आखीव शैक्षणिक कार्यक्रमांचा संबंधही येणार नाही ही परिस्थिती हितावह नाही. आजच्या वातावरणात विद्यार्थ्याला शाळेव्यतिरिक्त उरलेल्या वेळातही मार्गदर्शन मिळण्याची गरज फार आहे

हे अगदी स्पष्ट आहे. परंतु शाळेतील विषय शिकविणाऱ्या शिक्षकावरच ही जबाबदारी टाकणे इष्ट ठरेल काय ? अनेक कारणांमुळे असे करता येणार नाही, असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. आणि त्यामुळेच, अमेरिका, इंग्लंड इत्यादि पुढारलेल्या देशांतून ' मार्गदर्शन-चळवळ ' ( Guidance Movement ) या स्वरूपाच्या कार्यक्रमाची आखणी करण्याकडे लक्ष पुरविण्यात येऊ लागले आहे.

## मार्गदर्शनाचे सार्वत्रिक स्वरूप

' मार्गदर्शन-चळवळी 'ची कल्पना पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामधील काळात जन्माला आली; तथापि तिची सार्वत्रिक उपयुक्तता गेल्या दहा-पंधरा वर्षांतच सर्वांना पटू लागली आहे.

राजघराण्यांतील व सरदारघराण्यातील मुलांमुलींना ज्या तऱ्हेचें मार्गदर्शन पूर्वी मिळत असे त्यापेक्षा आधुनिक काळातील ' मार्गदर्शन-चळवळी ' चें स्वरूप व हेतू वेगळे आहेत हे येथे सांगावयास पाहिजे असे नाही. समाजवाद व लोकशाही या तत्त्वज्ञानांच्या संदर्भातच मार्गदर्शन-चळवळीची प्रगती सध्याच्या काळात अपेक्षित आहे.

उच्च प्रतीची बुद्धी असणाऱ्या काही थोड्या विद्यार्थ्यांना जसे मार्गदर्शन मिळावे त्याचप्रमाणे ज्यांचे व्यक्तिमत्त्व अधुरे, पंगू किंवा सर्वसामान्य आहे अशा विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शनाचा लाभ मिळावा. किंबहुना, प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गरजेप्रमाणे मार्गदर्शन देण्याची व्यवस्था झाली पाहिजे अशी ' मार्गदर्शन-चळवळी 'ची चौकट सध्या सर्व देशांतून निर्माण करण्यात येत आहे.

येथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. ज्या वेळी एखाद्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन केले जाते त्या वेळी त्याच्या वैयक्तिक गरजांचा विचार करणे एवढीच बाब अभिप्रेत नसते. त्याच्या कुटुंबातील आर्थिक व इतर परिस्थिती, समाजाची त्या मुलाकडून अपेक्षा ( जर विशिष्ट काळात एखादे राष्ट्र युद्धविषयक तयारीत गुंतले असेल तर त्या वातावरणाचा व सामाजिक गरजांचा विचार मार्गदर्शन देणाऱ्यांकडून अवश्य केला जातो. ) आणि राष्ट्रीय विकासाचा

टप्पा—या साऱ्या व इतर संबंधित बाबींचा विचार केल्याशिवाय एखाद्या मुलाचे ( अगर मुलीचे ) भवितव्य ठरविणे शक्य होत नाही.

## भारतातील सद्यःपरिस्थिती

वर मांडलेले विचार लक्षात घेता आपल्या देशात नुकत्याच सुरू झालेल्या मार्गदर्शनविषयक कार्यक्रमांची उपयुक्तता व उभारणी यांचा आपण फेरविचार करण्याची गरज आहे असे मला सुचवावेसे वाटते. ‘ मार्गदर्शन–चळवळ ’ असे नामाभिधान ज्याला यथार्थपणे देता येईल अशी चळवळ अद्यापि आपल्या देशात सुरू झालेली नाही. त्यासंबंधी वाढती जाणीव मात्र अलीकडे अलीकडे आपल्या समाजांत निर्माण होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

विद्यार्थ्यांनी कोणते शिक्षणक्रम व व्यवसाय निवडावे यासंबंधी मार्गदर्शन देणारे काही कार्यक्रम सध्या विशिष्ट प्रमाणात का होईना, परंतु यशस्वीपणे चालू आहेत. करीअर कॉन्फरन्सेस, भरविणे, करीअर मास्टर्सतर्फे शाळेच्या वेळात विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर माहिती सांगणे, राज्यातील दोनतीन ठिकाणी ‘ व्होकेशनल गायडन्स ब्यूरो ’ चालविणे व अशा ब्यूरोतून विशिष्ट स्वरूपाची माहिती देणे अन् काही चाचण्या घेणे, बी. एड्. च्या शिक्षणक्रमात ‘ शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन, या विषयाचा अंतर्भाव करणे इत्यादि काही गोष्टी शिक्षणखाते व विद्यापीठे यांच्या सहकार्याने अस्तित्वात आल्याचे दृश्य आपणास दिसत आहे.

## मार्गदर्शन-चळवळ उभारण्याची निकड

तथापि, ज्या गतीने व ज्या प्रकारची काहीशी संकुचित ध्येयधोरणे पुढे ठेवून ही प्रगती आपल्याकडे चालू आहे ती फारशी समाधानकारक आहे असे म्हणणे शक्य नाही. सभोवतालच्या समाजात जी गुंतागुंत निर्माण होत आहे ती लक्षात घेता आपल्या शिक्षण-व्यवस्थेने मार्गदर्शन-चळवळीची चौकट उभारण्याकडे अधिक आस्थेने व पद्धतशीरपणे लक्ष द्यावयास हवे आहे. वास्तविक पुढारलेल्या देशांतील अनुभव, तांत्रिक ज्ञान व कामाची आखणी आपल्या उपयोगी पडू शकेल अशी वस्तुस्थिती आहे. तथापि, या

कामाकडे द्यावे तसे लक्ष राजकीय पुढाऱ्यांनी, शिक्षणतज्ज्ञांनी व इतर घटकांनी दिलेले दिसत नाही.

माध्यमिक शिक्षणाच्या फलश्रुतीवर व यशस्वितेवर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते ही गोष्ट आता सर्वमान्य झालेली आहे. परंतु, माध्यमिक शिक्षण हाच आपल्या देशातील शिक्षणव्यवस्थेत सध्या फार कच्चा दुवा झाला आहे. ही परिस्थिती जर झपाट्याने पालटावयास हवी असेल तर, आपल्या शिक्षणव्यवस्थेत आधुनिक स्वरूपाचे 'मार्गदर्शन--चळवळी'चे कार्यक्रम उभारण्याकडे आपण तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. याकरिता अनेक नव्या गोष्टी कराव्या लागतील; पारंपरिक विचार करणारांच्या रूढ कल्पनांना धक्केही द्यावे लागतील. परंतु तसे न केले तर आज विद्यार्थ्यांमध्ये जी हेतुशून्यता, शिस्तीचा अभाव व परीक्षेचे ओझे वाहण्याची संकुचित वृत्ती पाहावयास मिळते ती वाढत जाईल. शाळांच्या व शिक्षकांच्या हातून विद्यार्थी निसटत चालला असून कोचिंग क्लासेस व गाईडस् यांच्या कचाट्यात तो सापडला आहे. दररोज संध्याकाळी, साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी व मोठाल्या सुट्ट्यांच्या काळात विद्यार्थ्यांनी काय करावे यांचे व इतर शेकडो बारीकसारीक बाबींचे मार्गदर्शन कोणीही समाधानकारकपणे करीत नाही व त्याची नेमकी जबाबदारी कोणावर आहे याचा कोणालाच पत्ता नाही. ही परिस्थिती झपाट्याने बदलण्यासाठी आपण सर्वांनी एका नव्या शास्त्रीय व आधुनिक कार्यक्रमाचा आश्रय करण्याची निकड आहे. हा कार्यक्रम म्हणजेच विद्यार्थ्यांच्या संपूर्ण जीवनाच्या प्रगतीची जबाबदारी उचलणारा 'मार्गदर्शन-चळवळी'चा कार्यक्रम. मार्गदर्शन-चळवळीविना आधुनिक काळातील माध्यमिक ( व उच्च ) शिक्षण म्हणजे एका पायाने चालण्याचा विक्रम करण्यासारखेच अनैसर्गिक आहे. तसे यापुढे चालू राहू नये म्हणून संबंधित घटकांनी एकत्र येऊन आधुनिक काळाचे हे आह्वान स्वीकारावे व 'मार्गदर्शन-चळवळी'ची संपूर्ण आधुनिक व शास्त्रीय चौकट या देशात निर्माण करावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२२० दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

REFBK-0013096
REFBK-0013096

आमच्या रौप्य महोत्सवप्रसंगीं

## प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| शिखांचा इतिहास | — | न. वि. गाडगीळ |
| विन्स्टन् चर्चिल | — | वसन्त शां. देसाई |
| जीवन-संगीत | — | सौ. यमुना शेवडे |
| स्वामी रामतीर्थ | — | गो. प्र. भावे |
| माध्यमिक शिक्षण : काही समस्या | — | |
| साहित्यिकांच्या सहवासांत | — | म. श्री. दीक्षित |
| जयां अंगीं मोठेपण | — | श्री. वा. काळे |
| रंग आणि रेखा | — | प्र. न. जोशी |
| टिळकांची कविता (भाग ४ था) | — | कै. ना. वा. टिळक |
| कांहीं तरी | — | हरि सखाराम गोखले |
| नोबेल पारितोषिकाचे मानकरी (भाग १ ते ३) | — | चं. रा. तळपदे |
| सुलभ विज्ञान माला (भाग १ ते ६) | — | सौ. शांता पंडसे |
| हॅन्स अन्डरसनच्या परीकथा (भाग १ ला) | — | सौ. सुमति पायगांवकर |
| भावना | — | सौ. लीला फणसळकर |
| गाभारा | — | गो. रा. दोडके |
| नाना गोष्टी (भाग २ रा) | — | ल. रा. गोडबोले |
| सनूसनाटी | — | ल. ना. गोखले |
| प्राचीन महाराष्ट्र (भाग २ रा) | — | श्री. व्यं. केतकर |
| आमची ओळख (भाग १ ते ३) | — | पां. पि. घरत |

व्हीनस प्रकाशन

३८१ क, शनवार पेठ : पुणें २